PRGI NO-MAHMAR/2023/86554

जागतिक लोकसंख्या दिन

समतावादी

# मुक्त संवाद

एक समृद्ध वाचन यात्रा

पत्रिका

जुलै २०२६ वर्ष तिसरे : अंक ११





**Nature Tours** ©
DOMESTIC & INTERNATIONAL TOURS

# Explore the Paradise of Turtuk

Where Nature, Culture & Serenity Come Together!

## A JOURNEY YOU'LL NEVER FORGET

Scenic Landscapes | Rich Culture | Peaceful Walks | Local Cuisine






## Experience Turtuk

### Like Never Before!

Turtuk – the last village on the India-Pakistan border, offers breathtaking views, warm hospitality, and unforgettable memories.

## PACKAGE HIGHLIGHTS

- Comfortable Transport
- Local Expert Guide
- Homestay / Hotel Stay
- Delicious Local Meals
- Sightseeing & Activities
- Safe & Hassle-Free Travel






**LET'S CREATE MEMORIES THAT LAST A LIFETIME!**

9822339466
9422245784

www.thenaturetours.com

**प्रकाशक, संपादक**
डॉ. विवेक कोरडे

**कार्यकारी संपादक**
शेखर देशमुख

**सल्लागार संपादक मंडळ**
सुलक्षणा महाजन, डॉ. शैलजा बरुरे, लोकेश शेवडे, राजेंद्र साठे, सुजय शास्त्री, सायली परांजपे

**संपादकीय साहाय्य**
सुमेधा कुवळेकर

**व्यवस्थापन सल्लागार**
विकास नाईक

**शीर्षनाम आरेखन**
विजय नार्वेकर

**मुखपृष्ठ**
स्विडिश शिल्पकार जोहान पी. जॉनसन यांची 'जंक आर्ट' कला प्रकारातील बॉईज थ्री ही कलाकृती

**अंकातील छायाचित्रे**
इंटरनेटवरून साभार

**अंक मांडणी, सजावट**
वैभव केसरकर (८५५१८५०४६२)

**व्यवस्थापक**
चंद्रकांत माळगवे (९६१९८२३६७२)

**विनामूल्य वितरणासाठी**
'समतावादी मुक्त-संवाद पत्रिका' हे मासिक मालक विवेक दत्तात्रय कोरडे यांच्या करिता, प्रकाशक विवेक दत्तात्रय कोरडे यांनी जागृती प्रिंटर्स, त्रिमूर्ती ९१, घारपुरे पथ, गिरगाव, मुंबई ४००००४ येथे छापून रूम नं. ४६, पहिला मजला, आंबेडकर सदन, सखाराम बालाजी पवार मार्ग, करीरोड नाका, डिलाइल रोड, मुंबई ४०००१३ येथून प्रसिद्ध केले.
संपादक : विवेक दत्तात्रय कोरडे

'Samatawadi MuktSanvad Patrika' Monthly Publication owned by Vivek Dattatrey Korde Printed at Jagruti Printers,Trimurti 91, Gharpure Path, Giragaon Mumbai 400004 and Published at Room No. 46, First Floor, SakharamBalaji Pawar Marg, Currey Road Naka, Delisle Road, Mumbai 400013
Editor : Vivek Dattatrey Korde
E mail Id- smsp.mumbai@gmail.com

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी, प्रतिक्रियांशी अथवा विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अंतरंग

✶ प्रबोधनाची वारी ओस का पडली?
– संपादकीय २

✶ अखेर सीतेचे दर्शन झाले...
– राजा पटवर्धन ४

✶ हे तर देशविरोधी कृत्य
– डॉ. विवेक कोरडे ११

✶ शिक्षण हक्क म्हणजे काय ग ताई?
– श्रीरंजन आवटे १६

✶ इंदिरा युगातील आश्वासने आणि अंतर्विरोध
– हितेश पोतदार २०

✶ जगाचा गुरुत्वमध्य सरकतो आहे?
– डॉ. मोहन द्रविड २६

✶ लगती है आग तो...
– रवि आमले ३२

✶ कार्यसंस्कृतीचा चिनी आविष्कार
– गजानन जोशी ३७

✶ प्रथम तुज न पाहता
– प्रा. श्रीनिवास हेमाडे ४३

✶ चार्वाक नेमके कोण होते?
– जगदीश काबरे ४९

✶ आडवळणाचा संशोधक
– सायली परांजपे ५४

✶ आनंदकाका : माझं जिव्हाळघरटं
– पार्थ एम एन ५७

✶ सी–१०, मुनिरका; केवळ पत्ता नव्हे...
– आशय गुणे ६१

✶ विन्सेंट वॅन गॉफ : वैज्ञानिक अंतर्दृष्टीचा चित्रवंत
– डॉ. आनंद जोशी ६५

✶ गाणे जिथे उगवते...
– गणेश मनोहर कुलकर्णी ७१

✶ स्त्री मनाचे चौकटबाह्य स्वगत
– डॉ. नेहा सावंत ७६

✶ सुलेखाचं रुदन
वनफूल; अनुवाद : सुमती जोशी ८२

✶ गुणवत्ता आयुर्वेदिक औषधांची
– डॉ. श्रीराम सावरीकर ८५



# प्रबोधनाची वारी ओस का पडली?

**संपादकीय**





**जुलै महिना विठ्ठलाचा. भक्ती परंपरेचा हा आधारू. या परंपरेने संतांची मांदियाळी घडवली. विश्वकल्याणाचा विचार हा या परंपरेचा केंद्रबिंदू. तो केंद्रबिंदू प्रमाण मानून त्यातूनच आधुनिक महाराष्ट्रात प्रबोधनाची एक वाट फुटली. ईश्वरभक्ती, धर्माचरण, धर्मचिंतन, धर्मचिकित्सा अशा एकेका पैलूची उकल करत एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून महाराष्ट्राच्या समाज आणि सांस्कृतिक जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न चिंतनपरंपरेचा वारसा सांगणाऱ्या विभूतींनी केला. आज सतत उठताबसता पुरोगामी महाराष्ट्र... पुरोगामी महाराष्ट्र असा घोष केला जातो, या मागे त्या काळच्या विचारवंतांचे कर्तृत्व होते. त्यांचा वारसा गगनभेदी घोषणा देऊन सांगितला जातो, पण आताच्या घडीला त्याचे महत्त्व जोखतोय कोण, त्या वारशाचे प्रतिधिनित्व महाराष्ट्रात करतोय कोण? प्रबोधनाच्या वारीचा रस्ता अडवतोय कोण?**

समाजाची दिशा नेमके ठरवते कोण? समाजाच्या विचारांना दिशा नेमके देते कोण? किंवा विचारांची दिशा नेमके बुजवते कोण?

भारत हा लोकशाही राष्ट्र म्हणून उदयास येण्यापूर्वी अगदी इंग्रजांचा अमल सुरू होण्याच्या आधीच्या मध्ययुगीन कालखंडाचा विचार करता, राजे-महाराजे, बादशाह यांनी मुख्यतः धर्मप्रेरणेतून (प्रसंगी कडवट धर्मनिष्ठेतूनही) त्या त्या काळच्या समाजांची दिशा ठरवली. दिशा देण्याचे काम अर्थातच धर्म आणि राजसत्तेच्या आचारविचारांशी बांधिलकी राखणाऱ्यांनी केले. मात्र, आधुनिक राष्ट्राच्या इतिहासात हे काम त्या त्या काळातल्या राजकारणाने, बलिष्ठ विचारधारांनी केले. त्यातूनच समाजाला नवे भान येत गेले. भान हरपतही गेले. आजचे वर्तमान त्यास अपवाद नाही.

महाराष्ट्राला समाज आणि धर्म प्रबोधन परंपरेचा समृद्ध वारसा लाभल्याचे सांगताना आपण थकत नाही. हा वारसा अर्थातच चक्रधर स्वामींपासून ज्ञानेश्वर-तुकारामांपर्यंतच्या संतांच्या भक्तिमार्गाच्या भक्कम पायावर उभा होता. पण या दोहोंचेही भान आजच्या समाजाला, आषाढी एकादशीनिमित्त भिन्नभिन्न मार्गांनी विठ्ठलभक्तीचे दर्शन-प्रदर्शन घडवणाऱ्यांना कितपत उरलेय,

विठ्ठलभक्तांचे राजकीय नेतृत्व करणाऱ्यांना कितपत उरलेय? या संबंधात शंकाचशंका आहेत.

मुळात, प्रबोधन कशास म्हणायचे, याचाच समाजास थांगपत्ता नाही, अशी सध्याची स्थिती आहे. दि. के. बेडेकरांनी 'धर्मचिंतन' (प्रकाशकः लोकवाङ्मय गृह) या ग्रंथातून प्रबोधनाची व्याख्या नेमकेपणाने विषद केली, ती अशीः अनेकविध प्रेरणा उत्पन्न होऊन त्यांना एकवटून दिशा देणारे, समूहाच्या अंतर्यामी सर्वंकषता निर्माण करणारे आणि आपल्या आत्म्याचा शोध घेण्यास प्रवृत्त करणारे जे व्यापक तत्त्व, त्याला यथार्थतेने प्रबोधन म्हणता येते.

याच ग्रंथातून त्यांनी महाराष्ट्रातल्या प्रबोधनाचा १८४० पासूनचा काळ अधोरेखित केला आहे आणि या प्रबोधनाचे प्रभावी अंग म्हणून त्यावेळच्या धर्मप्रबोधन प्रक्रियेची उकलही केली आहे. १८१० ते १८२० या कालखंडात तिकडे बंगालात मिशनरींच्या प्रचाराविरोधात उभे ठाकत राजा राममोहन रॉय यांनी ब्राह्मो समाजाची स्थापना केली. १८४० पासून मुंबईत दादोबा पांडुरंग यांनी परमहंस सभा स्थापन केली. १८६७ मध्ये न्या. रानडेंनी प्रार्थना समाजाची स्थापना केली, तर १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. यातल्या परमहंस सभेची दीक्षा घेण्यासाठी पावाचा तुकडा खाण्याचा विधी पाळला जात असे. परमहंस सभेच्या मंडळींना मूर्तिपूजा मान्य नव्हती, पण एकेश्वरी मत मान्य होते. प्रार्थना सभेची स्थापना केलेल्या न्या. रानडेंना विश्वधर्मी, मानवधर्मी समाजाची प्रस्थापना करायची होती. त्या मार्गावर चालण्यासाठी भारतीय त्यातही मराठी संतांच्या भक्तिमार्गाशी जवळचे नाते जोडले होते. सत्यशोधक समाजही विश्वाचा निर्माता (फुले त्यास निर्मिक संबोधायचे) ईश्वर करुणेने व्यापलेल्या पित्यासमान आहे आणि सर्व मानवांचे आपापसात बंधुत्वाचे नाते आहे, या विचारांनी मार्गक्रमण करू पाहत होता.

ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज आणि सत्यशोधक या तीन प्रबोधनाच्या मार्गावर चाललेल्या धर्मपंथांपुढे सामाजिक सुधारणा हे लक्ष्य होतेच, परंतु त्या सुधारणेला भगवंताचे अधिष्ठान (राष्ट्रीयत्वाच्या भावनेला धर्माचे अधिष्ठान हवे याच विचारातून गांधीजींनी स्वातंत्र्यचळवळीचा मार्ग आखला होता.) असले पाहिजे, अशीही श्रद्धा होती. यात अन्याय, विषमता यांना ते अधर्म मानत होते आणि न्याय, समता, करुणेच्या प्रस्थापनेसाठी लढा देणे हीच खरी ईश्वरी आज्ञा आहे, अशीही त्यांची भावना होती. अर्थातच, १८९० च्या सुमारास ब्रिटिशांनी भारतातल्या धर्मपंथांतल्या भेदांचा गैरफायदा घेत दंग्याधोप्यांना प्रोत्साहन देत भेदनीती अवलंबली. परिणामी, प्रार्थना समाजाचा प्रसार-प्रभाव मंदावत गेला, सत्यशोधक समाजाने वेगळी दिशा धरली, हेही त्या काळचे एक वास्तव होते. परंतु, धर्म प्रबोधनाचे सर्वंकष प्रबोधनाशी एकरुपतेचे नाते होते, असे ठोस प्रतिपादन या ग्रंथात बेडेकरांनी केले आहे. ते कायमस्वरुपी लक्षात ठेवावे असे आहे. आजच्या घडीला चित्र हे आहे की, वर्तमानातल्या वर्चस्ववादी राजकीय विचाराने धर्म, ईश्वर, प्रबोधन या शब्दांच्या व्याख्या उलटयापालट्या करून टाकल्या आहेत. त्या ना न्या. रानडेंच्या विचारांशी जुळणाऱ्या आहेत, ना फुले, डॉ. आंबेडकरांच्या विचारांशी त्याचे काही साधर्म्य आहे. परधर्मद्वेषी राजकारणाने घडवलेल्या वर्तमान धर्माचा झेंडा खांद्यावर घेऊन विठ्ठलाच्या दारी जाणाऱ्यांची संख्या कैक पटींनी वाढतेय. निखळ विठ्ठलभक्ती करणाऱ्यांची तसेच प्रबोधन परंपरेचे मर्म ओळखण्यांची संख्या रोडावत चाललीय. संत परंपरेचा वारसा सांगणारे भलेभले विद्वान खुनशी राजकारणापुढे नतमस्तक तरी झालेले दिसताहेत किंवा सत्ताधाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसणाऱ्यांनी जवळच्यास ऐकूही जाणार नाही, इतक्या क्षीण आवाजात निषेध नोंदवण्याचे कर्तव्य पार पाडताहेत.

या समाजाला आणि समाजाचे नेतृत्त्व करणाऱ्या विद्यमान राजकीय – सामाजिक – सांस्कृतिक नेतृत्वाला भक्ती चळवळीचे मर्म कळले आहे का, रानड्यांच्या नजरेतल्या ईश्वरी तत्त्वांचे तरी आकलन झाले आहे, का हा प्रश्न इथे अप्रस्तुत ठरू नये. ते अर्थातच झालेले नाही, हे आजचे वर्तमान सांगतेय. पंढरपूरच्या वारीचे उघडउघड उत्सवीकरण झालेले आहे, सत्ताधारी वारीचा वापर करून सांस्कृतिक राजकारण साधताहेत. बेडेकरांच्या शब्दांत मांडायचे तर, शहरी आणि ग्रामीण माणसाची धर्मभावना रुढींच्या जंजाळात विकृत आणि दुर्बळ झालेली आहे. म्हणूनही विठ्ठल भक्तीचे निव्वळ दर्शन-प्रदर्शन हाच कार्यक्रम गेली कित्येक वर्षे पार पडतोय. यंदाही तो जोमाने पार पडेल. त्यात विठ्ठलभक्तीतून स्फुरलेल्या धर्म आणि समाज प्रबोधनाच्या जाणिवेची नजरेत भरणारी अनुपस्थिती प्रत्येक समंजस माणसास अस्वस्थ करणारी ठरेल.

**– कार्यकारी संपादक**

# अखेर सीतेचे दर्शन झाले...



राजा पटवर्धन

पुनर्शोध रामायणाचा



**लंकापती रावणाचा ठावठिकाणा संपातीकडून हनुमानाला समजला (संपाती हा जटायूचा भाऊ) शंभर योजने समुद्र उल्लंघून लंका गाठणे हे फक्त देव, पक्षी आणि राक्षसांनाच शक्य होते, अशी समजूत होती. तोपर्यंत कुणा मानवाने आणि वानराने असा पराक्रम केलेला नव्हता. जांबुवंताच्या प्रेरणेने हे काम हनुमानाने केले. कधी महाकाय भीम, तर कधी महारूद्र रुप धारण करण्याचे सुप्त सामर्थ्य या केसरी नंदन पवनपुत्राजवळ होते. वेळप्रसंगी त्याने शरीराचे अतिसूक्ष्म कीटकाइतके संकोचन करूनही हा पराक्रम केला. पण एवढे साधून भागणार नव्हते. खरा पेच पुढे होता...**

लंकेत येऊन रावणाचा पराभव आजवर कुणीही केलेला नव्हता. अजिंक्य रावणाच्या अभेद्य लंकेत हनुमान शिरला इतकेच नव्हे, तर त्याने अशोक वनही गाठले होते. आज पर्यंत न पाहिलेल्या सीतेची ओळख पटवणे निश्चितच अवघड होते. शोक दूर करणाऱ्या एका अशोक (शिंशपा) वृक्षावर हनुमान बसला. या वाटिकेची निर्मिती सुद्धा स्वर्गातील देवांचा वास्तुविशारद – शिल्पकार – स्थापत्यकार (मराठीत 'आर्किटेक्ट') विश्वकर्म्यानेच केलेली होती. भव्यता आणि सौंदर्याची लयलूट असलेले दुसरे नंदनवन होते. नावाप्रमाणेच सोन्याची लंका होती ती. पण सीता? ती कशी ओळखू? या विवंचनेत मारुती होता. अचानक त्याला विद्रूप, ओंगळ राक्षशिणींचा समूह दिसला. प्रत्येकीला काहींना काही व्यंग होते. प्रत्येकीच्या त्वचेचे रंगही वेगवेगळे. पशुमुखे, गाढव घोडे गुरांसारखे कान, अमर्याद मोठे जबडे, या किळसवाण्या राक्षशिणींच्या हातात विविध शस्त्रे होती. काही जणी मद्य पीत पीत मांस खात होत्या. अशा भयाण राक्षशिणींच्या गराड्यात अशोक वृक्षाच्या बुंध्याला भूमीवर टेकून बसलेली एक अधोमुख स्त्री दिसली. हनुमान दुरून तिचे निरीक्षण करीत लपून बसला. फिकट पिवळी कांतीची स्त्री, त्याला निखळून पडलेल्या एका उल्केसारखी भासली. शरदातील दुर्बल चांदणीचा तिच्यात भास झाला. शरीर मलीन असले, तरी मृगनयने लपत नव्हती. अंगावर फारशी भूषणे नसूनही चेहऱ्यावर तेज होते. हनुमानाने फांदी बदलून निरीक्षण चालूच ठेवले. ती अशक्त दीन, क्षीण, कृश, व्यथित, विरहाकुल, अंग चोरुन बसलेली होती, दुर्बल असूनही पद्मलोचना होती.

तेवढ्यात एका बाजूने वेद घोष स्पष्ट ऐकू येऊ लागला. ती राक्षशिणींनी घेरलेली स्त्री अश्रू ढाळताना दिसली. रावण अशोक वृक्षाजवळ येताच हनुमानाने मानवी स्त्रीचा खणखणीत आवाज स्पष्ट ऐकला. आवाजाला धार होती. ''या दुष्ट रावणाचा प्रभू रामचंद्राच्या हातून वध होईल!'' हनुमानाने सीतेचा आवाज प्रथमच ऐकला.

**कामातुर रावणाचे आर्जव**

एक दिवस सीता प्राप्त होईल, या आशेवर कामातुर रावण दररोज सीतेची भेट घेण्यासाठी प्रभात फेरी करायचा. ''सीते तू अशी देह आक्रसून बसू नकोस. तू मला आवडतेस, माझ्या प्रेमाचा स्वीकार कर. इथे कुणी मानव किंवा अन्य राक्षस येऊ शकत नाही. तू भयमुक्त हो. परस्त्रीकडे जाणे किंवा तिला पळवून आणणे हा राक्षस धर्म आहे.'' ''हे जानकी! तू अनुकूल होईपर्यंत मी तुला स्पर्श करणार नाही, अगदी काम पीडित असलो तरीही करणार नाही. तू शोक सोड, सर्व सुखांची इच्छा धर. जगात जे जे उत्तम आणि दिव्य आहे ते सर्व काही तुला मिळेल. तुझे तारूण्य फुकट घालवू नकोस. तू त्रिभुवनातली सुंदर स्त्री आहेस. तुला पाहून विचलित होणार नाही, असा पुरुषच नाही. ब्रह्मदेवही याला अपवाद नाही. (ब्रह्मदेवाचा मानस पुत्र – पुलस्त्य, पुलस्त्याचा पुत्र विश्रवा, विश्रवाचा पुत्र रावण) होय! मी ब्रह्मदेवाचा पणतूच हे बोलत आहे, तुझ्याकडे टक लावून पाहिले, की माझे मन अडकते. नेत्र खिळून राहतात. तू रामाचा मोह सोडून दे. माझी पट्टराणी हो. कित्येक राजांना पराभूत करून त्यांची रत्ने तिजोरीत आहेत, ती सर्व तुझीच आहेत. (हा माझ्या जवळचा परकीय चलनरुपी भरपूर साठा आहे.) तुझ्यासाठी मी काय करणार नाही? सारी पृथ्वी जिंकून जनकाला आंदण (हुंडा) देईन. माझ्या बरोबरीचा कुणी वीर त्रैलोक्यात नाही. सर्व देवा सुरांचे रथध्वज मी मातीमोल केले. कुणीही माझ्यासमोर युद्धार्थ उभा राहायला तयार नाही. तू त्रैलोक्याची साम्राज्ञी म्हणून मिरवताना मला पाहायचे आहे. माझे वैभव एकदा पाहा. त्या रामाशी तुला काहीही कर्तव्य नाही. तो वनवासात जमिनीवर झोपणारा, नैराश्याने गांजलेला व्रतस्थ जिवंत तरी आहे का? तू माझे मन हरण केले आहेस. मला कोणत्याही अन्य स्त्रीबद्दल आकर्षण उरलेले नाही. तुला जे जे हवे ते सर्व मिळेल. तप बळ पराक्रम धन तेज आणि यश इ.सर्व बाबतीत राम माझी बरोबरी करूच शकत नाही.''

**सीतेचे राक्षसांना प्रत्युत्तर**

रावणाचे हे भयंकर आर्जवी वचन ऐकून भूमीवरील एक गवताची काडी प्रतिकाराचे रुप म्हणून सीतेने हाती घेतली. ''माझी अभिलाषा धरण्याची तुझी ना लायकी, ना पात्रता. मी महान कुळात उत्पन्न झालेली, पवित्र कुळात विवाह करून आलेली स्त्री आहे. मी तुझ्यासाठी परस्त्री आहे.'' असे म्हणून रावणाकडे पाठ करून उभी राहिली. ''हे निशाचरा!, तुझ्या स्त्रियांचे जसे तू रक्षण करतोस, तसे इतर स्त्रियांचेही तू रक्षण कर. नपेक्षा तुझा सर्वत्र तिरस्कारच होईल. तुझ्या राज्यात कुणी सज्जन आहेत, की नाहीत? तेही तुला उपदेश करीत नसतील तर तुझा विनाश ठरलेला आहे. तुझ्या मृत्यूनंतर लोक आनंदाने नाचतील. धन किंवा वैभव यांचा मला मोह नाही. सूर्याची त्याच्या तेजापासून जशी फारकत होत नाही, तशीच मी



*रावण हे अमर्याद लोभाचे, शरीर वासनेचे आणि टोकाच्या दुष्टत्वाचे प्रतीक. यातच त्याच्या सर्वनाशाची बिजे दडली होती...*

रामापासून वेगळी नाही. तूच आमची भेट घडवून दे. तुला तुझी ही नगरी उद्‌ध्वस्त करायची नसेल आणि जिवंत राहायचे असेल तर रामाशी मैत्री कर. एकवेळ तू यमाच्या तावडीतून सुटशील, पण राम तुला ठार मारल्याशिवाय राहणार नाही. राम आणि लक्ष्मण तुझ्यासह सर्व राक्षसांचा संहार करतील. एकट्या रामाने तुझ्या चौदा हजार संपूर्ण राक्षस सेनेला नष्ट केले. संपूर्ण जनस्थान राक्षसमुक्त झाले. राम-लक्ष्मण दोघेही हजर नसताना तू चोरासारखे मला पळवून आणलेस. ते आश्रमात असते, तर तेव्हाच तुझी शिकार झाली असती. जेव्हा तुला राम-लक्ष्मणाची चाहूल लागेल, तेव्हा दोन वाघांना पाहून कुत्र्याची होईल, तशी तुझी अवस्था होईल. हे रावणा, ती वेळ फार दूर नाही. तुला पळता भुई थोडी होईल. वीज पडून वृक्ष जसा जळून जातो, तशी तुझी अवस्था रामाच्या बाणाने होईल.''

रावणासमोर असे निडर बोलणे तो पर्यंत कुणी ऐकलेले नव्हते. ''मी रागाला आवर घालतोय, कारण तुझ्यावरील प्रेम मला तसे करायला भाग पाडीत आहे. तुझे बोलणे वध करण्याच्याच लायकीचे आहे. तुझ्या उद्धट बोलण्याला प्राण दंडाचीच शिक्षा योग्य आहे. मी तुला दिलेली मुदत दोन महिन्यांत संपेल. त्यानंतर तुला माझ्या शय्येवर संमतीने न आल्यास, अन्य उपायाने आणलेच जाईल. तसे न झाल्यास आमचे आचारी तुझ्या शरीराची मला न्याहरी करून घालतील.''

मृत्यूचे भय सीतेला नव्हतेच. हे राक्षसा, ''मी रामाची धर्मपत्नी आहे. तुझे बोलणेच तुझ्या नाशाला कारण ठरेल. रामासमोर तू म्हणजे, हत्तीसमोर ससा. माझ्या तेजानेच मी तुझे भस्म करू शकेन. रामाची आज्ञा न घेता मी तसे केले, तर माझे पुण्य संपून जाईल. म्हणूनच तू आत्तापर्यंत वाचला आहेस. तू स्वतःला जो शूर समजतोस, तर मग तू भ्याड चोरासारखा मला पळवून का आणलेस?''

रावणाने क्रूर राक्षशिणींना ताकीद दिली, ''तुम्ही कोणत्याही उपायाने ही जानकी मला वश होईल, असे करा'' त्याच्या दरडावण्याने मंदोदरी धन्यमालिनीसह तिथे आली. ''माझ्या सारख्या धर्मपत्नीला सोडून, या दुबळ्या मलीन मानवी स्त्रीची काय मनधरणी करता? तुमच्यासह दिव्य भोग या स्त्रीच्या नशिबीच नाहीत. हे विधात्यालाच मान्य नसेल तर, का हा व्यर्थ खटाटोप? तुम्हाला हे शोभत तर अजिबात नाही.'' मंदोदरीच्या या बोलण्याने उद्विग्न झालेला काममोहित रावण अक्षरशः हात चोळत निघून गेला, तेव्हा सीता थरथरत होती.

**राक्षशिणींच्या धमक्या**

आता रावणाचीच संमती मिळाली म्हटल्यावर सर्व राक्षशिणी एकत्र आल्या. एकजुटीने विकटा, हरिजटा, दुर्मुखी, अजामुखी इ.ना पुन्हा एकत्र केल्या. ''इंद्रासह तेहतीसांना ज्याने जिंकले, त्या विश्वप्रतापी महावीर महाबली राक्षसेंद्राला बिनबोभाट वश हो. जो सूर्याचा प्रकाश थांबवितो, वाऱ्याला रोखून धरतो, मेघांना जलवर्षाव करायला भाग पाडतो, अशा रावणाची भार्या होण्याचे तू का नाकारतेस? त्याचे ऐक नाहीतर उगाच मरशील. तुझ्या दारात सुख उभे असताना त्या विफल रामासाठी अशी उगाच का झुरतेस?'' त्यावर निर्भय होऊन सीता त्यांना म्हणाली, ''तुमचे हे पापी बोलणेच निष्फळ आहे. एक मानवकन्या कधी राक्षसपत्नी झाली आहे का? तुम्ही मला खुशाल खाऊन टाका. माझे पती दीन असोत, राज्य हीन असोत. सुवर्चा जशी सूर्याशी, शची जशी इंद्राशी, रोहिणी जशी चंद्राशी, अरुंधती जशी वसिष्ठाशी, लोपामुद्रा अगस्त्याशी, सुकन्या च्यवनाशी, सावित्री सत्यवानाशी, तशीच मी इक्ष्वाकु वंशातील रामाशीच एकनिष्ठ आहे.''

राक्षशिणी सीतेला खाऊन टाकण्याच्या मन:स्थितीत तर नाहीत ना? असे भासत असताना इकडे झाडात लपलेला हनुमान सावध झाला. सीता नेमक्या त्याच वृक्षाखाली येऊन बसली ज्यावर हनुमान लपून होता. राक्षशिणी पुन्हा एकवटल्या. ''तुझ्या जोड्या आम्ही खूप ऐकल्या. रावण सीतेची आणखी एक जोडी आम्हाला पाहायची आहे. आज पर्यंत आम्हाला तुझी थोडी दया यायची. आता नाही.''

''रावणाच्या अंत:पुरातच तुझी जागा आहे. समुद्रापार रावण तुला घेऊन आला, तो या अशोक वृक्षाखाली मातीत बसायला नाही. त्याला आपला पती मान, नाहीतर तुझी छाती फोडून तुझे रक्त आम्ही पिऊ.'' चंडोदरी राक्षसीने गर्जनाच केली. तिचे धमकावणे अजूनही संपले नव्हते. ''तुला पाहिल्यापासून तुझे मांस कधी खाईन, असे मला झाले होते. पण रावणाची करडी नजर होती म्हणूनच तू वाचलीत.'' प्रशंसा राक्षशीण पुढे सरसावली ''हिचा गळा दाबूनच मारूया आणि रावणाला सांगू या सीता मेली म्हणून.'' ''नको नको हिचे समान तुकडे करून ठेवले की रावणच सांगेल, ''खाऊन मोकळ्या व्हा.'' यावर सगळ्या जणींचे एकमत झाले.'' ''थांबा थांबा! मी सर्व दु:ख हारण मद्य आणते. निकुंभीदेवीसमोर नृत्य करून यथेच्छ मद्य पिऊ या नंतर सीतेच्या मांसावर ताव मारूया.''

सीता त्यांच्या देखत धीर सोडून रडू लागली. (सुंदर कांड. सर्ग २४/४७)

**निर्वाणीचे स्वगत**

सीतेने धावा सुरू केला. ''हे रामा, हे लक्ष्मणा! हे कौसल्ये, हे सुमित्रे! (यात कैकेयी नाही) पंडितांनी मला शिकवले की, वेळ आल्याशिवाय मृत्यू येत नाही,'' ''रामदर्शनाला पारखी झालेली मी, या कैदाशिणींच्या वेढ्यात छळ सोसते आहे, तरीही जिवंत आहे. पती दर्शनासाठी मी झिजते, तडफडते आहे. या राक्षशिणींची अभद्र तोंडे बघण्यापेक्षा मी प्राणत्यागच करते.''

सीतेची ही अवस्था मन थाऱ्यावर (भ्रांत चित्त) नसल्याचे दर्शवते. वाल्मिकींनी उन्मत्त प्रमत्त होऊन ती स्वत:शीच (बडबडत) बोलत होती असे म्हटले आहे. थोडक्यात, मी यांच्याशिवाय जगूच शकत नाही असे म्हणून सीता स्वत:चा धि:कार करू लागली होती. ती स्वतःशीच बोलत म्हणाली, ''रामाच्या विरहातही मी जिवंत कशी? त्या दुष्ट रावणाच्या अंगाला मी डाव्या पायाच्या बोटांनीही शिवणार नाही. हे राक्षशिणींनो तुम्ही मला कापा, चिरा, तुकडे करा, जाळून भस्म करा, त्या दुष्ट रावणाच्या आसपासही मी फिरकणार नाही.''

''समुद्रवलयांकित लंकेत येणे इतरांना अशक्य असले तरी रामाला ते शक्य होईल, असे मला वाटते. पण मी इथे लंकेत आहे हेच रामाला माहिती नसेल तर? मग तो राम लंका जाळायला महासागराची वाफ करायला, रावणाची कीर्ती धुळीस मिळवून त्याचा सर्वनाश करायला आलाच असता. हे सर्व होईल जेव्हा रामाला मी कुठे आहे, हे समजेल तेव्हा. माझ्या विरहाने व्याकूळ झालेल्या रामाने देहत्याग तर केला नसेल? म्हणूनच तर मला दिसत नाहीत. रावणानेच कपटाने त्या राम-लक्ष्मणाचा घात तर केला नसेल? आता मीच प्राणत्याग करून मोकळी होते!''

**त्रिजटेचे भयसूचक दुःस्वप्न**

सीतेचे हे सर्व स्वगत राक्षशिणींनी ऐकले. ही 'ब्रेकिंग न्यूज' सर्व प्रथम रावणाला सांगायला त्या सुसाट धावत सुटणार एवढ्यात झोपेतून जागी झालेल्या त्रिजटेने त्यांना अडवले. ''मी फार सूचक असे भयंकर स्वप्न बघितले. रामाचा विजय आणि समस्त राक्षसांचा नाश हा त्या स्वप्नाचा सरळ अर्थ निघतो.'' ते ऐकून सर्व राक्षशिणींची घाबरगुंडी उडाली. त्या भयभीत होऊन गेल्या.'' आकाशातून जाणारी एक शिबिका पाहिली. तिला पांढरेशुभ्र अनेक घोडे होते. पांढऱ्या फुलांच्या माळा घातलेले, पांढरी वस्त्रे परिधान केलेले ते दोघे इथे उतरले. ''त्रिजटे! ते दोघे कोण?'' ''दुसरे कोण? राम आणि लक्ष्मण!'' मग आणखी काय पाहिलेस तू त्रिजटे? सीतेनेही शुभ्र पांढरी वस्त्रे नेसली होती. सागराने वेढलेल्या श्वेत पर्वतावर राम सीतेसह आहे. चार दातांच्या हत्तीवर राम लक्ष्मण सीतेसह आरूढ झालेले आहेत. आकाशात उड्डाण करून सीता सूर्य आणि चंद्राला आपल्या हातानी पुसत आहे. हत्तीची ती अंबारी लंकेवर अंतराळात स्थिरावली आहे. तिथेच पुष्पक विमानातून तिघेजण उत्तरेकडे झेपावले... आणि मी जागी झाले. ''आणि हो, मला स्वप्नात रावणही दिसला. त्याने मुंडन केले होते. अंगाला तेल चोपडून लालवस्त्रे चढवीत होता, तो. मदिरा पिऊन झिंगलेला उन्मत्तही दिसत होता. त्याची लाल वस्त्रे आता काळीकुट्ट झाली होती. रावण पुष्पकातून जमिनीवर पडला. एक स्त्री त्याला फराफरा ओढीत नेत होती. आणखी एक स्वप्न पडले. रावण काळी वस्त्रे नेसून दक्षिणेकडे जात होता. नाचत होता. जोर जोरात हसत होता. आता तो तेल पीत होता. पुन्हा तो रथातून

खाली पडला. तो आता निर्लज्ज होऊन नग्न फिरत होता. धडपडत चिखलात पडत होता. पुन्हा एक स्त्री त्याला फरफटवीत होती. ती एक चिखलात बरबटलेली काळी स्त्री होती. कुंभकर्णही त्यात सामील होता. रावणाच्या सर्व पुत्रांनी मुंडने केली होती. मग गाढवे आणि उंट दिसले. अचानक एक श्वेत छत्र दिसले. एका विशाल हत्तीवर बसलेल्या बिभीषणाला मी पाहिले.'' त्रिजटेचे स्वप्न कथन सुरूच होते. ''मग पुढे?'' राक्षशिणींचे घसे कोरडे पडले... ''शेवटी लंका पुरी सर्व वैभवासह सागरात बुडालेली मी पाहिली.'' ''आणि नंतर काय झाले?''

''एक सांगायलाच मी विसरले. तत्पूर्वी एका महाकाय चपळ वानराने संपूर्ण लंका त्या आधी जाळली हेही मी पाहिले.'' त्रिजटा आता संपूर्ण जागी होती. ''हे राक्षशिणींनो, तुम्ही आता सावध राहा. सीतेला त्रास देऊ नका. तुम्ही आता तिची माफीच मागा. राक्षसांना आता रामाकडून भय उत्पन्न झाले आहे. सीतेला वंदन करूनही तुम्ही रामाकडून तुमचे संरक्षण करू शकता. माझ्या स्वप्नाचा अर्थ पुन्हा एकदा ऐका. रावणाचा विनाश आणि रामाचा विजय पाहायला फार काळ उरलेला नाही.'' त्रिजटा तिचे स्वप्न कथन करत होती, तेव्हा सीता जवळच होती. वृक्षांवरचे पक्षी मंजूळ स्वरात सीतेचे सांत्वन करीत होते.

**सीतेची आत्मवंचना**

एकीकडे सीतेचे विचारमंथन सुरूच होते, तिच्या मनात आत्महत्येचा विचार त्रिजटेच्या स्वप्न कथनानंतर पुन्हा डोकावला. ''रावण जर मला मारणारच असेल तर आत्महत्येच्या पातकाचा मला दोष लागणारच नाही. मातेला वाचवण्यासाठी जर गर्भाचे तुकडे करावे लागले (शल्यकृंत: म्हणजे शल्य चिकित्सक किंवा सर्जन होय. असा वा.रा.मधे उल्लेख आहे) पंचवटीतील पर्णकुटीत मृत्यूच मायावी रुप घेऊन आला असावा, मी मोहित झाले. मीच मूर्ख म्हणून राम-लक्ष्मणांना त्या सोनेरी मृगास पकडायला पाठवले.'' (विपत्ती काल समीप आला की बुद्धी मलीन होते)

सीतेने आपली चूक इथे मान्य केली आहे. पण त्याही स्थितीत मनाचा तोल संपूर्ण गमावलेला नाही. ती विचारते, ''मी कुठेही अधर्म केला नाही, अनन्य यातना छळ सहन केला, पातिव्रत्य धर्माचे पालन केले, हे सर्व फुकट गेले का? तुमच्या एकपत्नी व्रताचे तरी फळ कोणते? १४ वर्षांनी तुम्ही अयोध्येत परत जाल, तेव्हा अनेक स्त्रियांशी विवाह करून सुखोपभोग घ्याल. हे श्रीरामा, मी तुमच्यावरच प्रेम करते. चिरकाल माझे हृदय तुमच्याशीच जोडलेले राहील. माझे सर्व तप आणि प्राणत्याग व्यर्थ आहे का? माझ्या जीवनाचाच मी धि:कार करते. पण मला इथे धारदार शस्त्र किंवा विष कोण देणार?''

अशा खिन्न अवस्थेत ती अशोक वृक्षाखाली उभी राहिली, तेव्हा तिला शुभ शकुन जाणवले. त्रिजटेलाही जाणवले होते. सोनेरी रंगाचा तिचा मलिन पितांबर थोडा सरकला हा मात्र निश्चित शुभ शकुन होता. पापणी आणि बाहूंचे स्फुरणही तिला जाणवले होतेच. सीतेची आशा पालवली होती. थकवा दूर झाला होता. मनस्तापही शांत झाला होता.

**हनुमानाची द्विधावस्था**

शिंशपा (अशोक) वृक्षावर बसलेला हनुमान सर्व निरखित होता. सीतेचे सांत्वन करण्याची योग्य वेळ आणि संधीचा तो विचार करू लागला. सीतेची आत्महत्या टाळणे ही सर्वाधिक प्राथमिक गरज होती. कोणत्या रुपात सीतेसमोर जाऊ? कोणत्या भाषेत संवाद करू? संस्कृत भाषेत बोललो, तर मी रावणाचा हेर आहे, असा ती तर्क करील. मानवी भाषेतच हा संवाद हवा. वानर रुपात गेलो, मानवी भाषा वापरली तरी ती भयभीत होईल. ती मला रावणच समजून मोठ्याने ओरडेल. राक्षशिणी शस्त्रे परजून पुन्हा परततील. मी वृक्षांवर उड्या मारणेही धोकादायकच. थेट राक्षसच येतील. युद्ध उद्‌भवेल. या क्षणी मला युद्धात गुंतून चालणार नाही. सगळीकडून पेच आहे. मधुर आवाजात राम चरित्र गुणगान करावे, हे उत्तम!

इक्ष्वाकु कुळापासून सुरुवात करून सत्यवचनी दशरथाचे सर्व विशेषणांसह वर्णन केले. त्याचा ज्येष्ठ पुत्र श्रीराम. तो पित्याचा लाडका. श्रेष्ठ धनुर्धारी. शस्त्र शास्त्र निपुण. स्वजन हितकारी. पित्याच्या आज्ञेचे पालन करण्यासाठी त्याने वनवास स्वीकारला. पत्नी सीता आणि बंधू लक्ष्मणही सोबत वनात गेले. रावणाचे जनस्थान नष्ट झाल्याने, रावणाने राम पत्नी सीतेचे अपहरण केले. सोनेरी हरिण आणि मारीचाचाही उल्लेख केला. नंतरचा राम-लक्ष्मण यांचा सीतेविना झालेला प्रवास. सुग्रीव भेट. वालीचा वध. सुग्रीव राजाचा मंत्री म्हणून शतयोजन दूर लंकेत जटायूबंधू संपातीने ठावठिकाणा दिल्यानंतर मी येथे आलो. रामाने वर्णन केल्याप्रमाणे तिला मी पाहिले. ओळखले. एवढे प्रदीर्घ ओळख गान झाल्यावर हनुमान थांबला. सीतेने मान वर केल्यावर झाडावरच्या हनुमानाला प्रथमच पाहिले. वर्ण पिंगट. श्वेत वस्त्र. त्याच्या डोळ्यांची चमक सोन्यासारखी

होती. तो नम्रपणे बसून होता. ते रूप पाहून तिचे भान हरपले. तो वानर तिच्यासमोर हात जोडून उभा होता. सीता भानावर आली आणि तिने रामा! लक्ष्मणा! अशा हाका मारल्या. हे स्वप्न की भास? राम चिंतनात मी सतत मग्न असते, म्हणूनच ही रामकथा कानी पडली. पण हा वानर सविनय समोर उभा असून बोलत आहे. तिने आपल्या पित्यासह बृहस्पती अग्नी आणि इंद्राला नमस्कार केला. या वनचरकपीने जे सांगितले ते सत्य असो.

''हे कमल लोचन देवी, आपल्या नेत्रातून आसवे का गळत आहेत? कृपया आपली ओळख सांगावी. चंद्राचा विरह सहन न झाल्याने पृथ्वीवर उतरलेली तारका रोहिणीच माझ्यासमोर आहे का? वसिष्ठमुनी रागावले म्हणून रुसलेली अरुंधती मी पाहातोय का? तू देवता असण्यापेक्षा कुणी साम्राज्ञी वा राजपुत्री आहेस का? जनस्थानातून रावणाने अपहरण करून आणलेली राम पत्नी सीता असशील, तर तुझे शुभ चिंतितो. मला वाटते माझा कयास बरोबर आहे. रामाचे नाव उच्चारताच तुमचा चेहरा खुलला.'' हनुमानाच्या त्या म्हणण्यावर सीता म्हणाली, ''हे कपी श्रेष्ठा, पृथ्वीवरील सर्व राजात श्रेष्ठ शत्रुसंहारक दशरथ राजाची मी सून आहे. विदेह राजा जनकाची मी पुत्री भगवान रामाचीच पत्नी आहे. राजगुरू वसिष्ठानी राज्याभिषेकाची सर्व तयारी केली असूनही कैकेयीच्या हट्टामुळे रामाला वनवासात जावे लागले. त्यामागची सर्व हकिगत कैकेयीनेच दशरथादेखत रामाला सांगितली. रामाने तसे वचन दिले, ते पाळले. प्राण जायची वेळ आली तरी राम खोटे बोलत नाहीत.''

''रामाने वनात जाण्यासाठी वल्कले धारण केली. माता पित्यांनी मला वनात जाण्यास सांगितले नव्हते. तरीही मी त्यांच्या पाठोपाठ वनात जायला निघाले. रामाचा धाकटा बंधू लक्ष्मणही वल्कले नेसून आमच्या बरोबरच निघाला. त्यापूर्वी आम्ही कधीच अरण्यात राहिलेलो नव्हतो. दंडकारण्यात राहताना दुष्ट रावणाने मला पळवून आणले. मला दोन महिन्यांचा अवधी मिळाला आहे. त्या मुदतीत मी वश झाले नाही, तर तो मला मारून टाकणार आहे.'' सीतेने आत्मकथन करताना काहीच लपवले नाही.

**संशय मनी दाटला पण...**

''देवी, मी रामाचाच दूत आहे. त्याचा संदेश ऐका. ते खुशाल असून तुमचे कुशल त्यांना समजण्यासाठी ते आतुर आहेत. दोन्ही ज्ञानी दशरथनंदन कुशलच आहेत. लक्ष्मणाने तुमच्यासाठी मुद्दाम प्रणाम सांगितला आहे.'' सीतेचा चेहरा एकदम प्रफुल्लित झाला. दोघांनाही या भेटीमुळे आनंद झाला. हनुमान सीतेच्या थोडा जवळ जाताच ती दचकली. घाबरली. तिच्या मनात शंका आली. हा रावणतर नसेल ना? माझ्या मनातले सर्व बोलले ही चुकच झाली? तिने स्वत:ला दोष दिला. हनुमानाने तिच्या चरणाना वंदन केले तरी वाटले, की ही रावणाची चाल आहे. तिने हनुमानाच्या वंदनाला कोरडा प्रतिसादही दिला नाही. ''हे रावणा तू मायावी रूप घेऊन हे नाटक केले असले, तर ते निंद्य आहे. पंचवटीत तू संन्यासी बनून आला होतास, आता वानर बनून आला आहेस? पण तुला मी वानर म्हणून जेव्हा पाहिले, तेव्हा मला प्रसन्न वाटले होते. तू जर रामाचा खरा दूत असशील तर रामाचे आणखी गुण सांग. स्वप्नात वानर दिसणे अशुभ समजतात. मी तर प्रत्यक्षात रामदूताला पाहत आहे. की मी मोहाला बळी पडले आहे?'' सीता आपले स्वगत मनातच म्हणत होती. हा वानर रुपी रावणच आहे. तिने हनुमंता बरोबरचे संभाषणच बंद केले. हनुमानाला हे जाणवले. मी राम दूतच, याची आणखी खात्री पटवायली हवी. म्हणून मग त्याने रामाची महती पुन्हा ऐकवली. रूप आणि पराक्रमाचे वर्णन केले. मृगरुपी मारिचाची हकिगत ऐकवली. सुग्रीवानेही तुमचे कुशल चिंतिले आहे, याचा उच्चार केला. तुम्ही लवकरच सुग्रीवासह राम-लक्ष्मणाना पाहाल. मी त्या सुग्रीवाचा मंत्री हनुमान आहे. शंभर योजने समुद्र उल्लंघून रावणाच्या नाकावर टिच्चून लंकेत प्रवेश केला आहे. मोठ्या शर्थीने तुमच्या भेटीला आलो आहे. माझ्याबद्दल शंका घेऊ नका.''

''हे कपिवर, तुमची रामाची पहिली भेट वर्णन करून सांगा. राम-लक्ष्मणाच्या देहाचे वर्णन करा.''

सीतेला सर्व माहीत असूनही ती आपल्याला वर्णन करायला सांगते यामुळे हनुमान सुखावला. हे जानकी! रामाचे नेत्र फुललेल्या कमळासारखे. मुख चंद्राप्रमाणे मनोहर. तेज सूर्याप्रमाणे. गळा शंखासारखा.(कंबुग्रीव:) भव्य रुंद खांदे, गळ्याजवळचे हाड मांसात रुतलेले, डोळ्यांच्या कडा लालसर, इ.सर्व प्रकारे तपशीलवार वर्णन केल्यावर हनुमान म्हणाला, ''त्यांचा आवाज दुंदुभीप्रमाणे गंभीर असून शरीराचा रंग शामल (मेघवर्ण) आहे. सर्व अवयव सुडौल आहेत.'' हनुमानाने डोक्यापासून पायापर्यंत सर्व अवयवांचे इतके सविस्तर वर्णन केले, की सीतेच्या हाती जणू सर्व फोटोच दिले. एक्सरे, एम आर आय काय सांगतील, त्यापेक्षा अधिक तपशील दिले. राम पुढून पाठून कसा दिसतो, हेही सांगितले. (एखाद्या पुरुषाचे

इतके प्रदीर्घ वर्णन अन्य कुठे कुणी क्वचितच वाचले असेल) सीतेने लक्ष्मणाचेही वर्णन करायला सांगितले होते. हनुमानाने तेही थोडक्यात केले. तो सुमित्रेचा पुत्र रामाचा सावत्र भाऊ (वैमात्र:) असा तपशील देऊन त्याची कांती सुवर्णाची चमक असलेली (सुवर्णच्छवि:) आहे, हे ठासून सांगितले आणि राम सावळ्या रंगाचा असा पुन्हा उल्लेख केला. सीतेने राम हनुमान पहिल्याभेटीचे वर्णन करायलाही सांगितले होते. तेही सविस्तर सांगताना आपण ऋष्यमुख पर्वतावर दोघा बंधुंना आपल्या खांद्यावर बसवून परागंदा सुग्रीवासमोर नेले, हेही हनुमानाने सांगितले. तुम्ही पर्वतावर टाकलेली आभूषणे सुग्रीवाने रामाला दाखवली. ती पाहून राम कसा गहिवरला हेही हनुमानाने सीतेला सांगितले. राम तुमच्या विरहाने किती व्यथित आहे, याचे वर्णन सीतेने ऐकले. ''हे जनक नंदिनी! रावणाचा वध करून राम तुम्हाला भेटतील. मी दाशरथी रामाचा दूत असून तुमचा शोध घेतला आहे. मी वायुपुत्र आहे. मी अंजनीसुत आहे. केसरी नंदन आहे. सर्वश्रेष्ठ वीर काकुत्स्थ्य राम कुशल आहेत.''

हनुमानाने एवढे सगळे कथन केले, तेव्हा कुठे सीतेचा विश्वास बसला. हनुमान हा रावण नसून खरोखरीचा राम दूतच आहे, याची खात्री पटली. तिच्या नेत्रातून आनंदाश्रू सुरू झाले. ''माते, तुम्ही धैर्य धारण करा. मी तुमची कोणती सेवा करू?'' हनुमानाने राममुद्रा सीतेच्या हाती सुपूर्द केली. सीतेचा चेहरा उजळून निघाला.

''ही संदेश-भेट सद्‌भाग्यसूचक आहे असेच मी मानते.'' सीता आनंदाने वदली.

**ही लेखमाला मूळ वाल्मिकी रामायणावरून बेतली आहे. रामायणातल्या घटना-प्रसंगांचा अर्थ-अन्वयार्थ लावताना, सादरीकरणात खेळकरपणा आणण्यासाठी आधुनिक प्रतीके/प्रतिमा/घटना/कृतींची जोड देण्यात आली आहे. हेतू हा की, रामायणकालीन घटनांचा आजच्या संदर्भाने वाचकांना सुलभपणे अर्थ लागावा.**

**– संपादक**

**राजा पटवर्धन हे विज्ञान, समाज, अर्थशास्त्र आणि संस्कृतीचे अभ्यासक आहेत. कोकणातील विकास प्रकल्पांवर यांनी सातत्यपूर्ण लेखन केले आहे. यांचे 'पुनर्शोध महाभारताचा' हे पुस्तक प्रकाशित आहे.**
**संपर्क : ९८२००७१९७५**

## मुखपृष्ठाविषयी



**जुलै महिना जागतिक लोकसंख्या दिनाचा. जगाची या घटकेची लोकसंख्या ८३० कोटींच्या घरात. आधुनिक प्रगती, स्थैर्य यांचा लोकसंख्या वाढीशी थेट संबंध. जितकी प्रगती अधिक तितकी लोकसंख्येत घट, हे साधारण गणित. अर्थातच प्रगती एक समान पातळीवर होत नाही. म्हणूनच वाढीच्या वेगाचे गणित राष्ट्रागणिक बदलते. विशेषत: आधुनिक प्रगतीचे वारे पूर्णांशाने न पोहोचलेल्या लॅटिन अमेरिका, आफ्रिका आणि आशिया खंडात लोकसंख्येचा भार अधिक असल्याचे दिसते. या राष्ट्रात जगण्याचा संघर्ष तीव्र असतो. त्यात माणसे आणि समाज चेहरा हरवून बसतात. त्याचे प्रतिकात्मक रुप स्विडिश शिल्पकार जोहान पी. जॉनसन साकारत असतो. यासाठी तो लोखंड, लाकूड, डांबर, चामडे आदी टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करतो. त्याला सहसा 'जंक आर्ट' म्हटले जाते. जॉनसन मात्र, 'आउटसाइडर आर्ट' किंवा 'आर्ट ब्रुट' असे याचे वर्णन करतो. त्याने घडवलेली बॉइज-थ्री या नावाची कलाकृती जगभरातल्या बिनचेहऱ्याच्या लहानमुलींची मनोवस्था, भविष्यातली चिंता टिपते...**

# हे तर देशविरोधी कृत्य



डॉ. विवेक कोरडे

विरोधी बाकावरून







चूक झाली तर ती मान्य करायची नाही, अपयश आले तर कबुली द्यायची नाही, ही विद्यमान सत्ताधाऱ्यांची कार्यपद्धती बनली आहे. त्यालाच अनुसरून जणू काही घडलेच नाही अशा पद्धतीने नेपथ्य रचना करून 'नीट'ची पून:परीक्षा जून महिन्यात पार पडली. त्यासाठी वायूसेने सोबतच कितीतरी प्रशासकीय यंत्रणा दावणीला बांधल्या गेल्या पण मुळात, नीट–युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटणं किंवा साऱ्याच परीक्षांची प्रश्नपत्रिका फुटणं ही गोष्ट केवळ काही व्यक्तींच्या स्वार्थी वृत्तीने घडून आली, असे समजून आपण केवळ तितकाच इलाज करणार असू तर आपण स्वत:ची फसवणूक तर करणार आहोतच, पण त्याचबरोबर स्वार्थी आणि देशद्रोही पिढी निर्माण करणाऱ्या विद्यमान शिक्षण पद्धतीलाही संरक्षण देण्याचे देशविरोधी कृत्य करणार आहोत...

आधुनिक काळातील विचारवंतांमध्ये स्वामी विवेकानंदांचे स्थान अनन्यसाधारण आहे. हिंदू धर्माचे गाढे अभ्यासक म्हणून ते प्रसिद्ध आहेतच, त्याच बरोबर ते स्वतंत्र चिंतक तसेच विचारवंत म्हणूनही प्रसिद्ध आहेत. स्वामीजींनी केलेले शिक्षण विषयक चिंतन मौलिक असून आज शिक्षण क्षेत्रात जी बजबजपुरी माजली आहे, ती नष्ट करून चारित्र्यवान, देशप्रेमी आणि सामाजिक बांधिलकी असलेली पिढी निर्माण करायची असेल तर स्वामीजींचे शिक्षण विषयक विचार समजून घेऊन त्यांचा अंगीकार करणे अनिवार्य आहे.

स्वामीजी शिक्षण आणि धर्म या दोन गोष्टी एकच मानतात. ते म्हणतात, ''धर्म म्हणजे मनुष्यात आधीच असलेल्या दिव्यत्वाचे प्रकटीकरण, तर शिक्षण म्हणजे, मनुष्याच्या पूर्णत्वाचे प्रकटीकरण.'' त्यांच्या मते, मनुष्य विलक्षण शक्तींनी ओतप्रोत भरलेला असतो. या शक्तींचा योग्य दिशेने विकास करणे, शिक्षणाचे मुख्य कार्य आहे. शिक्षणाच्या माध्यमातून मनुष्य विविध प्रकारच्या ज्ञान आणि कौशल्याने सक्षम होऊन आपल्या विचारांनी क्रांती निर्माण करून सामाजिक उन्नती घडवून आणू शकतो. स्वामीजींनी शिक्षणाचे महत्त्व स्वीकारले आणि भारताची निर्धनता आणि पतनाचे मुख्य कारण अविद्या मानले. अर्थात, स्वामीजींना शिक्षणाच्या माध्यमातून मनुष्यत्वाचा विकास अभिप्रेत होता. समाजाच्या साऱ्या घटकांची सर्वांगीण उन्नती शिक्षणाने साधली पाहिजे, असे स्वामीजींचे मत होते. म्हणूनच स्वामीजी लाखो सहबांधवांच्या अज्ञान आणि दारिद्र्याबद्दल दाटून आलेल्या करुणेच्या भावनेला देशभक्ती संबोधित असत. त्यांच्या मते, ''जोवर देशबांधव भुके आणि पीडित आहेत, तोपर्यंत त्यांना सहाय्य करणे, हीच खरी देशभक्ती आहे. कोट्यवधी लोक जोपर्यंत भुके आणि अज्ञानी आहेत, तोपर्यंत मी अशा प्रत्येक व्यक्तीला देशद्रोही मानतो, जो त्यांच्या श्रमांवर कमावतो, परंतु त्यांची पर्वा करत नाही. सहबांधवांची पर्वा करण्याची संवेदनशीलता शिक्षणाने निर्माण करायला हवी, ही सहवेदना, ही सामाजिक बांधिलकी जे शिक्षण निर्माण करत नाही, ते शिक्षण देशद्रोही असते.'' म्हणूनच सामाजिक बांधिलकी नसलेली, स्वार्थी, आत्मकेंद्रित, संवेदनशून्य पिढी निर्माण करणारे शिक्षण देशद्रोहीच म्हणायला हवे.

**संवेदनशून्यतेचे संस्कार**

ही संवेदनशून्यता आपण अनेकदा अनुभवतो. पाकिस्तानी अतिरेकी पहलगामला निष्पाप, नि:शस्त्र भारतीय पर्यटकांची हत्या करतात आणि त्याच दिवशी देशातील अनेक माणसे क्रिकेट मॅच पाहण्यात धन्यता मानतात. समोर अन्याय घडत असतो, तेथे उपस्थित लोकांनी त्यामध्ये हस्तक्षेप करायची गरज असते, न्यायासाठी ठामपणे उभ राहण्याची गरज असते, पण लोक गप्प राहतात. बऱ्याचदा मोबाइलवर रेकॉर्डिंग करत राहतात. नुकताच अमेरिकेच्या नौदलाने भारतीय व्यापारी जहाजावर हल्ला केला, या हल्ल्यात तीन भारतीय तरुणांचा प्राण गेला. याची सार्वत्रिक निंदा व्हायला हवी होती. समाजाने जागोजागी या कृत्याचा आणि हे कृत्य करणाऱ्या अमेरिकी अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्पचा निषेध करायला हवा होता. पण समाज त्याच्याशी जणू काही देणं घेणं नाही, अशा प्रकारे शांत आहे. आजच्या शिक्षणाने अशी मूक पिढी निर्माण केली आहे. म्हणूनच ही शिक्षण व्यवस्थाच नीट करायला हवी. नीट-युजी परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटणं किंवा साऱ्याच परीक्षांची प्रश्नपत्रिका फुटणं ही घटना केवळ काही व्यक्तींच्या स्वार्थी वृत्तीने घडून आली, असे समजून आपण केवळ तितकाच इलाज करणार असू तर आपण स्वतःची फसवणूक तर करणार आहोतच, पण त्याचबरोबर स्वार्थी आणि देशद्रोही पिढी निर्माण करणाऱ्या विद्यमान शिक्षण पद्धतीलाही संरक्षण देण्याचे देशविरोधी कृत्य करणार आहोत.

आपल्या देशात कुविचारांचे साम्राज्य पसरलेले असले, तरी सुविचारांचा सुकाळ नेहमीच माजला होता. गीता सांगते, ''न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते! विद्येइतकी पवित्र करणारी दुसरी कोणतीच गोष्ट नाही, असं सांगणाऱ्या गीतेनेच चातुर्वर्ण्य समाजव्यवस्थेचा पुरस्कार करून शूद्र आणि स्त्रियांसह समाजाच्या फार मोठ्या वर्गाला पवित्र करणारे शिक्षण नाकारून अपवित्रच ठेवले होते. कारण बहुजन शिकले तर दुसऱ्यांच्या श्रमावर चंगळ करणारी व्यवस्था टिकू शकणार नव्हती. म्हणूनच महात्मा फुले अविद्या नष्ट करण्यासाठी कटिबद्ध झाले होते. १८८२च्या हंटर कमिशनपुढे त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याची मागणी याचसाठी केली होती. परंतु फायद्यापुरता साऱ्या आत्म्यांच्या एकत्वाची घोषणा करणाऱ्या या ढोंगी समाजव्यवस्थेने कायमची शिक्षण बंदी बहुजनांवर धर्माज्ञा म्हणून लादली होती. परिणामी देश गुलाम झाला, पारतंत्र्यात गेला.

**शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले**

ब्रिटिशांच्या वासाहतिक गुलामगिरीत भारतीयांचे शोषण

अधिक परिणामकारकपणे करण्यासाठी ब्रिटिशांना देशी नोकरदारवर्गाची आवश्यकता होती. त्यासाठीच मेकॉलेने देशात आधुनिक शिक्षण देण्यास सुरुवात केली. भारतीय शिक्षण व्यवस्था पहिल्यांदाच पंतोजींच्या तावडीतून बाहेर पडली. आपण न्यायी आहोत, भारतीयांना सुसंस्कृत बनविण्याच्या उदात्त हेतूने या देशात आले आहोत, हे सिद्ध करण्यासाठी ब्रिटिशांना पहिल्या व्यवस्थेहून वेगळी व्यवस्था निर्माण करणे भाग होते. निदान तसा आभास तरी निर्माण करावयास हवा होता. म्हणून ब्रिटिशांनी धर्मात फारसा हस्तक्षेप केला नाही, तरी शिक्षण समाजाच्या सर्व वर्गांसाठी खुले ठेवले. अर्थात बहुजनांवरची शिक्षण बंदी तत्त्वतः का होईना, पण रद्दबातल झाली. आधुनिक शिक्षण घेतलेली मंडळी देशाच्या भवितव्याचा वेगळ्या पद्धतीने विचार करू लागली. भारतीयांचे अज्ञान आणि अविद्या भारताच्या अवनतीचे, गुलामीचे कारण आहे, हे या पिढीने ओळखले. म्हणूनच आपल्या राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार करून तसे शिक्षण देणाऱ्या शाळा आणि महाविद्यालयांची स्थापना केली.

या नव्या विचारांच्या नेतृत्वाने भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन उभारले. सर्वसामान्य लोकांच्या उन्नतीचा आशय स्वातंत्र्याच्या कल्पनेशी जोडला. त्यात सर्वांना शिक्षण ही गोष्ट अपरिहार्य होती. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण ही गोष्ट महत्त्वाची मानली गेली. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सहा ते चौदा या वयोगटातील मुला - मुलींना शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यात आले आणि हे करण्यासाठी सरकारला दहा वर्षांची मुदत घालण्यात आली व सरकारकडून तसे करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

मार्गदर्शक तत्त्वांमधील या एकाच कलमाला मुदतबद्ध करण्यात आले आहे, यावरून आमच्या संविधानकारांना शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे महत्त्व किती वाटत होते ही गोष्ट स्पष्ट होते. स्वातंत्र्योत्तर काळात बहुजनांच्या उन्नतीसाठी शिक्षण हा ध्यास घेऊन भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ अशा अनेकांनी आपले आयुष्य वेचले. अशा व्यक्तित्वांच्या प्रेरणेने गावोगावी मुला - मुलींना शिक्षण मिळावे म्हणून नेतृत्व निर्माण झाले आणि या साऱ्यांनी सरकारच्या मदतीने शिक्षण संस्था उभारल्या, नावारूपाला आणल्या आणि शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात आपला सक्रिय सहभाग नोंदविला. छत्रपती शाहू महाराजांनी तर स्वातंत्र्यपूर्व काळातच प्रत्येक समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे उभारून बहुजन विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुकर करण्याचा प्रयत्न केला.

स्वातंत्र्योत्तर काळात मिळालेल्या शिक्षणाच्या संधीमुळे बहुजन शिकू लागले. आरक्षणामुळे सरकारी नोकऱ्या मिळवू लागले. इतकेच नव्हे तर तथाकथित उच्च वर्णीयांच्याबरोबर स्पर्धाही करू लागले. परिणामी उच्च शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये उच्च वर्णीयांची मक्तेदारी धोक्यात येऊ लागली, यावर उपाय म्हणूनच खाजगी शिक्षण संस्थांच्या नावे शिक्षणाचे व्यापारीकरण करण्यात आले. शिक्षण महाग करून गरीब बहुजनांना शिक्षणापासून वंचित करणे, हाच शिक्षणाच्या खाजगीकरणाचा उद्देश होता.

**शिक्षणाचे खासगीकरण आणि परीक्षांचे अर्थकारण**

शिक्षणाचे खाजगीकरण म्हणजे श्रीमंतांसाठीच्या राखीव जागा होत्या. त्या व्यवस्थेत गुणवत्ता नव्हे, तर धनवत्ता महत्त्वाची होती. राखीव जागांच्या विरोधात इतर वेळी गळे काढणारा मध्यमवर्ग या श्रीमंतांच्या राखीव जागांकडे मूग गिळून पाहत होता. उन्नीकृष्णन विरुद्ध आंध्रप्रदेश या खटल्याच्या निर्णयात (१९९३) माननीय न्यायालयाने चौदा वर्षापर्यंतच्या मुलांच्या शिक्षणाचा अधिकार मूलभूत अधिकार आहे असे घोषित केले. त्याचबरोबर व्यावसायिक खाजगी शिक्षण संस्थांमध्ये त्रिस्तरीय शुल्करचना करण्याची शिफारस करून पंधरा टक्के एन. आर. कोटा, पस्तीस टक्के व्यवस्थापन कोटा आणि पन्नास टक्के सरकारी कोटा अशी व्यवस्था लावून दिली. गरीब व मध्यमवर्गाला निदान पन्नास टक्के जागा गुणवत्तेनुसार खाजगी शिक्षण संस्थांमध्ये मिळू लागल्या. पण ही व्यवस्था टिकू दिली जाणार नव्हती. २००२मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या टीएमए पै निर्णयाने ही त्रिस्तरीय शुल्क रचना रद्द केली. पुन्हा गरीब बहुजन मुले खाजगी शिक्षण संस्थांत प्रवेश मिळविण्यापासून वंचित झाली. असे झाले तरीही काही गरीब विद्यार्थी आपल्या गुणवत्तेमुळे उच्च शिक्षण घेण्यास पात्र ठरत होते. न्यायालयाने खाजगी शिक्षण संस्थांना त्यांच्या पसंतीचे विद्यार्थी घेण्याचा हक्क दिला. प्रवेश सामायिक प्रवेश प्रक्रियेतून करताना प्रत्येक राज्याच्या अभ्यासक्रमात समकक्षता नव्हती, म्हणून कॉमन एंट्रन्स टेस्ट आणली गेली. या परीक्षेची तयारी करून घेणारे नवे खाजगी क्लासेस आले. विद्यार्थ्यांच्या प्रवेश पात्रतेचे मूल्यांकन दोन तासाच्या परीक्षेने ठरू लागले. वेगवेगळ्या संस्थांच्या, विद्यापीठांच्या डझनावारी प्रवेश परीक्षा



*प्रवेश परीक्षा हा देशभरातल्या विद्यार्थ्यांच्या मानसिक-भावनिक ताणात भर घालणारा असह्य प्रकार असेल, तर सरकार तो किती काळ रेटत राहणार?*

होऊ लागल्या. त्यामुळे होणारी गैरसोय लक्षात घेऊन नॅशनल एलिजिबिलिटी अँड एंट्रन्स टेस्ट (NEET) ही एकच प्रवेश परीक्षा निश्चित झाली. ही परीक्षा देण्यासाठी खाजगी क्लासेस लावणे आवश्यक आहे, असे वातावरण निर्माण करण्यात आले. परीक्षेची काठीण्यपातळी वाढविण्यात आली. पुन्हा एकदा खाजगी व्यावसायिक शिक्षण विशेषतः वैद्यकीय शिक्षण पैसेवाल्यांची मक्तेदारी झाली. खरे तर विविध बोर्डांच्या गुणांचे पर्सेंटाइल पद्धतीने मूल्यांकन करून प्रवेश देणे योग्य होते. परंतु जाणीवपूर्वक नीटची निवड करण्यात आली. परीक्षेची काठीण्यपातळी वाढविली, पण प्रवेशासाठी गुणांचे निकष कमी कमी करण्यात आले. आता बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेत पस्तीस टक्के गुण मिळवणाऱ्या आणि नीटमध्ये उणे मार्क मिळवणारा विद्यार्थीही प्रवेशास पात्र असतो.

**बेईमान आणि अनैतिकांच्या हाती शिक्षणाचे साम्राज्य**

खाजगी शिक्षणाची अधोगती इतक्यावर थांबणारी नव्हती. शिक्षणाचा धंदा आधीच सुरू झाला होता. धंद्यात बेईमानी, अनैतिक असे काहीही नसते हा सिद्धांत या देशात आधीपासूनच रूढ आहे. त्यांना अनुसरून या मेरिट मिळवून देणाऱ्या खासगी शिक्षणसंस्था आणि क्लासेस यांच्या युतीतून पेपर फुटी नित्याची झाली. यात बडी धेंडे असल्याने त्यांच्यावर नाईलाजाने कारवाई झाली, पण फारच थोड्या लोकांना शिक्षा झाल्याचे दिसते. यात प्रामाणिक विद्यार्थ्यांची होणारी हानी, मानसिक खच्चीकरण आणि त्यांना येणारे नैराश्य कोणीही लक्षात घेतले नाही. अनेकदा पेपरफुटीमुळे नव्याने परीक्षा झाल्या.

सुदैवाने, यावेळी नीटचा पेपर फुटल्यामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे, पण सरकार इतके असंवेदनशील आहे की अशा घटना वारंवार घडूनही सरकारने या परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीवर (NTA) व त्याच्यावर सरकारने नेमलेल्या मर्जीच्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली नाही. देशाचे शिक्षण मंत्री निर्लज्जपणे त्यांच्या खुर्चीवर बसून आहेत. (त्यांना हटवण्यात येणार आहे, अशी चर्चा सुरू झाली आहे. पण विद्यार्थ्यांना झालेल्या अन्यायामुळे राजीनामा देण्याची नैतिक चाड त्यांच्यामध्ये नाही.) थोडक्यात, पेपरफुटीबाबत सरकार गंभीर तर नाहीच, उलट या पेपरफुटीला जबाबदार असणाऱ्या उच्चपदस्थांचे संरक्षण करत आहे.

शिक्षण ही विक्रेय वस्तू बनविली असल्याने आता शिक्षण हा धंदा झाला आहे. मुळातच हे सरकार भांडवलदारांचे असल्यामुळे ते भांडवलदार आणि श्रीमंतांचे हितरक्षण करत आहे. शिक्षणाच्या धंद्यातून भांडवलदार आणि धनदांडगी मंडळी आपले उखळ पांढरे करून घेत आहेत. म्हणूनच केवळ परीक्षा पद्धतीत सुधारणा करून हा प्रश्न सोडवता येणार नाही. शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलावा लागेल.

शिक्षण हे बहुजनांच्या उत्थानाचे साधन आहे, ही गोष्ट लक्षात घेऊन बहुजनांना शिक्षणापासून वंचित करणाऱ्या भरमसाठ शुल्क, खाजगी क्लासेस या साऱ्याच बाबत पुनर्विचार करावा लागेल. त्यासाठी सर्वप्रथम विना अनुदानाचे धोरण रद्द करावे लागेल. शिक्षण संस्था फालतू गावगुंड आणि धनदांडगे यांच्या वर्चस्वातून मुक्त कराव्या लागतील. पात्र विद्यार्थ्याला मग तो कोणत्याही आर्थिक वा सामाजिक स्तरातला असो, सारे शिक्षण मोफत करावे लागेल. हा खर्च भागवण्यासाठी संपत्ती करासारखे (Wealth tax) नवे कर लावून ते काटेकोरपणे वसूल करावे लागतील. अन्य उपायही शोधावे लागतील. मोफत शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याला सामाजिक उत्तरदायित्व म्हणून तो कमवायला लागल्यावर त्याच्या उत्पन्नातील ठराविक रक्कम किमान तीन वर्षे शासनाला परस्पर सुपूर्द केली जाईल, असा कायदा बनवावा लागेल. त्याने सामाजिक उत्तरदायित्वही निभावले जाईल आणि शिक्षणासाठी लागणारा पैसाही उपलब्ध होईल. ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटोने शिक्षणाची व्याख्या करताना 'जे नागरिकत्व घडवते ते शिक्षण' असे म्हटले आहे. अर्थात जे चांगला नागरिक घडवते, ते चांगले शिक्षण. याचा खरा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे.

थातूरमातूर उपाय करून सरकार कदाचित पालकांचे-विद्यार्थ्यांचे समाधान करू शकेलही. पण ते समाधान फारसे

टिकणारे नसेल. तो या समस्येवरचा उपायही नसेल. कारण नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटणे याला यंत्रणा जितकी जबाबदार आहे, त्यापेक्षा जास्त शिक्षणाच्या खाजगीकरणाचे धोरण जबाबदार आहे, हे कटू सत्य आधी स्वीकारावे लागेल. विद्यमान सत्ताधारी स्वतःस विश्वगुरू, अपराजित वगैरे बरेच काही समजताहेत, त्यामुळे सत्याचा स्वीकार करण्याची, झालेल्या चुका स्वीकारण्याची गरज त्यांना आजवर भासलेली नाही. अशा या काळात केवळ नीट-सेटपुरता प्रश्न सोडवून स्वतःच्या कार्यक्षमतेचे ढोल बडवण्यापेक्षा शिक्षणव्यवस्थाच आतूनबाहेरून नीटनेटकी करावी लागेल, तेव्हाच स्वामी विवेकानंदांच्या स्वप्नातली चारित्र्यवान, देशप्रेमी आणि सामाजिक बांधिलकी जपणारी पिढी तयार होईल. स्वामीजींच्या नावाने उठताबसता राजकारण करणारे सत्ताधारी वर्तमानात याच्या नेमके उलटे करत आहेत. स्वामीजींच्या नजरेत हा एक देशद्रोहाचाच गुन्हा आहे.

**डॉ. विवेक कोरडे यांची 'जातीयवादी राजकारणाचा अन्वयार्थ', 'गांधीची दुसरी हत्या', 'शहीद भगतसिंग', 'वैचारिक बंदुकांचे शेत', 'गांधीहत्येचे राजकारण', 'आरएसएस आणि नथुराम गोडसे', 'भगतसिंग, गांधी आणि सावरकर : अपप्रचारामागचे वास्तव' ही पुस्तके प्रसिद्ध आहेत.**

**ई मेल :** drvivekkordeg@mail.com

**अक्षर प्रकाशनाचं नवं पुस्तक...**

**य.दि. पुनःस्मरण** वासंती फडके




**किंमत रु.५००/-**
**सवलत किंमत रु. ४००/-**

**फडके सरांनी एकहाती जे प्रचंड लेखन संपादनाचे काम केलेले आहे आणि प्रकृतीचा नसता बाऊ न करता जे काही मोठे प्रकल्प हाती घेतलेले आहेत, ते पाहून आळशी लोकांची छातीच दडपावी! महाराष्ट्रातील ताज्या सत्तांतरानंतर तत्त्वनिष्ठा म्हणून राज्यसाहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाचा स्वतःहून राजीनामा देण्याचा त्यांचा बाणेदारपणा आपल्याला स्तिमित करतो. उज्ज्वल इतिहासाची नुसती स्तुतिस्तोत्रं पोकळपणे गात फडके सर बसत नाहीत, तर आज एकूणच आपला संपूर्ण समाज वैचारिक पातळीवर मृतप्राय होत चालला असताना आणि धन सत्ता लोभी राजकारण यांची विवेकशून्यता, अमानुषता विचारवंतांना देखील बधीर करत असताना हा देश घडवलेल्या महामानवांचे स्मरण नव्या पिढीला प्रमाणचरित्र लेखनाद्वारे करून देण्याचे मोलाचे काम फडके सर निष्ठापूर्वक करीत राहिले आहेत. पुस्तक वाचल्यावर वाचकांना याचा प्रत्यय येईलच.**

अक्षर प्रकाशन ऑर्चिड रोड मॉल, रॉयल पाम, 'बी' विंग, युनिट नं. २३५, सर्वे नं. १६९, आरे कॉलनी, गोरेगाव (पू), मुंबई-६५ फोन : ९३२२३९१७२० email : aksharprakashan@gmail.com

# शिक्षण हक्क म्हणजे काय ग ताई?



श्रीरंजन आवटे

मर्म संविधानाचे




**बारावीनंतरच्या परीक्षांची आणि त्यावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेची ही अवस्था आहे. अगदी त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांबाबत (MPSC/ UPSC) प्रचंड प्रमाणातला बिझनेस ही सुद्धा मोठी समस्या आहे. अगदी प्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासून झालेल्या बेसुमार खाजगीकरणाने शिक्षणाचे प्रचंड अध:पतन झाले आहे. अशा परिस्थितीत मूलभूत प्रश्न आहे, तो शिक्षण नावाची गोष्ट ही एखाद्या चकचकीत मॉलमधील गुळगुळीत कमोडिटी झालेली आहे काय? आणि त्या अनुषंगाने प्रत्येकाला संविधानात काही हक्क मान्य केले आहेत काय? या अनुषंगाने मोहिनी जैन या विद्यार्थिनीबाबत घडलेली घटना महत्त्वाची आहे...**

**मे** महिन्यामध्ये नीट परीक्षेचा पेपर फुटला आणि सुमारे २३ लाख विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले. त्यासाठी पुन्हा परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या दरम्यान साधारण १५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. केवळ हीच परीक्षा नव्हे, तर गेल्या ११ वर्षांत ८९ पेपर फुटल्याचे अहवाल आहेत. या नीट घोटाळ्यामधून अनेक कोचिंग क्लास चालकांचे हितसंबंध समोर आले. लातूरचे क्लासचालक मोटेगावकर यांचे नाव देशपातळीवर पोहोचले, ते घोटाळ्यातील प्रमुख आरोपी म्हणून. या निमित्ताने कोचिंग क्लास, ट्यूशन्सवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला. शिक्षणाचे हे बेसुमार बाजारीकरण कल्पनेच्या पलीकडे आहे. त्यातून विशेषतः मुली आणि ग्रामीण भागातले विद्यार्थी या व्यवस्थेतून बाहेर फेकले गेले आहेत.

महाराष्ट्रात ज्याप्रमाणे 'लातूर पॅटर्न' प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणे देशपातळीवर 'कोटा पॅटर्न' प्रचंड लोकप्रिय आहे. राजस्थानमधील कोटा शहरात दरवर्षी सुमारे तीन लाखांहून अधिक विद्यार्थी आयआयटीसाठीच्या प्रवेश परीक्षांच्या कोचिंग क्लासेससाठी प्रवेश घेतात. या कोचिंग क्लासेसवर आधारलेली अर्थव्यवस्था हजारो कोटींची आहे. याकरता सर्वसामान्य घरातील विद्यार्थी कर्ज काढतात. जमिनी विकतात. गहाणही ठेवतात. या कोचिंग क्लासेसचे शुल्क असते, लाखांच्या घरात. मुळात अनेकजण कॉलेजमध्ये जातच नाहीत, कारण कॉलेजमध्ये लेक्चर्स होत नाहीत. बारावीच्या मार्कांना काहीच किंमत नसल्यानं पुढची करियरची दिशा आधारलेली आहे, प्रवेश परीक्षांवर. त्यामुळे अनेक कॉलेजेसनी खाजगी क्लास, चालकांसोबत संधान साधून नफेखोरीचे प्रकार सुरू केले आहेत. त्यामुळे कॉलेज नाममात्र आणि सर्व काही अवलंबून क्लासेसवर, अशी अवस्था सार्वत्रिक झाली आहे.

**शिक्षण नावाची क्रयवस्तू**

बारावीनंतरच्या परीक्षांची आणि त्यावर अवलंबून असलेल्या अर्थव्यवस्थेची ही अवस्था आहे. अगदी त्याचप्रमाणे स्पर्धा परीक्षांबाबत (MPSC/ UPSC) प्रचंड प्रमाणातला बिझनेस ही सुद्धा मोठी समस्या आहे. पुणे ते दिल्ली या सर्व महानगरांमध्ये कोचिंग क्लासेसचे दुकान टाकून विद्यार्थ्यांना लुबाडणाऱ्या व्यवस्थेला अधिमान्यता मिळालेली आहे. इतर करियरचे पर्याय बंद. त्यामुळे सगळी भिस्त या स्पर्धा परीक्षांवर आधारलेली. अलीकडेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी याबाबत कोटा येथील भाषणात याच अनुषंगाने चिंता व्यक्त केली. या स्पर्धा परीक्षांच्या उद्योगातून लाखो तरुणांची ऐन उमेदीची वर्षे वाया जातात. त्यातून यश मिळते मूठभरांना; पण इतरांना कोणत्याही औपचारिक पद्धतीने शिक्षण घेऊन करियर घडवण्याची संधीच उपलब्ध नसते. या सगळ्यातून उच्चशिक्षित बेरोजगारांची मोठी फळीच निर्माण झाली आहे. मुळात. अनेकांना उच्च शिक्षण घेणे परवडत नाही. ज्यांना शक्य होते त्यांनाही पुढे काहीच करता येत नसल्याने भीषण पोकळी निर्माण झाली आहे.

उच्च शिक्षण तर लांबची गोष्ट; अगदी प्राथमिक शिक्षणाच्या स्तरापासून झालेल्या बेसुमार खाजगीकरणाने शिक्षणाचे प्रचंड अधःपतन झाले आहे. शिक्षणाची गुणवत्ता हा तर नंतरचा भाग; शिक्षणाची संधीच संपत जाण्याचा प्रवास वेगाने होतो आहे. देशभरात २०१४ ते २०२४ या काळात सुमारे ८९,४४१ सरकारी शाळा बंद पडल्या आहेत. याच काळात खाजगी शाळा मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. अलाहाबाद उच्च न्यायालयाने २०१५ साली दिलेल्या निर्देशांमध्ये असे स्वच्छ म्हटले होते की, शासकीय कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि न्यायिक अधिकारी यांनी आपल्या मुलांना शासकीय शाळेतच प्रवेश घ्यायला हवा. प्रत्यक्षात असे घडले नाही. शिवाय ज्युनियर, सिनियर केजी या स्तरापासून शाळेच्या फी मुळे ग्रामीण, गरीब, वंचित विद्यार्थ्यांचे, कुटुंबांचे आर्थिक कंबरडे मोडले आहे. अनेकांना शिक्षण दुष्प्राप्य झाले आहे.

अशा परिस्थितीत मूलभूत प्रश्न आहे, तो शिक्षण नावाची गोष्ट ही एखाद्या चकचकीत मॉलमधील गुळगुळीत कमोडिटी झालेली आहे काय? आणि त्या अनुषंगाने प्रत्येकाला संविधानात काही हक्क मान्य केले आहेत काय? या अनुषंगाने मोहिनी जैन या विद्यार्थिनीबाबत घडलेली घटना महत्त्वाची आहे.

१९९१ साली मोहिनी जैन या विद्यार्थिनीची वैद्यकीय शिक्षणाकरता कर्नाटकमधील सिद्धार्थ मेडिकल कॉलेजमध्ये निवड झाली. त्यासाठीची वार्षिक फी होती, ६० हजार रुपये. याशिवाय साडेचार लाख रुपये डोनेशन मागण्यात आले. सरकारी जागांच्या कोट्यातून मोहिनी जैन यांची निवड झाली होती. मात्र कर्नाटक सरकारने शिक्षणसंस्थांना शुल्क ठरवण्याचे स्वातंत्र्य देणारी अधिसूचना १९८९ साली जारी केली होती. त्यात मोहिनी जैन ही विद्यार्थिनी उत्तर प्रदेशची आणि या



*संविधानाने मूलभूत शिक्षणहक्काचा संबंध जगण्याच्या अधिकाराशी जोडला आहे, याचे भान आजवरच्या सत्ताधाऱ्यांनी बाळगले नाही. शिक्षण व्यवस्थेचे होत गेलेले व्यापारीकरण हा त्याचा लाज आणणारा परिपाक आहे...*

अधिसूचनेने परराज्यातील विद्यार्थ्यांकरता अधिक फी ठरवली होती. मोहिनीची आर्थिक परिस्थिती बेताची होती. तिला इतके पैसे भरुन शिक्षण घेणे अशक्य होते. त्यामुळे या संदर्भात ती न्यायालयात गेली. शिक्षण हा आपला मूलभूत हक्क आहे, असा तिचा युक्तिवाद होता. न्यायालयाने बाजू ऐकून घेतली आणि सांगितले की, शिक्षण हा काही व्यापार नाही. तो कर्तव्याचा आणि सेवेचा भाग आहे. तसेच आत्यंतिक खाजगीकरणामुळे शिक्षण घेणेच अशक्य होईल, याचा विचार करुन या शुल्कावर नियंत्रण आणण्याचे निर्देश दिले. मूलभूत शिक्षण हा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार आहे. भारताच्या संविधानातील एकविसाव्या अनुच्छेदामध्ये जगण्याच्या अधिकारामध्ये तो अंतर्भूत आहे, असे सांगणारा न्यायालयाचा निर्णय खूप मोलाचा होता.

**शिक्षण हक्काचे अधिष्ठान**

उन्नीकृष्णन खटल्यात (१९९३) सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा हा मूलभूत हक्क प्रत्येक व्यक्तीला असल्याचे सांगितले; मात्र उच्च शिक्षण/व्यावसायिक शिक्षण हा मूलभूत अधिकाराचा भाग नाही, असे सांगितले. त्यामुळे वयाच्या १४व्या वर्षापर्यंतचे शिक्षण हा मूलभूत हक्क असल्याचे या निर्णयाने अधोरेखित झाले. त्यानंतर २००२ साली ८६ वी घटनादुरुस्ती करून अनुच्छेद २१ मध्ये शिक्षणाचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचे मान्य केले गेले. या दुरुस्तीनुसार वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क मान्य केला आणि अनुच्छेद २१ (क) मध्ये शिक्षण हक्क सामाविष्ट केला गेला. नंतर २००९ साली भारत सरकारने शिक्षण हक्क कायदा संमत केला आणि त्यानुसार सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचण्याची दारं किलकिली झाली.

मुळात, ही घटनादुरुस्ती आणि नंतर कायदा झाला असला तरी त्यासाठीची तरतूद राज्यसंस्थेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये होती. त्यानुसार घटनादुरुस्ती झाली. मात्र यासाठीचा लढा सुरू झाला, एकोणिसाव्या शतकात. सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी शाळा सुरु केल्या. त्यासोबतच सर्वांना शिक्षण मिळावं यासाठीचा आग्रह धरला. १८८२ मध्येच हंटर आयोगासमोर सर्वांना मोफत, समान व सक्तीचे शिक्षण मिळावे, यासाठी महात्मा फुलेंनी मागणी केली. ब्रिटिशांनी महात्मा फुलेंना न्याय दिला नसला, तरी सयाजीराव गायकवाड आणि राजर्षि शाहू महाराजांनी आपापल्या संस्थानांमध्ये शिक्षण हक्काची अंमलबजावणी केली. काँग्रेसने नेहरु अहवालात, कराची ठरावामध्ये या हक्कासाठीची आग्रही मागणी केली. संविधानसभेतही याबाबत चर्चा झाली. तेव्हा राज्यसंस्थे-साठीच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्याचा समावेश केला गेला. स्वातंत्र्यानंतर शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न झाला खरा; पण अधिकृतपणे शिक्षण हक्क मान्य व्हायला खूप उशीर झाला.

**शिक्षणहक्काची पाठराखण**

जगण्याच्या हक्कामध्येच शिक्षणाचा हक्क अंतर्निहित आहे, असे न्यायालय म्हणते, तेव्हा त्याचा नेमका अर्थ समजून घेतला पाहिजे. जगण्याला शिक्षणापासून वेगळं करता येत नाही. महात्मा फुले म्हणाले होतेः सारे अनर्थ अविद्येने झाले आहेत आणि समाजातले परिवर्तन शिक्षणामार्फतच होऊ शकते. अर्थातच अंधारातून प्रकाशाकडे जायची वाट शिक्षणातून मिळते. हे शिक्षण कोणत्याही सबबीखाली नाकारता येणार नाही. ते आमच्या हक्काचे आहे. संविधानाने शाळेचं प्रवेशद्वार सर्वांसाठी खुलं केलं. हजारो वर्षांची नाकेबंदी संपली आणि गावकुसाबाहेरच्या वस्तीतली इवलीशी लेक पाटीवर 'ग म भ न' गिरवू लागली.

ही नाकेबंदी संपली असली, तरी आधी उल्लेखल्याप्रमाणे शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाची चाकं उलटी फिरू लागली आहेत. एक सुप्रसिद्ध वचन आहेः एखाद्या देशाला पूर्णपणे उद्ध्वस्त करायचे असेल, तर त्या देशावर बॉम्बहल्ला करण्याची, गोळीबार करण्याची किंवा युद्ध करण्याची आवश्यकता नाही. त्या देशातील शिक्षण व्यवस्थेचे पूर्णपणे

नुकसान केले की देश आपोआप उद्ध्वस्त होतो.

त्यामुळे देश घडवायचा आणि टिकवायचा तर शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. कोठारी आयोगाने १९६८साली शिक्षणावर देशाच्या सकल उत्पन्नाच्या (जीडीपी) ६ टक्के इतका खर्च केला पाहिजे, असे सांगितले होते; मात्र संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानंतरही हा टक्का ४ च्या आसपास आहे. अनेक प्रगत अर्थव्यवस्थांमध्ये हे प्रमाण ७ ते १० टक्क्यांपर्यंत आहे. भारत सरकार शिक्षणाकडे किती गांभीर्याने पाहते, हे यातून सहज लक्षात येते.

एका बाजूला हा पुरेसा खर्च केला जात नसताना सामान्य माणसाचा शिक्षणावरील खर्च वारेमाप वाढतो आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये 'इंटरनॅशनलायझेशन'च्या नावाखाली खाजगीकरणाची वाट मोकळी करून देण्यात आलेली आहे. काही परदेशी विद्यापीठांना भारतामध्ये आपल्या शाखा सुरू करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. अशा विद्यापीठातील शिक्षण सर्वांना परवडणारे असणार नाही. म्हणजेच, संविधानातील 'सर्वांना शिक्षण' हे राज्यसंस्थेसाठी असलेले मार्गदर्शक तत्त्व अंमलात आणणे अतिशय कठीण झाले आहे आणि आणखी कठीण होण्याची शक्यता आहे.

**शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला चाप**

या २०२० च्या धोरणात 'स्कूल मर्जर' असा शब्दप्रयोग केलेला आहे. लहान गावातील शाळा पटसंख्या कमी आहे, म्हणून बंद करून तालुक्याच्या ठिकाणी समूह शाळा (क्लस्टर स्कूल) सुरू करण्याचा घाट या धोरणामध्ये दिसून येतो आहे. UDISE यांच्या २०१६-१७ च्या सर्वेक्षणानुसार भारतातील २८ टक्के सरकारी प्राथमिक शाळांमधील विद्यार्थीसंख्या ही ३० हून कमी आहे. अशा सर्वच शाळा हळूहळू बंद केल्या, तर शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा प्रवासच उलट दिशेने सुरू होईल. महात्मा फुले ते कर्मवीर भाऊराव पाटील या सर्वांनी शिक्षण खेडोपाडी पोहोचावे म्हणून प्रयत्न केले. आता अशा धोरणांमुळे शिक्षणाची दारे बंद होण्याची भीती आहे. तसंच २००९ साली शिक्षण हक्क कायदा लागू झालेला असला, तरी वंचितांसाठी राखीव असलेल्या २५ टक्के जागांवर मुलांचे प्रवेश होत नाहीत.

पण मुळात संविधानात शिक्षणाविषयीची अपेक्षा होती ती अशीः सर्वांना समान, मोफत आणि दर्जेदार शिक्षण मिळालं पाहिजे. ते वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारलेलं हवं. तसंच शिक्षण हा प्रत्येकाचा हक्क आहे. त्यामुळेच शिक्षणाचा उल्लेख मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्त्वे आणि कर्तव्ये या तीनही विभागांमध्ये येतो.

आज भारतीय शिक्षण व्यवस्था एका निर्णायक वळणावर उभी आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यांची संख्या वाढत असताना शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्याऐवजी ते सधन वर्गास अधिक अनुकूल होत आहे. त्यांचा दर्जा ढासळत चाललेला आहे. सर्व बाजूंनी होणारे शिक्षण व्यवस्थेचं अधःपतन चिंताजनक आहे. शिक्षणाची ही बिकट वाट चालून जात प्रत्येकापर्यंत शिक्षण कसं पोहोचेल, यासाठीचा विचार रुजवणे आणि त्या अनुषंगाने कृती कार्यक्रम आखणे ही काळाची गरज आहे. संविधानाने शिक्षणाची दारं खुली केलेली असताना ती बंद करण्याचा डाव आखला जात असेल, तर वेळीच सावध व्हायला हवं. अन्यथा अविद्येने होणाऱ्या अनर्थाचा सावधगिरीचा इशारा महात्मा फुलेंनी देऊन ठेवला आहेच.

**श्रीरंजन आवटे कवी, लेखक आहेत. ते सध्या बँकॉक येथील सुआन सुनंधा राजभाट विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापकपदी (राज्यशास्त्र) कार्यरत आहेत. राही श्रु. ग. यांच्यासोबत त्यांनी लिहिलेले 'आपलं आयकार्ड' हे संविधानाधारित पुस्तक वाचकप्रिय ठरले आहे.**

**संपर्क** : poetshriranjan@gmail.com

# इंदिरा युगातील आश्वासने आणि अंतर्विरोध



हितेश पोतदार

अर्थबोध



*प्रातिनिधिक छायाचित्रे*

इंदिरा गांधींचं दशक हे आश्वासन आणि अंतर्विरोध यांच्यातला सर्वात तीव्र संघर्ष होतं. रुपयाचं अवमूल्यन आणि बँकांचं राष्ट्रीयीकरण एकाच वेळी घडलं. गरिबी हटावची घोषणा आणि तिची अपूर्ण अंमलबजावणी एकाच वेळी घडली. हरित क्रांतीचं उत्पादन आणि तिची असमान वाटणी एकाच वेळी घडली. कामगार चळवळीचं शिखर आणि आणीबाणीतलं तिचं दमन एकाच वेळी घडलं...

**शब्दचित्र एक : परळ, मुंबई (जून, १९७२) : वसंतचा संभ्रम**

वसंत आता तेवीसचा होता. नारायणाचा मोठा मुलगा. गिरणीतच लागला होता. वडिलांच्याच मुकादमाच्या शिफारशीने. पण वसंतचं जीवन अगदी वडिलांसारखं नव्हतं. तो रात्र-शाळेत जात होता. त्याला इंग्रजी वाचता येत होतं. चाळीतल्या एका खोलीत संध्याकाळी काही तरुण जमत असत. कुणी समाजवादी, कुणी झेंडाहीन युनियनचं, कुणी कम्युनिस्ट पक्षाचं आणि बाकी नवनवीन मवाळ-जहाल लोकल-ग्लोबल विचारांची.

वसंतला हे सगळं ठाऊक होतं की बंगालमध्ये आणि आता आंध्र-तेलंगणातही, काही तरुण जमीनदारांच्या विरोधात शस्त्र उचलत होते. चारू मजुमदार नावाच्या माणसाचं नाव चाळीत कुणीतरी कुजबुजत उच्चारत असे. बहुतांशी भीतीने आणि इतरवेळी छुप्या आदराने. 'भारतीय राज्य अर्ध-सामंती आहे', असं वसंतला कुणी म्हणालं होतं. वसंतला हा शब्द नीट समजला नव्हता. पण त्याला हे कळत होतं की त्याच्या वडिलांची गिरणी आणि रत्नागिरीतलं त्यांचं छोटं शेत, हे दोन्ही एकाच कुठल्यातरी जुन्या चक्रात अडकलेले आहेत आणि ते चक्र भेदण्याची भाषा कुणीतरी करत आहे.

त्याच वर्षी, आजच्या काळात रोजची वाटणारी पण त्या वेळेची मोठी एक बातमी होती. सहा वर्षांपूर्वी, १९६६ मध्ये रुपयाचं अवमूल्यन झालं होतं. वसंतला त्याची नीट आठवण होती. कारण त्याच वर्षी घरात महागाईची चर्चा फार होती, जी आता अगदी रोजची झाल्याने त्याचं फारसं काही आज वाटत नाही. त्यावेळेस महागाई खूप मोठी गोष्ट वाटायची. सरकारे पडायची. इंदिराबाईंनी आय.एम.एफ.च्या दबावाखाली रुपया कमजोर केला, असं युनियनचा एक म्हातारा कार्यकर्ता म्हणाला होता. वसंतला प्रश्न पडला की आय.एम.एफ. म्हणजे काय, आणि त्याचा दबाव म्हणजे नेमकं काय?

**शब्दचित्र दोन : गिरणीच्या आत, त्याच क्षणी**

वसंतच्या शेजारच्या मशीनवर एक नवा चेहरा दिसत होता, रामू. तो बदली-कामगार होता. म्हणजे, कायमस्वरूपाचा कामगार नव्हता. कुणी आजारी पडला, कुणी रजेवर गेला, तर रामूला बोलावलं जायचं. त्याच्याकडे युनियनचं कार्ड नव्हतं. त्याला भविष्य निधी नव्हता. त्याला कायम कामगाराइतकं वेतनही नव्हतं. पण काम तेच होतं. तीच मशीन, तेच यंत्र, तोच धूळभरला मजला.

वसंतला हे अस्वस्थ करत असे. कारण त्याला माहीत होतं, की गिरणी मालकांना रामूसारखे कामगार जास्त आवडतात. ती अधिक स्वस्त असतात. हक्क वगैरे मागू शकतील एवढी त्यांची ताकद नसते. कधीही काढून टाकता येणारे असतात. जर उद्या मालकांनी ठरवलं की कायम कामगारांपेक्षा बदली कामगारच जास्त ठेवायचे, तर वसंतचं कार्डही त्याला वाचवेल का, याची शाश्वती नव्हती.

ही गोष्ट तेव्हा कुणाला फार मोठी वाटली नाही. पण संघटित कामगार वर्गाच्या अगदी आत, त्याच्याच यंत्रांमध्ये, एक दुसरी, असुरक्षित श्रमशक्ती हळूहळू मूळ धरत होती. हीच असुरक्षितता पुढे, अनेक दशकांनंतर, एका वेगळ्या रूपात म्हणजेच ॲपवरून बुक होणाऱ्या, तासाला मोजल्या जाणाऱ्या कामाद्वारे मुसंडी मारणार होती. वसंतचा मुलगा समीर आता उबेरसाठी टॅक्सी चालवतो.

**शब्दचित्र तीन : मराठवाडा, त्याच वर्षी**

सखुबाईंची मुलगी. आता तिचं लग्न झालेलं. नाव लता. मराठवाड्यातल्या एका कोरडवाहू व पडिक जमिनी बहुल गावात राहत होती. तिच्या नवऱ्याकडे साडेतीन एकर जमीन. १९७२ साल दुष्काळाचं वर्ष होतं. महाराष्ट्रात या वर्षी जो दुष्काळ पडला, तो शतकातला सर्वात भीषण मानला जातो. पाऊसच नाही. विहिरी आटल्या. गुरं मरायला लागली.

लताच्या नवऱ्याने रोजगार हमी योजनेच्या कामावर जायचं ठरवलं. रस्ता बांधणीचं काम, पण काय तर म्हणे 'सरकारी'. आणि म्हणून हमी सुद्धा. दिवसाला काही पैसे मिळत.

पण शेजारच्या गावातून बातमी आली होती. पंजाबमध्ये, हरियाणामध्ये शेतकरी आता वेगळ्याच बियाण्यांनी, खतांनी प्रचंड उत्पादन काढत आहेत. 'हरित क्रांती' का काय, तर म्हणे. असं लताच्या नवऱ्याने वर्तमानपत्रात वाचलं होतं. पण इथे, मराठवाड्यात, पाण्याचं कालव्याचं जाळं नव्हतं, मोठी विहीर खणायला भांडवल नव्हतं आणि सावकाराचं कर्ज आधीच डोक्यावर होतं. हरित क्रांती कुठल्या तरी दुसऱ्याच भारतात दूर घडत होती. पंजाबात. जिथे आधीच जमीन जास्त असलेले शेतकरी होते, जिथे कालवे ब्रिटिश काळापासून किंवा काही त्याही अगोदरपासून म्हणजेच मुघलाच्या काळात बांधलेले होते.

लताला हे कळत नव्हतं की ही क्रांती तिच्या उंबरठ्यापर्यंत


THE TIMES OF INDIA

14 TOP BANKS ARE NATIONALISED

Ordinance follows unanimous Cabinet decision

Kamaraj, Chavan happy

'Syndicate' in disarray as Morarji goes

Nationalised banks

Assam flood worsens: heavy havoc

Nanda called to Delhi

A vital step, says Indira

*१९६९ मध्ये बँकांचं राष्ट्रीयीकरण झालं. संस्थानिकांचे तनखे रद्द झाले. १९७१ च्या निवडणुकीत 'गरिबी हटाओ' ही घोषणा दिली गेली. मागणीची भाषा डावी झाली, पण पुरवठ्याची रचना तशीच राहिली...*

का पोहोचत नव्हती. लाल नसली तरी, हरित का असेना. आपल्यापर्यंत यावी. तिला फक्त हे माहीत होतं की त्या वर्षी पीक आलं नाही, सावकाराचं व्याज थांबलं नाही आणि त्याकारणाने नवऱ्याला रस्त्याच्या कामावर आणि तिला दुसऱ्यांच्या शेतात मजूर म्हणून जावं लागलं.

वसंतच्या गिरणीतल्या तासाभोवती फिरणाऱ्या क्रांतिकारी चर्चा, त्याच्याच शेजारी उभा असलेला असुरक्षित रामू आणि लताच्या दुष्काळग्रस्त शेतातली शांत हतबलता. हे तिन्ही एकाच दशकाचे चेहरे होते. हे असं दशक होतं, जिथे सरकारी आश्वासनांचा वेग आणि त्यांच्यातील अंतर्विरोध दोघेही एकाच दमात अधिक तीव्र झाले होते.

**भाग एक (भारत) : आश्वासनांचा कडेलोट**

१९६४ मध्ये नेहरूंचं निधन झालं. नेहरूंनंतरचा भारत लवकरच एका गंभीर परकीय चलन संकटात अडकला. १९६५चं युद्ध, दोन वर्षांचा दुष्काळ आणि परकीय चलनाचा साठा संपत चाललेला. या परिस्थितीत इंदिरा गांधींच्या सरकारला अमेरिका आणि जागतिक बँकेच्या दबावाखाली रुपयाचं ३६ टक्क्यांनी अवमूल्यन करावं लागलं.

हा निर्णय आर्थिकदृष्ट्या किती योग्य होता, यावर अर्थतज्ज्ञांत वाद आहेत. पण राजकीयदृष्ट्या त्याचा परिणाम उलट झाला. त्याला जागतिक राजकीय अर्थव्यवस्थेतील एक संरचनात्मक दिठी म्हणून बघायचं सोडून राष्ट्रीय अपमान म्हणून समजला गेला. नियोजनाचं स्वातंत्र्य परकीय संस्थांच्या इशाऱ्यावर ठरतंय, ही भावना खोलवर रुजली. याच भावनेतून इंदिरा गांधींचं पुढचं राजकारण घडलं. एक डावीकडे झुकणारं आणि लोकवादी राजकारण. जे या अपमानापासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत होतं.

संख्यात्मक दृष्टीने पाहायचं झालं, तर एक रुपया जो आधी २१ अमेरिकी सेंटच्या बरोबरीचा होता, तो आता साडेतेरा सेंटवर आला. आयात केलेलं प्रत्येक यंत्र, प्रत्येक खत, प्रत्येक औषध एका रात्रीत महाग झालं. या अवमूल्यनासोबत आलेल्या अटींपैकी एक होती, की आयात नियंत्रणं सैल करणं, म्हणजेच सरकारी अनुदानं सुद्धा कमी करणं. म्हणजे ज्या संरक्षणाखाली भारतीय उद्योग वाढत होता, त्या संरक्षणालाच पहिला धक्का इथे बसला होता. १९६९ मध्ये बँकांचं राष्ट्रीयीकरण झालं. संस्थानिकांचे तनखे रद्द झाले. १९७१ च्या निवडणुकीत 'गरिबी हटाओ' ही घोषणा दिली गेली आणि प्रचंड बहुमताने इंदिरा गांधी जिंकल्या.

पण अर्थतज्ज्ञ प्रभात पटनायक यांनी या काळाचं एक महत्त्वाचं विश्लेषण मांडलं आहे. त्यांच्या मते, 'गरिबी हटाओ' ही एक मागणी एकत्रित करणारी राजकीय भाषा होती. गरिबांना मतपेढीत बदलणारी. पण तिच्यासोबत संपत्तीच्या पुनर्वाटपाचा कोणताही ठोस, संरचनात्मक कार्यक्रम नव्हता. राज्य अजूनही त्याच प्रबळ मालकी वर्गांवर म्हणजेच औद्योगिक भांडवलदार, धनी शेतकरी, नोकरशाही मध्यमवर्ग यांच्यावर अवलंबून होतं. अशा गटांकडून खऱ्या पुनर्वाटपाला विरोध होणारच होता. म्हणजे मागणीची भाषा डावी झाली, पण पुरवठ्याची रचना तशीच राहिली.

**हरित क्रांती : कुणासाठी हरित ?**

१९६० च्या दशकाच्या उत्तरार्धात सुरू झालेली हरित क्रांती १९७० च्या दशकात अधिक व्यापक झाली. उच्च उत्पादन देणारी बियाणं, रासायनिक खतं, सिंचनाची नवी व्यवस्था आली. पंजाब, हरियाणा, पश्चिम उत्तर प्रदेशात गव्हाचं उत्पादन दुप्पट-तिप्पट झालं. पण याच काळात भारतीय मार्क्सवादी वर्तुळात एक तीव्र आणि महत्त्वाचा वाद सुरू झाला. 'उत्पादनपद्धतीचा वाद' (Mode of Production Debate). हा वाद Economic and Political Weeklyच्या पानांवर वर्षानुवर्षे चालला. प्रश्न सोपे वाटावेत असे होते, पण उत्तरं अवघड होत चालली होती. भारतीय शेती भांडवली आहे, सामंती आहे, की या दोन्हींचं काही विचित्र मिश्रण ?

अर्थतज्ज्ञ अमित भादुरी यांनी 'अर्ध-सामंतवाद' (semi-

feudalism) ही संकल्पना मांडली. त्यांचा युक्तिवाद होता की बिहारसारख्या भागात भाडेकरी शेती आणि सावकारी एकत्र राहून मुद्दामहून कमी उत्पादकता टिकवून ठेवतात. कारण कुळ जितका जास्त सावकाराकडे कर्जासाठी जातो, तितका जमीनदाराचा व्याजातला नफा वाढतो. पण इथे जमीनदाराला उत्पादकता वाढवण्यात स्वारस्यच नाही.

उत्सा पटनायक यांनीसुद्धा कृषी वर्गांचं अधिक काटेकोर वर्गीकरण मांडत दाखवून दिलं, की हरित क्रांतीचा फायदा प्रामुख्याने अशा शेतकऱ्यांना मिळाला, ज्यांच्याकडे आधीच जास्त जमीन होती, सिंचनाची सुविधा होती आणि नव्या निविष्ठा विकत घेण्याचं भांडवल होतं. भूमिहीन शेतमजूर आणि लताच्या नवऱ्यासारखे छोटे शेतकरी ज्यांच्याकडे यातलं काहीच नव्हतं, ते या क्रांतीच्या परिघावरच राहिले. किंवा त्यापासून पूर्णतः वगळले गेले. म्हणजे हरित क्रांती ही केवळ तंत्रज्ञानाची कथा नव्हती. तर ती कष्टकरी वर्गाची कथा होती. आधीपासून असलेली विषमता अधिक तीव्र करणारी होती.

या वादातून एक प्रश्न तरीही शिल्लक राहिला, जो आजही महत्त्वाचा आहे. भांडवल नेहमी सर्वात 'आधुनिक' किंवा सर्वात 'कार्यक्षम' संबंधांची निवड करत नाही. ते अशा संबंधांची निवड करतं, जे शोषण सर्वात स्वस्तात, सर्वात सहजपणे टिकवून ठेवतात. मग ते संबंध 'सामंती' वाटणारे असोत किंवा 'आधुनिक'. भादुरींचा युक्तिवाद इथे एका मोठ्या तत्त्वाकडे इशारा करतो. जे तत्त्व आपल्याला आज प्लॅटफॉर्म भांडवलशाही समजून घेतानाही उपयोगी पडतं. नियंत्रण आणि शोषणाची रचना नेहमी 'जुनी' विरुद्ध 'नवी' अशा सरळ रेषेत बदलत नाही. ती जुन्या आणि नव्या स्वरूपांचं मिश्रण घडवत राहते. या सिद्धांताचा शास्त्रशुद्ध अभ्यास सध्याच्या काळात जैरुस बानाजी सारखे अभ्यासक अजूनही करत आहेत.

**कामगार चळवळीचं शिखर आणि आणीबाणी**

१९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी गावात शेतमजुरांचा उठाव झाला. चारू मजुमदार आणि इतर कम्युनिस्ट नेत्यांनी भारतीय राज्याचं वर्णन 'अर्ध-सामंती, अर्ध-वसाहतिक' असं केलं आणि सशस्त्र शेतकरी क्रांतीची भाषा सुरू केली. हे विश्लेषण उत्पादनपद्धतीच्या वादाशी थेट जोडलेलं होतं, पण त्याने राजकीय कृतीची एक वेगळी, हिंसक दिशा घेतली. या उठावाने भारतीय कम्युनिस्ट चळवळीत खोल फूट पाडली. CPI, CPI(M²) आणि CPI(ML) असे तुकडे झाले. वसंतच्या चाळीत संध्याकाळी जमणाऱ्या तरुणांच्या चर्चांमध्ये हीच फूट प्रतिबिंबित होत होती. संसदीय मार्गाने बदल घडेल असं मानणारे आणि सशस्त्र क्रांतीच एकमेव मार्ग आहे असं मानणारे.

१९७०चं दशक हे भारतीय संघटित कामगार चळवळीचं शिखर मानलं जातं. मुंबईच्या गिरण्यांत अडीच लाखांहून अधिक कामगार होते. रेल्वे कामगारांचा १९७४ चा देशव्यापी संप जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली वीस दिवस चालला आणि त्या संपाने देशाची अर्थव्यवस्था गदागदा हलवून सोडली.

पण याच ताकदीची धास्ती वाटल्यामुळेच, १९७५ मध्ये आणीबाणी लागू झाली तेव्हा सर्वप्रथम ज्या लोकाधिकारावर बंदी आणली, तो म्हणजे संपाचा अधिकार. वीस सूत्री कार्यक्रमात गरिबांसाठी काही योजना होत्या, खऱ्या पण कामगारांचा मूलभूत अधिकार, संघटित होऊन मागणी करण्याचा अधिकार स्थगित झाला. राज्याची कामगारांशी असलेली बांधिलकी किती सशर्त होती, हे आणीबाणीने नग्नपणे दाखवून दिलं. कुठलंही आर्थिक संकट आलं, की पहिला बळी जातो, तो कामगारांच्या अधिकाराचा, हेही त्या वेळी स्पष्ट झालं.

**भाग दोन (जग) : सुवर्णयुगाचा अंत आणि नव्या व्यवस्थेची चाहूल**

१९७१ मध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी एकतर्फी निर्णय घेतला. डॉलरची सोन्याशी असलेली नाळ तोडली. ब्रेटन वूड्स व्यवस्थेचा मूळ आधारच कोसळला. परंतु हा निर्णय अमेरिकेच्या दुर्बलतेचं लक्षण नसून तो अमेरिकेच्या सत्तेचं नवं रूप होतं. आता डॉलर कशालाही बांधलेलं नव्हतं. पण तरीही जगाचं मुख्य चलन तेच राहिलं. कारण ते अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक वर्चस्वावर उभं होतं.

१९७३ मध्ये अरब-इस्रायल युद्धानंतर ओपेक देशांनी तेलाचा पुरवठा रोखला. किमती काही महिन्यांत चौपट झाल्या. भारतासारख्या तेल-आयातदार देशांना याचा प्रचंड फटका बसला. पण इथे एक विरोधाभासही होता. तेलातून मिळालेले अब्जावधी डॉलर्स आखाती देशांतून पश्चिमी बँकांत जमा झाले आणि त्या बँकांनी हे पैसे तिसऱ्या जगाच्या देशांना बेफाम कर्ज म्हणून दिले. याला 'पेट्रोडॉलर रिसायकलिंग' म्हणतात. हे कर्ज





*१९७०चं दशक हे भारतीय संघटित कामगार चळवळींनी व्यापले होते. मुंबईच्या गिरण्यांत अडीच लाखांहून अधिक कामगार होते. रेल्वे कामगारांचा १९७४ चा देशव्यापी संप जॉर्ज फर्नांडिस यांच्या नेतृत्वाखाली वीस दिवस चालला आणि त्या संपाने देशाची अर्थव्यवस्था गदागदा हलवून सोडली.*

स्वस्त वाटत होतं. पण त्याची खरी किंमत पुढच्या दशकात कळणार होती.

**व्होल्कर शॉक आणि थॅचर–रेगन यांचा वर्गीय प्रकल्प**

१९७९ ते १९८१ या कालावधीत अमेरिकेतली महागाई रोखण्यासाठी अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हचे अध्यक्ष पॉल व्होल्कर यांनी व्याजदर जवळपास वीस टक्क्यांपर्यंत वाढवले. याचे पडसाद जगभर उमटले. ज्या देशांनी डॉलरमध्ये कर्ज घेतलं होतं, त्यांचं कर्जफेडीचं ओझं काही महिन्यांत दुप्पट–तिप्पट झालं. १९८२ मध्ये मेक्सिको कर्जबुडीत गेला. लॅटिन अमेरिकेचं 'हरवलेलं दशक' इथून सुरू झालं.

या आकड्यांकडे जरा बारकाईने पाहूया. १९७० मध्ये विकसनशील देशांचं एकत्रित बाह्य कर्ज सुमारे ६८ अब्ज डॉलर्स होतं. १९८० पर्यंत ते ५६० अब्जांपर्यंत पोहोचलं. हे कर्ज आधी स्वस्त वाटत होतं, कारण व्याजदर कमी होते आणि पेट्रो डॉलर्सच्या पुरामुळे बँका कर्ज देण्यासाठी अधीर होत्या. पण व्होल्करने व्याजदर वाढवताच, हे स्वस्त कर्ज अचानक एका सापळ्यात बदललं. ज्या देशांनी अल्पकालीन किंवा बदलत्या व्याजदराने कर्ज घेतलं होतं, त्यांचं वार्षिक कर्जफेड ओझं काही वर्षांतच दुप्पट–तिप्पट झालं. हा निव्वळ आर्थिक अपघात नसून एका देशाच्या आर्थिक निर्णयाने (अमेरिकेच्या देशांतर्गत महागाई रोखण्याच्या स्वार्थी निर्णयाने) संपूर्ण जगातल्या डझनभर देशांचं भविष्य ठरवण्याची ताकद दाखवणारी घटना होती. साम्राज्यवाद इथे कुठल्याही सैन्याशिवाय, केवळ एका व्याजदराच्या आकड्याने काम करत होता.

याच काळात ब्रिटनमध्ये थॅचर आणि अमेरिकेत रेगन सत्तेवर आले. वैचारिक बदलांच्या पलीकडे हे भांडवलाचं श्रमिक वर्गावरील प्रत्युत्तर होतं. १९७० च्या दशकातल्या नफ्याच्या घसरणीला आणि कामगार चळवळीच्या वाढत्या ताकदीला उत्तर म्हणून, खाजगीकरण, कामगार संघटनांवर हल्ला (ब्रिटनमधील १९८४–८५चा खाण कामगारांचा संप आणि त्याचा निर्णायक पराभव) आणि भांडवलासाठी करसवलती हा एक संघटित वर्गीय प्रकल्प होता.

जागतिक स्तरावर तिसऱ्या जगाने मागितलेली 'नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था' (NIEO) याच काळात पराभूत झाली. तिच्या जागी 'वॉशिंग्टन कन्सेन्सस' उभं राहिलं. खाजगीकरण, नियंत्रणमुक्ती आणि उदारीकरण हीच आता विकासाची एकमेव भाषा मानली जाणार होती.

**सिद्धांतांची नवी लाट**

याच अस्वस्थ दशकात मार्क्सवादी विचारविश्वातही एक मोठी सैद्धांतिक चळवळ उभी राहिली. प्रेबिशच्या निरीक्षणांना अधिक धारदार रूप देत आंद्रे गुंडर फ्रांक यांनी 'अविकासाचा विकास' (Development of Under development) ही संकल्पना मांडली. लॅटिन अमेरिका मागासलेली राहिली, कारण ती भांडवलशाहीच्या बाहेर नव्हती. तर नेमकं उलट तिच्या भांडवलशाही जागतिक व्यवस्थेतल्या खोल गुंतवणुकीनेच तिचा अविकास घडवला. फ्रांकच्या मते 'अविकसित' (underdeveloped) आणि 'अनविकसित' (undeveloped) हे दोन वेगळे शब्द आहेत. जंगलात

राहणारा आदिवासी समाज 'अनविकसित' असू शकतो, कारण तो भांडवली व्यवस्थेच्या बाहेर आहे. पण लॅटिन अमेरिकेतले देश 'अविकसित' आहेत. कारण ते भांडवली व्यवस्थेच्या आतच आहेत. नेमकं त्या व्यवस्थेतल्या त्यांच्या स्थानानेच त्यांचा विकास खुंटवला आहे. म्हणजे गरिबी ही पाश्चात्य विकासाची उपपत्ती (by-product) नसून ती त्याची पूर्वअट आहे.

१९७४ मध्ये इमॅन्युएल वॉलरस्टाइन यांचं 'The Modern World-System' प्रकाशित झालं. त्यांनी संपूर्ण आधुनिक इतिहासालाच एका 'भांडवली जागतिक-व्यवस्थे'चा भाग म्हणून मांडलं. कुठलाही एक देश स्वतंत्रपणे 'विकसित' किंवा 'अविकसित' होत नाही, तर संपूर्ण जग एका श्रम-विभागणीत (division of labour) बांधलेलं असतं. 'केंद्र' देश भांडवल-केंद्रित, उच्च-वेतनाचं, तंत्रज्ञानप्रधान उत्पादन करतात. 'परिघ' देश कच्चा माल आणि स्वस्त श्रम पुरवतात. आणि 'अर्ध-परिघ' देश (जसे ब्राझील, भारत) या दोघांच्या मध्ये, कधी केंद्राकडे झुकणारे, कधी परिघाच्या स्थितीत अडकलेले. हा सिद्धांत पुढची अनेक दशकं प्रभावी राहिला आणि अजूनही आहे. कारण त्याने 'विकास' आणि 'अविकास' यांना एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हणून दाखवलं. वेगळे प्रवास नव्हे.

पण याच मार्क्सवादी वर्तुळात एक अंतर्गत वादही उभा राहिला. इतिहासकार रॉबर्ट ब्रेनर यांनी १९७७ मध्ये एक तीव्र टीका लिहिली. फ्रांक आणि वॉलरस्टाइन हे व्यापाराच्या आणि देवाणघेवाणीच्या संबंधांवरच लक्ष देतात, पण उत्पादन-संबंधांवर म्हणजे प्रत्यक्ष वर्गसंघर्षावर पुरेसं लक्ष देत नाहीत, असा त्यांचा आक्षेप होता. ब्रेनरचा मुद्दा होता की एखादा देश गरीब का राहतो, हे केवळ तो जागतिक बाजारात कुठे उभा आहे यावरून ठरत नाही, तर त्या देशाच्या आतल्या वर्गसंबंधांवरूनही ठरतं. जमीनदार आणि कुळ यांच्यातला संबंध, मालक आणि कामगार यांच्यातला संबंध. व्यापार हा दुय्यम घटक आहे, उत्पादनसंबंध हे मूळ कारण आहे. हा वाद आजही चालू आहे. तो आपल्याला आठवण करून देतो की मार्क्सवाद एक एकसंध, बंदिस्त सिद्धांत नाही, तर सतत स्वतःशी झगडणारी, स्वतःला तपासणारी एक पद्धती आहे.

**कडेलोटाचा उंबरठा आणि वर्तमानाची मुळं**

वसंत आणि लता यांच्या जगात हे सगळे जागतिक भूकंप वेगळ्या प्रकारे पोहोचले. एकाला महागाई आणि राजकीय भाषेच्या रूपात, दुसरीला दुष्काळ आणि न पोहोचलेल्या क्रांतीच्या रूपात ते अनुभवास आले. तर वसंतच्याच शेजारी उभा असलेला रामू, तो एका तिसऱ्याच भविष्याचा संदेशवाहक होता.

या सगळ्या अंतर्विरोधांची मुळं आजही आपल्या आसपास जिवंत आहेत. रामूसारखा 'बदली कामगार' हा आजच्या गिग कामगाराचा पूर्वज होता. कायम नोकरीशिवाय, हक्काशिवाय, पण तेवढीच मेहनत करणारा. लताच्या नवऱ्यासारखा हरित क्रांतीतून वगळलेला शेतकरी हा आजच्या कृषी संकटाचा, शेतकरी आत्महत्यांचा पूर्वेतिहास होता. तेव्हाही फायदा त्यांनाच मिळाला ज्यांच्याकडे आधीच जमीन, पाणी आणि भांडवल होतं. आणि व्होल्करच्या व्याजदरवाढीने तिसऱ्या जगावर लादलेला कर्जाचा सापळा हा आजच्या आयएमएफ-जागतिक बँकेच्या 'धोरणात्मक अटी' या भाषेचाच पूर्वावतार होता. ज्याच्या आधारेच पुढे १९९१ मध्ये भारताला आपली दारं उघडावी लागणार होती.

म्हणजे, जागतिकीकरण ही १९९१ मध्ये जन्मलेली अचानक घटना नव्हती हे अधिक प्रखरपणे लक्षात येतं. ती या दशकात व्याजदर, चलन आणि कर्जाच्या भाषेत आधीच लिहिली जात होती. वसंतच्या गिरणीतल्या नोकरीला आणि लताच्या शेतातल्या कर्जाला अजून हे माहीत नव्हतं की पुढच्या दशकात त्यांची वाट कुठे जाऊन मिळणार आहे. मुंबईतल्या एका ऐतिहासिक संपाकडे, जो संघटित कामगार वर्गाच्या पराभवाची सुरुवात ठरेल आणि अंतिमतः १९९१ च्या त्या उंबरठ्याकडे, जिथे भारताला मोकळा श्वास घेण्यासाठी जागतिक व्यवस्थेसमोर गुडघे टेकावे लागतील.

**लेखक किंग्स कॉलेज, लंडनमधील इंटरनॅशनल डेवलपमेंट आणि जियोग्राफी विभागात पीएच.डी. अभ्यासक आहेत. युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड येथेही ते अध्यापन सहाय्य करतात. त्यांचे संशोधन मुख्यत: कामगार (श्रम), तंत्रज्ञान आणि सार्वजनिक वित्त यांच्या अर्थराजकीय व्यवस्थेवर केंद्रित आहे. संपर्क : ९६५७७९९९८६**

**ईमेल :** hiteshdpotdar@gmail.com

# जगाचा गुरुत्वमध्य सरकतो आहे?



डॉ. मोहन द्रविड

विश्वकारण



अमेरिकेला युद्धाशिवाय दुसरं अधिक परिणामकारक हत्यार सापडलं होतं. शत्रू देशाला आर्थिकदृष्ट्या वाळीत टाकणे. त्याच्यावर निर्बंध टाकणे. अमेरिका निर्बंध दोन प्रकारचे टाकते, प्राथमिक आणि द्वितीय. पहिल्या प्रकारात शत्रू देशावर स्वतः अमेरिका बंधनं घालणार. ती घालायचा आणि काढायचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाकडे. दुसऱ्या प्रकारात जो कोणी तिसरा देश शत्रू देशाबरोबर व्यवहार करत असेल त्याच्यावर बंधनं घालायची. ती घालायचा आणि काढायचा अधिकार अमेरिकेच्या संसदेचा. याचं उदाहरण म्हणजे, भारताने इराणशी व्यापार केला, तर भारतावर येतील ती द्वितीय बंधनं. सांगायचा मुद्दा म्हणजे, क्यूबावर सर्व प्रकारची बंधनं टाकून झाली...

जगाचा इतिहास संक्रमणातून जात आहे. या आधीचं संक्रमण १९९१ साली झालं. त्या वर्षी सोव्हिएत युनियन कोसळली आणि अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धानंतर शह देणारा समाजवादी गट संपला. पण त्या आधीच समाजवादी गटात उभी चीर पडली होती. सोव्हिएत युनियन आणि चीन यांच्यात वैरभाव निर्माण झाला होता. व्हिएतनाममध्ये नामुष्की झालेल्या अमेरिकेनं या दुफळीचा फायदा उचलला आणि चीनला जवळ केलं. चीनशी दोस्ती करण्याची किंमत म्हणून अमेरिकेने तैवानची मान्यता काढून घेऊन ती चीनला दिली. जागतिक संघटनेच्या सुरक्षा समितीमधील जागा तैवानकडून काढून घेऊन चीनला दिली. पण त्यातही दुतोंडीपणा असा, की त्याच वेळेस तैवानबरोबर चीनविरोधी लष्करी करार केला! या भूमिकेला अमेरिकेने 'हेतुपुरस्सर संदिग्धता' (strategic ambiguity) असं भरगच्च नाव दिलं.

१९९१ साली जगातल्या देशांची पुनर्जुळणी झाली. अफगाणिस्तानातील धर्मवेड्यांनी घेरलेल्या डाव्या सरकारचं रक्षण करण्याच्या प्रयत्नांत खुद्द सोव्हिएत युनियनचेच बारा वाजले. तिचे पंधरा तुकडे तर झालेच, पण तिच्या गोटातले पूर्व युरोपमधले देश सरळसरळ अमेरिकेला सामील झाले. रशियाने समाजवादाला रामराम ठोकला. तिथे भांडवलदारी माफियांचं राज्य चालू झालं. त्यांनी देश लुटून काढला आणि देशातील संपत्ती बाहेर नेली. आता रशियाला अमेरिकेच्या मेहेरबानीवर जगायची पाळी आली. चीननेही नवी अर्थव्यवस्था स्वीकारल्याने त्याला अमेरिकेला विरोध करणं परवडणारं नव्हतं. जगातील डावी चळवळ पोरकी होऊन संपुष्ट व्हायच्या मार्गावर लागली.

हे युद्धोत्तर इतिहासाचं शेवटचं पर्व आहे, किंबहुना मानवी विचारांच्या उत्क्रांतीचा इतिहास (एंड ऑफ हिस्ट्री अँड द लास्ट मॅनः फ्रान्सिस फुकुयामा) संपला, असे विचार लोकप्रिय झाले. यापुढे अमेरिका हा सर्व जगाचा आदर्श असेल, नेता असेल. अमेरिकेची राजकीय आणि आर्थिक प्रणाली सर्वमान्य होईल आणि त्यातून समृद्धी पसरेल. त्यासाठी पश्चिम युरोप, जपान, कोरिया ही उदाहरणं दिली जात होती. यात अमेरिका न्यायाने, समंजसपणे आणि प्रामाणिकपणे वागेल, मनमानी कारभार करणार नाही हे गृहीत धरलं होतं. असं करायला पुरावा फारसा भक्कम नव्हता. पण बदललेल्या परिस्थितीत अमेरिका सर्वांना सांभाळून घेईल, असा भाबडा विश्वास निर्माण झाला होता.

**अमेरिकेच्या कृपेने जग तडतडले...**

पण त्या विश्वासाला लवकरच तडे पडायला लागले. युगोस्लाव्हिया हा देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र होता. युरोपमधल्या अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्या अनुक्रमे नेटो आणि वॉर्सा पॅक्ट या लष्करी संघटनांपासून अलिप्त राहिला होता. भारताचे पंतप्रधान नेहरू, इजिप्तचे नासेर, चीनचे चौ-एन् लाय, इंडोनेशियाचे सुकार्नो यांचा भर अलिप्तवादी संघटनेवर होता. अमेरिकेच्या नेटो या लष्करी संघटनेने १९९८ मध्ये युगोस्लाव्हियावर सतत तीन महिने बाँबहल्ला केला. तिथलं सरकार उद्ध्वस्त केलं आणि देशाचे महाराष्ट्रातल्या तालुक्याच्या आकाराचे दहा तुकडे केले. नवीन युगातला अमेरिकेचा हा राष्ट्रबदलाचा पहिला प्रयोग.

सुरुवातीस रशियाची युगोस्लाव्हियाला मदत होती. पण अमेरिकेने दम दिल्यानंतर तीही बंद झाली. चीन हा स्वतःच्या व्यापात (आणि व्यापारात) गुंतला होता. चीन आणि रशिया गप्प राहण्याचं दुसरं आणि अधिक महत्त्वाचं कारण हे की या दोन देशांचे तुकडे करण्याचे प्रयत्न अमेरिका आणि तिच्या साथीदारांचे चोरून, पण मोठ्या प्रमाणात चालले होते.

चीनमधील प्रांत शिंजियान आणि तिबेट हे स्वतंत्र देश असून ते चीनच्या पारतंत्र्यात गुलामासारखे राहतात, हा प्रचार गेली अनेक दशकं चालू आहे. यातून चीनमध्ये दुफळी माजावी हा हेतू. (भारत-चीन हा तंटा हा १९५०च्या दशकात तिबेटच्या प्रश्नावरून सुरू झाला, हे फार थोड्या लोकांच्या लक्षात असेल. भारताने चीनवर हल्ला करून बीजिंग शहर काबीज करावे, अशी राणा भीमदेवी थाटातील भाषणं आपल्याकडचे मधू लिमयेंसारखे समाजवादी पुढारी नेहरूंवर दडपण आणण्याकरता करत असत. पुढे भारत-चीन युद्ध उद्भवले आणि आपले चीनबरोबरचे संबंध कायमचे दूषित झाले.) रशियाच्यामागेसुद्धा अमेरिकेने जॉर्जिया, युक्रेनसारखे उपद्व्याप लावून दिले.

राष्ट्रबदलाचा दुसरा प्रयोग झाला, इराकमध्ये. त्याआधी १९९०-९१च्या 'वाळवंटातील वादळ' असं नाव दिलेल्या लढाईत नेटोने इराकला झोडपून काढलं होतं. तेव्हा अस्तित्वात असलेल्या सोव्हिएत युनियनने किंवा चीनने तोंडातून ब्रही काढला नाही. अमेरिकेला त्याच वेळी नव्या युगाची चाहूल लागली होती. २००३ साली अमेरिकेची आर्थिक परिस्थिती फारच सुधारली होती. अर्थसंकल्प अतिरिक्त होता. तिजोरीत कधी नाही तेवढे पैसे साठले होते. थोडक्यात म्हणजे, गाठीला मजबूत पैसे होते आणि समोर मोकळं रान होतं. युद्धखोरीसाठी दुग्धशर्करा योगच जणू. मग, सर्वानुमताने इराकवर हल्ला



*इस्रायलच्या युद्धखोर मानसिकतेचे चोचले पुरवणाऱ्या अमेरिकेने अख्ख्या जगाचा तोल बिघडवून टाकला आहे. त्यात भारतासारखा याचकाच्या भूमिकेतला देश अभिनयसामर्थ्याच्या बळावर वेळ मारून नेतो आहे...*

करायचं ठरलं. त्यात इतर अरबी राष्ट्रंही सामील झाली. इराकला हरवलं, इराकी नेत्याला फासावर चढवलं, अमेरिकेत आनंदीआनंद साजरा झाला. खुद्द इराकमध्ये बंडाळी चालू झाली. तिथली अस्थिरता अजूनही कायम आहे. अमेरिकेचं सैन्य अजूनही तिथे मुक्काम ठेवून आहे. असेच प्रयोग पश्चिम अशियातील लिबिया, सुदान, सिरिया या देशांत झाले. अमेरिकेचे जनरल वेझ्ली क्लार्क यांच्या २००७ सालच्या म्हणण्याप्रमाणे वरील चार आणखी लेबनॉन, सोमालिया आणि इराण हे देश मिळून सात देशांवर हल्ला करायची अमेरिकेची योजना होती. त्यातील आता फक्त इराण शिल्लक आहे.

इस्रायल पश्चिम आशियामध्ये होता आणि इस्रायलला या भागात अमेरिकेला हाताशी धरून आपलं वर्चस्व निर्माण करायचं होतं. अर्थातच पश्चिम आशिया हा काही जगातील एकमेव भागच अमेरिकेला खुणावत होता अशातला भाग नाही. दक्षिण अमेरिकेतीलसुद्धा काही देश स्वतंत्र बुद्धीने वागू इच्छित होते. त्यातील एक, क्यूबा तर गेली पासष्ट वर्ष मनमानी कारभार करत होता. एकदा तर क्यूबामुळे अणुयुद्धाचा समरप्रसंग येऊ घातला होता. पण तेव्हाचा संघर्ष सोव्हिएत युनियनबरोबर होता. आता तर सोव्हिएत युनियन अस्तित्वातच नाही. तेव्हा क्यूबाला मनसोक्त छळायचा मार्ग मोकळा झाला.

**अमेरिकेची माफिया शैली**

अमेरिकेला युद्धाशिवाय दुसरं अधिक परिणामकारक हत्यार सापडलं होतं. शत्रू देशाला आर्थिकदृष्ट्या वाळीत टाकणे. त्याच्यावर निर्बंध टाकणे. अमेरिका निर्बंध दोन प्रकारचे टाकते, प्राथमिक आणि द्वितीय. पहिल्या प्रकारात शत्रू देशावर स्वतः अमेरिका बंधनं घालणार. ती घालायचा आणि काढायचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाकडे. दुसऱ्या प्रकारात जो कोणी तिसरा देश शत्रू देशाबरोबर व्यवहार करत असेल त्याच्यावर बंधनं घालायची. ती घालायचा आणि काढायचा अधिकार अमेरिकेच्या संसदेचा. याचं उदाहरण म्हणजे, भारताने इराणशी व्यापार केला, तर भारतावर येतील ती द्वितीय बंधनं. सांगायचा मुद्दा म्हणजे, क्यूबावर सर्व प्रकारची बंधनं टाकून झाली. द्वितीय बंधनांमुळे त्यांना मदत करायला बाकीचे देश घाबरतात. थोडीफार मदत चीन आणि रशिया करतात. पण ती पुरत नाही आणि आता क्यूबा शरण येण्याची लक्षणं दिसत आहेत.

इ. स. २००० सालच्या आसपास क्यूबाच्या पायावर पाय टाकून दक्षिण अमेरिकेतील व्हेनेझुएलाने अमेरिकेबरोबर असहकार्य पुकारलं. त्याचा परिणाम काय झाला, तो इतिहास ताजाच आहे. तिथे आधी दंगेधोपे घडवले गेले. लष्कराला चिथावण्यात आलं. निवडणुकांत हस्तक्षेप केला. तरीही तिथल्या शावेझ या नेत्यावर त्यांचा काही परिणाम झाला नाही. २०१३ साली शावेझ गेल्यानंतर त्याचा चेला मदुरो याच्याविरुद्ध कारवाया चालू केल्या. त्याही अयशस्वी ठरल्यानंतर एका रात्रीच्या असाधारण आणि धाडसी कारवाईमध्ये व्हेनेझुएलातील राष्ट्रपती भवनात घुसून त्याचं आणि त्याच्या पत्नीचं अपहरण केलं.

तसाच प्रयोग पण मोठ्या प्रमाणात आणि वेगळ्या प्रकारे इराणविरुद्ध केला. त्या प्रयोगाला नाव दिलं 'शिरच्छेद (decapitation)' आणि त्याची रूपरेषा अशी. ज्यांचा बळी घ्यायचा त्यांच्यावर आपल्या हेरांतर्फे पाळत ठेवायची. संधी मिळाली, की त्यांच्यावर मोठा बॉंब टाकायचा. त्यांच्याबरोबरची मंडळी – बायका, मुलं, नातेवाईक, शेजारी–पाजारी, कोणीही – मृत्युमुखी पडली तर सोन्याहून पिवळं! इराणचा लष्करप्रमुख कासिम सुलेमानी याचा २०२० साली तो बगदादच्या विमानतळात असताना क्षेपणास्त्रं टाकून खात्मा केला. त्यानंतर १३ जून ते २४ जून २०२५ मध्ये इराणविरुद्ध इस्राइल–अमेरिका झालेल्या युद्धात महम्मद बगेरी, हुसेन सलामी अशा सैन्यातल्या ३० मातब्बर लोकांना आणि १० शास्त्रज्ञांना घातपाती प्रकाराने ठार मारले.

**कळीचा मुद्दा युरेनियमचा**

आता विरामाच्या स्थितीत असलेले युद्ध २८ फेब्रुवारी २०२६ या दिवशी सुरू झाले. खरं म्हणजे, तेव्हा ओमान या

देशात जून २०२५चे युद्ध संपवायच्या वाटाघाटी चालू होत्या. त्या दिवशी इराणला नमवायचा शेवटचा प्रयत्न म्हणून अमेरिकेने जोराचा हल्ला केला. तो संपूर्ण फसला. आता हे नवीन युद्ध संपवण्यासाठी पाकिस्तानला मध्यस्थी घालून ८ एप्रिलपासून जूनपर्यंत (स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या वाटाघाटीमधली अनिश्चितता जून महिना संपेपर्यंत कायम होती.) वाटाघाटी चालल्या असल्या, तरी वादग्रस्त मुद्द्यांवरील दोन्ही बाजूंच्या भूमिकांमध्ये दरीएवढे अंतर आहे. वादग्रस्त मुद्दे खालील प्रमाणे : १) इराणसाठी अणुशक्ती, २) इराणची गोठवलेली मालमत्ता, ३) इराणवर टाकले गेलेले निर्बंध, ४) अमेरिकेचे पश्चिम अशियातील लष्करी तळ, ५) इराणचे हमाससारखे छोटे शिलेदार, ६) इराणकडे असलेली क्षेपणास्त्रे, ७) युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई, ८) यापुढील सुरक्षाहमी.

पहिला वादग्रस्त मुद्दा आहे, अणुशक्तीसंबंधी. १९६८ साली झालेल्या जागतिक ठरावाप्रमाणे (Non-Proliferation Treaty: NPT) वीज तयार करण्यासाठी अणुशक्तीचा वापर करण्याचा अधिकार सर्वांना आहे. पण अणुबॉंब बनवायचा अधिकार सुरक्षासमितीचे पाच सभासद सोडून कोणालाही नाही. या दोन गोष्टींचा मेळ कसा साधायचा? तर अणुबॉंब बनवण्यासाठी लागणाऱ्या इंधनावर नियंत्रण. ते तपासणीसाठी आंतरराष्ट्रीय अभिकरण (IAEA) संस्था तयार केली आहे. अणुबॉंब बनवायचा कच्चा माल म्हणजे, युरेनियम धातू.

युरेनियम धातूची अनेक समस्थानके (isotopes) आहेत आणि ती सर्व विघटनक्षम आहेत. त्यातील दोन युरेनियम-२३५ आणि युरेनियम-२३८ हे त्यातल्या त्यात टिकाऊ आहेत आणि म्हणून ती निसर्गात अजूनही अस्तित्वात आहेत. (यातील २३५ आणि २३८ हे आकडे ते अणू हायड्रोजन अणूच्या किती जड आहेत ते दाखवतात.) त्या दोघांतसुद्धा युरेनियम-२३८ जास्त टिकाऊ आहे. तेव्हा नैसर्गिकरित्या त्याचे प्रमाण ९९.३ टक्के असते, तर युरेनियम-२३५चे प्रमाण ०.७ टक्के. (युरेनियम-२३४ हे समस्थानक ०.०००६ टक्के असते, तेव्हा त्याचा फारसा विचार गेला जात नाही.) युरेनियम-२३८ फुटत नसल्याने (त्याचे अर्धायुष्य अब्जावधी वर्षांचे आहे) त्याचा अणुशक्तीसाठी फारसा उपयोग नाही. (त्याच्यापासून प्लुटोनियम बनवता येतो आणि त्याचा अणुशक्तीसाठी उपयोग होतो. पण तो विषय वेगळा आहे.)

थोडक्यात म्हणजे, अणुशक्तीसाठी युरेनियम-२३५ पाहिजे आणि त्यासाठी खाणकाम केलेल्या युरेनियममधलं युरेनियम-२३५चं प्रमाण वाढवलं पाहिजे. या प्रक्रियेला संवर्धन (enrichment) म्हणतात. अशा रीतीने वीज निर्मितीसाठी किंवा बॉंब बनवण्यासाठी संवर्धन ही एक अनिवार्य पायरी ठरते. संवर्धन दोन प्रकारांनी करतात, विसरण (diffusion) आणि केंद्रोत्सारण (centrifugal action). यांपैकी दुसरी प्रक्रिया अधिक लोकप्रिय आहे. त्यात युरेनियम-२३८ हा युरेनियम-२३५ पेक्षा किंचित अधिक (१.२८ टक्क्यांनी) जड असतो, या गुणधर्माचा फायदा घेतला जातो. दोन्हींची हेक्साफ्लुराइड (UF6) ही वायूरूपं असतात. असा मिश्रित वायू नळकांड्यांत (centrifuges) घालून ७०,००० RPM किंवा अधिक अशा वेगाने फिरवतात. जड युरेनियम-२३८चं हेक्साफ्लुराइड बाहेरच्या बाजूला फेकलं जातं. केंद्राजवळील वायूत युरेनियम-२३५चे प्रमाण थोडेसे वाढते. केंद्राजवळील वायू बाहेर काढून त्याचं आणखीन संवर्धन केलं जातं. ही प्रक्रिया अनेक वेळा केली की युरेनियम-२३५चे प्रमाण ६० टक्क्यांपर्यंत जाते.

वीज निर्मितीसाठी यु-२३५चे प्रमाण ३ ते ५ टक्क्यांपर्यंत पुरते. त्याला reactor-grade इंधन म्हणतात. उच्च-विश्लेषण कमी-संवर्धित युरेनियम (HALEU) २० टक्क्यांपर्यंत संवर्धित केलेले यु-२३५ याचा वापर पुढील पिढीच्या आणि लहान मॉड्युलर अणुभट्ट्यांना (SMR) इंधन देण्यासाठी वाढत्या प्रमाणात केला जातो. अशा लहान अणुभट्ट्या छोट्या डेटा सेंटरसाठी वापराव्यात, असा एक विचार बळावत आहे. अत्यधिक संवर्धित युरेनियम (२० ते ९० टक्क्यांपर्यंत संवर्धित केलेले यु-२३५) शस्त्रास्त्र दर्जाचं मानलं जातं. ९० टक्के संवर्धित केलेले यु-२३५ अण्वस्त्रं तयार करण्यास सक्षम असते.

इराण हा दहशतवादी देश असून त्याला कसलंही युरेनियम ठेवण्याची परवानगी देऊ नये, असा इस्रायलचा हट्ट आहे. (यूनोचा नाही.) परंतु अमेरिका, युरोप, रशिया आणि चीनने इराणवर लक्ष ठेवून त्याला अणुशक्तीचा प्रकल्प उभा करण्याची योजना ओबामांनी २०१५ साली इस्रायलला न जुमानत आखली (JCPOA). त्यावर यूनोतील सुरक्षा-समितीतील पाच सभासद अधिक जर्मनी (P5+1) यांनी सह्या केल्या. या योजनेत इराणला यु-२३५चे प्रमाण ३.६७ टक्क्यांपेक्षा जास्ती ठेवता येणार नव्हतं. अशा युरेनियमचा साठा आणखी पंधरा वर्ष ३०० किलोग्रॅमपेक्षा जास्त ठेवता येणार नव्हता. त्या बदल्यात इराणवरील व्यापारी आणि आर्थिक बंधनं उठवली जाणार

होती. पण ट्रम्प राज्यावर आल्यानंतर त्यांनी ती योजना उधळून लावली. त्यानंतर राज्यावर आलेल्या बायडनना ती योजना परत सुरू करता आली असती, पण तेही आयपॅकच्या वर्चस्वाखाली असल्यामुळे त्यांनी तो प्रश्न लोंबकळतच ठेवला.

**निव्वळ थापेबाजी**

ही योजना इराणने मान्य केली होती. जवळ असलेले १०,००० कि.ग्रॅ.चं युरेनियम नष्ट करायचं कबूल केलं. पण अमेरिकेनेच ही योजना अमान्य केल्यावर इराणने संवर्धन चालू केलं. आज इराणकडे ६० टक्के धारणेचे ४०० कि.ग्रॅ. युरोनियम आहे असा अंदाज आहे. ते जमिनीत पार खोलवर गाडलेलं आहे. त्याचं एका आठवड्यात ९० टक्क्यांत रूपांतर करून त्याचे दहा बाँब करता येतील असं टेड पॉस्टल या MITमधील अणुशास्त्रज्ञाचं मत आहे. (इराणने ते केलेही असतील, असं तो हसत म्हणतो.) इराणला एक कणही युरेनियम ठेवून देणार नाही, कारण नाही तर तो बाँब बनवेल, अशी अमेरिकेची भूमिका आहे. याचा अर्थ, 'ते सगळं आम्ही जून २०२५ च्या हल्ल्यात उडवून टाकलं,' असं जे अमेरिका म्हणते त्यात फार तथ्य नसावं.

याउलट आमच्याकडचं युरेनियम आम्ही सोडणार नाही, आम्हाला बाँब बनवायचा असेल तर आम्ही तो केव्हाच बनवला असता, अशी इराणची भूमिका आहे. 'इराण दोन आठवड्यात बाँब बनवेल,' असं इस्रायल गेली वीस वर्ष म्हणत आला आहे, यावरून इराणच्या म्हणण्याला दुजोरा मिळतो. अधूनमधून इराणकडचं युरेनियम चीन किंवा रशियाकडे ठेवण्यात यावं, असं ऐकायला मिळतं. पण त्याला कुठूनही दुजारा मिळत नाही. शिवाय संवर्धित केलेले युरेनियम तसं एका देशातून दुसऱ्या देशात नेणं धोक्याचं आहे, असं काही तज्ज्ञांचं मत आहे. ओमानने फेब्रुवारी महिन्यात काढलेल्या तोडग्याप्रमाणे इराणचं आताचं युरेनियम काढून घेऊन त्याला अणुशक्तीसाठी लागणारं युरेनियम जरुरीप्रमाणे पुरवायचं, याला इराण तयार होता, असं म्हटलं जातं. पण त्यानंतर अमेरिकेने युद्ध काढलं, आणि इराण अर्थातच त्या तोडग्याला आता तयार नाही. असा पेच पडल्यामुळे युरेनियमचा प्रश्न आता हाती न घेता काही काळ थांबून घ्यावा, असाही एक मतप्रवाह आहे.

दुसरा प्रश्न आहे, अमेरिका आणि तिच्या दोस्तराष्ट्रांनी इराणवर घातलेल्या निर्बंधासंबंधी. त्यांपैकी (भारतासारख्या) अमेरिकेतर राष्ट्रांवर घातलेले निर्बंध इराणकडून विकत घ्यायच्या तेलावर आहेत. दोस्तराष्ट्रं ही निर्बंध काढायला एका पायवर तयार आहेत. पण या सर्वाला अमेरिकेच्या सेनेटची परवानगी घ्यावी लागेल. सेनेटमध्ये रिपब्लिकन पक्षाचं बहुमत आहे. पण अमेरिकेतील एकूण युद्धविरोधी वातावरण पाहून हा प्रश्नही सुटण्यास काही अडचण होऊ नये.

तिसरा प्रश्न आहे, इराणच्या गोठवलेल्या मालमत्तेचा. इराणच्या शहाची त्याच्या देशातून गच्छंती झाल्यापासून (१९७९) अनेक देशांनी इराणची मालमत्ता अमेरिकेच्या आदेशावरून गोठवली आहे. त्याची किंमत १२० ते २४० अब्ज डॉलरपर्यंत जाते. त्यात इराणकडून विकत घेतलेल्या तेलाची बिलं आहेत, अमेरिकेकडून शस्त्रास्त्रं विकत घेण्यासाठी दिलेली आगाऊ रक्कम आहे. २०१५ साली केलेल्या JCPOA या करारानंतर ओबामांनी २० अब्ज डॉलरपैकी १ अब्ज डॉलर परत केले. तेव्हा रिपब्लिकन पक्षाने आणि ट्रम्प यांनी अमेरिका जणू काही स्वतःच्या खिशातून पैसे देत आहे असा गोंधळ घातला होता. इराण ती मालमत्ता परत मागत आहे. हा प्रश्नही सुटायला सोपा आहे. कारण गोठवलेले बरेचसे पैसे इतर देशांकडे आहेत आणि ते देश केवळ अमेरिकेच्या धाकाने इराणचे पैसे सोडत नाहीत.

चौथा प्रश्न आहे, पश्चिम अशियातील सर्व राष्ट्रांचा–अरबी राष्ट्रांचा, तुर्कस्तानचा आणि पाकिस्तानचा. ही सर्व राष्ट्र कमीजास्त प्रमाणात अमेरिकेच्या कह्यात आहेत. अरबी राष्ट्रांत आणि तुर्कस्तानात अमेरिकेचे लष्करी तळ आहेत. (पाकिस्तानमध्ये एके काळी होते.) पॅलेस्टाइनच्या प्रश्नामुळे त्यांचे इस्रायलशी संबंध फारसे चांगले नाहीत. हे संबंध सुधारावेत असा ट्रम्प यांचा प्रयत्न चालला होता (अब्राहम करार) आणि त्या प्रयत्नाला यश येण्याची चिन्हे इराणयुद्धाच्या पूर्वी दिसत होती. पण युद्धात अमेरिकेने इराणवर हल्ला करण्यासाठी अरबी राष्ट्रांतले लष्करी तळ वापरले. म्हणून इराणने ते सर्व जवळजवळ नष्ट केले. अमेरिकेचे लष्करी तळ असण्याचं मुख्य प्रयोजन अमेरिकेने त्यांना संरक्षण देण्याकरता होतं. त्याकरता अरबी राष्ट्रांनी त्यांचं तेल डॉलरशिवाय कोणत्याही चलनात न विकण्याचं आश्वासन दिलं होतं. या सर्व गोष्टींचा पुनर्विचार करायची वेळ आली आहे. विशेषतः अमेरिकेचे लष्करी तळ पश्चिम अशियात ठेवायचे नाहीत, अशी इराणची मागणी आहे.

पाचवा प्रश्न आहे, गाझा आणि लेबनॉनचा. तिथे चाललेली मानवहत्या बंद केल्याशिवाय युद्धबंदी करणार नाही, असं इराणने स्पष्ट सांगितले आहे. कोणत्याही शांती करारात

गाझा आणि लेबनॉन यांचा विचार झालाच पाहिजे, नाहीतर शांती कायमची राहणार नाही, असं इराणचं म्हणणं आहे.

**सरकता गुरुत्वमध्य**

सहावा प्रश्न आहे, इराणकडे असलेल्या क्षेपणास्त्रांचा. ती इराणने नष्ट करावीत किंवा अमेरिका-इस्रायलकडे सुपूर्द करावीत, अशी अमेरिकेची (मूर्खपणाची) मागणी आहे. ती कुणालाच मंजूर होणार नाही. एकोणिसाव्या शतकात अमेरिकन इंडियन (मूळ रहिवासी) यांच्यात झालेल्या तहांत अमेरिकन इंडियन यांनी आपली शस्त्रं टाकून द्यावीत, असं एक कलम असे. तहानंतर काही वर्षांतच गोरे लोक त्यांच्यावर हल्ला करून त्यांना नष्ट करीत. इराणी लोक तशी चूक करतील असं वाटत नाही.

पुढचे तीन प्रश्न युद्धानंतर तयार झालेले आहेत. या युद्धात झालेली अब्जावधी डॉलरची नुकसानभरपाई कोण आणि कशी करणार? इराणच्या म्हणण्याप्रमाणे इराणचं नुकसान तीनशे अब्ज झालं आहे. दुसरा प्रश्न म्हणजे असं आक्रमण आणि असं युद्ध पुन्हा होऊ नये, याकरता नवीन सुरक्षारचना कशी करायची? तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न होर्मुझ आखाताचा. आज त्याच्यावर ताबा इराणचा आहे. तो कायदेशीर करण्यासाठी इराणने Persian Gulf Strait Authority (PGSA) नावाची प्राधिकरण व्यवस्था सुरू केली आहे. त्यात ओमानचा सहभाग किती आहे, हे जाहीर झालेले नाही. पण ओमानने जर त्यात भाग घेतला तर तो देश नष्ट करू, अशी अमेरिकेने धमकी दिली आहे.

दोन्ही बाजूला युद्धखोर प्रवृत्तीचे लोक आहेत. युरेनियम २० ते ९० टक्क्यांपर्यंत संवर्धित करावा, असं म्हणणारा एक मोठा गट इराणच्या लोकसभेत आहे. वेळ आली तर आखातातील इंटरनेट आणि इतर दळणवळणाच्या तारा तोडून टाकू असा दम इराणचे काही नेते देत आहेत. इराणला पूर्णपणे संपवून टाकलं पाहिजे, असा जोर अनेक अमेरिकन नेते लावत आहेत. अमेरिकेचा इस्रायलमधील राजदूत अरबी राष्ट्रांचा दौरा काढून त्यांना अमेरिकेच्या बाजूने लढायला प्रवृत्त करताना दिसत आहे. इराण NPT च्या बाहेर पडून अणुबाँब बनवायच्या तयारीत असल्याच्या बातम्या आहेत. इराणने अणुबाँब बनवला आहे, असं अनेक विश्लेषक म्हणत आहेत. पण स्फोट करून दाखवलेला नाही.

पुढील काळात अनेक महत्त्वाचे बदल होणार आहेत. मध्यपूर्वेत मुसलमानी राष्ट्रांचा एक शक्तिमान गट तयार होईल. युरोपचं महत्त्व कमी होईल. अमेरिका आणि युरोपमध्ये दुरावा निर्माण होईल. जगाचा गुरुत्वमध्य जो गेली तीन शतके अटलॅंटिक महासागरात होता, तो युरेशियात येईल. सध्या होत असलेली आफ्रिकेतील जागृती पाहता काही वर्षांनी गुरुत्वमध्य हिंदी महासागरात येऊन स्थिरावेल. या सर्व घटनांचा उहापोह यापुढील अंकांत करता येईल.

**डॉ. मोहन द्रविड हे फिजिक्समधील पीएच.डी. असून राजकारण, विज्ञान, इतिहास या विषयांवरील त्यांचे लिखाण वेगवेगळ्या मासिकांतून प्रसिद्ध होते. त्यांचे वास्तव्य अमेरिकेत असून 'मुक्काम पोस्ट अमेरिका' हे अमेरिकेचं सर्वांगीण दर्शन देणारे पुस्तक 'रोहन प्रकाशन'ने प्रसिद्ध केले आहे.**
**संपर्क : ९८२०५ ६३१३०**

## आमचे पाठीराखे

समतावादी मुक्त-संवाद पत्रिका

**कुमार केतकर, हुसेन दलवाई, रवींद्र टी. प्रधान, जगदीश काबरे, जयराज साळगावकर, दत्ता नायक, टी. जगत, विनोद शिरसाठ, डॉ.आनंद जोशी-सुमती जोशी, डॉ. अनंत फडके-संध्या फडके, आशिष पाटकर, डॉ.दिलीप खताळ, डॉ.प्रदीप कर्णिक, प्रसाद केरकर, अतुल देऊळगावकर, गणेश मनोहर कुलकर्णी, डॉ.अजित जगताप, डॉ.रेखा शेळके, डॉ. नेहा सावंत, प्रशांत पवार, डॉ.मंदार काळे, सुशीलकुमार शिंदे, विकास महाडिक, दत्ता बाळसराफ, चिन्मय दामले, प्रशांत खुंटे, प्रा. राजेंद्र भोईवार, सचिन परब, पांडुरंग शिवलकर, सोहन भांगले, अविनाश हावळ, प्रभाकर कुंभार, चंद्रकांत पाटणकर, सुधीर साठे, वासुदेव (काका) खानोलकर, नेहा आसगावकर.**

# लगती है आग तो...



रवि आमले

**पाळतशाहीच्या पाऊलखुणा – ७**



*शोधपत्रकार सेम्युर हर्श...*

*पाळतखोर अध्यक्ष रिचर्ड निक्सन...*

**पा**ळतखोरीला मर्यादा नसते. त्यात आपला–परका असा भेद नसतो. 'नॅशनल सिक्युरिटी एजन्सी' – एनएसएमध्ये वरिष्ठ विश्लेषक पदावर काम केलेल्या पेरी फेलवॉक या २५ वर्षीय तरुणाने आपल्या मुलाखतीतून हेच संकेत दिले होते. एनएसएबाबतची धोक्याची घंटा त्याने वाजवली होती. त्याची ती 'रॅम्पार्ट्स' या बंडखोर मासिकातील मुलाखत ऑगस्ट १९७२मधली. यानंतर दोनच वर्षांत अमेरिकी नागरिकांना त्याची प्रचिती आली...

**१९७४**चा डिसेंबर महिना तो. नाताळचा सण तोंडावर आलेला. पण अमेरिकेत तो नेहमीचा उत्साह नव्हता. चार महिन्यांपूर्वी राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला होता. 'वॉटरगेट प्रकरण' नडले होते त्यांना. या 'वॉटरगेट' नामक इमारत संकुलातील डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'राष्ट्रीय समिती'च्या मुख्यालयात पाळत ठेवण्यासाठी केलेल्या उपद्व्यापाची फळे भोगावी लागली होती, त्यांना. सत्ताधाऱ्यांमधील सत्तेच्या नग्न लालसेचे ते कुरूप. जगभरातील लोकशाहीवादी सुबुद्धांसाठी धक्कादायक होते, ते.

**आजचे वर्तमान, तो अमेरिकेचा भूतकाळ**

एकीकडे हे राजकीय कांड आणि दुसरीकडे अर्थव्यवस्थेची लागलेली वाट. १९७३च्या 'ओपेक' तेल समस्येने अमेरिकेतील 'महंगाई डायन' चवताळली होती. डिसेंबरमध्ये शेअर बाजार कोसळला होता. बेरोजगारीने कहर केला होता. नवे अध्यक्ष जेराल्ड फोर्ड यांनी अशात 'विन' म्हणजे 'व्हिप इन्फ्लेशन नाऊ' ही महागाई विरोधी मोहीम सुरू केली होती.

भारीच मोहीम होती, ती. काँग्रेससमोर ८ ऑक्टोबर १९७४ रोजी केलेल्या भाषणातून त्यांनी अमेरिकी नागरिकांना आवाहन केले, की लोक हो, महागाईशी आपल्याला लढायचे आहे. तिच्यावर विजय मिळवायचा आहे. तेव्हा 'तुम्ही' 'महागाई योद्धा' बना. देशात इंधन तेलाची टंचाई आहे. तेव्हा 'तुम्ही' इंधन वाचवा. वेगवेगळ्या कार वापरू नका. 'कार पूल' करा. कमी प्रवास करा. तेलाची आयात कमी करा. शेतकऱ्यांनो, अधिक धान्य पिकवा. महिलांनो, अन्न शिळे टाकू नका. वरताण म्हणजे, फोर्ड सरकारने 'विन'चे लाखो बटण-बिल्ले करून घेतले. लोकांना आवाहन केले, की हे बिल्ले सर्वांनी आपल्या सदऱ्यावर, कोटावर लावावेत. अमेरिकेतील 'सर्वाधिक फज्जा उडालेली प्रचार मोहीम' म्हणून आजही या मोहिमेची चर्चा होत असते. यात भर म्हणजे, अवघ्या वातावरणात दाटलेला मरणरंग. ५८ हजार अमेरिकी सैनिकांचा बळी घेणाऱ्या व्हिएतनाम युद्धाने अमेरिका गळपटली होती. त्या युद्धात देशास लोटणाऱ्या सरकारांविरोधात लोकमानसात चीड होती. सरकारबाबत मोठी विश्वास–तूट निर्माण झालेली होती. आणि अशात २२ डिसेंबर १९७४ रोजी तो वृत्तस्फोट झाला.

**ते ४८०८ शब्द... वस्त्रहरण करणारे**

त्या दिवशी सकाळी अमेरिकेतील १६ लाख घरांमध्ये कचेऱ्यांमध्ये 'न्यू यॉर्क टाइम्स'चा अंक पडला, तो सीआयएच्या देशांतर्गत पाळतखोरीच्या बेकायदेशीर कार्यक्रमाचे वस्त्रहरण करीतच. 'न्यू यॉर्क टाइम्स'च्या पहिल्या पानावरच्या त्या चार हजार ८०८ शब्दांच्या मुख्य बातमीचा मथळा होता – 'निक्सन यांच्या कार्यकाळात अमेरिकेतील युद्धविरोधी शक्ती आणि अन्य आंदोलकांविरोधात सीआयएने मोठी गुप्त मोहीम राबवल्याचे उघड.' हा गौप्यस्फोट केला होता, सेम्युर हर्श यांनी.

बातमी खरोखरच स्फोटक होती. सीआयएने कोणा परराष्ट्राच्या हेरांविरोधात, एजंटांविरोधात नव्हे, तर अमेरिकेत राहणाऱ्या अमेरिकी नागरिकांविरोधात मोहीम राबवल्याचे ती सांगत होती. सीआयएची जी 'सनद' आहे, त्यानुसार या संस्थेकडे ना देशांतर्गत कारवाईची परवानगी आहे, ना पोलिसी अधिकार. पण ती सनद धाब्यावर बसवून सीआयएने देशात मोठ्या प्रमाणावर हेरगिरी आणि पाळतखोरी केल्याचे दिसत होते. त्यासाठी सीआयएने आपल्या 'काऊंटर इंटेलिजन्स' - हेरगिरीविरोधी – विभागात एक अतिगोपनीय 'स्पेशल युनिट' स्थापन केले होते. युद्धविरोधी चळवळ आणि सरकार–विरोधातील गट हे त्याचे प्रमुख 'टार्गेट' होते. सेम्युर हर्श यांनी खोदून काढलेल्या माहितीनुसार, युद्धास विरोध असणाऱ्या नागरिकांची माहिती गोळा करणे, आंदोलनांत सहभागी होणाऱ्या लोकांची छायाचित्रे घेणे, त्यांच्या हालचालींवर पाळत ठेवणे, त्यांचे फोन टॅप करणे, पत्रे चोरून वाचणे, त्यांच्या घरात वा कार्यालयात चोरासारखे घुसून तपासणी करणे, त्या गटांमध्ये आपले खबरे घुसवणे, असे प्रकार या युनिटने केले होते. या द्वारे किमान दहा हजार अमेरिकी नागरिकांच्या गुप्त माहितीच्या फाइल त्यांनी तयार केल्या होत्या. यामध्ये सामान्य आंदोलक तर होतेच. पण लोकप्रतिनिधी होते आणि सेलेब्रिटीसुद्धा. उदाहरणार्थ, जेन फोंडा.

**मास्टरस्ट्रोक अमेरिकेतले...**

हॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री त्या. अशा यशस्वी सेलेब्रिटींची, यशवंतांची सर्वसाधारण रहाटी अशी, की उगवत्या सूर्यास नमन करावे. नवा सूर्य क्षितिजावर दिसतोय म्हटल्यावर जुन्या सूर्यावर थुंकावे. सत्ताधीशांच्या आरत्या ओवाळून त्यांचे निर्णय हे कसे 'मास्टरस्ट्रोक' आहेत हे लोकांस सांगावे. करिअरपोषक कर्मकांड असते ते. बहुसंख्य सेलेब्रिटी ते करतात. पण काहींना पाठकणाही असतो. जेन फोंडा तशा होत्या. त्या सरकारच्या अयोग्य धोरणांवर टीका करीत.




*सेम्युर हर्शसारखे दिग्गज पत्रकार, थेट सर्वोच्च पदावरच्या नेत्याचे बिंग फोडतात. ही आजच्या भारतासाठी परीकथा ठरावी...*

कृष्णवर्णीयांच्या नागरी हक्कांसाठी लढत. युद्धविरोधी आंदोलनात आघाडीवर असत. लोकशाही राज्यप्रणालीत सनदशीर आंदोलने, चळवळी हा हक्कच असतो नागरिकांचा. तेव्हा जेन फोंडा काही गैर करीत होत्या, असे नव्हे. सरकारच्या निर्णयांना, धोरणांना विरोध हा देशाला विरोध नसतो. सरकारच्या सुरक्षेला धोका हा देशाच्या सुरक्षेला धोका नसतो. मुळात, सरकार म्हणजे देश नसतो. प्रश्न उभे राहतात, ते हे भान सुटले की. मग नागरी हक्कांसाठी लढणारे लोक 'आंदोलनजीवी' ठरवले जातात. सरकारी धोरणांना विरोध करणारे देशद्रोही आणि शत्रूराष्ट्राचे एजंट मानले जातात.

सीआयएच्या हेरगिरीविरोधी विभागाचे तत्कालीन प्रमुख जेम्स अँगल्टन हे असे मानणारे गृहस्थ होते. येल विद्यापीठाचे पदवीधर, जीवशास्त्रज्ञ, महाविद्यालयातील काव्यविषयक मासिकाचे संपादक राहिलेल्या अँगल्टन यांची सीआयएमध्ये नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या कल्पनाशक्तीला जणू असंख्य पंख फुटले होते. मोगलांच्या सैन्याला पाण्यात संताजी-धनाजी दिसायचे. अँगल्टन यांना जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी सोव्हिएत षड्यंत्रे दिसायची. त्यांची अशी ठाम श्रद्धा होती, की माध्यमांतील अनेकांचे सोव्हिएत रशियाशी संबंध होते. चळवळ ब्लॅक पँथरसारखी हिंसक असो की शांततावादी युद्धविरोधी, त्यामागे परकीय हात होता. एवढेच नव्हे, तर सीआयएमध्ये आणि प्रशासनामध्ये परराष्ट्राचे हेर होते. सीआयएमधील अशा पन्नासेक अधिकाऱ्यांची यादी तयार केली होती, त्यांनी. हा मॅकार्थिझमचा प्रभाव. जेन फोंडा यांच्यासारख्या आंदोलकांवर सीआयएकडून पाळत ठेवली जात होती, ती यातूनच.

**शरमेने मान खाली... कारण पाळतकांड**

सेम्युर हर्श यांनी त्यांच्या 'रिपोर्टर' या पुस्तकात सीआयएच्या या पाळतकांडावर एक अख्खे प्रकरण दिलेले आहे. 'द बिग वन' हे त्याचे नाव. हे संपूर्ण कांड किती बेकायदेशीर होते, ही पाळतखोरी करणारे लोक किती अनैतिक होते, याची कल्पना त्यातील एका गोष्टीवरून येते. हर्श सांगतात, 'या बातमीसंदर्भात मी अँगल्टन यांना जेव्हा भेटलो, तेव्हा त्यांनी मला मोठा धक्काच दिला. हा धक्का दिला तो सगळ्याचा इन्कार करून नव्हे, तर मला सौद्याची ऑफर देऊन.' अँगल्टन यांनी त्यांना सांगितले, की 'ही बातमी छापू नका. त्या ऐवजी मी तुम्हाला उत्तर कोरिया आणि रशियामध्ये या घडीला जी हेरगिरीची ऑपरेशन सुरू आहेत, त्यांची इत्थंभूत माहिती देतो.' स्वतःला वाचवण्यासाठी सीआयएचा तो पाळतखोर अधिकारी आपल्या देशाच्या गुप्तचरांशी गद्दारी करण्यास तयार झाला होता. पाळतशाहीची विकृत भलामण करणाऱ्या उल्लूमशालांनी आवर्जून लक्षात घ्यावी, अशी ही बाब आहे. अखेर पाळत ठेवणारे कोण आहेत, हाही भाग तेवढाच महत्त्वाचा असतो.

सुरक्षा, संरक्षण, कायदा आणि सुव्यवस्था यासाठी लोकांवर (म्हणजे गुन्हेगार, दहशतवादी, समाजकंटक आदींवर) पाळत ठेवणे गरजेचे असते, असा युक्तिवाद केला जातो. त्यात नेहमीच हे विसरले जाते, की पाळत ही वणव्यासारखी असते. कशी आणि कुठे पसरेल याचा काही नेम नसतो. राहत इंदौरी यांचे शब्द थोडे फिरवून सांगायचे, तर 'लगती है आग तो आते हैं कई घर ज़द में' हे 'तत्त्व' पाळतखोरीसही लागू असते. सरकारविरोधातील सामान्य आंदोलक, राजकीय कार्यकर्ते यांच्यावर ठेवली जाणारी पाळत ही कधीही त्या विशिष्ट व्यक्तींपुरतीच मर्यादित राहत नसते. त्या व्यक्तीचे मित्र, त्या मित्रांचे मित्र असे ते वर्तुळ वाढत जाते. मग त्या व्यक्तींचे खासगी जीवन खासगी राहात नाही. त्याची 'फाइल' बनते. कधीही त्या व्यक्तींना अडचणीत आणता येईल, अशी फाईल. जेन फोंडा यांचे उदाहरण या दृष्टीनेही लक्षणीय ठरते. त्यांच्यावर केवळ पाळतच ठेवली जात होती, असे नव्हे. अखेर पाळतखोरीतून प्राप्त झालेल्या माहितीचा गैरवापर कुठे ना कुठे तरी केला जाणारच. जेन फोंडा यांच्या बाबतीत तो त्यांच्या चारित्र्यहननासाठी करण्यात आला होता.




*अभिनेत्री जेन फोंडा ही त्याकाळच्या अमेरिकेतल्या 'टुकडे टुकडे गँग'ची सदस्य... तिने व्हिएतनाम युद्धाला विरोध काय केला, अमेरिकी सत्ताधाऱ्यांनी तिची पावलोपावली छळवणूक मांडली...*

**तेव्हाचा टॉमी मीडिया**

ही गोष्ट आहे, १९७०च्या नोव्हेंबरमधली. कॅनडाच्या दौऱ्यावर जेन फोंडा गेल्या होत्या. तेथील विद्यापीठांमध्ये व्याख्याने होती त्यांची. विषय अर्थातच व्हिएतनाम युद्धाचा होता. त्यांच्या त्या भाषणांमुळे इकडे निक्सन प्रशासन अस्वस्थ झाले होते. त्या परदेशात जाऊन टीका करतात, असे रान 'टॉमी मीडिया'ने उठवले होते. २ नोव्हेंबरला त्यांचा दौरा आटोपला. त्या विमानाने अमेरिकेत परतल्या. क्लिव्हलँड विमानतळावर त्यांचे विमान उतरताच, तेथील सीमाशुल्क अधिकाऱ्यांनी त्यांना बाजूला घेतले. त्यांच्या सर्व बॅगा उघडून तपासल्या. एका बॅगेत लाल नेल पॉलिशने 'बी', 'एल' आणि 'डी' अशा खुणा केलेल्या प्लॅस्टिकच्या छोट्या छोट्या पिशव्या होत्या. त्यात होत्या बऱ्याचशा गोळ्या. जेन फोंडा यांनी सांगितले, या 'बी.एल.डी.' म्हणजे ब्रेकफास्ट, लंच आणि डिनरनंतर घेण्याच्या जीवनसत्त्वाच्या गोळ्या आहेत. पण ऐकतो कोण? अमली पदार्थांच्या तस्करीच्या आरोपाखाली त्यांना अटक करण्यात आली. कोठडीत ठेवले. गुन्हेगारांची ती गळ्यात पाटी लटकावून छायाचित्रे काढतात. तशी त्यांची छायाचित्रे काढण्यात आली. त्यांना दहा तास कोठडीत काढावे लागले. पाच हजार डॉलरचा जामीन द्यावा लागला. सगळीकडे याच्या बातम्या आल्या. एक नटी, तीही सरकारविरोधात बोलणारी, ती 'नशेडी' आहे, ड्रग्ज तस्करी करणारी आहे, अशा मसालेदार सनसनाटी बातम्या आल्यावर काय होऊ शकते, याची आपण कल्पना करू शकतो. आपल्याकडच्या 'टॉमी' पत्रकारांनी ते दिव्य अनुभव दिलेले आहेत, आपल्याला. जेन फोंडा यांचे ते ड्रग्ज प्रकरण महिनाभर चालले. त्या एकेका गोळीची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली. त्यातून स्पष्ट झाले, की नाही, ते ड्रग्ज नव्हते. निव्वळ जीवनसत्त्वाच्या गोळ्या होत्या.

आपल्या 'माय लाइफ सो फार' या आत्मकथनात जेन फोंडा सांगतात, की निक्सन व्हाइट हाऊसमधील अधिकाऱ्यांच्या सांगण्यावरून हे किटाळ रचण्यात आले होते. याचा अर्थ असा होतो, की जेन फोंडा यांच्या बॅगमध्ये त्या गोळ्या आहेत, याची कल्पना त्या अधिकाऱ्यांना आधीच होती. म्हणून तर तो डाव रचू शकले ते. त्यामागील हेतू तर स्पष्टच होता. बदनामी करून जेन फोंडा यांची विश्वासार्हता धुळीस मिळवायची होती त्यांना. एकदा तर याहून मोठा डाव रचला होता, एफबीआयने. पुढे 'सिनेट सिलेक्ट कमिटी ऑन इंटेलिजन्स' समोर आलेल्या एफबीआयच्या कागदपत्रांतून तो उघड झाला. सरकार-विरोधातील व्यक्तीची बदनामी करण्यासाठी, तिला अडकवण्यासाठी यंत्रणा कोणत्या थराला जाऊ शकतात, याचा एक उत्तम नमुना म्हणून त्याकडे पाहता येईल.

**कारस्थानी डोकी**

ते एक पत्र होते, मॉरिस नामक एका व्यक्तीने 'व्हरायटी' या सिनेनियतकालिकाच्या आर्मी आर्चर्ड या स्तंभलेखकाला उद्देशून लिहिलेले. त्यात त्याने त्याचा एक अनुभव सांगितला होता, की एकदा ब्लॅक पँथर पार्टीच्या एका मेळाव्याला तो गेला होता. कडक सुरक्षा व्यवस्था होती तेथे. झडती घेऊनच त्याला आत सोडण्यात आले. आत अनेकांची भाषणे झाली. जेन फोंडाही होत्या तेथे. त्यांनी तेथे घोषणाबाजी केली, की 'रिचर्ड निक्सन यांची आणि आमच्या मार्गात येणाऱ्या अशा कोणाचीही आम्ही हत्या करू.' मुळात ही घटना कधी घडलीच नव्हती. ना असा मेळावा झाला होता, ना त्यात फोंडा यांनी ती

घोषणाबाजी केली होती. हे बनावट पत्र तयार केले होते एफबीआयने. या बाबत एका अधिकाऱ्याने एफबीआयच्या लॉस एंजेलिस कार्यालयास पाठवलेल्या सूचनापत्रात म्हटले होते, 'अशी अपेक्षा आहे, की हॉलिवूडच्या एखाद्या गॉसिप कॉलममध्ये हे वृत्त प्रसिद्ध झाले, तर ब्लॅक पँथर पार्टीच्या कार्यातील फोंडा यांचा सहभाग समोर येऊन त्यांच्या प्रतिष्ठेची हानी होऊ शकते.' याच पत्रात अशीही सूचना देण्यात आली होती, की हे पत्र एफबीआयने पाठवले आहे याचा कोणालाही सुगावा लागणार नाही, याची दक्षता घ्या. अर्थात तशा सूचनेची आवश्यकताच नव्हती. कारण एफबीआयसाठी या अशा गोष्टी म्हणजे हातचा मळ होता. १९५६ पासून १९७१ पर्यंत एफबीआय 'को इंटेल प्रो' (काउंटर इंटेलिजन्स प्रोग्राम) या नावाने जे ऑपरेशन राबवित होते, त्यात निनावी पत्रे पाठवून नवरा-बायकोत वाद निर्माण करणे, लोकांच्या नोकऱ्या घालवणे आणि त्या द्वारे त्या व्यक्तीचे मानसिक संतुलन बाधित करणे, अशा गोष्टी सर्रास केल्या जात होत्या.

सरकारविरोधात असणाऱ्या, नागरी हक्कांसाठी आंदोलने करणाऱ्या, शोषितांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या व्यक्तींवर पाळत ठेवली जाते, हेरगिरी केली जाते, तिचा अंतिम हेतू हाच असतो, की त्यांना येनकेन प्रकारेण कायद्याच्या कचाट्यात अडकवायचे. कुणाचे काही अतिखासगी प्रकरण हाती आले, तर ब्लॅकमेल करून त्यांची मुस्कटदाबी करायची. आंदोलकांचे, चळवळ्यांचे वैयक्तिक आयुष्य उद्ध्वस्त करायचे. एफबीआयचे जे. एडगर हूव्हर हे यात महामाहीर होते. पण हे झाले आंदोलनांचे चेहरे, चळवळीतले नेते यांच्याबाबत. पण सामान्य कार्यकर्त्यांचे काय? सरळमार्गी, नाकासमोर चालणाऱ्या, नेक-इमानदारांचे काय? त्यांना का केले जाते, पाळतखोरीची शिकार?

**रवि आमले हे ज्येष्ठ पत्रकार-संपादक, प्रथितयश लेखक आणि भाष्यकार आहेत. त्यांची प्रोपगंडा, रॉः भारतीय गुप्तचर संस्थेची गूढ गाथा, मॅनहंट (अनुवादित), परकीय हात, वरुण ते बहिर्जी आदी पुस्तके वाचकप्रिय ठरली आहेत.**

**संपर्कः** ravi.amale@icloud.com

## आ वा ह न

सप्रेम नमस्कार,

तुमच्या पाठबळाच्या जोरावर '**समतावादी मुक्त-संवाद पत्रिके**'ने (पूर्वाश्रमीचे 'मुक्त-संवाद') साडेसहा वर्षांचा टप्पा गाठला आहे. पुढची वाटचाल अशीच सुकर होण्यासाठी आपल्या मदतनिधीची आम्हाला आशा आहे. मदतनिधी जमा करण्यासाठी बँक खात्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खातेदार संस्थेचे नाव :** SAMATAWADI MUKTSANVAD PATRIKA

**बँक, शाखा :** SARASWAT BANK, MAHIM

**खाते क्रमांक :** 610000000035417

**आयएफएससी क्रमांक :** SRCB0000007

**'समतावादी मुक्त-संवाद पत्रिके'चा अंक मर्यादित संख्येने छापील आणि पीडीएफ अशा दोन प्रकाराने प्रकाशित होतो. हा अंक वाचकांसाठी विनामूल्य असून, अंकाच्या पीडीएफसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा अथवा व्हॉट्सॲपद्वारे संदेश पाठवावा. संपर्क : ९६१९८२३६७२/८५५१८५०४६२**

# कार्यसंस्कृतीचा चिनी आविष्कार



गजानन जोशी

शोधक नजर







**ची**न हा केवळ धुक्यात वावरणारा देश नाही, तर संशयाचे धुके स्वत:भोवती असणारा देश आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा क्षेत्रांत तर हे धुके अधिकच गडद असल्याचे बाहेरच्या जगाला अनुभव येत राहतो. मात्र, उच्च कोटीच्या पायाभूत सुविधा आणि घाऊक तरीही दर्जेदार उत्पादन त्यासाठी लागणारी शिस्तबद्धता, कटिबद्धता हे चीनइतके कुठेही स्वच्छ नि स्पष्ट नाही. तकलादू, दर्जाहिन माल म्हणजे चिनी माल अशीच जर ख्याती असती, तर अमेरिकेच्या राष्ट्रीय ध्वजाच्या किंवा पॅरिसच्या आयफेल टॉवरच्या सोव्हेनियर स्वरुप वस्तूंचं चीनमध्ये घाऊक उत्पादन होऊन त्याची अमेरिकेत, फ्रान्समध्ये दणक्यात विक्री झालीच नसती...

विद्युत निर्मिती क्षेत्रामध्ये तोपर्यंत जवळ जवळ २५ वर्षाचा अनुभव माझ्या गाठीशी जमा होता. भारतासह अमेरिका–युरोप हे देश प्रत्यक्ष भेट देऊन आणि कामाच्या निमित्ताने अनुभवले होते. त्या वेळेपर्यंत भारतातल्या विद्युतनिर्मिती क्षेत्रामध्ये पूर्व युरोप–रशिया, जर्मनी, अमेरिका आणि काही प्रमाणामध्ये जपान येथील तंत्रज्ञान वापरले जात होते. अर्थात, भारताच्या परराष्ट्रीय धोरणाचा कदाचित भाग म्हणून परंतु रशियाचे तंत्रज्ञान फार मोठ्या प्रमाणात वापरलेले होते.

या व्यवसाय आणि कार्यालयीन कामानिमित्ताने मी अमेरिकेमधल्या एका प्रथितयश संस्थेमध्ये फ्रेडरिक येथे कामाला होतो. काम अतिशय आव्हानात्मक परंतु आनंद देणारे होते. त्यावेळेला आज सारखे खाजगी ईमेल वापरण्याची फारशी सवय नव्हती. परंतु एक दिवस मला माझा गुजरातमधील मित्र नरेश मेहता याचा ईमेल आला. त्या वेळेला मोबाइलची नुकतीच सुरुवात झाली होती. त्यामुळे माझ्याकडे मोबाइल जरी होता, तरी आंतरराष्ट्रीय रोमिंग नव्हते, तसेच मोबाइलवरती ईमेल बघायची पण सोय नव्हती.

नरेशचा ईमेल कदाचित तीन–चार दिवसापूर्वीच आला होता. मी तो जेव्हा बघितला, तेव्हा लक्षात आले की तो काम करत असलेली कंपनी चीनमध्ये विद्युतनिर्मिती क्षेत्राशी निगडित काम करणार आहे आणि त्यांना आंतरराष्ट्रीय कामाचा अनुभव असणाऱ्या व्यक्ती पाहिजे आहेत. तोपर्यंत आमच्याच कंपनीमध्ये काम करत असलेल्या काही चीनच्या नागरिकांशी कामानिमित्त परिचय तेवढा झाला होता. अतिशय रंजक अशा कथा त्यांच्याकडून ऐकत होतो, तसेच काही तैवानी नागरिक माझे सहकारी होते. त्यांच्याकडून एकदम वेगळ्या पण नकारात्मक अशा काही गोष्टीही चीनबद्दल ऐकायला मिळत होत्या. सोबतच एक भारतीय म्हणून चीनबद्दल मला बऱ्याच गोष्टी त्या आधी ऐकायला आणि वाचायला मिळाल्या होत्या. उदा. चीनची सांस्कृतिक क्रांती, माओ त्से तुंग, डॉ. कोटनीस, १९६२ आणि बरेच काही...

तोपर्यंत अमेरिकेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात चीनमधील उत्पादने वापरण्यास सुरुवात झाली होती. मीदेखील त्या उत्पादनांचा, प्रणालींचा अनुभव घेत होतो. अशा काळात नरेशच्या ई मेलनंतर चीनबद्दलचे माझे कुतूहल अधिकच वाढू लागले. अमेरिकेमधून काम संपवून भारतामध्ये परत येणार होतो, त्यामुळे नरेशला त्याप्रमाणे कळविले. कंपनीच्या दृष्टीने परिस्थिती तातडीची असल्याने त्याने भारतात परतल्यानंतर लगेचच दोन–तीन दिवसांत माझ्या इंटरव्ह्यूची व्यवस्था केली. त्यानुसार इंटरव्ह्यूला गेलो आणि चीनच्या माझ्या प्रवासाच्या दिशेने पहिले पाऊल पडले...

**सगळे कसे आखीवरेखीव, शिस्तबद्ध**

...दुपारची वेळ होती आणि लख्ख प्रकाश होता. वरून बीजिंग शहर दिसायला सुरुवात झाली. मला ग्रेट वॉल ऑफ चायना आणि तिआन मेन चौक दिसतो, का ते पाहायची उत्सुकता होती. परंतु प्रसिद्ध भिंत तर दिसत नव्हती. माझी कल्पना होती, की भिंत संपूर्ण बीजिंग शहराभोवती आहे. परंतु माझ्या पाकिस्तानी सहप्रवाशाने सांगितले, की माझा तो समज साफ चुकीचा आहे. एकीकडे विमानातून दिसणारे बीजिंग शहर म्हणजे महाकाय रूप होते. प्रचंड मोठा विस्तार होता. जस जसे विमान खाली येत होते, तसे रस्ते, गाड्यांच्या लांब रांगा आणि मोठ्या संख्येने उत्तुंग इमारती दिसायला लागल्या. बीजिंग एअरपोर्ट तर प्रचंड मोठे होते. २००७ मध्ये ज्या एअरपोर्टवर आमचे विमान उतरले, ते आता असलेले नवीन विमानतळ नव्हते, तर जुने होते. तरी देखील ते प्रचंड मोठे वाटले. जस जसे विमान खाली येत होते, तसे माझ्या मनात चीन देश, चीनी लोक, त्यांची पायाभूत क्षेत्रामधील अग्रेसरता आणि एखाद्या वर्षभरात होणाऱ्या ऑलिम्पिक आणि त्यासाठी ते करीत असलेली तयारी, त्यांची भाषा, त्यांची लिपी आणि बरेच काही याबद्दलची उत्सुकता वाढत चालली होती.

चीन म्हणजे काय आणि त्यांनी केलेली प्रगती म्हणजे काय, हे आता प्रत्यक्ष बघायला सुरुवात झाली होती. आम्ही प्रवास करत होतो, तो रस्ता चार पदरी होता. रस्ते अतिशय रुंद होते, दोन्ही बाजूला मोठी झाडे, रस्त्याचे विभाजक सुद्धा अतिशय रुंद आणि त्यावर देखील झाडे आणि विशेष म्हणजे फुलझाडे आणि त्यांची रेखीव व्यवस्थादेखील नजरेत भरत होती.

बघताच क्षणी जाणवलेल्या काही लक्षवेधी गोष्टी म्हणजे, सगळ्या गाड्या एका रेषेमध्ये आणि बरोबर लेनमध्ये चालल्या होत्या. रस्त्यावर जेव्हा वळण असेल तेव्हा देखील कोणतीही गाडी आपली लेन सोडत नव्हती. आपल्याकडे मात्र वळणावर किंवा घाटामध्ये आपण हमखास लेन सोडणारच हा माझा तोपर्यंतचा अनुभव होता. त्याहीपेक्षा महत्त्वाची आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, २००७ मध्ये आपल्याकडे होंडा सीटी, ह्युन्डाई, स्कोडा, निस्सान, सुझुकी या गाड्या सधन

लोकांच्या मालकीच्या या गाड्या बीजिंगमध्ये टॅक्सी म्हणून होत्या. या सगळ्या गाड्यांची टॅक्सी बघून आश्चर्यच वाटले. गंमत म्हणजे, प्रत्येक टॅक्सी ही वातानुकुलित होती. आज देखील मुंबई विमानतळावर प्री-पेड टॅक्सीच्या काऊंटरवर एसी टॅक्सी की साधी टॅक्सी, हा प्रश्न विचारला जातो आणि चीनमध्ये २००७ मध्ये सगळ्या टॅक्सी वातानुकुलित हा पहिला धक्का. एकाही ठिकाणी सिग्नलसाठी गाडी थांबली नव्हती, कारण प्रत्येक ठिकाणी एक्झिट आणि फ्लायओवर होते.

आम्ही शहरात प्रवेश केला तसे प्रचंड मोठ्या इमारती, शॉपिंग मॉल्स, हॉटेल्स दिसू लागली. शॉपिंग मॉल पटकन लक्षात आले नाहीत कारण, त्यावर चिनी भाषेमध्ये लिहिले होते. परंतु हॉटेल्स लक्षात आली कारण त्यांची नावं इंग्लिशमध्ये लिहिली होती. ॲन डंग या आमच्या ड्रायव्हरला जरी इंग्लिश बोलता येत नसलं, तरी तो मला या वेगवेगळ्या बिल्डिंगची नाव सांगत होता. शेवटी आम्ही बीजिंगमधील चाऊयांग जिल्ह्यामध्ये पोहोचलो. बीजिंगमध्ये बरेच जिल्हे आहेत, त्यापैकी चाऊयांग म्हणजे, आपल्या मुंबईमधील दक्षिण मुंबईमधील डाउनटाउन. सगळ्या महत्त्वाच्या कार्यालयांच्या इमारती, जागतिक संस्थाची कार्यालय, सगळ्या देशांच्या वकिलाती. तिथे वसलेल्या होत्या. अशा या भागातल्या किंग्ज गार्डन या वसाहतीमध्ये आमच्या कंपनीचे गेस्ट हाऊस होते.

पहिला दिवस गेस्ट हाऊस मधील ऑफिसमध्येच गेला. सगळ्या सहकाऱ्यांच्या ओळखी झाल्या. कामाच्याबद्दलची माहिती घेणं, हे देखील एक महत्त्वाचं काम संपूर्ण दिवसभर होतं. आमच्या भारतीय कंपनीकडून कमीतकमी दहा बिलियन युएस डॉलरची खरेदी करण्याची आमची महत्त्वाकांक्षी योजना होती. पुढील काही दिवसांमध्ये या सगळ्याची आखणी करायची होती. कित्येक मोठ्या आणि छोट्या उत्पादक कारखान्यांना भेटी द्यायच्या होत्या. या सगळ्या भेटी ज्या गावामध्ये होणार होत्या, त्यांचे नियोजन करण्यासाठी पुढील पूर्ण आठवडा जाणार होता. लक्षात आले, की ही बहुतेक सर्व ठिकाणे ही चीनच्या पूर्व प्रदेशामध्ये परंतु अगदी उत्तरेच्या टोकापासून दक्षिण टोकापर्यंत होती. उत्तरेला हार्बिन म्हणजे, सायबेरियाची सीमा, तर दक्षिणेमध्ये नानिंग म्हणजे व्हिएतनाम सीमा.

**असावे नेटके सादर**

व्यवसाय-नोकरी या निमित्ताने पुढील काही वर्षे चीनमध्ये भरपूर प्रवास करावा लागणार होता. त्यासाठी काही अलिखित-लिखित नियम पाळावेच लागणार होते. त्यामध्ये एखाद्या उत्पादन संस्थेला भेट द्यायची असेल तर दिवस आणि वेळेची आखणी करणे, निश्चित करणे, त्याप्रमाणे पालन करणे, ज्या विषया संबंधात बैठक वा चर्चा होणार आहे, त्याची तयारी करणे, त्या संबंधात अंतर्गत सहकाऱ्यांशी चर्चा करून टिपणं काढून ठेवणे, कोण सहकारी येणार बरोबर याची आखणी करणे, त्याच प्रमाणे कोण दुभाषा बरोबर असणार हे नक्की करून प्रवासाची संपूर्ण व्यवस्था करणे. परंतु याचबरोबर आमच्या सीईओ यांनी मला आवर्जून सांगितले, की कोणत्याही कार्यालयीन मीटिंगमध्ये सहभागी होताना सूट-कोट-टाय हे असलेच पाहिजे. चीनमधील ज्या शहरात माझे जाणे होणार होते, त्यापैकी सगळ्याच शहरात प्रचंड थंडी असते. हार्बिनमध्ये (म्हणजे सायबेरियाची सीमा) येथे कित्येक महिने (उणे २० ते उणे ३० डिग्री) थंडी असते. बाकी शहरांत थोड्या कमी प्रमाणात परंतु आपल्या दिल्ली पेक्षा खूपच जास्त थंडी, तर ती मुंबईपेक्षा किती जास्त याची तुम्हीच कल्पना करा. त्यामुळे सूट-कोट-टाय तसेही थंडीपासून बचाव होण्यासाठी घालणे आवश्यकच होते. या ठिकाणी प्रचंड थंडीच्या दिवसांत प्रवास करताना-चालताना सूट-कोट-टायसोबतच जाड असा ओव्हर कोट घालणेही अतिआवश्यक होते. भारतामधून निघताना मी काही सूट-कोट-टाय घेऊन गेलो नव्हतो. कारण आमच्या सीईओनी सांगितले होते, की बीजिंग मध्येच विकत घेऊया, उत्तम प्रतीचे आणि स्वस्त असतात.

**शास्त्र नियोजनाचे नि खरेदीविक्रीचे**

अर्थात, माझ्या मनात शंका होती आणि मला विश्वास बसत नव्हता. तरी देखील ठरल्याप्रमाणे आम्ही पहिल्याच दिवशी संध्याकाळी बीजिंगमधील सुईशे मार्केटला भेट दिली. हे म्हणजे, एक अतिशय अजस्र, भव्य-दिव्य असे मार्केट. साधारणपणे पाच-सहा मजली इमारतींमध्ये वसलेले आणि बीजिंग शहराच्या अगदी मध्यवस्तीत. तेथे काय मिळत नव्हते? यच्चयावत सगळ्या गोष्टी उपलब्ध होत्या. त्या इमारतीमध्ये कमीत कमी एक हजार ते दीड हजार लहान मोठे व्यावसायिक गाळे होते. कमीत कमी चार-पाच हजार कर्मचारी काम करत होते. त्यामध्ये साधारण ९० टक्के स्त्रिया आणि त्यातही जवळजवळ ९० टक्के तरुण मुली. या सगळ्या कामचलाऊ इंग्लिश बोलत होत्या. त्यातही मला एक गोष्ट लक्षात आली,



*चीनमधली सार्वजनिक स्तरावरची शिस्तबद्धता आणि त्यातून आकारास आलेली कार्यसंस्कृती अचंबित करणारी आहे...*

की जे पुरुष/मुलगे काम करत होते, त्यांना फारसे इंग्रजी येत नव्हते. बहुतेक मुली व्यवसायाला लागेल इतपत इंग्लिश बोलत होत्या. त्यांना ग्राहक बघून त्याच्या देशाचा अंदाज येत असावा. कारण त्याप्रमाणे त्यांचे बोलण्याचे विषय बदलत होते. भारतीय दिसला की मुंबई, दिल्ली, नमस्ते, ताजमहाल, राज कपूर-आवारा हे विषय त्यांच्या बोलण्यात हमखास येणार. एकदा, त्या दुकानात (म्हणजे पार्टिशन केलेले गाळे) ग्राहकांनी पाय टाकला की शक्यतो, तो ग्राहक वस्तू विकत घेऊनच बाहेर पडणार. त्या प्रसंगांत सेल्स गर्ल्स ज्या पद्धतीने मार्केटिंग करायच्या, हे त्यांचे कसब बघण्यासारखे होते. कोणताही व्यवसाय करताना संयम ठेवावा लागतो, देवाण-घेवाणची तयारी ठेवावी लागते, ग्राहकाच्या मानसिकतेचा अंदाज घ्यावा लागतो. अशा बऱ्याच बाबी मला तिथे जाणवल्या आणि प्रत्यक्ष अनुभवायला मिळाल्या.

आणखी एक धक्कादायक गोष्ट म्हणजे, पहिल्यांदा सांगितलेली किंमत आणि प्रत्यक्ष विक्री केलेली किंमत यामध्ये किती फरक असावा याला काहीही मर्यादा नाही. एक साधा शर्ट त्याची प्रथम सांगितलेली किंमत होती, आरएमबी १५०० (चायनीज चलनामध्ये दीड हजार म्हणजे भारतीय रुपयामध्ये त्यावेळेला रु. १२,०००/-). माझ्या साहेबांनी मला सांगितले होते, येथे लाज न बाळगता आपल्या मनातील अपेक्षित किंमत सांगायची आणि आपल्याला नक्की त्या किंमतीला वस्तू मिळते, असा त्यांचा अनुभव होता. आपल्याकडच्या सवयीप्रमाणे आपण फार फार तर १० ते २० टक्के डिस्काउंट मागतो. परंतु तिथे मी घाबरत घाबरत आरएमबी १००० सांगू का, असे माझ्या साहेबांना सांगितले. त्यावेळेला त्यांनी मला मूर्खात काढत आरएमबी ९० (नव्वद) हा आकडा सांगितला. तो आकडा ऐकून मला तिथून मान खाली घालून पळून जावेसे वाटले. ती मुलगी वाटेल तसं बोलायला लागली. आर यू क्रेझी? आर यू मॅड? गो टू डॉक्टर?

आम्ही तेथून काढता पाय घेतोय म्हटल्यावर तिचा पवित्रा बदलला. तिने आम्हाला एकदम आरएमबी ७०० किंमत सांगितली. मला आणखी एक धक्का बसला. आधीच्या आरएमबी १५०० वरून तिने सरळ आरएमबी ७०० किंमत सांगितली. त्यानंतरचे तिचे बोलणे म्हणजे- यू आर माय गुड फ्रेंड फ्रॉम इंडिया, ओन्ली फॉर यू आय ॲम गिव्हिंग धीस प्राइस, फरदर लोअर प्राइस, देन माय बॉस विल किल मी... वगैरे वगैरे जवळ जवळ अर्धातास आम्ही भाव करत होतो. आम्ही अजिबात किंमत वाढवत नव्हतो, परंतु तोपर्यंत ती मुलगी आरएमबी २५० पर्यंत आली होती. शेवटी आरएमबी १०० मध्ये आम्ही तो शर्ट विकत घेतला. कुठे आरएमबी १५०० आणि कुठे आरएमबी १००. हा माझा पहिला अनुभव जेथे चीनमधल्या वस्तू किती पैशात आधी सांगतात आणि किती पैशात प्रत्यक्ष व्यवहार होतो.

**काटेकोर कार्यशैलीचा नजारा**

आम्ही असेच पाचव्या मजल्यावर असलेल्या सूट-कोटच्या दुकानात गेलो. तेथे दोन दिवसात पूर्ण सूट शिवून दिला जातो. आमच्या साहेबांनी आधीच काही सूट शिवून घेतले होते. त्यामुळे त्यांच्या किमतीची घासाघीस होऊन किंमत आधीच ठरली होती. माझ्या संदर्भाने सुरुवातीची किंमत होती, आरबीएम ३,२०० हीच किंमत घासाघीस करून झाली, आरबीएम ६००. त्यामुळे आरएमबी ६०० मध्ये एक, असे मी दोन सूट शिवायची ऑर्डर दिली. तेथील काम बघितले आणि लक्षात आले. कामाची अतिशय काटेकोरपणे विभागणी केली गेली होती. प्रत्येकजण आपापल्या कामामध्ये अनुभवी होता. मेजरमेंट घेणारी व्यक्ती काय वेगाने मेजरमेंट घेत होती. तोंडाने ती व्यक्ती मेजरमेंट सांगत होती आणि एक व्यक्ती दूर ते ऐकून लिहून घेत होती. माझ्या लक्षात आले, की मेजरमेंट घेणारी व्यक्ती फक्त आकडे सांगत होती आणि लिहून घेणारा ते मेजरमेंट कशाचे आहे, न विचारता बरोबर लिहून घेत होता. म्हणजे, मेजरमेंट घेताना कोणत्या क्रमाने ते घ्यायचे याचा अतिशय चपखल समन्वयसूर त्या दोघांमध्ये लागत होता.

त्यांनी दुसऱ्या दिवशी ट्रायलसाठी बोलावले होते,



*स्वस्त आहे म्हणजेच टाकाऊ आहे, हे चीनच्या संदर्भाने मिथक ठरावे अशी वस्तुस्थिती आहे. चीनमध्ये वस्तू स्वस्त दरातही मिळतात आणि त्या दर्जेदारही असतात, यामागे चीनची दर्जा सांभाळणारी उत्पादनपद्धती कारणीभूत ठरते...*

संध्याकाळी पाच वाजता. आपल्याकडील अनुभवावरून मला काही त्यावर विश्वास बसला नाही. मला वाटले, हे नक्की ट्रायलसाठी दोन-चार दिवस उशीर करणार परंतु, दुसऱ्या दिवशी गेलो तर ट्रायलसाठी दोन्हीही सूट तयार होते. प्रथम त्याने मला सूट घालायला दिला आणि स्वत:च काही निरीक्षण करू लागला. फक्त एक छोटी दुरुस्ती खांद्याच्या ठिकाणी त्याला कराविशी वाटली, त्याची त्याने नोंद केली. त्यानंतर मला विचारले. मला तर सगळे योग्य वाटत होते. परंतु त्याने मला सांगितले, अंतिम शिलाई होईल त्यावेळेस तुम्हाला खांद्याच्या ठिकाणी थोडे आकसल्यासारखे वाटेल. मग त्याच्या वरिष्ठाने एकदा बघितले आणि त्याने सर्व फायनल केले. मला वाटले, आता आणखी दोन-तीन दिवस लागतील. परंतु त्याने मला सांगितले, की मार्केट रात्री आठ वाजता बंद होते. जर मी सातपर्यंत आलो तर दोन्ही सूट तयार मिळतील.

सगळेच आक्रित आणि अजब वाटायला लागले. मी सात वाजता पोहोचलो. आणि दोन्ही सूट तयार! पुन्हा एकदा ट्रायल घ्यावी म्हणून मी त्यांना सुचविले. त्यांचे म्हणणे होते की गरज नाही, पण तरीही सूट घालून बघितला तर एकदम परफेक्ट होता. एवढे होऊनही, या सूटच्या क्वालिटीबद्दल मनात थोडी शंका शिल्लक होती. ज्यात कापड, अस्तर, शिवणासाठी धागा आणि इतर माल कसा असेल, हा प्रश्न होता. परंतु पूर्ण माझ्या तीन वर्षाच्या चीनमधील वास्तव्यात हे सूट अतिशय उत्तम रीतीने उपयोगात आले. या समाधानकारक अनुभवानंतर मी आखणीन चार-पाच सूट चीनमध्ये असताना शिवून घेतले आणि दर आठवड्याला सलग तीन-चार वर्षे हे सर्व सूट वापरले होते.

तुम्हाला आश्चर्य वाटेल, की २००७ सप्टेंबरमध्ये हे शिवलेले सूट आज २०२६ मध्ये देखील उत्तम स्थितीत आहेत आणि आज देखील मी ते गरज भासल्यास वापरत असतो. फक्त वेळोवेळी योग्य पद्धतीने ड्राय क्लिनिंग करून घेणे आवश्यक असते, इतकेच. म्हणूनही बघणाऱ्याला हे २००७ चे शिवलेले सूट अगदी नवीनच वाटतात.

**किफायती तरीही दर्जेदार**

चिनी माल हा कमी प्रतीचा असतो, असा जो आपला समज असतो, तसा तो माझादेखील होता. पण माझ्या संदर्भाने तो निव्वळ गैरसमज निघाला. महत्त्वाचा आणखी एक मुद्दा म्हणजे, घासाघीस करून किंमत कमी केलेली होती तरी देखील कणभर देखील त्रुटी नाही, आज देखील एकदम नवा कोरा सुट वाटतो. अर्थात कमी प्रतीचा देखील तिथे माल मिळतो त्याबद्दल कधीतरी सविस्तर सांगेन. परंतु या अनुभवामुळे शिकायला मिळाले की, चीनमध्ये तुम्हाला चांगले उत्तम प्रतीचे उत्पादन देखील मिळू शकते. तसेच तुम्ही तयार असाल आणि संयम राखणार असाल, तर किंमत मोठ्या प्रमाणात कमी करण्यात यशस्वी होऊ शकता आणि वस्तूची उत्तम क्वालिटी सुद्धा त्याच कमी किमतीमध्ये मिळवू शकता.

यावरील उदाहरणावरून ज्या गोष्टी माझ्या लक्षात आल्या, त्या म्हणजे, १.आपल्याला काय पाहिजे याची मुळात ग्राहकाला कल्पना असली पाहिजे. २. घाऊक स्वरुपाच्या उत्पादन प्रक्रियेमुळे मालाची अंतिम किंमत बऱ्यापैकी कमी होते. ३. लक्ष्यकेंद्री काम करणारी समर्पित कामगारांची फळी, त्यांचे योग्य प्रशिक्षण, आणि स्टॅण्डर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर (SOP) या सगळ्या गोष्टींना अगदी छोट्यातल्या छोट्या व्यवसायामध्ये आणि उत्पादन क्षेत्रामध्ये चीन खूप महत्त्व देते. ४. मॅन्युफॅक्चरिंग/उत्पादन क्षेत्र यामध्ये चीनने आपली जी जागा जगामध्ये निर्माण केली आहे. त्यामागे त्यांचे हे सगळे परिश्रम, सातत्य कार्यनिष्ठा कारणीभूत आहेत.

अर्थातच ही फक्त एक झलक होती. मला प्रत्यक्ष तंत्रज्ञान आणि तांत्रिक कामाच्या संदर्भाने तेथील अनुभव अजूनही येणे बाकी होते. हा अनुभव मला माझ्या चीनमधील व्यावसायिक कामात पुढे खूप उपयोगाला येत गेला, त्याबद्दल पुढील भागांत विवेचन येईलच. परंतु मुख्यत्वे तंत्रज्ञान, प्रगतिशील उत्पादन, कार्यक्षम औद्योगिक संस्था, अतिउच्च प्रतीचे तंत्रज्ञ, अभियंते आणि दर्जा कमी न करता केले जाणारे औद्योगिक काम, याबद्दल घेतलेल्या अनुभवांचे कथन करेन. या अनुभवकथनाच्या ओघात काही गमतीदार प्रसंग देखील सादर करेन.

**गजानन जोशी नामवंत ऊर्जानिर्मिती अभ्यासक, भाष्यकार आहेत. समाज, साहित्य आणि कला हे त्यांचे चिंतन आणि आस्वादनाचे विषय आहेत.**
**संपर्क** : joshigajanan@hotmail.com




## कृत्रिम बुद्धिमत्तेचे भविष्य माणसाहाती

### टिप फुले टिप

'इम्पीरियल कॉलेज लंडनची' पत्रिका नुकतीच हातात पडली. यात 'एआय' बाबतची माहिती आणि इम्पीरियलमध्ये 'एआय' संबंधी सुरू केलेले उपक्रम असे पत्रिकेचे स्वरूप. किती टिपून घ्यायचे तितके टिपावे, असे त्यातील लेख. कृत्रिम बुद्धिमत्ता ही ना शत्रू ना मित्र. ही एक यंत्रणा. माणसाने निर्माण केलेली. त्यानेच या यंत्रणेची उत्क्रांती सुरू केली. एकदा ही उत्क्रांती सुरू झाली म्हणजे, ती थांबत नाही. या यंत्रणेच्या उत्क्रांतीची गती भन्नाट आहे. यंत्रणा हे साधन असले पाहिजे, पण हीच यंत्रणा माणसाचे नियंत्रण करेल की काय अशी भीती आता वाटत आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवी बुद्धीची आविष्कार यंत्रणा, तिला विज्ञान शिरजोर होऊन देणार नाही. एआय माणसाला मदत करणारे झाले पाहिजे, यासाठी इम्पिरियलने 'School of Convergence Science' हा विभाग स्थापला आहे. अप्लाइड कम्प्युटेशनल लॉजिक, एआय अप्लाइड टु मेडिसिन, एआय अँड न्युरोसायन्स, फिजिक्स या विषयातील प्राध्यापक एकत्र येऊन एआय बाबतच्या विचारांची, प्रयोगांची देवाणघेवाण करणार आहेत.

दोन विज्ञान शाखा एकत्र येऊन तिसरी शाखा निर्माण होणे, विज्ञानाला नवीन नाही. बायोफिजिक्स, बायोकेमिस्ट्री, बायोइंजिनियरिंग वगैरे. पण एआय हा जरा आगाऊ आणि इस्पळ आहे. तो स्वत:च शिकतो आणि काहीबाही तयार करू शकतो. एआयचे वर्तन अनपेक्षित असू शकते. म्हणून ही बुद्धिमान मंडळी एकत्र आली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेने मानवी बुद्धीला समृद्ध केले पाहिजे. हा सुद्धा एक उद्देश 'कन्वर्जंस सायन्स' मागे आहे.

आता कोणतीही विज्ञान शाखा, कोणताही उद्योग, 'एकला चलो रे' पद्धतीने विविध शिखरे काबीज करू शकणार नाही, हे विज्ञानाच्या केव्हाच लक्षात आले आहे. शक्यता अनेक आहेत. सकारात्मक बदल करण्याच्या सुप्त क्षमता चंड-प्रचंड आहेत. एआयला बरोबर घेऊन मूलभूत सुविधा निर्माण करून 'सायन्स फॉर ह्युमॅनिटी' 'मानवतेसाठी विज्ञान' ही संकल्पना विज्ञानवंत प्रत्यक्षात आणू पाहत आहेत.

मानवी बुद्धीचा अणुऊर्जा हा महत्त्वाचा आविष्कार होता. पण तो हाताबाहेर गेल्यामुळे हिरोशिमा नागासाकी घडले हे सगळ्यांना माहीत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानव निर्मित आविष्कार यंत्रणा, निसर्गावर आधारित गुणकारी जीवननिष्ठांना पोषक ठरली पाहिजे, या करता विज्ञानात प्रयत्न सुरू आहेत. पुढेही सुरू राहणार आहेत...

**– टिपक**

# प्रथम तुज न पाहता



प्रा.श्रीनिवास हेमाडे

**गोष्ट प्रेमाची** **लेखांक – ७**



प्रस्तुत लेखमालिका 'गोष्ट प्रेमाची' मी लिहायला सुरुवात केल्यापासून अनेकांनी मला एक प्रश्न विचारला. तो वेगवेगळ्या प्रकारे विचारला गेला. त्यांचा ल. सा. वि. असा की ''प्रेम हा एक रंजक विषय आहे हे खरे, पण तत्त्ववेत्त्यांना त्यात रस का असतो?'' त्यांचा प्रश्न बरोबर आहेच. पण प्रश्नामागे किंवा अशा विधानांमागे एक पूर्वग्रह दडलेला असतो, अन् त्याची मला नेहमीच गंमत वाटते. तो पूर्वग्रह असा, की 'सामान्य लोकांना ज्या गोष्टींमध्ये रस असतो, त्या गोष्टींमध्ये तत्त्ववेत्त्यांना रस नसतो. तत्त्ववेत्ते वेगळ्याच धुंदीत, आपल्याच विश्वात रममाण झालेले असतात अन् त्या विश्वात 'प्रेम' या विषयाला जागा नसते.' हा पूर्वग्रह रास्तच आहे. कारण 'तत्त्वज्ञान' (Philosophy) या विषयाच्या कोणत्याही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात 'प्रेम' हा विषय एका गुणापुरताही एक मिनिटही शिकवला जात नाही. मग तत्त्ववेत्त्यांना प्रेमात रस का असतो, हा प्रश्न आणखी लांब...

**मी** तीस वर्षे तत्त्वज्ञान हा विषय शिकवला. पहिल्या वर्षाला (FYBA) शिकवताना 'प्रेम' या विषयावर किमान चार पाच तास तरी द्यायचो. त्यानंतरच मी त्याला जोडून येणारा love of wisdom अर्थात Philosophy ला शुभारंभ करत होतो. मी प्रेमापासून सुरुवात करून ज्ञानाच्या प्रेमाकडे विद्यार्थ्यांसोबत प्रवासाला निघत असे.

इथे 'तत्त्ववेत्ते' (Philosophers) आणि 'तत्त्वज्ञानाचे विद्यापीठीय व महाविद्यालयीन प्राध्यापक' (Professional Philosopher) हा भेद लक्षात घेतला पाहिजे. तत्त्ववेत्ता, तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक असतोच, असे नाही अन् तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक, तत्त्ववेत्ता असतोच असेही नाही. ते फार दुर्मीळ आहे. पण तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाला पाश्चात्य-युरोपात 'Professional Philosopher' म्हटले जाते. भारतात अजून ती प्रथा सुरू झालेली नाही (पण मी ती सुरू केलीय).

'प्रेम' या विषयात तत्त्ववेत्त्यांना रस का असतो? तर नक्कीच असतो, इतिहास साक्ष आहे. प्राचीन तत्त्ववेत्त्यांनी तर Love of Wisdom - Philosophy चा शोध घेतलाच आहे, पण Wisdom of Love आणि Wisdom in Love चाही शोध घेतला आहे. त्याचप्रमाणे आधुनिक कालखंडात जगातील बहुतेक पाश्चात्य-युरोपीय विद्यापीठातील Professional Philosophers या विषयाला हात घातला आहे. Philosophy of Love हा त्यांच्या चिंतनाचा विषय बनला आहे. पण भारतातील तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकांच्या ऐरणीवर तर नाहीच, पण खिजगणतीतही हा विषय नाही, असा माझा साक्षात अनुभव आहे. भारतीय तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक लोक्स केवळ व्यवसाय (profession) म्हणून Philosophy चाच अभ्यास करतात. त्यांच्या अभ्यासक्रमात ते कधीही 'प्रेम' हा विषय समाविष्ट करत नाहीत, पण शिकवतात Love of Wisdom. असे अनेक वर्षे घडत आले आहे. का घडत आले आहे आणि त्यात बदल का होत नाही, त्याची कारणे अनेक आहेत. ती नंतर कधीतरी पाहू.

पण लेखमालिका मी मराठीत लिहीत असल्याने मला *'मराठी वाचकांकडून' 'प्रेम हा एक रंजक विषय आहे हे खरे, पण तत्त्ववेत्त्यांना त्यात रस का असतो?'* हा प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा फारसे आश्चर्य वाटले नाही. कारण, तत्त्वज्ञानाची आणि व्यावसायिक तत्त्ववेत्त्यांची वर स्पष्ट केलेली मानसिकता आणि वैचारिकता. त्या मानसिकतेतून घडलेली सामान्य लोकांची 'तत्त्वज्ञान' विषयाबद्दलची धारणा.

**तत्त्वज्ञान प्रेमिकांची चढती श्रेणी**

ज्यांनी हा प्रश्न विचारला, ती प्रश्नकर्ती माणसे तत्त्ववेत्ते नाहीत, शिवाय तत्त्वज्ञानाचे अभ्यासकही नाहीत; तत्त्वज्ञानाचे प्राध्यापकही नाहीत. प्रश्नकर्ते १) सामान्य सुशिक्षित माणसे आहेत. 'तत्त्वज्ञान' (philosophy) या विषयाशी त्यांचा फारसा संबंधही आलेला नाही. त्यांना 'तत्त्वज्ञान' आणि 'philosophy' हे शब्द त्यांच्या कुठल्यातरी बुवा, महाराज, ताई महाराज, माताजी यांच्या प्रवचनातून अथवा नाथपंथ, वारकरी भजन, अभंग इत्यादीत ऐकलेला आहे. २) प्रश्नकर्त्यांमधील काहीजण थोडेसे उत्क्रांत झालेले सुशिक्षित लोक आहेत. हे शब्द त्यांच्या वाचनात कुठेतरी आलेले असतात किंवा त्यांच्या लेखनातही हे शब्द येत असतात, अर्थातच त्यांचा वापर सैलसर असतो. ३) त्यातील आणखी काहीजण अधिक उत्क्रांत होऊन अभ्यासक, संशोधक बनलेले आहेत. त्यांना आवश्यक आहे त्या विचारवंतांच्या विचारांचा अभ्यास करताना, त्यांचे संदर्भ घेताना ते आदरपूर्वक या दोन्ही शब्दांचा उपयोग करतात. आणि जे विद्यापीठीय संशोधन, PhD प्रबंध लेखन करतात त्यांच्या पदवीत Doctor of Philosophy असा Philosophyचा उल्लेख असल्यामुळे Philosophy शब्द त्यांना अनिवार्यतेने माहीत झालेला असतो. ४) त्यातील काहीजण आणखी उच्च पातळीवर उत्क्रांत झालेले अधिक जोरकस, भक्कम अन् भरीव प्रेरणा घेऊन थेट तत्त्वज्ञानाची पुस्तके वाचतात. मग त्यांच्यात थेट 'तत्त्वज्ञान प्रेमी' विकसित होतो. हे **'बिगर-तत्त्वज्ञान'** (non philosophy) प्रेमिक असतात. ५) त्याच प्रेमिकांमधून आणखी उत्क्रांती होऊन ज्ञानजिज्ञासेची मात्रा खूप तीव्र आणि गतिमान असलेले तत्त्वज्ञान प्रेमिक उदयास येतात. त्यांच्या आवडी-निवडीनुसार वेगवेगळ्या सामाजिक, नैसर्गिक, मानव्य अन् कला विषयक प्रांतांचे 'चिंतक' असतात; ते 'विचारवंत' म्हणूनही प्रसिद्ध होतात. या खेरीज साहित्य, कला, संगीत इत्यादी क्षेत्रातील 'चिंतक - विचारवंत' मंडळीही आपापल्या परीने त्यांच्या कलाकृतींच्या माध्यमातून त्यांचे विषयानुषंगिक 'तत्त्वचिंतन' व्यक्त करतात. समीक्षा हा प्रांत देखील त्या त्या विषयाचे 'तत्त्व' शोधून त्याची तार्किक व ज्ञानात्मक चिकित्सा करणारा 'तात्त्विक प्रांत' बनतो. साहजिकच समीक्षक मंडळी देखील 'तत्त्व' ज्ञान प्रेमिक असतात, असे म्हणता येते. ही ज्ञानी मंडळी काहीशी

'तत्त्वचिंतक' ही बनलेली असतात. त्यांना '**तत्त्वज्ञान-समीप तत्त्ववेत्ते**' (near philosopher) म्हणता येते. ६) या शिवाय इटालियन विचारवंत अन्तोनिओ ग्राम्सीचे म्हणणे ऐकले, तर 'जवळपास प्रत्येक माणूस एक सुप्तगुप्त तत्त्वज्ञानी असतो.' या सर्वांनाच तत्त्वज्ञानाविषयी प्रेम, आदर असतो आणि त्यांना तत्त्वज्ञानाचा काहीसा दरारा वाटत असतो, यात शंका नाही.

या प्रत्येक वर्गातील काही वाचकांनी मला वरील ''प्रेम या विषयात तत्त्ववेत्त्यांना रस का असतो?'' हा प्रश्न विचारला आहे. अर्थात लेखमालिका सुरू करण्यापूर्वीच्या काळात इतर काही प्रसंगी काही कारणांनी काहीजणांनी हा प्रश्न विचारला होता. पण त्यावेळी मी प्रेम या विषयावर केवळ बोलत होतो, पण लिहित नव्हतो किंवा लिहिले नव्हते. आता ही लेखमाला लिहित असल्याने माझ्या प्रेमचिंतनाचा पुरावा निर्माण होत आहे. त्यामुळे वाचकांना मला विचारण्याचा खुला हक्क प्राप्त झाला आहे. ज्यांच्यापर्यंत 'मुक्त संवाद'चा अंक प्रिंट, ईमेल, व्हॉट्सॲप या माध्यमांनी पोहोचतो, त्यातील काही वाचकांनी लेखमालिकेवर उत्तम प्रतिसाद दिला आहेच. पण मी माझ्या फेसबुकवर लेख पोस्ट करत असल्याने तिथूनही हजारो वाचकांपर्यंत लेखमालिका पोहोचते, त्यातीलही अनेकांनी हाच प्रश्न वेगवेगळ्या शब्दांत, पद्धतीत उपस्थित केला आहे.

मला वाटतं, लोक जेव्हा एखाद्याला प्रश्न विचारतात, तेव्हा एका प्रकारे लेखकाला 'अमुकतमुक विषयाचा लेखक' अशी एक 'ओळख' लाभत असते, त्याचा-तिचा परिचय निश्चित होत जातो, तसे माझे काहीसे झाले आहे. गेल्या काही वर्षांत मला प्रेम हा विषय तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत आकर्षक व चिंतनीय वाटला आहे. 'प्रेम' हा विषय अनेक प्राचीन आणि उत्तराधुनिक तात्त्विक प्रश्नांचा आणि तात्त्विक कोड्यांचा कधीही न आटणारा स्रोत आहे, असे माझे निरीक्षण आहे.

**माझे प्रेमप्रकरण**

प्रेमाबद्दलची कोणतीही चर्चा, त्या शब्दाचा नेमका अर्थ काय आहे, याबद्दलच्या आपल्या 'गृहीतकां'वर (assumptions) अवलंबून असते. मला प्रामुख्याने 'वैयक्तिक प्रेमा'त रस घ्यावा असे वाटते आहे, म्हणजे व्यक्तींवरील प्रेम, व्यक्तींमधील प्रेम. जी. ई. मूरने जगातील 'चांगल्या गोष्टींची जी यादी केली आहे, त्यात 'व्यक्तिगत स्नेह' (personal affair)चा समावेश केला आहे. ज्या कोणत्या गोष्टींना आंतरिक मूल्य असते, त्यांची उदाहरणे आणि त्यांचे विश्लेषण देताना मूर 'प्रेम' या संकल्पनेचा विचार करतो. तो 'Love'साठी 'Personal affection' - 'व्यक्तिगत स्नेह' हा विशेष शब्दप्रयोग मुकर्रर करतो. व्यक्तिगत प्रेम, पर्यायाने अनेक व्यक्तींच्या 'समूह प्रेमा'ला स्वतःहून अस्तित्वात (मानवी वर्तनात) असणारी 'आंतरिक मूल्यवान' गोष्ट मानावे, असे तो सुचवतो. 'परस्परांविषयी प्रेम' हे तर लोकशाहीचे मूल सूत्र. म्हणून तर लोकशाहीचा पुरस्कार अनिवार्य ठरतो. अर्थात मूर केवळ affection हाच शब्दप्रयोग करतो असे नव्हे, तर Love संज्ञा देखील उपयोगात आणतो. विश्लेषणाच्या ओघात जे कसे शक्य नाही आणि जे कोणत्या अर्थाने भ्रम ठरते, हे स्पष्ट करताना Love of God अशी संकल्पना मांडतो. ('खुल्लम खुल्ला प्यार करेंगे...!' -लेखांक ०५ मे २०२६)

प्रणयरम्य प्रेम, मित्रप्रेम, कुटुंब सदस्यांवरील प्रेम ही प्रेमाची आदर्श उदाहरणे आहेत. अर्थात, प्रेम हा शब्द इतर अनेक प्रकारेही वापरला जातोच, पण मानवी व्यक्ती नसलेल्या मानवेतर गोष्टींवरील प्रेमाचे 'वैयक्तिक प्रेमा'शी किमान काही प्रमाणात साम्य असते. निसर्गावर प्रेम करणे, आपला धंदा, व्यवसाय, शास्त्रीय संगीत-लोकसंगीत किंवा विसाव्या शतकाच्या सुरुवातीची चित्रकला, यापैकी काहीही एखाद्या व्यक्तीवरील प्रेमाप्रमाणेच, जीवनाला एक उद्देश देऊ शकते, जीवनाला आकार देण्यास मदत करू शकते आणि प्रेम करणाऱ्या व्यक्तीची ओळख निर्माण करण्यास मदत करू शकते. जोपर्यंत तुम्हाला एखाद्या व्यक्तीची आवड कळत नाही, तोपर्यंत तुम्ही त्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने ओळखत नाही. ज्या व्यक्तीवर तुमचे प्रेम आहे, ती व्यक्ती कळण्यासाठी, तिला ओळखण्यासाठी तिची आवडही ओळखता येणे आवश्यक असतेच.

असं पाहा, हेच तुमच्या बाबतीतही खरे असते. जोपर्यंत तुम्हाला तुमची स्वतःची आवड-निवड कळत नाही, तोपर्यंत तुम्ही स्वतःला खऱ्या अर्थाने ओळखत नाही.

हे वास्तव सत्य इतर कोणत्याही प्रकारच्या प्रेमाप्रमाणेच खरे असले तरी, व्यक्तींवरील प्रेम काही विशिष्ट घटकांच्या बाबतीत वेगळे वाटते, पण त्यामुळेच ते विशेष महत्त्वाचे आणि विशेष मनोरंजक बनते. एखादी व्यक्ती तुमच्या प्रेमाला प्रतिसाद देईल अथवा न देईल. तुमच्याबद्दल तिच्या अनेक प्रकारच्या वृत्ती असू शकतात. एकविसाव्या शतकाच्या प्रारंभ काळातील चित्रकलेवर किंवा शास्त्रीय, पॉप संगीतावर तुमचे प्रेम



*ओढ, आकर्षण, आसक्ती, आदर असे अनेक पैलू प्रेमाला कमी-अधिक प्रमाणात जोडलेले असतात. परंतु प्रेमाची अभिव्यक्ती वा अनुभूती संभाषणावरच अवलंबून असते...*

असेलही, पण तुम्ही तिच्यावर प्रेम करता आहात, हे त्या चित्रकलेला, संगीताला कधीच कळणार नाही. तुमच्या प्रेमाचा कलेच्या विकासावर किंवा जग तिचा जो काही अनुभव घेईल, त्यावर कोणताही परिणाम होणार नाही. तथापि तुमच्या-बद्दलचेही त्या कलेचे, अर्थात कलाकार मंडळींचे दृष्टिकोन बदलतील. त्याचवेळी तुमचेही तिच्याबद्दलचे दृष्टिकोन बदलतील.

**प्रेम : एक संवाद क्षमता**

मला वाटतं, प्रेम करणं ही कृती 'बोलणे करण्या'सारखी कृती आहे. तुम्ही सर्व प्रकारच्या गोष्टींशी – झाडेझुडपे, घराच्या बागेतील फुलझाडे, नदी, समुद्र, आकाश, पाऊस कुणाशीही बोलू शकता, पण ते 'सम-भाषण' – संभाषण (conversation) नसते, तो 'संवाद' (dialogue) नसतो. कारण त्यांच्याकडे संभाषण करण्याची क्षमता नसते, त्यांना आपण सजीव मानत असलो तरीही. ज्याच्याकडे संभाषणाची 'संकल्पना' आहे आणि संबंधित संवाद साधण्याची 'क्षमता' आहे त्याच्याशीच, त्याच 'अस्तित्वा'शी (existence) तुम्ही संवाद साधू शकता. म्हणजेच आपण केवळ दुसऱ्या संवादक्षम व्यक्तीसोबतच 'संभाषण' करू शकतो. मला वाटते, 'प्रेम' तेव्हाच सर्वात जास्त रंजक असते, जेव्हा ते अशा प्रकारे 'संभाषण' क्षम असते.

**प्रेम करण्याची कारणे**

आता इथे एक तात्त्विक प्रश्न उपस्थित करता येईल. तो असा की, *'आपण ज्या लोकांवर प्रेम करतो, त्यांच्यावर प्रेम करण्याची आपल्याकडे काही यथार्थ कारणे आहेत का? अन् असली तर ती कोणती?'* हा प्रेमाबाबतचा मूलभूत तात्त्विक प्रश्न बनतो. प्रेमाबद्दलची बरीचशी तात्त्विक चर्चा या मूळ प्रश्नाभोवती केंद्रित होते. अनेकदा आपण त्या प्रश्नांचा विचार न करताच संवाद साधू पाहतो आणि खरेच शब्दशः 'तोंडघशी' उर्फ 'प्रेमघशी' पडतो. असे घडते, तेव्हा आपण जे काही बोलू पाहत असतो, संवाद साधू पाहतो त्यातून बऱ्याचदा असे सूचित होते की, आपल्या मनात काही कारणे असू शकतात. पण नेहमीच ती कारणे असतील असे नाही. कधी कधीच असतात. (पण समजा ती फक्त कधीकधीच असतील आणि नेहमीच नसतील तर 'ती गोष्ट मुदलातच स्वतःच काहीशी गूढ ठरेल!')

जी व्यक्ती आपल्याला आकर्षित करते, त्या व्यक्तीकडे ती आपल्याला आकर्षित करणारी अनेक वैशिष्ट्ये असतात आणि आपण अनेकदा ती ओळखू शकतो. ती इतरांना सांगू शकतो, त्याबाबत इतरांशी 'संभाषण' करू शकतो. पण त्याचवेळी आपण त्या व्यक्तीचे तिच्या त्या वैशिष्ट्यांसह संपूर्ण वर्णन करू शकतो, असे आपल्याला जवळजवळ कधीच वाटत नाही! समजा जर आपण सर्वकाही सांगण्याचा 'मूर्खपणा' केलाच तर आपल्या यादीतून काहीतरी अजूनही 'गहाळ' झाले आहे, 'निसटले' आहे, असे जवळजवळ ***नेहमीच*** वाटते. (हे मूरच्या 'चांगले हे अवर्णनीय असते' या गुणधर्माशी जुळते पाहा. वर्णन करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी 'नैसर्गिक तर्कदोष' घडतोच)

आणि

''आपल्या प्रिय व्यक्तींवर प्रेम करण्याची आपल्याकडे कारणे असतात'' या कल्पनेतून अनपेक्षित निष्कर्ष काढण्यात तत्त्ववेत्ते तरबेज असतात, बरं का! त्यांनी ते चातुर्य मोठ्या शिताफीने दाखवले आहे. उदाहरणार्थ, जर 'प्रेम करण्याची आपल्याकडे कारणे असतात' हे खरे असेल तर मग तुमच्या प्रिय व्यक्तीच्या हुबेहूब प्रतिकृतीवर प्रेम करण्याचे तशीच कारण तुमच्याकडे असतील काय? म्हणजे नसतील काय? असली पाहिजेत. ती असली तरच तुम्ही प्रतिमेवर, हुबेहूब प्रतिकृतीवर प्रेम करू शकता. प्रेयसीचा, प्रियकराचा, आई वडलांचा फोटो, मुलांचे फोटो किंवा कुठलेतरी आपले गुरू महाराज, गुरूमाता किंवा अगदी देवाचे फोटो. (देवाच्या किंवा ईश्वराच्या फोटोबाबत एक समस्या अशी असते की देव वास्तवात

भेटलेला नसतो, तरी त्याचे फोटो, मूर्ती इत्यादी असतात. त्यावर आपले प्रेमही असते. जे भेटलेले नाही, त्यावर 'ते भेटले आहे, त्याच्याशी संवाद झाला आहे' असे समजून त्याच्या फोटोवर, मूर्तीवर प्रेम करणे गूढ बनते. विठोबा काय, सॉक्रेटिस काय अन् आजच्या पिढीला न भेटलेले तुकोबा, म. फुले, गांधीजी इत्यादी काय; गूढता तीच...! इथे 'श्रद्धे'ला जागा मिळते, ती प्रेमाची जागा बळकावून घेतेच)

किंवा,

असे समजा की संधी मिळाल्यास आपल्या जोडीदाराच्या जागी अशी व्यक्ती आणून मूळ जोडीदाराला अशा रीतीने नव्या व्यक्तीची स्थापना करून बदलणे की या नव्या बदली व्यक्तीमध्ये मूळ व्यक्तीचे तेच सर्व आकर्षक गुण आणि त्यासोबतच एक अतिरिक्त आकर्षक गुण असतील!

आता, हे तर्कसंगत ठरेल का? 'ब्रेक अप' फेम आधुनिक relationship age मध्ये असे घडत आहे. (तू नहीं तो और सही/और नहीं तो और सही!) हा आजचा फंडा मानला जातो.

**प्रथम तुज पाहता, की न पाहता?**

येथे लोकांना सर्वात जास्त थेट भिडणारा अन् सतावणारा आक्षेप आहे, तो 'प्रथम तुज पाहता'च्या 'पहिल्या भेटी'तल्या प्रेमाच्या कल्पनेवर (Love@ first sight) आधारित आहे. 'पहिल्यांदाच पाहिलं/भेटला/ली अन प्रेमात पडला/ली' असे घडते हे खरे. आता, प्रेम म्हणजे संभाषण, अशी कल्पना मान्य केली आणि इतर कुणावरही प्रेम करण्याची निश्चित कारणे असतात, हे मान्य केले तर आपली विवेकबुद्धी 'प्रथम तुज पाहता' प्रेमाबाबत गहाण टाकता येत नाही. जर आपण काही कारणांमुळे प्रेम करत असू, तर 'पहिल्या भेटीतलं प्रेम अस्तित्वात असूच शकत नाही.' कारण, एखाद्याला पहिल्यांदा भेटल्यावर, आपण त्यांच्यावर प्रेम का करत आहोत, याची कारणं आपल्याला माहीत नसतात. आता, साहजिकच, 'पहिल्या भेटीतलं प्रेम अस्तित्वातच नाही' असा निष्कर्ष काढून आपण हा आक्षेप फेटाळू शकतो.

पण इथे एक अडचण येते. मला असं वाटतं की, 'पहिल्या भेटीतलं प्रेम कदाचित अस्तित्वात असते; किमान काही प्रेम प्रकरणाबाबतीत तरी ते असतेच असते.' अर्थात, 'प्रथम तुज पाहता' हे केवळ व्यक्तिगत प्रेमप्रकरणांपुरत' मर्यादित नाही; तिथे तर आहेच आहे म्हणा. पण असं इतर प्रकारच्या प्रकरणांमध्येही घडतं – उदाहरणार्थ, नवजात बालकांचे पालक पाहा. आपल्या बाळावर जन्माच्या वेळीच, किंबहुना जन्माच्या आधीच आईवडलांचे प्रेम जडलेलं असते. 'बाळावर प्रेम का करावे?' याची अनेक कारणे तर असतातच.

याचा अर्थ असा, की जे अजून जन्माला आलेले नाही, 'प्रथम तुज पाहता' घडलेलेच नाही त्यावर अर्थात ''प्रथम तुज न पाहता जीव वेडावला'' तरीही त्याच्यावर आपले प्रेम जडलेले आहे; तर मग जे अस्तित्वात आहे, पण ज्यांना आपण कधीच पाहिलेले नाही, पाहणारही नाही – म्हणजे ती शक्यता कमी आहे अशा विद्यमान मानवजातीच्या पृथ्वीवर विखुरलेल्या अब्जावधी माणसांवरही आपण प्रेम करतोच.

एवढेच नव्हे, तर ज्यांचे अस्तित्व आपण पाहूच शकणार नाही, अशा दूरवरील भविष्यकालीन माणसांवरही 'मानवजात' म्हणून आपले प्रेम आहे. केवळ माणसांवर नव्हे तर अखिल पशुपक्षी, वनस्पतिसृष्टी अन् संपूर्ण कवेत न येणाऱ्या ब्रह्मांडावरही आपण प्रेम करतोच. आपले पूर्वजांवरही प्रेम असतेच. त्यांच्यामुळेच आज आपण अस्तित्वात आहोत, ही कृतज्ञता आपल्या तनामनात असते, ती अनेक मार्गांनी व्यक्तही होते.

थोडक्यात, भूत-वर्तमान अन् भविष्यकालीन ''प्रथम तुज न पाहता...'' प्रेम असतेच. योगदर्शनकार महर्षि पतंजली यांचा 'ब्रह्मविहार' (''मैत्रीकरुणामुदितोपेक्षाणां सुखदुःखपुण्यापुण्य-विषयाणां भावनातश्चित्तप्रसादनम्'', योगसूत्र १.३३) आणि महात्मा बुद्धाचा 'ब्रह्मविहार' (मैत्री (प्रेमपूर्ण सौहार्द), करुणा (दया), मुदिता (सहानुभूतिपूर्ण आनंद), उपेक्षा (समत्व) : त्रिपिटक, अंगुत्तर निकाय, १०.२०८), जैन तत्त्वज्ञानातील अहिंसा आणि सत्य ही मूल्ये, अथवा महात्मा फुले यांची 'सार्वजनिक सत्यधर्म'च्या प्रस्तावनेत व्यक्त झालेली 'एक जग' संकल्पना आणि जागतिक भारतीय तत्त्ववेत्ते प्रोफेसर सुरेंद्र बारलिंगे यांची 'एक जग' (परामर्श, खंड ४ अंक २) ही तत्त्वज्ञानात्मक एकात्म जगाची संकल्पना हेच कथन करतात. तेव्हा ''प्रथम तुज पाहता...'' आणि सोबतीला ''प्रथम तुज न पाहता जीव वेडावला'' म्हणजेच ''जगाला प्रेम अर्पावे'' ते हेच.

**प्रेम आणि काळ**

आपल्याला हे स्पष्ट झाले आहे की 'प्रेम आणि कालखंड'

यांच्यातील नातेसंबंधाबद्दलच्या काही गोष्टी योग्यरित्या समजून घेणे हीच गुरुकिल्ली आहे. याचा अर्थ असा की, जे पालक प्रामाणिकपणे आणि खऱ्या अर्थानेही आपल्या नवजात बालकांवर प्रेम करतात, त्यामागील एक कारण आहे आणि ते एकमेव कारण आहे. ते असे की, 'आपली बालके जसजशी मोठी होतील, तसतसे त्यांच्यामध्ये प्रेमळ गुण विकसित होतील' ही त्यांची धारणा. अर्थात, बालकांमध्ये नेमके कोणते गुण विकसित होतील, हे त्यांना माहीत नसते; पण त्याने काही फरक पडत नाही म्हणा. कारण पालक-बालक नात्याचे स्वरूपच असे आहे की, त्या व्यक्तीमध्ये जे काही गुण दिसून येतील, त्या गुणांसाठी तिच्यावर प्रेम करण्याची एक प्रकारची वचनबद्धता त्यात अंतर्भूत असते. हे काहीसे त्या प्रेमासारखे आहे, ज्यात एकदा का तुम्ही एखाद्याच्या खऱ्या प्रेमात पडलात की, तुम्ही त्यांच्यातील सर्व प्रकारच्या गोष्टींवर प्रेम करू लागता. मग त्यात अशाही काही गोष्टींचा समावेश असतो, ज्या सुरुवातीला तुम्हाला अगदी क्षुल्लक किंवा कदाचित अनाकर्षक वाटल्या होत्या किंवा ज्या अजिबात लक्षात आल्या नाहीत.

व्यक्तिगत स्नेह उर्फ प्रेम प्रकरणाचे प्रेम आणि पालक-बालक प्रेमात एक फरक आहे. तो असा, की पालक-बालक नात्यात, ज्या गोष्टी तुम्हाला आवडू लागतात त्या खऱ्या अर्थाने 'त्या प्रेमाचे कारण असण्याचे काम' करतात; तर व्यक्तिगत प्रेमाच्या बाबतीत त्या गोष्टी अनेकदा 'प्रेमाचे कारण असण्याचे काम' करत नाहीत. त्या अशा गोष्टी असतात, की ज्यांच्याबद्दल तुम्हाला केवळ सकारात्मक भावना वाटते. कारण त्या अशा व्यक्तीशी जोडलेल्या असतात, जिच्याशी तुम्ही स्वतः आता (वेगळ्या अर्थाने) जोडलेले असता. एवढेच कारण असते. बालक हे पालकांची 'निर्मिती' असते, पण प्रिय व्यक्ती तुमची 'निर्मिती नसते', ती तुमच्या व्यक्तिमत्व बाह्य व्यक्ती असते. म्हणून ती अर्थात तिच्याशी असलेले प्रेमसंबंध नाते कधीही तोडले जाऊ शकते; पण 'पालकांचे बालकाशी असलेले नाते तोडले जाऊ शकत नाही,' हे मुख्य कारण असते.

थोडक्यात, ''आपल्या प्रिय व्यक्तींवर प्रेम करण्याची आपल्याकडे कारणे असतात'' या गृहीतकाचा हा निष्कर्ष आहे, की प्रेमसंबंधानुसार त्याची स्वतःची कारणे असतात. हा प्रेमाच्या परिवर्तनकारी शक्तीचाच एक भाग आहे. प्रेम कोणतेही असो त्याला कारण असतेच. म्हणून तत्त्ववेत्त्यांना प्रेम या विषयात रस असतो, मग तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापकाला असो अथवा नसो!

**लेखक व्यावसायिक तत्त्ववेत्ते आणि सल्लागार आहेत.**
**संपर्क :** ९१५ ८६५ ८०६६, wiselove2026@gmail.com



**कुणबी, गाव आणि वेळीप यांची वास्तविकता**
प्रतापसिंह वेळीप काणकर
किंमत २५०/-



**काळीज उसवलां**
उदय नरसिंह म्हांबरो
अनुवाद : पौर्णिमा केरकर
किंमत २००/-


**आरशातल्या आरशात**
डॉ. सुधीर देवरे
किंमत २२५/-



**दक्षिणायन**
किशोर अर्जुन
किंमत : २५०/-



**नामदेव साळुबाई ढसाळ**
मोतीराम कटारे
किंमत २२५/-



**यांगोन यात्रा**
डॉ. मिलिंद जोशी
किंमत २००/-

सहित
आपली प्रत आजच नोंदवा
७०३० ९९००८१
९९६० ३७४७३९
@SAHITPRAKASHAN

# चार्वाक नेमके कोण होते?



जगदीश काबरे

नास्तिक दर्शन



इतिहासाच्या संदर्भात पाहिले तर चार्वाक कोण होते, हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे. कारण लोकायताच्या मूळ ग्रंथांचा मोठा भाग हरवलेला आहे. पण हिंदू, बौद्ध, जैन ग्रंथांतून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे चार्वाक अथवा लोकायत प्रवाहाचा आरंभ इ.स.पू. आठव्या शतकात झाला, असे मानले जाते. कुमारिल भट्ट, शंकराचार्य, धर्मकीर्ति, नागार्जुन यांसारख्या तत्त्वज्ञांनी आपल्या ग्रंथांमध्ये लोकायत विचारांना प्रभावशून्य करण्याकरिता स्वतंत्र अध्याय लिहिले आहेत. यावरून लोकायत हे तत्त्वज्ञान त्या काळात प्रभावी होते, हा निष्कर्ष निघतो. बाराव्या-तेराव्या शतकानंतर लोकायत परंपरा जवळजवळ अदृश्य झाली; तरी...

**भा**रतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात चार्वाक किंवा लोकायत ही विचारसरणी एक अत्यंत महत्त्वाचा परंतु तितकाच वादग्रस्त टप्पा आहे. वेद, उपनिषदे, ब्राह्मणग्रंथ, स्मृतिग्रंथ या प्रवाहांमध्ये देव, आत्मा, पुनर्जन्म, स्वर्ग, मोक्ष यांसारख्या अभौतिक संकल्पनांना स्थान देण्यात आले होते. पण या पारंपरिक धार्मिक मान्यतांना संपूर्णपणे नाकारणाऱ्या, प्रत्यक्ष जगण्यावर आधारित असणाऱ्या ज्या तत्त्वज्ञानाने उघड आव्हान दिले, ती विचारसरणी म्हणजे, लोकायत किंवा चार्वाक.

भारतीय ज्ञानपरंपरेतील हा नकारात्मक वा प्रतिपक्ष मानला जाणारा, पण प्रत्यक्षात अत्यंत प्रगत, प्रयोगशील आणि अनुभवप्रधान असा प्रवाह ज्या काळात उदयास आला, तो काळ भारतीय समाज आणि राज्यव्यवस्थेच्या संक्रमणाचा होता. वैदिक धार्मिक विधी, यज्ञकर्मे, ब्राह्मणसत्तेचे वर्चस्व, जातव्यवस्था, वेदाधारित अर्थशास्त्रीय-राजकीय व्यवस्था, यामुळे सामाजिक विषमता आणि अंधश्रद्धा वाढत असताना लोकायतिक तत्त्वज्ञांनी प्रतिपादन केले, की ज्ञान हे प्रत्यक्ष अनुभवावर आधारित असले पाहिजे; इंद्रियांना जे जाणवते तेच सत्य; जगण्याचा मूळ उद्देश सुख प्राप्त करणे; आणि मृत्यूनंतर काहीही उरत नाही. या विचारांनी वैदिक धर्माला, ब्राह्मणधर्माला, तसेच शोषणात्मक धार्मिक सत्तेला थेट आव्हान दिले. त्यामुळेच चार्वाकांचा उदय, त्यांची बदनामी, त्यांना अनितिमान ठरवणाऱ्या स्वरूपातील वर्णने, तसेच त्यांचा हळूहळू होणारा ऱ्हास ही सर्व प्रक्रिया सामाजिक-राजकीय प्रक्रियांशी घट्ट जोडलेली आहे.

**वैदिक धर्माच्या एकाधिकारशाहीला आव्हान**

असे असले तरीही भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात चार्वाक किंवा लोकायत ही विचारसरणी एक आगळी-वेगळी, तरीही दीर्घकाळ दडपलेली आणि निंदित झालेली धारणा म्हणून दिसते. वेद, ब्राह्मण, उपनिषद, स्मृती आणि नंतरचे बौद्ध-जैन, तसेच वेदांत, सांख्य, न्याय इत्यादी सर्वच तत्त्वपंथांनी आपले विचार ठसवण्यासाठी चार्वाकीय सूत्रांचा पूर्वपक्ष म्हणून उल्लेख केला. पण चार्वाकांचे स्वतःचे ग्रंथ केवळ तुकड्यांमध्ये शिल्लक राहिल्याने त्यांची नेमकी कालरेखा निश्चित करणे अवघड बनले. तरीही भारतीय सामाजिक-धार्मिक परिवर्तनाच्या विश्लेषणातून चार्वाकांचा उदय बौद्ध-जैन प्रवाहांपूर्वीच झाल्याचे पुरेसे संकेत मिळतात. कारण, त्यांच्या उदयाचे बीज सामाजिक संघर्षात, यज्ञसंस्थेवरील टीकेत, आर्थिक बदलांमध्ये आणि वैदिक धर्माच्या एकाधिकारशाहीवर उमटणाऱ्या प्रश्नांमध्ये खोलवर रोवलेले होते. चार्वाकांचा प्रादुर्भाव हा केवळ काही व्यक्तींचा नव्हता, तर तो भारतीय लोकजीवनातील मुक्त विचार, संशयवाद आणि यथार्थवादाच्या जनप्रवाहाचे वैचारिक औपचारिकीकरण होता. म्हणूनच इतिहासाच्या दृष्टीने चार्वाक परंपरेला समजण्यासाठी आपल्याला वैदिक समाजाची आर्थिक रचना, यज्ञसंस्थेची वाढ, ब्राह्मणांचे वर्चस्व आणि त्या पार्श्वभूमीवर उदयाला आलेल्या विविध देववाद-विरोधी प्रवाहांचा मागोवा घ्यावा लागतो.

वैदिक संस्कृतीच्या आरंभीच्या टप्प्यात समाजात कृषी व्यवस्थेचा प्रसार, जमिनीचे मालकीसंबंध, गायींचे धर्म-मूल्य आणि यज्ञसंस्थेचे सामाजिक महत्त्व हे मुद्दे ठळक दिसतात. यज्ञ धार्मिक क्रिया असल्या तरी त्यांचा सामाजिक परिणाम व्यापक होता. यज्ञांच्या माध्यमातून ब्राह्मणांनी अधिकार, जमीनदान, धनसंपत्ती, सामाजिक प्रतिष्ठा आणि राजसत्ता यांच्यावर प्रभाव वाढवला. अशा परिस्थितीत ज्यांना या संस्कृतीचे फायदे कमी मिळत होते वा नव्हतेच ते शेतकरी, वस्तू उत्पादक, गावजीवनावर अवलंबून असलेले समुदाय तसेच श्रमजीवी वर्ग यांच्यातून हळूहळू कर्मकांडाला विरोध करणारी विचारधारा तयार होत होती. हा विरोध अकस्मात नव्हता; ऋग्वेदातही काही सूक्तांमध्ये यज्ञातील अतिरेकीपणावर टीका केली आहे. 'नासदीय सूक्त' तर विश्वाच्या उत्पत्तीबद्दल आणि अस्तित्वाच्या रहस्याबद्दल प्रश्न विचारते. या सूक्तांतील संशयवाद आणि विचारमुक्ती हीच चार्वाकांच्या भावी उदयाची मानसिक जमीन होती. त्यामुळे प्राचीन काळातच देववादाच्या पलीकडे जाणारा एक 'लोकमतवादी यथार्थवाद' अस्तित्वात होता, ज्याची स्पष्ट अभिव्यक्ती नंतर चार्वाकांच्या रूपाने झाली.

**ब्राह्मणी कल्पनांवर हल्ला**

ब्राह्मणग्रंथांमध्ये 'यज्ञ न केल्यास पाप', 'स्वर्गाची प्राप्ती यज्ञानेच' आणि 'देवांच्या संतुष्टीसाठी आहुती देणे' यासारखी तत्त्वे प्रत्यक्षात सामाजिक-आर्थिक नियंत्रणाची साधने म्हणूनही वापरली जात होती. यज्ञसंस्थेत आवश्यक साहित्य, प्राणी, धान्य, सोनं, पैसा, कर्मकांड यामुळे सामान्य लोकांच्या श्रमावर भार वाढत असे. अशा वेळी एखादी विचारसरणी 'देव नाहीत', 'यज्ञ फोल आहेत', 'भोग हाच जीवनाचा ध्येय', 'प्रत्यक्ष अनुभूती ज्यात आहे तेच सत्य' असे सांगत असेल, तर ती

केवळ तात्त्विक उलथापालथ नसून सामाजिक बंडखोरीही ठरत होती. चार्वाकांचे मूलभूत विधान 'प्रत्यक्षप्रमाण एकमेव' आणि 'अनुमान व शास्त्रोक्त कल्पना अवैज्ञानिक' हा त्या काळातील ब्राह्मणी कल्पनांवर स्पष्टपणे हल्ला होता. त्यामुळे ब्राह्मण ग्रंथांनी चार्वाकांना 'अनितिमान', 'पाखंडी', 'निंदक' असे संबोधले. रामायणात चार्वाकांचा उल्लेख रावणाच्या अंत्यसंस्काराच्या प्रसंगी दिसतो; तेथे चार्वाकाला ब्राह्मणांचे वेषांतर करून रामाला दोष देणारा 'नास्तिक' म्हणून दाखवले आहे आणि शेवटी तो लोकांच्या कोपाने नष्ट होतो. महाभारतातही चार्वाकाला भीमाने मारताना दाखवले आहे आणि तो व्यासांनी 'नास्तिक, देववादविरोधी' असे म्हटले आहे. ही वर्णने या महाकाव्यातली असली तरी त्यातून चार्वाक विवेचनाचा समाजातील प्रभाव आणि त्यांच्या विचारांना असणारा विरोध प्रकट होतो. म्हणजे रामायण-महाभारताचे अंतिम संपादन ज्या काळात झाले (इ.स.पू. ४थे ते १ले शतक) त्या आधीच चार्वाक व्यापक स्वरूपात ओळखले जात होते.

इतिहासकारांच्या दृष्टीने चार्वाकांच्या उदयाचा काल बौद्ध व जैन धर्मांपूर्वीचा मानण्यास अनेक दखलपात्र कारणे आहेत. बौद्ध-जैन धर्म इ.स.पू. ६व्या शतकात उदयास आले; परंतु त्यांच्या ग्रंथांमध्ये 'अजीविक', 'निगण्ठ', 'अक्षपाद', 'देहवादी' अशा विविध नास्तिक प्रवाहांचा उल्लेख आहे. यांत 'देहवाद' हा स्पष्टपणे भौतिकवादी होता आणि त्यांची तर्कपद्धती चार्वाकांच्या अत्यंत जवळ जाणारी होती. अशा प्रवाहांचा उल्लेख स्वतः बुद्धाच्या काळात होण्याचा अर्थ हा की भौतिकवादी तत्त्वधारा बुद्धापूर्वीच बराच काळ अस्तित्वात होती. शिवाय काही उपनिषदांत 'लोकेयत' हा शब्द दिसतो, ज्यावरून लोकायताचे बीज उपनिषदकाळातच (इ.स.पू. ८ वे-७ वे शतक) रोवले गेले होते हे लक्षात येते. जरी उपनिषदांचा प्रमुख जोर अध्यात्माकडे असला, तरी त्यांनी कर्मकांडाला विरोध करताना जो तात्त्विक वादविवाद उभा केला, त्यातून चार्वाकांना विरोध करणे आवश्यक झाले. यावरून चार्वाक प्रवाह उपनिषद निर्मात्यांना देखील परिचित होता हे स्पष्ट होते.

प्रश्न असा की, बौद्ध आणि जैनांच्या आधीच नास्तिक भौतिकवादी विचार अस्तित्वात असूनही चार्वाकीय परंपरा सामाजिक पातळीवर प्रमुख प्रवाह का बनू शकली नाही? याचे कारण सामाजिक रचनेत दडलेले होते. वैदिक ब्राह्मणी समाजरचनेत धर्माच्या विरोधातील प्रवाहांना सहसा ग्रंथसंपदा निर्माण करता येत नसे; ब्राह्मण्यांच्या नियंत्रणाखालील शिक्षण, गुरुकुल, ग्रंथनिर्मिती ही प्रणाली नास्तिकांपासून दूर होती. त्यामुळे चार्वाकांनी तत्त्वज्ञान निर्मिले तरी त्यांच्या ग्रंथांचे संरक्षण झाले नाही. बहुतेक चार्वाक ग्रंथ जाळले गेले किंवा अप्रचलित झाले. आज उपलब्ध असलेले तुकडे जसे की 'तत्त्वोपप्लवसिंह' किंवा जयंत भट्ट, माधवाचार्य, शंकर, कुमारिल, उद्योतकर, जैन आचार्यांची उद्धरणे यांतूनच चार्वाकांचा चेहरा ओळखता येतो. त्यांची स्वतःची 'ब्राह्मण-लिखित' परंपरा नसल्याने इतिहासातील त्यांची उंची दडपली गेली.

### अतिशयोक्त धर्मकथांना नकार

इतिहासाच्या संदर्भात पाहिले तर चार्वाक कोण होते, हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे. कारण लोकायताच्या मूळ ग्रंथांचा मोठा भाग हरवलेला आहे. पण हिंदू, बौद्ध, जैन ग्रंथांतून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे चार्वाक अथवा लोकायत प्रवाहाचा आरंभ इ.स.पू. आठव्या शतकात झाला, असे मानले जाते. कुमारिल भट्ट, शंकराचार्य, धर्मकीर्ति, नागार्जुन यांसारख्या तत्त्वज्ञांनी आपल्या ग्रंथांमध्ये लोकायत विचारांना प्रभावशून्य करण्याकरिता स्वतंत्र अध्याय लिहिले आहेत. यावरून लोकायत हे तत्त्वज्ञान त्या काळात प्रभावी होते, हा निष्कर्ष निघतो. बाराव्या-तेराव्या शतकानंतर लोकायत परंपरा जवळजवळ अदृश्य झाली; तरी त्यांच्या विचारांचा धागा पुढे भर्तृहरी, चक्रधर, कबीर, तुकाराम, नानक, भक्तिकवी, मुक्ताई, ज्ञानदेव, जोतीबा फुले, शाहू महाराज, आंबेडकर अशा विचारवंतांपर्यंत सामाजिक बंडखोरीच्या स्वरूपात पोहोचला.

चार्वाकांना 'यज्ञविरोधी' म्हटले जाते ते योग्यच होते. कारण यज्ञसंस्था ही केवळ धार्मिक नव्हे, तर आर्थिक-राजकीय व्यवस्था होती. राजे यज्ञाद्वारे आपली सत्ता 'धर्मयुक्त' ठरवत; ब्राह्मण यज्ञाद्वारे धनसंपत्ती प्राप्त करत आणि सामान्य जनता या सर्वासाठी श्रम पुरवत असे. चार्वाकांनी प्रत्यक्ष अनुभवावर आधारित जीवनदृष्टी स्वीकारली आणि अतिशयोक्त धर्मकथांना नकार दिला. 'यावत् जीवेत् सुखं जीवेत्; नास्ति मृत्यू अगोचरः' ही त्यांची धारणा म्हणजे भोगवादी, अनैतिक समाजनिर्मिती नव्हे तर 'देवभय आणि कर्मकांडामुळे माणसाचे जीवन जखडले गेले आहे' यावरील तीव्र प्रतिक्रिया होती. 'परलोक नाही, स्वर्ग-नरक नाही, म्हणून यज्ञाला अर्थ नाही' हे



*वैदिक धर्मात असलेल्या यज्ञादी कर्मकांडामुळे उत्पादक वर्गाचे होणारे शोषण ओळखून कर्मकांडांचा नीतिमूल्यांशी नसलेला संबंध चार्वाकांनी उघड केला होता...*

त्यांचे विधान ब्राह्मणांसाठी धोक्याची घंटा होती. म्हणूनच चार्वाकांच्यावर समाजात अपकीर्ती लादली गेली. त्यामुळे चार्वाकांना त्रास सहन करावा लागला. कारण त्यांची वैचारिक भूमिका सामर्थ्यवान धार्मिक वर्गांच्या आर्थिक हितांवर थेट वार करत होती.

चार्वाक विचारसरणीचा कालक्रम बघितला तर, तिची पायाभूत तत्त्वे उपनिषदपूर्व काळात जन्माला आली; उपनिषद काळात तिच्या विरोधी चर्चा करून राळ उठवली गेली. न्याय, सांख्य, मीमांसा, वेदांत या सर्व दर्शनांनी या विचारधारेच्या विरोधात प्रचार केला. बुद्ध-निगण्ठांच्या काळात ती लोकांमध्ये परिचित विचारधारा होती. इ.स. १२व्या-१३व्या शतकापर्यंत चार्वाकांचा अशा प्रकारे नकारात्मक उल्लेख सतत होत राहिला. माधवाचार्याने 'सर्वदर्शनसंग्रह'मध्ये चार्वाक विचारांवर प्रतिवाद करण्यासाठी एक स्वतंत्र प्रकरण समाविष्ट केले, म्हणजे मध्ययुगातही चार्वाक पंथ अस्तित्वात होता. यावरून चार्वाक परंपरा सुमारे दोन हजार वर्षे भारतात जिवंत होती. मात्र प्रसार मर्यादित होता, कारण त्यांच्याकडे संन्यासी परंपरा, आश्रम व्यवस्था आणि संघटना नव्हती.

**वैज्ञानिक मानसिकतेचे जनक**

चार्वाकांनी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला, अनुभवप्रधानता मान्य केली, अंतर्ज्ञान किंवा ऋषी-वाक्यांना प्रमाण मानले नाही. थोडक्यात, शब्दप्रामाण्य आणि ग्रंथप्रामाण्य नाकारले. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने त्यांचे तत्त्वज्ञान अपूर्ण असू शकते, पण त्यांनी 'अनुभव', 'प्रत्यक्ष', 'तर्क', 'इंद्रियज्ञान' यांना जे महत्त्व दिले, ते त्यांच्या काळासाठी क्रांतिकारी होते. त्यामुळे त्यांना भारतीय 'वैज्ञानिक मानसिकतेचे जनक' म्हणता येईल. या विचारसरणीला समाजात प्रचंड विरोध झाला, कारण त्यात देव, स्वर्ग, कर्म, पूर्वजन्म, पुनर्जन्म इत्यादी कल्पनांना नकार होता. अर्थातच देव आणि दैववादी असणाऱ्या समाजाला चार्वाकांच्या नास्तिकतेने धक्का बसणं अपरिहार्य होतं. ब्राह्मण, क्षत्रिय सत्ता, यज्ञाधिष्ठित अर्थव्यवस्था आणि अधिभौतिक नैतिकता यांना चार्वाकांनी दिलेले तर्काधारित आव्हान दीपस्तंभासारखे निर्णायक होते. म्हणूनच त्यांना समाजात दडपण, निंदा आणि अनितिमान म्हणत छळवणुकीला समोरे जावे लागले. लौकिक जीवनावर आधारित त्यांची तत्वज्ञान प्रणाली अधर्म, भोगप्रधानता, आधुनिक समाजविघातकता असे ठपके लावून बदनाम करण्यात आली.

बौद्ध आणि जैन तत्त्वज्ञानाच्या उदयापूर्वीही चार्वाक विचार अस्तित्वात होता, हे आपण मागे पाहिलेच आहे. बौद्ध-जैनांनी कर्मकांडाला विरोध केला, पण देवाच्या अस्तित्वाला पूर्ण नकार दिला नाही; त्यांच्या परंपरेत नैतिकता, अहिंसा, संघ, शील, ध्यान या धार्मिक चौकटी होत्या. पण चार्वाकांनी धर्माच्या मूळ आधारावरच प्रश्न उभा केला होता, 'जे अनुभवात नाही, ते अस्तित्वात नाही.' त्यामुळे चार्वाक विचार अतिशय मूलभूत आणि बौद्ध-जैनांच्या तत्त्वज्ञानालाही विरोध करणारा होता. तत्त्वशास्त्रातील पुरावे, बौद्ध ग्रंथातील नास्तिकांच्या उल्लेख, उपनिषदांतील संकेत, आणि महाभारत-रामायणातील प्रतिमा हे सर्व चार्वाकांच्या पूर्वकालीन अस्तित्वाचे प्रमाण आहे.

अखेर, चार्वाकांना का त्रास सहन करावा लागला? कारण कोणतीही सत्ता 'प्रत्यक्ष, तर्क, अनुभव' या तत्त्वांवर आधारित कार्यरत असणाऱ्या बंडखोरांना सहजपणे मान-मान्यता देत नाही. धर्मकारण, राजकारण आणि सामाजिक वर्चस्व जिथे मजबूत असते, तिथे नास्तिकांच्या आवाजाला धोका असतो. चार्वाकांचे तत्त्वज्ञान लोकजीवनाशी अतिशय जवळचे होते, म्हणून विद्यमान व्यवस्था त्यांना अधिकच धोकादायक मानत होती. म्हणून धर्मांधांनी त्यांचे ग्रंथ जाळले. अनेक शतकांमध्ये धार्मिक संस्थांनी त्यांच्यावर मानसिक, वैचारिक आणि कधीकधी शारीरिक दडपशाही केली.

या सर्व विवेचनाचा सारांश असा की, चार्वाकांचा उदय बौद्ध-जैन धर्मांपूर्वीच झालेला असून, ती भारतीय समाजातील

यज्ञाधारित धार्मिक वर्चस्वाला आव्हान देणारी सर्वात जुनी तर्कप्रधान विचारधारा होती. त्यांच्या विचारांनी सामाजिक बंधने, धार्मिक अधिकार, देववाद, कर्मकांड यांना तर्काधारित प्रश्न विचारले. पण भारतीय इतिहासात विजयी ठरले, ते धार्मिक संघटनांचे प्रवाह. चार्वाकांचा पराभव झाला, कारण ते संघटित नव्हते आणि त्यांच्याकडे ग्रंथरक्षणाची संस्थाही नव्हती. तरीही त्यांच्या विचारांचा प्रभाव भारतीय तत्त्वज्ञानावर आणि आधुनिक वैज्ञानिक दृष्टीसंपन्न विचारांवर कायमस्वरूपी राहिला.

**वैज्ञानिक आणि संघर्षशील**

चार्वाक विचारांचा मोठा फायदा असा, की त्यांनी प्राचीन समाजात वैज्ञानिक, प्रायोगिक, भौतिकवादी, धर्मनिरपेक्ष विचारांची बीजे पेरली. त्यांनी लोकांना सांगितले की सत्य हे प्रत्यक्ष अनुभवातून शोधा; अंधश्रद्धेला भिऊ नका; देवाची भीती बाळगू नका; ज्ञानाला पुरावा असला पाहिजे; काळ, दिशा, स्वर्ग, मोक्ष, नरक या कल्पित संरचना आहेत. मनुष्य एकदाच जन्मतो; म्हणून माणूसकेंद्रित समाज उभारणे हेच सर्वात मोठे मूल्य आहे. हा विचार जरी त्या काळी हरला तरी इतिहासाने त्याला पुन्हा उचलून घेतले... आजच्या वैज्ञानिक दृष्टिकोनात, मानवाधिकारांच्या संकल्पनेत, मानवी स्वातंत्र्यात, प्रगतिशील विचारांत चार्वाकांचे बीज दडलेले आहे.

चार्वाकांचे तत्त्वज्ञान आजही समाजाला सांगते की अंधश्रद्धेच्या वा देवाच्या भीतीद्वारे चालणारा धर्म हा खरा धर्मच नव्हे; तर बौद्धिक स्वातंत्र्य, प्रत्यक्ष ज्ञान, मानवी स्वातंत्र्य, वैज्ञानिक तर्क हीच खरी मानवी मूल्य आहेत. लोकायताचा उदय काही शतकांपूर्वीच्या प्राचीन काळातला असला तरी त्याची गरज आजही तितकीच प्रखर आहे. जिथे प्रश्न विचारणे पाप मानले जाते, जिथे अंधश्रद्धा वाढते, जिथे देव आणि धर्माच्या नावाने भीती निर्माण केली जाते, जिथे प्रत्यक्ष अनुभवावर आधारित विज्ञानाला नाकारले जाते, तिथे चार्वाक विचारसरणी गरजेचीच नव्हे तर अनिवार्य ठरते. म्हणूनच चार्वाकांचा इतिहास हा केवळ भूतकाळ नव्हे तर वर्तमानकाळातही चालू असलेला संघर्ष आहे. तर्क विरुद्ध श्रद्धा, अनुभव विरुद्ध अंधविश्वास, सत्य विरुद्ध मृगजळ, आणि मानवी स्वातंत्र्य विरुद्ध धार्मिक बंधन, असे त्याचे स्वरूप आहे.

**यापुढील प्रत्येक लेखात आपण चार्वाकांविषयीची विशेष माहिती जाणून चार्वाक दर्शनाचा उलगडा करणार आहोत.**

**जगदीश काबरे हे समाजचिंतक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत. संपर्क :** ९९२०१९७६८०
**ई मेल :** jetjagdish@gmail.com



# आडवळणाचा संशोधक


सायली परांजपे





**यां**च्याच शब्दांत सांगायचं, तर त्यांच्या आयुष्यात विज्ञान सरळ वाटेने आलंच नाही, वळणावळणांची वाटच त्यांना विज्ञानाच्या प्रवासाला घेऊन गेली. अर्थात वळणावळणांच्या वाटेने सुरू झालेला हा प्रवास त्यांना नोबेल पुरस्कारापर्यंत घेऊन गेला. कर्करोगाला कारणीभूत ठरणाऱ्या कर्कजनुक–ऑंकोजीन्सबाबतच्या संशोधनासाठी नोबेल प्राप्त करणाऱ्या जे. मायकल बिशप यांनी 'हाऊ टू विन द नोबेल प्राइझ: ॲन अनएक्स्पेक्टेड लाइफ इन सायन्स' या त्यांच्या पुस्तकातच या वळणवाटांचीच गोष्ट सांगितली आहे. गोष्टीतल्या या नायकावर लॅन्सेट नियतकालिकात फेथ मॅकलेलन यांनी स्मरणलेख लिहिला. त्या लेखाचे हे भाववृत्त...

कर्कविज्ञानात डोंगराएवढे योगदान नोंदवणाऱ्या जे. मायकल बिशप यांचा नव्वद वर्षांचा जीवनप्रवास (२० मार्च, २०२६) सॅन फ्रान्सिस्को इथे न्युमोनियाचं निमित्त होऊन संपला, तेव्हा त्यांच्या आयुष्यातल्या या प्रवासाच्या स्मृतींना उजाळा मिळाला.

हा प्रवास सुरू झाला होता, २२ फेब्रुवारी १९३६ रोजी. बिशप यांचे वडील ल्युथरन मिनिस्टर (प्रोटेस्टण्ट पंथाचे धर्मगुरू) होते. आपल्या बालपणीच्या आयुष्याचं वर्णन त्यांनी 'पॅस्टोरल' असं केलं आहे. लहानपणी त्यांना निसर्गाबद्दल अपार कुतूहल होतं आणि संगीताची विलक्षण आवड होती.

बिशप यांनी १९५७ मध्ये गेट्सीबर्ग कॉलेजमधून पदवी घेतली. वैद्यकीय शिक्षण हार्वर्ड मेडिकल स्कूलमधून १९६२ मध्ये पूर्ण केलं. तिथे एल्मर फेफरकॉर्न त्यांचे मार्गदर्शक होते. फेफरकॉर्न यांच्या मार्गदर्शनाखाली आपण संशोधनातली झिंग अनुभवली, काटेकोरपणाचा सराव केला आणि निराश होण्याची कलाही शिकलो, असं बिशप यांनी म्हटलं आहे. पुढे बोस्टनच्या मॅसॅच्युसेट्स जनरल हॉस्पिटलमध्ये त्यांनी इंटर्नशिप आणि रेसिडेन्सी पूर्ण केली. यूएस नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थचे (एनआयएच) फेलो म्हणून त्यांनी मायक्रोबायोलॉजीचे प्राध्यापक लिऑन लेव्हिन्टो यांच्या प्रयोगशाळेत काम केलं. लेव्हिन्टो यांच्याशी झालेली मैत्री पुढे आयुष्यभर टिकली. पोलिओचा विषाणू स्वत:च स्वत:ची पुनर्निर्मिती कशी करतो, याचा अभ्यास बिशप यांनी तिथेच केला.

**कलेच्या आवडीने संशोधन बहरले...**

१९६८ मध्ये लेव्हिन्टो यांनी सॅनफ्रान्सिस्कोच्या कॅलिफोर्निया विद्यापीठामध्ये बिशप यांची निवड केली. पुढे संपूर्ण कारकीर्द बिशप यांनी तिथेच आपलं योगदान नोंदवलं. त्यानंतर ते तिथे प्रोफेसर एमेरिटस आणि चॅन्सेलर एमेरिटसही झाले. हॅरोल्ड ई. व्हॅरमस हे पोस्ट डॉक्टरल फेलो बिशप यांच्या प्रयोगशाळेत रुजू झाल्यानंतर त्या दोघांनी मिळून रोउस सार्कोमा विषाणूचा अभ्यास सुरू केला.

एसआरसी हे त्या विषाणूचे रूपांतरणाच्या टप्प्यातील जनुक पहिल्या ऑंकोजीन्सपैकी (कर्करोगाला कारणीभूत ठरणारी जनुकं) एक समजले जाते. हे जनुक एका सामान्य पेशीमय जनुकापासून (प्रोटो-ऑंकोजीन) तयार होत असल्याचा शोध या दोघांनी लावला. रेट्रोव्हायरल ऑंकोजिन्सची निर्मिती शरीरातल्याच सामान्य जनुकांपासून होत असल्याचं या दोघांनी सिद्ध केलं. त्यामुळे कर्करोग हा पेशीमय जनुकांच्या नियमनातील बदलामुळे होणारा आजार असल्याचं स्पष्ट झालं. त्यातून पुढे अनेक प्रोटो-ऑंकोजीन्सचा शोध लावला गेला आणि कॅन्सरवरील लक्ष्यकेंद्री (टार्गेटेड) उपचारपद्धतींचा पाया घातला गेला. बिशप आणि व्हॅरमस या दोघांना १९८९ शरीरशास्त्र व वैद्यक विभागातला नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला, तो याच संशोधनासाठी.

सध्या न्यूयॉर्कमधल्या लेवीस थॉमस युनिव्हर्सिटीत वैद्यकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम करत असलेले व्हॅरमस सांगतात, ''माइक आणि मी प्रयोगशाळेतल्या कामाकडे तुलनेने उशिराच वळलो. एम.डी. पूर्ण केल्यानंतर आम्ही शिक्षणाचा भाग म्हणून निवासी डॉक्टर म्हणून काम केलं, व्हिएतनाम युद्धाच्या काळात एनआयएचमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम केलं. मॉलिक्युलर बायोलॉजी आणि व्हायरोलॉजी या विषयांतल्या बलस्थानांचा वापर मानवी आजार समजून घेण्यासाठी करण्याचं शिक्षण आम्हाला यातूनच मिळालं. खरं तर आम्ही दोघंही कलेवर प्रेम करणारे होतो. माइकला घरातूनच धार्मिक संगीताचं बाळकडू मिळालेलं होतं, तर मी इंग्रजी साहित्याचं शिक्षण घेतलेलं होतं. विज्ञानाचे रोमांचक प्रयोग एकमेकांच्या साक्षीने करण्यासाठी मला वाटतं, या कलेच्या पार्श्वभूमीची आम्हाला खूप मदत झाली. त्यामुळेच आमची गाढ मैत्री झाली आणि ती टिकूनही राहिली.''

**पुनरुज्जीवनवादी दृष्टिकोनास विनोदाची झालर**

बिशप आणि व्हॅरमस यांच्या प्रयोगशाळेतल्या माजी पोस्टडॉक्टरल फेलो डेबोरा ए. स्पेक्टर सध्या सॅन दिएगोच्या युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामधील स्कूल ऑफ मेडिसिनमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्या म्हणाल्या, ''माइक यांची मानसिकता खऱ्या अर्थाने रेनेसाँ अर्थात पुनरुज्जीवनाची होती. विलक्षण बुद्धिमत्ता आणि अनेक गोष्टींत कुतूहल असूनही ते अत्यंत नम्र होते. संशोधनासाठी लागणाऱ्या कठोर परिश्रमासाठी तरुण वैज्ञानिकांना तयार करतानाच त्यांच्या वाढीलाही ते प्रोत्साहन द्यायचे. जर कुणी संध्याकाळी सहाच्या आत निसटताना दिसलं, तर त्यांचं एक ठरलेलं वाक्य होतं– 'हे तुमचं करिअर आहे!' हे वाक्य मीही माझ्या प्रशिक्षणार्थींना उद्देशून वारंवार म्हटलं आहे, अजूनही म्हणते.''

अर्थात बिशप यांच्या झोकून देऊन काम करण्याच्या वृत्तीला विनोदबुद्धीची जोडही होती. त्याहून महत्त्वाचं म्हणजे,



*कर्करोग हा पेशीमय जनुकांच्या नियमनातील अचानक होणाऱ्या बदलांचा दुष्परिणाम असल्याचे बिशप यांनी सप्रमाण सिद्ध केले, त्यातूनच पुढे लक्ष्यकेंद्री उपचारपद्धतीचा पाया रचला गेला...*

कामाकडे आणि विज्ञानाकडे बघण्याच्या वेगवेगळ्या दृष्टिकोनांबद्दल त्यांच्या मनात आदर होता. आणखी एक पोस्टडॉक्टरल प्रशिक्षणार्थी तसंच सध्या युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सॅन फ्रान्सिस्कोमध्ये (यूसीएसएफ) प्राध्यापक म्हणून काम करणारे आंद्रे गोगा सांगतात, ''माइक अनेक जबाबदाऱ्या पार पाडत होते, तरीही साप्ताहिक बैठकांना उपस्थित राहणं आणि प्राथमिक स्वरूपाच्या डेटाचं सादरीकरण बघणं यात त्यांना प्रचंड रस होता. ते आम्हाला स्वत:चे प्रकल्प विकसित करण्यासाठी प्रोत्साहन देत होते. त्यांना अनेक गोष्टीत रस होता आणि त्या करणाऱ्यांना त्यांचा अविरत पाठिंबा होता. कर्करोगाबाबतची अत्यंत वैविध्यपूर्ण संशोधनं आणि असंख्य प्रशिक्षणार्थी ही याचीच परिणती आहे.''

**विज्ञानातला दिग्गज**

यूसीएसएफमध्ये बिशप यांना मायक्रोबायोलॉजी अँड इम्युनोलॉजी विभागात पूर्णवेळ प्रोफेसर म्हणून पदोन्नती मिळाली आणि १९८१ साली ते जी. डब्ल्यू. हूपर फाउंडेशनचे संचालकही झाले. १९९८ मध्ये ते यूसीएसएफचे चॅन्सेलर झाले. २००९ सालापर्यंत त्यांनी हे पद सांभाळले. यूसीएसएफमधल्या अतुलनीय विकासाच्या कालखंडाचं नेतृत्व बिशप यांनी केल्याचं यूसीएसएफचे वर्तमान चॅन्सेलर सॅम हॉगुड आवर्जून सांगतात. यूसीएसएफचं वैशिष्ट्य समजल्या जाणाऱ्या कल्पनांच्या आदानप्रदानासाठी नवीन कॅम्पसचा विकास करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. विद्यापीठाला एकविसाव्या शतकाची आव्हानं पेलण्यास समर्थ करण्यासाठी बिशप यांनी खूप कष्ट घेतले. त्यावेळी अमेरिकेतला सर्वांत मोठा जैववैद्यकीय प्रकल्प ठरलेल्या त्यांच्या मिशन बे जैववैद्यकीय संकुलामुळे यूसीएसएफच्या निधीउभारणीत मोठी मदत झाली. जैवतंत्रज्ञान उद्योगासाठी तर हे आकर्षणाचं केंद्रच झालं. हॉगुड हे बिशप यांचं वर्णन विज्ञानातील 'दिग्गज' असं करतात.

लहानपणापासून वेगवेगळी वळणं घेत काहीसा उशिरा का होईना, संशोधनाच्या वाटेने सुरू झालेला बिशप यांच्या आयुष्याचा प्रवास अखेरीस वयाच्या नव्वदाव्या वर्षी संपला असला, तरी कर्करोगासारख्या गंभीर आजारामागची कारणं समजून घेण्यात आणि त्यावरच्या उपचारांच्या पद्धतींमध्ये बिशप यांच्या संशोधनाने घडवून आणलेल्या बदलांचा प्रवास पुढे चालूच राहील, असा विश्वास त्यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेल्या वैज्ञानिकांच्या पुढच्या पिढ्यांच्या रूपाने कायम राहणार आहे.

**लेखिका, अनुवादिका असलेल्या सायली परांजपे यांची 'राया' (अनुवादित), 'शहीद भगतसिंग', 'क्रांतिज्योती सावित्राबाई फुले', 'सम्राट अशोक', ही लघुचरित्रपर पुस्तके प्रकाशित आहेत. सायली या 'समतावादी मुक्त संवाद पत्रिके'च्या सल्लागार संपादक मंडळाच्या सदस्या आहेत.**
**संपर्क** : sayalee.paranjape@gmail.com

# आनंदकाका : माझं जिव्हाळघरटं



पार्थ एम.एन.

आनंदरंग




*आवाहन आयपीएच या व्हिडिओ पॉडकास्टवरून साभार*

**स्व**प्न आणि वास्तवाच्या मध्ये एक प्रदेश असतो. अस्थिरतेचा, अस्वस्थतेचा. धगीचा आणि उलथापालथीचा. स्वप्न भंगण्याच्या पायरीवर हा प्रदेश नजरेस पडू लागतो. स्वप्नांचा चुराडा झाला की, या प्रदेशातली धग एखाद्याला पोळून काढते. कोलमडून टाकते. पण त्याच मोक्याच्या टप्प्यावर मला आनंदकाका म्हणजेच डॉ. आनंद नाडकर्णी भेटले आणि जाणतेपणी क्रिकेटची इनिंग संपवून अर्थात क्रिकेटचं स्वप्न मागे टाकून पत्रकारितेच्या विश्वात मी आत्मविश्वासाने वावरू लागलो. आनंदकाका भेटला नसला तर मी आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचलो नसतोच, पण माझ्यातला आत्मकोशात राहणारा, चारचौघांत अवघडलेल्या स्थितीत वावरणारा मुलगा कुठे तरी हरवून, खुडून गेला असता…

**जे**मतेम १४ वर्षांचा असेन तेव्हा मी. आईसोबत (मीना कर्णिक) पहिल्यांदा 'इन्स्टिट्यूट फॉर सायकोलॉजिकल हेल्थ'(IPH) मध्ये गेलो. तेव्हा ती इमारत आजच्या तुलनेत साधीच होती. मला आठवतं, चिंताग्रस्त असलेला मी एका खोलीत शिरलो. एरवी, नवीन जागा दिसली की मी लगेच गप्प व्हायचो. स्वतःभोवती विणलेल्या कोशात शिरायचो. चारचौघांमध्ये अवघडलेल्या स्थितीत वावरायचो आणि कदाचित म्हणूनच आई मला ठाण्यापर्यंत घेऊन आली होती. माझ्या आईवडिलांना त्यांच्या कॉलेज जीवनापासून परिचित असलेल्या व्यक्तीकडेच मला नेण्यात सोयीस्कर वाटलं होतं.

पण, काही क्षणांतच माझ्या मनातली अस्वस्थता नाहीशी झाली. आता मी डॉ. आनंद नाडकर्णी म्हणजेच माझ्यासाठी आनंदकाका याच्या समोर बसलो होतो. त्याचं व्यक्तिमत्त्व विलक्षण आश्वासक होतं. उबदार हास्य, शांत करणारा स्वभाव आणि ''सगळं माझ्या हातात आहे, काळजी नसावी'' असं भासवणारी त्याची तिथली उपस्थिती दिलासादायक होती. किंबहुना, त्या भेटीने माझ्या आयुष्यातल्या मोजक्या म्हणता येईल, अशा एका जिव्हाळ्याच्या नात्याची सुरुवात झाली होती.

त्या क्षणांपासून मला माझ्या मनोवस्थेबद्दल जे काही थोडंफार उमजत गेलं, जाणवत गेलं, त्याला एकमेव कारण म्हणजे, आनंदकाका. कालांतराने तो माझा मार्गदर्शक, गुरू आणि वडिलांसमान होत गेला.

**मनाचिये गुंती**

त्या काळातलं म्हणजेच माझ्या शालेय वर्षांतलं माझं रिपोर्ट कार्ड हे एकप्रकारे माझ्या विचित्र स्वभावाची साक्ष देणारं असे. शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या पाच महिन्यांत शिक्षक शेरा मारायचे–शांत नि सद्वर्तनी मुलगा. पण दुसऱ्या सहामाहीत तेच शिक्षक म्हणायचे–भयानक त्रासदायक, गोंधळ घालून असह्य करून सोडणारा मुलगा.

अर्थात, जिथे मला जवळिकीची भावना देणारं वातावरण मिळायचं, तिथे मी मस्तपैकी खुलायचो. पण याची उलट बाजू अशी होती, जशी माझ्या वर्तुळाच्या बाहेरच्या लोकांमध्ये जाण्याची वेळ यायची, मी चिंतेचा गोळा होऊन जायचो. अगदी दोन महिन्यांपूर्वीच जिम कॉर्बेटला एका परिषदेसाठी म्हणून गेलो होतो. सोबत अनेक पत्रकार होते. त्यातल्या दोघा-तिघांना मी चांगला ओळखत होतो. पण उरलेल्यांना मी पहिल्यांदा फारतर दुसऱ्यांदाच भेटत होतो. दिवसभराची कामं आटोपल्यानंतर सगळा ग्रुप डिनरसाठी एकत्र येत होता. त्यात गप्पाटप्पा, गाणीबिणी असा छान वेळ जात होता.

ज्या प्रकारचा माहोल तिथे होता, ते पाहता मी शांतपणे स्वतःचं मनोरंजन करून घेत वेळ घालवला असता. पण प्रत्यक्षात काय घडलं, तर मी सगळ्यात जास्त गप्पा केल्या, कुणी गायिली नसतील एवढी गाणी धडाक्यात गायली. तिथे त्या क्षणी माझ्या संदर्भाने जे घडलं, ते पाहता एकेकाळी सोशली ऑकवर्ड मुलगा म्हणून मी ओळखला जात होतो, यावर कोणाचा विश्वास बसला नसता. माझ्यात हा बदल दोन शब्दांमुळे घडला. ते शब्द म्हणजे– आनंदकाका.

**वास्तवातली जमीन गवसली**

१४ व्या वर्षी मी पहिल्यांदा आनंदकाकाला भेटलो, तेव्हा क्रिकेटपटू होण्याचं स्वप्न पाहत होतो. शाळेच्या संघात खेळत होतो, मुंबईसाठी आणि मग भारतासाठी खेळण्याचीही आकांक्षा बाळगून होतो. कसंही करून मला हे उद्दिष्ट गाठायचंच होतं. स्वप्न पूर्ण करायचंच होतं. पण त्याच वेळी आपण जे साध्य करायचं ठरवलंय, ते तसं घडलं नाही, तर? ही भीती मला काही क्षणांपुरतं का होईना, पंगू बनवत होती. कधीमधी मी स्वतःलाच खूप ताण देऊ लागलो होतो.

वस्तुस्थिती ही होती, की मुंबईच्या पातळीवर खेळणारा मी एक बरा क्रिकेटपटू होतो, परंतु त्या पलीकडे जाऊन वरच्या पातळीवरचं क्रिकेट खेळण्याइतपत चांगला नव्हतो. म्हणून मुंबईपलीकडे काही माझी झेप जात नव्हती. याच वास्तवामुळे वयाच्या एकविसाव्या वर्षी मी क्रिकेटपटू होण्याच्या स्वप्नांवर काट मारली आणि पत्रकार होण्याचं नवीन स्वप्न पाहिलं.

हा बदल सहज झाला, तो आनंदकाकामुळे. तो सोबत नसता, तर हे सारंच अशक्य होतं. खरं तर वयाच्या सहा वर्षांपासून आपण क्रिकेटर होणार, हेच माझ्या डोक्यात फिट्ट होतं. क्रिकेट माझं सर्वस्व बनलं होतं. पण, १५ वर्षांनी ते स्वप्न भंगलं. या स्वप्नभंगामुळे मनात कटुता निर्माण होऊ शकली असती किंवा नैराश्याने मी ग्रासलो असतो. पण उलट मी नवीन आव्हानं स्वीकारायला तयार होतो. नव्हे, नवीन आव्हान मी अगदी उत्साहानं स्वीकारलं होतं. याचं कारण पुन्हा, आनंदकाकासोबत पार पडलेल्या समुपदेशन सत्रांनी (काउंन्सिलिंग सेशन्स) मला अपयश पचवायला शिकवलं, हे होतं.




*समाजाचे आरोग्य सुस्थितीत राखण्यासाठी व्यक्तीचे मानसिक आरोग्य जपणे महत्त्वाचे असते, याची पुरेपूर जाण असलेल्या डॉ. आनंद नाडकर्णींनी घर आणि संस्था असा भेद न करता प्रत्येकाच्या आयुष्याला स्पर्श केला. जगण्याचे ठोस निमित्त पुरवले...*

*एव्हरीवनगुडॲटसमथिंग डॉट कॉमवरून साभार*

मी अर्थातच उत्तम क्रिकेटर नव्हतो. आमची बरीच समुपदेशन सत्रं मी सामन्यात वाईट कामगिरी केल्यानंतर पार पडली होती. वस्तुतः आनंदकाका हा क्रिकेट प्रशिक्षक नव्हता, त्यामुळे तो काही मला चांगला खेळाडू बनवणार नव्हता. पण त्या वेळी त्याने काय केलं, तर मला अपयशावर हसायला आणि स्वतःच्या उणिवा स्वीकारायला शिकवलं. किंबहुना, अपयश पचवता येतं, ही धारणा मनात रुजली की माणूस अभेद्य होतो, याची त्या क्षणांमध्ये आनंदकाकाने मला जाणीव करून दिली. नव्हे, त्याने मला एक प्रकारे सुरक्षा कवच पुरवलं. त्याने पुरवलेल्या या सुरक्षा कवचामुळेच मी असुरक्षिततेनं ग्रासलेला मुलगा बनलो नाही.

**आश्वासक संवादस्पर्श**

खरोखरच आनंदकाका मानसिक आरोग्याच्या क्षेत्रात अग्रणी होता. त्याने इन्स्टिट्यूट फॉर सायकोलॉजिकल हेल्थ या संस्थेची स्थापन केली. कुणी फारसं महत्त्व देत नसताना, मानसिक आरोग्याविषयी अविरतपणे जनजागृती केली. आजही सुशिक्षितांमध्ये मानसिक आरोग्य हा विषय निषिद्ध मानला जातो. व्यक्तीचे मानसिक आजार लपवण्याकडे अनेकांचा कल असतो. पण व्यक्तीचं आरोग्य हे समाजाचं आरोग्य ठरवत असतं, हे ओळखून आनंद काकाने हे काम ४० वर्षांपूर्वी सुरू केलं ते कालपर्यंत, म्हणजे, अखेरच्या श्वासापर्यंत तो त्या कामात गढलेला राहिला. या सगळ्यात, माझ्या आयुष्याच्या संदर्भाने माझ्या आईवडिलांनी अनेक चांगले निर्णय घेतले, त्यातला एक म्हणजे, त्यांनी माझा आनंदकाकाशी परिचय करून दिला. ही घटना घडली नसती, तर मी भलताच व्यक्ती झालो असतो.

कालांतराने मी पत्रकारितेत रमलो. त्यातही डेव्हलपमेंट जर्नालिझममध्ये मी स्वतःला गुंतवून घेतलं. महाराष्ट्रातल्या गावखेड्यांपासून युरोप-अमेरिकेतल्या शहरांपर्यंत प्रवास घडला. पत्रकारितेतल्या अनुभवांनी माझ्यात प्रगल्भता येऊ लागली. वैयक्तिक आयुष्यासोबतच व्यावसायिक आयुष्याच्या संबंधानेही माझ्यात आणि आनंदकाकामध्ये संवाद घडू लागला. या कालावधीत पत्रकार म्हणून जेव्हा जेव्हा पुरस्कार मिळाले, फेलोशिप मिळाली, तेव्हा सर्वात आधी मी आनंदकाकाला फोन करून कळवू लागलो.

ही आत्मस्तुती अजिबातच नाही. पण दहा वर्षांच्या आजवरच्या पत्रकारितेतल्या कारकीर्दीत मी अनेक आंतरराष्ट्रीय प्रकाशनांसोबत काम केलं, कामाची पावती म्हणून डझनभर पुरस्कारही मिळाले. हा माझा प्रवास क्रिकेटमधल्या अपयशाच्या तुलनेत एकदमच उलटा ठरला. या प्रवासात जे काही प्रयत्न मी केले, त्याचं फळ मला मिळत गेलं. पण जसं अपयशात भावनांचं संतुलन राखायला आनंदकाकाने शिकवलं, तसंच यशातही आत्मसंतुलन महत्त्वाचं असतं, याची शिकवण त्याने मला दिली. यातही मी कुठेतरी अडतोय, अडखळतोय, असं जेव्हा वाटलं, तेव्हा आनंदकाका एका फोनकॉलवर आपल्याला उपलब्ध आहे, हा विचार कायम मनाला दिलासा देत राहिला. त्याचं माझ्या आसपास असणंच खूप आश्वासक ठरत गेलं.

१५ मे रोजी माझ्या आयुष्यातली ती आश्वासक उपस्थिती कायमची हरपली. आपण पोरके झालोय, ही भावना तत्क्षणी मनात उसळून आली. भल्या सकाळी आनंदकाकाचा मुलगा कबीरचा फोन आला. माझ्या नजरेत कबीर हा एक गुणवान निहरहुन्नरी तरुण आहे. तो मला माझ्या धाकट्या भावासमान आहे.

पलीकडून फोनवरून कबीर म्हणाला, ''बाबा आज पहाटे गेले.''

मला वाटणारी भीती खरी ठरली. मी अक्षरशः स्तब्ध झालो. गोठून गेलो. तसंही, कुणाचं मरण पचवणं ही सगळ्यात अवघड गोष्ट असते. इथे तर जाणारा आनंदकाका होता. काही आठवड्यांपूर्वीच त्याच्या ऑपरेशनच्या आधी मी आनंदकाकाला भेटलो होतो. तो उत्साही दिसत होता. पुढे काय करायचंय, याच्या योजना त्यांच्या डोक्यात पक्क्या होत्या. पण प्रत्यक्षात तसं घडायचं नव्हतं...

ठाण्याला आनंदकाकाच्या अंत्यसंस्काराला गेलो. माझ्याप्रमाणेच तिथं जमलेला प्रत्येक जण आनंदकाकाच्या जाण्याने हादरून गेलेला मला दिसला. त्यानंतर दिवसभर कुतूहलाने सोशल मीडियावर आनंदकाकाला वाहिलेल्या श्रद्धांजली वाचत राहिलो. या श्रद्धांजलीपर प्रतिक्रियांना दुजोरा देणारं हलकंसं हसू चेहऱ्यावर नकळत उमटलं.

तुमच्या आयुष्यात आश्वासक जागा निर्माण करण्याची पात्रता आणि क्षमता असलेले फार कमी लोक असतात. आनंदकाका माझ्यासारख्या असंख्यांसाठी अशाच काही दुर्मीळ मौल्यवान व्यक्तींपैकी एक होता. इतक्या वर्षांच्या नात्यात मी त्याला कधी हे थेट सांगितलं नाही, पण मला खात्री आहे, की त्याला ते जाणवलं असणार. ठाऊक असणार.

चिरशांती लाभो, आनंदकाका तुला. तुझ्यासोबत माझ्यातला एक अंशही निघून गेला आहे...

**पार्थ एमएन, हे मुंबईस्थित स्वतंत्र पत्रकार आहेत. 'पीपल्स अर्काइव्ह ऑफ रुरल इंडिया' (पारी) तसेच 'वॉशिंग्टन पोस्ट', 'अल जझिरा', 'लॉस एन्जलिस टाइम्स' आदी भारतीय आणि परदेशी प्रकाशन संस्थांनी त्यांचे वृत्तलेख प्रकाशित केले आहेत. 'आएनजी एक्सलन्स इन जर्नालिझम', 'प्रेम भाटिया ॲवॉर्ड', 'युरोपीयन युनियनचा लॉरेन्सो नतालि मीडिया प्राइज' आदी मानाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.**

**संपर्क** : parth.mn13@gmail.com



# सी-१०, मुनिरका; केवळ पत्ता नव्हे...



आशय गुणे

बरसाती मजला






मुनिरका, नवी दिल्ली येथील दिल्ली डेव्हलपमेन्ट अथॉरिटी (DDA) च्या कॉलनीत जेव्हा राहायचे नक्की झाले, तेव्हा साहजिकच, घरी जेवण बनविण्यासाठी कुणाला बोलवायचे, आपले कपडे धुवून व इस्त्री करून कोण देईल, जवळ दुकानं कोणकोणती, तिथे काय मिळतं, असे काही प्राथमिक प्रश्न समोर उभे ठाकले. मात्र दिल्लीतील डीडीए कॉलनींची रचनाच अशी असते, की ज्यामुळे एकदा तुम्ही डीडीएत शिरलात की तुम्हाला बाहेरच्या जगावर फारसे अवलंबून राहावे लागत नाही. डीडीएच्या रचनेप्रमाणे, जिथे आतील इमारतींच्या समूहांना (clusters) इंग्लिश अक्षरांप्रमाणे नावं दिलेली असतात, माझ्या इमारत-समूहाला सी (C) हे अक्षर दिले होते. व त्यातील क्रमांक १० ची इमारत असल्यामुळे माझा पत्ता होता सी-१०, मुनिरका...

आमच्या इमारतीसमोर एक छोटेसे दुकान होते, जे बिहारहून दिल्लीला येऊन स्थायिक झालेले झा आडनावाचे कुटुंब चालवीत होते. दिल्लीतील पहिल्याच आठवड्यात, जेव्हा मी सकाळी ऑफिसला जाताना एक छोटासा बिस्किटचा पुडा घ्यायला गेलो, तेव्हा, मी एकही प्रश्न न विचारता, ते बिहारचे आहेत ही माहिती आणि मी सरकारी कार्यालयात कामाला आहे, ही त्यांची माझ्याबद्दलची धारणा या दोन्हींना एकाचवेळी सामोरे गेलो. माझ्या डोक्यात मेट्रो पकडून ऑफिसला वेळेत कसे पोचता येईल हे गणित, तर त्यांची गप्पा मारायची झालेली सोय! पुढे अनेक महिने मला दिवसाच्या कोणत्याही प्रहरी त्या दुकानात कॉलनीतील एखादी गृहिणी आणि श्रीमती झा या एकमेकांसमोर आपापली मनं मोकळी करताना दिसायच्या. परंतु त्या पहिल्या दिवशी मी कुठून आलो, माझं लग्न झालं आहे का (नाही झालं, असं मी सांगितल्यावर ते ठराविक आश्चर्य व्यक्त करणारे हावभाव) आणि सरकारी कार्यालयात खूप काम असेल तुम्हाला, असा बिहारच्या असल्यामुळे एकाच प्रकारच्या नोकरीबद्दलचे ज्ञान याची झलक मला मिळाली. मी खाजगी क्षेत्रात काम करतो हे त्यांच्या लक्षात यायला पुढील काही महिने गेले. परंतु जवळजवळ चार महिन्यांनी याच झा बाईंनी मला त्यांच्या दुकानात गप्पा मारायला आलेल्या एका जरा वयस्कर महिलेशी ओळख करून दिली आणि कपडे धुणे व इस्त्री करणे हा माझा प्रश्न कायमचा सुटला.

''आप वो मद्रासी के घर में रहते हो ना'', असं विचारत धोबीण बाईंनी संवादाला सुरुवात केली. मी डीडीएमध्ये कुणालाही ओळखत नसताना माझे घर-मालक कोण ही बातमी यांच्यापर्यंत कशी काय पसरली असेल, या विचारात मी पडलो असताना झा बाईंनी आपल्या घरातील कुणाची तरी तक्रार धोबीण बाईंकडे मांडली होती.

पुढे या झा परिवाराचे दुकान अचानक बंद झाले. मात्र तोपर्यंत या धोबीण बाई आणि त्यांचा नवरा अशोक यांनी मला कपडे धुवून देण्याची व इस्त्री करून देण्याची सेवा द्यायला सुरुवात केली होती. इथूनच मला पिण्याच्या पाण्याच्या कॅनचा पुरवठा करणाऱ्या परवेशचा व जेवणाचा डबा देणाऱ्या एकाचा फोन नंबर मिळाला. या दोघांना मी मद्रासीच्या घरात राहतो हे माहिती होते. तसा सर्व दक्षिण भारतीयांना मद्रासी म्हणायचं हा दिल्लीवाल्यांचा जुना स्वभाव आहे. मात्र माझ्या बाबतीत हे खरे होते. मी ज्या घरात राहत होतो, ते तमिळनाडूचे होते.

**गप्पाटप्पा, ख्यालीखुशाली...**

आमच्या डीडीएत मी किमान पाच ते सहा लाँड्रीवाले बघितले होते. शिवाय दोन मशीनद्वारे करून कपडे धुवून देणारे माझ्या घराच्या मागच्याच बाजूला होते. थोडं पुढे मुनिरका मेट्रो स्थानकापर्यंत चालत गेल्यावर तिथल्या मुख्य मार्केटमध्येही दिसायचे. परंतु मला या जोडीला निवडावेसे वाटले, कारण त्यांच्याकडे डिजिटल माध्यमे नव्हती. वीस रुपये प्रति कपडा (धुणे व इस्त्री करणे) असा दर ठरला आणि आठवड्यातून एकदा त्यांची सेवा घेणे सुरू झाले. दर शनिवारी सकाळी कपडे देताना व रविवारी संध्याकाळी परत घेताना त्यांचे दुकान गप्पागोष्टींचे केंद्रबिंदू आहे, हे लक्षात यायचे. एखादी आजी जवळच्या गुरुद्वाऱ्यातून प्रसाद घेऊन थोडासा यांना द्यायला यायची, दुकान जिथे होते तिथल्या इमारतीत राहणारी एखादी बाई बाजारातून भाजी घेऊन येताना थोडावेळ गप्पा मारायला थांबायची, तर कधी थोडं पुढे बागेत एखादे प्रवचन सुरू असताना एखादी घरकाम करणारी बाई या धोबीण बाईंना बोलवायची. मात्र त्या पाच ते दहा मिनिटांत एक तर स्वतःच्या घराबद्दल किंवा दुसऱ्या कुणाबद्दल चर्चा या हमखास ऐकू येत. मी 'मद्रासी के घर में' राहतो हे मी तिथे आल्याच्या काही आठवड्यात त्या झा बाईंना कसे समजले होते, हे आता मला लक्षात आले होते. मला मात्र धोबीण बाई आणि त्यांचा नवरा अशोक हे दोघेही भैय्या अशी हाक मारायचे. दोघांनीही मी कुठून आलो, काय करतो, कुठे कामाला जातो, माझे लग्न झालेले नाही ही माहिती अगदी पहिल्याच भेटीत विचारून स्वतःचा डेटाबेस अपडेट केलेला होता. अर्थातच बहुतेकांपर्यंत ही माहिती एव्हाना पोहोचली असणार, याची मला आता खात्री होती.

एवढ्या मोठ्या कॉलनीत आपले हक्काचे पंचवीस ते तीस गिऱ्हाईक तरी असावेत हे इथल्या धोब्यांचे गणित असते, जेणेकरून २० रुपये प्रति कपडा या दराने काही हजार रुपये महिना एवढे शाश्वत उत्पन्न मिळू शकते. कारण एका मोठ्या कॉलनीत आठ ते दहा लाँड्रीवाले असल्यामुळे स्पर्धाही जास्त असते. या हक्काच्या गिऱ्हाईकांकडे स्वतः कपडे पिक-अपसाठी धोबीण बाई रोज ठरलेल्या इमारतीत जिने चढून-उतरून मेहनत करायच्या. त्यांचा नवरा मात्र दुकानाच्या बाहेर सिगरेट ओढत आणि मोबाइलवर रील्स पाहत बसलेला असायचा. थोडक्यात, कपडे धुण्यापासून इस्त्री करेपर्यंत सारं काही या बाई एकट्याने करत होत्या. अजूनही करीत असतील.

पुढे मी केवळ ऑफिसचे कपडे जवळच्या मशीनवाल्या लाँड्रीत देऊ लागलो. तिथे देखील दुकानाची रचना आणि तिथे येणाऱ्या ग्राहकांची आर्थिक पातळी सोडल्यास इतर सारे वातावरण फार काही वेगळे नव्हते. दिल्लीचा स्वभाव पाहता, सकाळी मंडळी कामावर गेली की संध्याकाळी घरी येईपर्यंत सगळीकडे शांतता व फुरसत, हे दोन्ही या दुकानांमध्येही अनुभवता यायचे. इथे मात्र फोनवर रील्स पाहण्याच्या बरोबरीने एका लाँड्रीवाल्याकडे एक छोटासा टी.व्ही. देखील होता. त्यामुळे तो, त्याच्या समोरचा आणखी एक लाँड्रीवाला, शेजारचे दोन किराणावाले व एक स्टेशनरीवाला अशी मंडळी त्या टी.व्ही. भोवती दिसायची. मग कधी सिनेमे, तर कधी धार्मिक मालिका, कधी भारत वि पाकिस्तान हे सामने व्हावेत का, ही टीव्हीवरची चर्चा आणि काही दिवसांनी तोच भारत विरुद्ध पाकिस्तान हा क्रिकेट सामना प्रत्यक्ष पाहणे हे सारे उद्योग तिथे घडत असत. घरातील कार्यरत मंडळी गुडगाव किंवा नोएडात कामाला गेली की दिवसभर संबंधित घरातील गृहिणी, ज्येष्ठ मंडळी, त्या इमारतीत येणारे-जाणारे मदतनीस हे सर्व कॉलनीतील दुकानं, लाँड्रीवाले, चहावाले, भाजीवाले यांच्या ठेल्यावर थांबून गप्पागोष्टी करीत.

मला घरी जेवण बनविण्यासाठी कुणी मदतनीस हवी आहे याची माहिती या टी.व्ही. असलेल्या लाँड्रीवाल्याच्या शेजारच्या दुकानदाराने एका महिलेला दिली. जेव्हा एके रविवारी सकाळी त्या महिलेने माझे दार वाजवून मला याबद्दल सांगितले, तेव्हा इतक्या लगेच बातमी पसरली याचे मला पुन्हा आश्चर्य वाटले. पण तोपर्यंत कलावती आणि तिची सून गणेशी यांची निवड त्या कामासाठी झालेली होती.

**किचन लक्ष्मी होता हैं...**

मागच्या वर्षी सप्टेंबर महिन्याच्या सुरुवातीला कलावती यांनी घरातल्या स्वयंपाकघरात पदार्पण केले. मला ९ वाजता निघायचे असल्यामुळे सकाळी साडे-आठ वाजता येऊन मला डबा करून देणे आणि नंतर संध्याकाळी येऊन रात्रीचे जेवण बनवणे असे ठरले. डीडीएच्या बाहेर एका वस्तीत हे कुटुंब राहत होते. कलावतीचा मुलगा (गणेशीचा नवरा) याचे एका अपघातात निधन झाले होते व आता घरची जबाबदारी या दोन बायकांवर होती. घरी कलावतीचा नवरा आणि दोन मुलं (वय वर्ष १७ आणि वय वर्ष १५) असे होते. पहिल्या दिवशी सकाळी कलावतीने बटाट्याची भाजी आणि दोन पोळ्या असा साधाच बेत केला होता. मात्र डबा भरताना स्टोव्हवर एक छोटीशी पोळी तशीच ठेवलेली दिसली. ''यह रह गया हैं, क्या?'', असं विचारल्यावर कलावतीचे उत्तर आले, ''नहीं, किचन लक्ष्मी होता हैं. यह मेरी यहाँ की पहली रोटी हैं, इसे मैं गाय को खिलाऊंगी, ताकि सुरुवात अच्छी हो.''

त्या दिवशी मेट्रोत 'किचन लक्ष्मी होता हैं' या वाक्यावर मी थोडा विचार केला. या भावनेचा उगम काय? ओढ की अवलंबित्व? या किचनद्वारे तिच्या लक्ष्मीची सुरुवात झाली आहे, पण खरं तर कलावतीचे तिथे असणे हे मला प्राप्त होणाऱ्या लक्ष्मीवर अवलंबून आहे. तिच्या या दुहेरी भावनांचा आदर करताना मला आमच्या साहेबांकडे अमुक गाड्या आहेत असं कौतुकाने सांगणारे ड्रायवर आठवले.

पुढील काही दिवस कलावती आणि नंतर पूर्ण वेळ गणेशी रोज वेळेत येऊन जेवण बनवू लागल्या. काही दिवसांनी या परिवाराचे गाव झांशीच्या जवळ कुठेतरी आहे असं समजलं. काही वर्षांपूर्वी गणेशीचा नवरा दिल्लीत काम मिळावं म्हणून राहायला आला आणि लगेच लग्न करून गणेशीला घेऊन आला. गणेशी स्वतः छत्तीस वर्षांची असताना तिला एक १७ वर्षांचा मुलगा आणि १५ वर्षांची मुलगी असणं म्हणजे वयाच्या १९व्या वर्षी ती आई झाली होती. आणि काही महिन्यातच कलावती या आपल्या मोठ्या नातवासाठी मुलगी बघायला गावी जात आहे असं कळलं. याचा अर्थ पुढील काही वर्षात गणेशी ही आजीच्या रूपात पदार्पण करणार होती. इतक्या लवकर लग्न करू नका असं सांगितल्यावर, ''वो (तिचा मुलगा) उसके दादाजी के खिलाफ नहीं जा सकता'', हे उत्तर मिळालं. हे उत्तर ऐकल्यावर मला मात्र गणेशीच्या एका स्वभावाचे मूळ नव्याने समजले. तिला मोबाइल फोन बरोबर घेऊन फिरायची सवय नव्हती. उद्या येऊ नकोस वगैरे सांगण्यासाठी फोन केला, तर घरी मुलगा उचलायचा. ''तिच्या नवऱ्याला तिने फोनवर बोललेलं आवडत नसे. म्हणून तिने कधी फोन बरोबर ठेवला नाही'', असं मला घर-मालकिणीकडून समजलं होतं. आता जर नवरा गेल्यावरही त्याने वापरू न दिलेल्या गोष्टी ती अजूनही वापरत नसेल, तर आजोबा जिवंत असताना त्यांचा नातू त्यांच्या विरोधात कसा बंड पुकारेल? एखादे कुटुंब गरिबीच्या सापळ्यात अडकते ते केवळ पैसे नसल्यामुळे नव्हे, हे मला या उदाहरणावरून लक्षात आले.

गणेशीच्या उदाहरणामुळे असेल, पण तिथे डीडीएतच चहा विकणाऱ्या एका व्यक्तीला गरिबीच्या सापळ्यातून बाहेर

काढायचा माझ्या परीने प्रयत्न केला. मशीनवाल्या लाँड्रीकडे किंवा तिथल्या दुकानात काही किरकोळ सामान आणायला जात असताना एक चहा विकणारा रस्त्याच्या कोपऱ्याला हताश उभा असायचा. त्याच्याकडून दोन-तीनदा चहा घेतल्यानंतर मी कधी दिसलोस तर अपेक्षेने, ''चाय?'' असं विचारायचा. ते २०२५-२६ चे थंडीचे दिवस होते. एका शनिवारी सकाळी मी थोडं चालून आल्यावर त्याच्याकडे चहासाठी थांबलो. संभाषण थोडंसं वाढलं आणि तो १९८४ या वर्षी बिहारहून दिल्लीत चहा विकायला आला होते, हे मला समजलं. त्याच्याच शब्दात सांगायचं तर, ''इंदिराजी को मार दिया उसके कुछ दिनो बाद.'' ''पहले यहाँ सब खाली होता था, अब सब लोगों ने गाडी खरीद ली.'' त्याचं हे वाक्य ऐकल्यावर, का, माहिती नाही, पण माझ्या तोंडून वाक्य निघालं, ''चाय बेच के अच्छी कमाई होती हैं?'' कदाचित मी त्याच्या वर्मावर बोट ठेवलं असावं. कारण त्याने देखील सगळं सांगायला सुरूवात केली. त्याच्या मते, भाजी विकण्याने हातात जास्त पैसे येतात. ''समजा, मी तुला थोडे पैसे दिले, तर भाजी आणून विकायला सुरु करशील?'' मी विचारले. लगेच त्याचा चेहरा खुलला आणि त्याने मला पुढचे गणित समजावले. भाजी आणायची त्याला पहाटे पाच वाजता ओखला मंडीला जावं लागणार होतं. एवढ्या सकाळी मेट्रो सुरू नसल्यामुळे रिक्षाने जाणं भाग होतं, आणि दोन्ही वेळेस रिक्षाचे पैसे ५०० रुपये. म्हणजे ३००० रुपये असतील तर २५०० ची भाजी आणता येईल, कारण उरलेले पैसे रिक्षाभाडे! ही २५०० ची भाजी त्याला किमान ३५०० ला विकावी लागेल, तरच पुढल्या वेळेस रिक्षाभाड्यासकट नवी भाजी आणल्यावरही थोडे पैसे उरतील. पण ३५०० ची विक्री करायला दोन अडथळे होते - एक, काही आठवड्यात सुरु होणारा उन्हाळा, ज्यामुळे भाजी लवकर खराब होणार होती आणि दुसरं, इतर भाजीवाल्यांशी स्पर्धा. म्हणून मी त्याला मुख्य बाजारपेठेत न जाता (स्पर्धा ओढवून न घेता) कॉलनीच्या एका कोपऱ्यात गाडी लावून १५ ग्राहक थेट जोडायला सांगितले. तो तयार झाल्यावर त्याला ५००० रुपये दिले.

**गरिबीचा फेरा**

काही दिवसांत ''सब्जी ले लो...''ची हाक कानावर पडू लागली. थोडं बरं वाटलं. मी देखील त्याच्याकडून भाजी घेऊ लागलो. मी दिलेल्या पैशांमुळे तो तीनवेळा मंडीत जाऊन नवी भाजी घेऊन आला, हे समजलं. आता हा नवीन मार्गाला लागला असं समजून मी आठवडाभर श्रीनगरला जाऊन आलो. आल्यावर शनिवारी सकाळी जेव्हा इस्त्रीवाल्याकडे गेलो. म्हटलं, त्यालाही नमस्ते म्हणून येऊ या, तर रडवेला चेहरा करून हताश बसलेला दिसला. सकाळी नवी भाजी आणायला गेलेला असताना कुणीतरी अख्खी पिशवी चोरली आणि जी काही कमाई होण्यास सुरू झाली होती त्यात एकदम शून्यायी निर्माण झाली होती. परिणामी, मी पुन्हा एकदा ३००० रुपये देऊन नव्याने धंदा सुरू करायला सांगितला. त्यानंतर मात्र मी दिल्ली सोडेपर्यंत तो भाजी विकत होता. त्याच्याशी बोलताना इतके छोटे व्यापारी डिजिटल माध्यमे का वापरत नाहीत, याची देखील पुन्हा एकदा जाणीव झाली. लोकांनी भले त्यांना डिजिटल पैसे दिले तरी रोज एटीएममधून कॅश काढण्यासाठी (त्या बँकेच्या एटीएमपर्यंत) दर दोन दिवसांनी लांब चालत कोण जाईल? शिवाय ओखला मंडीत कॅशने व्यवहार होतो, त्यामुळे हातात कॅश असणं व्यावहारिक असतं, असं त्याने मला सांगितलं.

दिल्ली सोडण्याच्या एक दिवस आधी माझ्याकडची जुनी पांघरुणं, एक जॅकेट, थोडे कपडे आणि एक छोटी बॅग असं त्याला देऊन टाकलं. त्याच्याकडे उत्पन्नाचा स्रोत असावा व त्याची प्रकृती चांगली असावी, हा त्याच्यामागचा उद्देश. त्याला दोन मुली, एक कॉलेजमध्ये आणि एक शाळेत. कदाचित त्यांना नोकरी लागल्यावर याचा परिवार गरिबीतून बाहेर पडेल, अशी माझी भाबडी आशा. मात्र दिल्ली सोडताना त्याला भेटलो, तेव्हा कळलं की गॅस सिलेंडरच्या भीषण टंचाईमुळे (मार्चमध्ये सुरू झालेल्या इराण युद्धामुळे) दिल्लीचे ब्लॅक मार्केट तेजीत आलेलं आहे. त्याच्या घरी जेवण बनवण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा प्रसंगी काय करावं? सिलेंडरसाठी २००० रुपये देऊन मी हताश होऊन घरी परतलो. शेवटी, एखादी व्यक्ती किंवा कुटुंब गरिबीत पुन्हा ढकललं जातं ते असं, आणि आपण त्यांना कसलीच मदत करू शकत नाही, या कठोर वास्तवाचं मला मुनिरका इथल्या डीडीए कॉलनीत दर्शन घडलं...

**आशय गुणे हे दिल्ली-मुंबई स्थित कम्युनिकेशन कन्सल्टंट, लेखक, अनुवादक आणि संगीत आस्वादक आहेत. त्यांचे डॉ. मनमोहन सिंग-ए टेम्पेस्टुअस टेन्यूर-सहलेखक सुजय शास्त्री- हे पुस्तक प्रकाशित आहे.**

**संपर्क:** gune.aashaygmail.com

# निर्मितीचा निखारा स्पर्शताना...



डॉ. आनंद जोशी

ज्ञान रंग





ते दिवस होते, आर. के. नारायण यांच्या 'मालगुडी डेज'चे. त्यात त्यांचे भाऊ आर. के. लक्ष्मण यांची रेखाटने होती. दूरदर्शनवर मालगुडीची चित्रवाणी उलगडत गेली. त्याच्या आधीच त्यांची ही कादंबरी वाचली होती. त्याला सुप्रसिद्ध इंग्लिश कादंबरीकार ग्राहम ग्रीन यांची प्रस्तावना होती. त्यांचे एक वाक्य आठवणीत ठसले होते, त्याचा आशय 'आर. के. नारायण हे 'सेन' लेखक आहेत'. हे प्रामाणिक गौरवोद्गार वाचून बरे वाटले होते. आज त्या वाक्याचा व्यत्यास लक्षात आला, 'म्हणजे बरेच लेखक काही अंशी 'इनसेन' असतात की काय?' 'सेन' या इंग्लिश शब्दाचा अर्थ शहाणा, मनोविकृति नसलेला असा आहे. येथे लेखक हा शब्द व्यापक अर्थाने घेतला आहे. कोणताही निर्मितिक्षम कलावंत असा त्याचा अर्थ आहे. स्वत: ग्रीन यांना असुरक्षितता आणि भीती या भावनेने पछाडलेले होते, ते कधी कधी जवळ पिस्तुल बाळगत असत. हे सगळे आठवले कारण वॅन गॉफबद्दल विचार करत होतो. त्याची मनोविकृती आणि त्याच्या कलाकृती तपासून पाहत होतो...

आयर्विन स्टोन (१९०३-१९८९) यांची 'लस्ट फॉर लाइफ' ही वॅन गॉफ याच्या चरित्रावर आधारित कादंबरी वाचली होती. या व्यथित प्रतिभावंताने मानसिक त्रासातून जात असताना, महान चित्रकृती निर्मिल्या याचे चित्रपटासारखे शब्दांकन स्टोनने केले होते. १९३४ साली प्रकाशित झालेली ही कादंबरी अजूनही 'आउट ऑफ प्रिंट' नाही, असे म्हणतात. १९५६ मध्ये 'लस्ट फॉर लाइफ' हा कर्क डग्लसची भूमिका असलेला आणि त्याच कादंबरीवर आधारित सिनेमा मात्र माझ्या नजरेतून निसटला होता.

**चित्रकला आणि चित्रकार**

निर्मिकाच्या मानसिकतेचा शोध त्याची चित्रे बघून घेण्याची सुरुवात फ्रॉइडने केली. त्याने लिओनार्डो, मिकेलांजलो यांच्या कलाकृती बघून त्यांच्यावर शोध-निबंध लिहिले. ते अत्यंत वादग्रस्त ठरले. पण त्यामुळे एक नवीन ज्ञान दालन उघडले. वॅन गॉफचे चरित्र, चारित्र्य, त्याचा पत्रव्यवहार आणि त्याच्या चित्रकृती. या सगळ्याचा वापर करत वॅन गॉफला कोणत्या मनोविकृतीने पछाडले होते, हे या लेखात दाखवण्याचा प्रयत्न करणार आहे. याचा आढावा घेत मनोव्यथा आणि निर्मितीच्या निखाऱ्याचा स्पर्श याची साखळीही बघणार आहे.

वॅन गॉफला १८८८ ते १८९० या दोन वर्षात वारंवार मनोविकृतीचे झटके येत असत. असे झटके त्याला का येत असत, या बद्दल तुटपुंजे पुरावे उपलब्ध असले तरी सुद्धा दीडशे पेक्षा जास्त डॉक्टरांनी त्याचा चरित्र-शोध घेतला आणि शोधनिबंध प्रकाशित केले. या शोधनिबंधाचे चिकित्सक परीक्षण तसेच विहंगमावलोकन करत एक निबंध अमेरिकन जर्नल ऑफ सायकॅट्री या विज्ञान पत्रिकेने प्रकाशित केला, त्याचा आधार या लेखातील विवेचनासाठी घेतला आहे.

**विन्सेंटची वांशिकता**

मनोविकृती या काही वेळेला आनुवांशिक असतात. विन्सेंटचे वडील, आजोबा, ख्रिस्ती धर्मशिक्षक होते. तसेच त्याच्या घराण्यात काही जण आर्ट डीलर्स आणि आर्टिझन्सही होते. पण त्याच्या पूर्वजांमध्ये मनोविकृतीचा इतिहास आढळत नाही. विन्सेंटला लहान पाच भावंडे होती. विन्सेंटच्या आत्महत्येनंतर सहा महिन्यात त्याचा भाऊ थिओचा मृत्यू झाला. त्याचा धाकटा भाऊ बोअर युद्धात दक्षिण आफ्रिकेत मरण पावला किंवा त्याने आत्महत्या केली. विन्सेंटची बहीण वयाच्या ३४व्या वर्षी मनोविकृती-स्किझोफ्रेनियाने आजारी पडली, तिला मेंटल असायलममध्ये ठेवले गेले, तिचे तिथेच वयाच्या ७९व्या वर्षी निधन झाले. त्याची आई ८७व्या वर्षापर्यंत जगली. विन्सेंटचे वडील ६३व्या वर्षी गेले. विन्सेंट आणि त्याचे दोन भाऊ त्यांच्या तिशीत मेले. बहिणी सत्तरी पर्यंत जगल्या.

**पॅरिसला मनोव्यथेची सुरुवात**

विन्सेंट १८८६ साली पॅरिसला आला आणि भाऊ थिओ बरोबर राहू लागला. तेथे त्याला अचानक भीतीचे झटके, पोटामध्ये गोळा येणे आणि भान हरपणे असेही होऊ लागले. कधी मधी त्याला फिट्स येऊ लागल्या. या फिट्स मधून तो बाहेर आल्यानंतर त्याची स्मृती पूर्ण जात असे. त्या काळात तो 'Absinthe' ही दारू जास्त प्रमाणात घेत असे. या विशिष्ट प्रकारच्या मद्यामुळे आकडी येऊ शकते. तो गबाळा राहात असे. या काळात त्याचा भांडखोरपणा खूपच वाढला होता. कित्येक वेळेला 'हाच का तो विन्सेंट' असे वाटावे इतका शांत आणि सुशील असाही तो वागत असे.

त्याच काळात थिओने त्याच्या बहिणीला लिहिलेल्या पत्रात विन्सेंटबद्दल लिहिले आहे. 'विन्सेंट'मध्ये दोन व्यक्ती आहेत, एक प्रतिभावान, कोमल, सुसंस्कृत आणि दुसरी गर्विष्ठ, कठोर. कधी तो असा असतो, तर कधी तसा. मला त्याची दया येते. तो स्वत:चाच शत्रू आहे. तो फक्त इतरांसाठी नव्हे तर स्वत:साठी सुद्धा जीवन दुर्धर करून टाकतो.' थिओने त्याचे वर्णन करून त्याच्या 'बायपोलर' व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. मराठीत याला द्विध्रुवीय विकार असे म्हणतात. यात दोन टोकाच्या अवस्था असतात, कधी अतिउत्साह तर कधी तीव्र नैराश्य.

१८८६ हे ते साल होते. विन्सेंट पॅरिसमध्ये होता. या काळात मनोव्यथा विन्सेंटला सतावत होती. तरी त्याची चित्रसाधना चालूच होती. पॅरिस येथील शैक्षणिक चित्रकार फर्नांड कॉरमोन (१८४५-१९२४) यांच्या खुल्या स्टुडियोमध्ये त्याने तीन चार महिने काम केले. व्यक्तिचित्रण आणि प्रत्यक्ष मॉडेल पाहून स्वत:ची कला सुधारण्याचा प्रयत्न केला. त्याच्याबरोबर काम करणाऱ्या विद्यार्थ्याने लिहिले आहे, 'विन्सेंट अतिशय अनियंत्रित, परिणामांची पर्वा न करता चित्रकाम करत असे. तीव्र संतापात किंवा अतिउत्साहाने कॅन्व्हासवर रंग फेकत असे' असे त्याचे काम बघणाऱ्याला वाटत असले तरी त्या कृती मागे त्याचे काही नियोजन असावे.

२०१२च्या सुमारास वॅन गॉफच्या काही पेंटिंग्जचे 'एक्स-रे' क्ष-किरणाने विश्लेषण करण्यात आले, त्यात रंगांचे थरावर थर असल्याचे आढळून आले. काही विशिष्ट 'इफेक्ट' या मुळे विन्सेंट साधत असावा, असे कलाशिक्षकांचे मत आहे.

**आर्ल गावात**

१८८८ च्या सुरुवातीला दक्षिण फ्रान्स मधील निसर्गरम्य आर्ल या गावी विन्सेंट चित्रकलेकरता येऊन पोचला. येथे आल्यानंतर पहिले काही दिवस चांगले गेले. तो आता कुशल आणि तरबेज चित्रकार झाला होता. पण त्याच्या कलेची अजून दखल घेतली गेली नव्हती. पेंटिंग्ज विकली जात नव्हती. थिओ पैसे पाठवत होता. त्याच्या मनोविकृतीने पुन्हा उचल खाल्ली. भ्रम, मतिभ्रम, याचे झटके येऊ लागले. विन्सेंटने थिओला पत्रात लिहिले, 'हे आतले वादळ आले म्हणजे मला बधीर करण्याकरता मी माझा 'प्याला' जवळ करतो.' अशा 'एकच प्याल्या' नंतर आकडी येणे, विचित्र हालचाली, वगैरे सुरू होत असे. 'अति-उल्हासात' असताना विन्सेंटची पेंटिंग्ज करण्याची गती अकल्पनीय होती. ही गती त्याला अशीच मिळाली नव्हती.

द हॉग-डेनहॉग या शहरी राहत असताना १८८२ च्या मे महिन्यात लिहिलेल्या पत्रात विन्सेंटने नमूद केले आहे 'निर्णायक कृती करण्याआधी तर्क आणि चिंतन करायचे असते. कृती करत असताना तर्क आणि चिंतनाला अवकाश मिळत नाही' या त्याच्या विचारात पेंटिंग्जच्या गतीची पाळेमुळे दडलेली आहेत. ॲमस्टरडॅममधले राइक्स म्युझियम बघायला विन्सेंट गेला होता. तीन दिवस तो रेम्ब्राँ (१६०६-१६६९) आणि फ्रान्स हॅल (१५८०-१६६६) या दोन डच पेंटर्सची पेंटिंग्ज पाहत, निरखत होता. त्याला चित्राकडे पाहण्याची उपजत चित्रदृष्टी होती, ही पेंटिंग्ज त्याने तीन दिवस अभ्यासली. मग त्याने नमूद केले 'या मास्टर्सनी कुंचला एकदा कॅन्व्हासला लावला म्हणजे, ते मागे बघत नसत असे दिसते' त्यानंतर तो निष्कर्षाप्रत आला तो असा, 'शक्य होईल तेवढे एकाच दमात चित्र रंगवा'. त्याने त्याच्या पेंटिंग-पद्धतीचे वर्णन 'sabre' म्हणजेच 'तलवारबाजी' असे केले आहे. बहिणीला लिहिलेल्या १८८९ डिसेंबरच्या पत्रात हा उल्लेख आढळतो. एकदा तलवारीचा घाव घातला की तो मागे घेता येत नाही. विन्सेंटची लेखन शैली अचूक होती.

आर्लमध्ये असताना ख्रिश्चिएन मॉरी पिटरसन (१८५८-१९४५) हा डॅनिश पेंटर विन्सेंट बरोबर होता. त्यांनी त्याचे काम अगदी जवळून पाहिले होते. तो त्याच्याबरोबर आर्ल येथील फळबागात पेंटिंग करत असे. विन्सेंटची कामाची गती पाहून थक्क होत असे. त्याने जोहान ऱ्होड (१८५६-१९३५) या डॅनिश पेंटरला १६ मार्च १८८८ रोजी लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे, 'विन्सेंटचे काम पाहून मला वाटते त्याच्या कलेत 'method in madness' आहे. हे त्याने चांगल्या अर्थाने आणि गौरवाने लिहिले आहे. वेडातील ही पद्धती त्याने मेहनतीने कमावली होती' असे मला वाटून गेले.

लेटिनांट मिलट हा फ्रेंच आर्मीतील अधिकारी आर्लमध्ये होता. त्याची आणि विन्सेंटची मैत्री होती. विन्सेंटने त्याला आरेखने कशी करायची हे शिकवले. विन्सेंटला पोरींशी व्यवहार करताना अवघडल्यासारखे होई, तर मिलट पोरींशी सहज गट्टी करत असे. त्याचा विन्सेंटला काहीसा हेवा वाटे. विन्सेंटने मिलटचे पोर्ट्रेट केले होते. ते आजही एका म्युझियममध्ये आहे. त्याचे टायटल 'द लव्हर' असे आहे. मिलटने विन्सेंटबद्दल लिहिले आहे त्याचा आशय, 'आरेखने करतानाचा विन्सेंट निराळा होता, पण त्याने हातात ब्रश घेतला म्हणजे तो पिसाट होत असे. त्याची धीट कल्पना सैराट धावे' मिलटचे हे निरीक्षण मला महत्त्वाचे वाटले. अतिउत्साहाला काही 'ट्रिगर' लागतो. ब्रश, रंग, विन्सेंट करता चेतक होते. द्विध्रुवात्मक विकृतीत कोणतातरी ध्रुव चेतवण्यासाठी काही चेतक लागत असावा.

**शेतकऱ्यांची दफनभूमी आणि चर्चचा मनोरा**

पेटून उठून चित्रकाम करण्याच्या त्याच्या वृत्तीचा मागोवा घेता घेता डिसेंबर १८८३ मध्ये पोचलो. नेदरलँड येथील न्यूनेन या गावी विन्सेंट त्याच्या कुटुंबाबरोबर राहत होता. वडील तेथे धर्मगुरू होते. तेथे एका जुन्या चर्चचा टॉवर-मनोरा होता. मागे शेतकऱ्यांची दफनभूमी होती. विन्सेंटला गरीब शेतकऱ्यांची खूप कणव. म्हणूनही असेल डिसेंबर १८८३ ते मे १८८५ या कालावधीत त्याने या चर्चची ३५ पेंटिंग्ज आणि आरेखने केली. चर्चचा मनोरा पाडला गेला. इमारतीच्या भंगाराचा लिलाव झाला. या भंगाराचे विन्सेंटने वॉटरकलर केले.

'द पोटॅटो इटर्स' हे त्याचे जगप्रसिद्ध पेंटिंग त्याने १८८५च्या सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये केले. पण त्याची कुळीमुळी न्यूनेन या गावातील वास्तव्यात रोवली गेली होती. शेतकरी वर्गाचे जीवन सचित्र करणे ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. जोसेफ इस्राएल (१८२४-१९११) या डच पेंटरची शेतकरी जीवनावरची पेंटिंग्ज

आणि त्याचे 'द फ्रुगल मिल' शेतकरी जेवणाचे चित्र पाहून विन्सेंट प्रभावित झाला होता. चित्रबोलीचे रुपांतर शब्दबोलीत करण्याची हातोटी विन्सेंटकडे होती. 'द पोटॅटो इटर्स'बद्दल त्याने थिओला लिहिले त्याचा आशय, 'कंदिलाच्या उजेडात बटाटे खाणारी ही मंडळी, जे हात ते त्यांच्या थाळीत घालतात, तेच हात मातीत घालून त्यांनी हे बटाटे वर काढले. हे हात काबाडकष्ट बोलतात, प्रामाणिकपणे मिळवलेली ही घामाची भाकर. रूढ गुळगुळीतपणा या चित्राला देणे चुकीचे ठरेल. शेतकऱ्यांचे जीवन रंगविणे गंभीर गोष्ट आहे. जे कला आणि जीवन या बाबत खोलवर विचार करतात, त्यांच्या मनात हे चित्र पाहून जर गंभीर विचार उत्पन्न झाले नाहीत, तर मी स्वत:ला दोष देईन, मला खंत वाटेल.'

हे पेंटिंग करण्याआधी त्याने खूप अभ्यास केला. जे चेहरे यात येतील त्या चेहऱ्यांची त्याने ३० पेंटिंग्ज आणि आरेखने केली. जे रंग त्याने वापरले त्याचे स्पष्टीकरण देताना त्याने थिओला लिहिले 'द पोटॅटो इटर्स'मधील आकार, रूप दाखवण्याकरता एकाच रंगाचा वापर केला, त्याच रंगाच्या वेगवेगळ्या छटा आणि पोतही त्यात असतील, तसेच या छटांच्या तीव्रतेत आणि मूल्यात थोडा थोडा फरकही असेल. हे मी मुद्दाम योजले आहे. येथे अभिव्यक्ती करता तोच मार्ग मला महत्त्वाचा वाटतो.' वेदना, संवेदना आणि त्यांची आविष्कार यंत्रणा या बाबत विन्सेंटने सखोल विचार केला होता.

'पोटॅटो इटर्स' हे पेंटिंग पाहताना आणि विन्सेंटचे त्यावरचे टिपण टिपताना मला लिओ टॉलस्टॉयच्या एका कथेची आठवण आली. त्यात पुढील आशयाचे विधान आहे 'गावात कोणी वाटसरू वस्तीला आला, तर गावकरी त्याचे हात तपासून पाहात. त्याच्या हाताला जर घट्टे पडलेले असतील, तर त्याला ते आनंदाने ठेवून घेत आणि खाऊ पिऊ घालत.' वॅन गॉफ चित्रकारातील जणू टॉलस्टॉय होता, असे वाटून गेले. शारीरिक श्रमाचा आदर करणे, हे जीवनाचे सार दोघांना भावले होते.

**वॅन गॉफ आणि पॉल गोगँ**

विन्सेंटने ९०२ पत्रे लिहिली त्यातील ८२० पत्रे त्याने त्याचा भाऊ थिओला लिहिली. ही सगळी पत्रे संशोधकांना शोधाभ्यासाकरता उपलब्ध होती. या पत्रात तो जीवनात काय अनुभवत होता, हे त्याने स्पष्टपणे लिहिले आहे. 'International Journal Of Bipolar Disorder' या जगप्रसिद्ध विज्ञानपत्रिकेत नोव्हेंबर २०२० च्या अंकात या पत्रांचा शोधाभ्यासाकरता उपयोग केला आहे. दक्षिण-फ्रान्सला पोचल्यावर विन्सेंटने थिओला लिहिले, 'मला नक्की काय झाले आहे याचे वर्णन करायला मी असमर्थ आहे. कोणतेही कारण नसताना मला चिंतेचे झटके येतात. डोक्याचा रिकामा खोका झाला आहे, थकवा आला आहे, असे वाटते. औदासिन्य, भयंकर पश्चाताप, अशा भावना होतात.'

यामुळे विन्सेंट अगदी हिंपुटी होत असे. त्याच्या मनोव्यथा, त्याचे चित्रकाम या बद्दल तो रोजच थिओला लिहीत असे. त्याची प्रॉव्हिन्सहून थिओला लिहिलेली पत्रे म्हणजे जणू त्याचे मनाचे श्लोक होते. 'स्टारी नाइट'च्या पहिल्या पेंटिंगबद्दल तो थिओला लिहितो. 'कठोर मेहनत करणे माझ्यासाठी चांगले आहे. पण त्यामुळे माझी धर्माची निकड काही कमी होत नाही. मग मी ताऱ्यांचे पेंटिंग करायला घराबाहेर पडतो.'

सामान्य लोकांसाठी चित्रकलाकृती निर्माण करण्याकरता विन्सेंटने स्वत:ला अथकपणे वाहून घेतले होते, हे पाहून पूर्वायुष्यात त्याने शुभवार्ता उपदेशक-इव्हॅन्जलिस्ट धर्मप्रसारक होण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची आठवण करून देणारे होते. १८८८ आर्लमध्ये पानगळ सुरू झाली होती. वॅन गॉफला अतिशय एकाकी वाटू लागले. थिओच्या मदतीने त्याने पॉल गोगँ (१८४८-१९०३) या चित्रवंताला आर्लला येण्याची गळ घातली. गोगँ हा फ्रेंच चित्रकार, तो मार्टिनिक या फ्रेंच वसाहतीतून पॅरिसला परत आला होता. त्याची पेंटिंग्ज पाहून विन्सेंट प्रभावित झाला होता. त्याच्याबरोबर आर्ल येथे एक स्टुडियो सुरू करावा आणि तरुण चित्रकारांकरता तो खुला ठेवावा, अशी विन्सेंटची इच्छा होती. पॉल आर्लला आला. पण दोघांचे जमले नाही. रोज दोघात वादविवाद भांडाभांड्या होत, संवाद नव्हताच. हे सगळे विन्सेंटने थिओला कळवले. पॉल त्याच्या बरोबर दोन महिने राहिला. ख्रिसमसच्या आदल्या संध्याकाळी पॉल म्हणाला, 'विन्सेंट मी आता परत जाणार आहे.' दोघेही बारमध्ये दारू पीत होते. विन्सेंटने ग्लासभर दारू पॉलच्या तोंडावर फेकली. त्यांच्या मित्रांनी विन्सेंटला घरी आणले. पॉल घराबाहेर पडला. विन्सेंट त्याच्या मागोमाग वस्तरा घेऊन त्याचा पाठलाग करत होता. पॉलने त्याला घरी पाठवले. विन्सेंट घरी आला, त्याने स्वत:च्या डाव्या कानाच्या पाळीचा लोलक कापला. रक्त वाहत होते. त्याने कानाचा तुकडा कागदात गुंडाळून घेतला आणि सरळ वेश्यागृह गाठले आणि तो तुकडा राशेल या त्याच्या आवडत्या वेश्येला दिला.

तो पाहून ती बेशुद्ध पडली. विन्सेंट कसाबसा घरी येऊन त्याच्या बेडवर पडला. रस्ता भर रक्तस्राव होतच होता. आजूबाजूच्या लोकांनी, मित्रांनी बेशुद्धावस्थेतील विन्सेंटला इस्पितळात नेले. तीन दिवस एकांतवासात ठेवले. तेथे त्याच्यावर दोन आठवडे उपचार करण्यात आले. विन्सेंटला काय घडले, याची कोणतीही त्याला स्मृती नव्हती. इस्पितळातील डॉक्टरांनी एपिलेप्सीचे निदान करून त्यावर औषधोपचार सुरू केले. गावातल्या वृत्तपत्रात दुसऱ्या दिवशी बातमी छापून आली. रुग्णालयातून घरी आल्यानंतर त्याने स्वचित्र काढले 'बँडेज्ड इयर विथ पाइप,' या पोर्ट्रेटमध्ये पाइप ओढणारा विन्सेंट शांत आणि स्थिर दिसतो. पण एरवी, आजूबाजूची पोरे त्याची टिंगलटवाळी करत. त्याला वॅन गॉफ वैतागला आणि सेंट रेमी असायलममध्ये स्वेच्छेने भरती झाला. तिथे असताना वर्षभरात त्याला सायकोसिसचे तीन झटके येऊन गेले. प्रत्येक झटक्यातून बाहेर आल्यानंतर तो पेंटिंग्ज करत असे. त्याने वर्षात ३०० पेंटिंग्ज केली. त्याचे सुप्रसिद्ध पेंटिंग 'स्टारी नाइट' हे त्यातील एक. ते त्यांनी जून १८८९ मध्ये केले.

**शेवटचे ७० दिवस**

शेवटचे ७० दिवस ऑव्हे सीर वाज या पॅरिसच्या उत्तरेला २२ मैलावर असलेल्या एका गावात काढले. तेथे तो एका खानावळीतील पोटमाळ्याच्या छोट्या खोलीत राहत असे. त्याच्या या शेवटच्या वास्तव्यात त्याने ८० हून अधिक पेंटिंग्ज निर्माण केली. आजही ही खानावळ आणि विन्सेंटची खोली जतन करून ठेवली आहे. त्याच सुमारास एक कौटुंबिक घटना घडली. थिओचा साखरपुडा झाला १८८८च्या शेवटच्या महिन्यात आणि लगेच चार महिन्यात विवाह झाला. पुढे त्याला मुलगा झाला. पण विन्सेंटला वाटले, आता थिओची आणि आपली मैत्री संपुष्टात येईल. त्याने थिओला लिहिले, 'तुझ्या मैत्रीशिवाय मला जगणे अशक्य आहे, मग मी सद्सद्विवेकबुद्धीला सोडून आत्महत्या करेन, ते जरी डरपोकपणाचे असले तरी.' त्याने शेवटचे पेंटिंग केले 'व्हिटफिल्ड विथ क्रोज.' कावळे पेंटिंग करताना त्रास देतात त्यांना उडवून लावण्याकरता विन्सेंटने खानावळवाल्याकडून गन मागून घेतली. त्याच गनने स्वत:च्या छातीत गोळी मारून आत्महत्या केली. या घटनेचे सूक्ष्म तपशिलासह वर्णन महाजालावर सहज मिळेल.

**मेंदू–मनोविकृती विज्ञान**

शेते पिकुनी पिवळी झाली, हे त्याचे चित्र पाहत होतो. निरभ्र आकाशातून काळी पाखरे उडत चालली होती, शेतातून जाणारे कुठेही न जाणारे, न संपणारे तीन रस्ते, त्या चित्राला उदास करत होते. इतक्यात 'ठाक–ठो' मोठा आवाज झाला, टंकित हात थांबला. मी भानावर आलो.

के रेडफिल्ड जेमिसन (१९४६) यांच्या 'टच्ड विथ फायर' या पुस्तकाची आठव झाली. अमेरिकेतील जॉन्स हॉपकिन्स या विद्यापीठात के जेमिसन मनोविकृतिविज्ञानाच्या प्राध्यपिका असून दुसऱ्या एका विद्यापीठात 'इंग्लिश'च्या प्राध्यापिका आहेत. त्यांनी मनोविकृती आणि निर्मिक कलावंत, लेखक, कवी यांच्यातील संबंधाचा सखोल वैज्ञानिक शोधाभ्यास केला आहे. त्या करता त्यांनी साहित्य, चित्रकला यांचा ऐतिहासिक शोध घेऊन हे पुस्तक सिद्ध केले. हे पुस्तक इतके प्रभावी ठरले की, त्याचा आधार घेत २०१५ साली 'टच्ड विथ फायर' ही 'ड्रामा फिल्म' तयार केली, दोन 'बायपोलर' कवी मनोविकृती रुग्णालयात भेटतात आणि प्रेमात पडतात, असा त्या सिनेमाचा प्लॉट आहे.

एरिक कँडेल (१९२९) मेडिसिनमध्ये नोबेल २००० यांच्या 'द एज ऑफ इनसाइट' या मेंदूविज्ञान आणि दृश्यकला या पुस्तकात 'टच्ड विथ फायर' या पुस्तकाचे संदर्भ आहेत. पुढील विवेचनात या दोन्ही पुस्तकांचे आणि इतर तज्ज्ञांचे संदर्भ वापरलेले आहेत.

द्विध्रुवीय विकृती तसेच अवसाद (डीप्रेशन) या विकृतींचे प्रमाण चित्रकार, लेखक, कवी अशा मंडळींमध्ये 'जनरल पॉप्युलेशन' समाजातील सर्वसाधारण लोकांपेक्षा जास्त असते, असे के जेमिसन यांना त्यांच्या शोधाभ्यासात आढळून आले आहे. इतिहासात अनेक उदाहरणे आहेत. विन्सेंट वॅन गॉफ आणि एडवर्ड मन्च हे दोघे एक्सप्रेशनिझमचे संस्थापक या दोघांना 'मॅनिक–डिप्रेसिव डीसऑर्डर' म्हणजे 'बायपोलर–द्विध्रुवीय विकृती' होत्या. या पुस्तकात पाश्चात्य देशातील लेखक, कवी, कलावंत, ज्यांना अशा मनोविकृती होत्या त्याचा एक भलामोठा तक्ता दिला आहे. तो पाहिला म्हणजे, अशी ऐतिहासिक उदाहरणे दिसतात. तेथील सृजनसृष्टीतील मोठी नावे पाहून आपण थक्क होतो.

अमेरिकी वैज्ञानिक नॅन्सी अँडरसन यांनी 'क्रिएटिविटी' सर्जनशीलतेवर संशोधन केले आहे. यात त्यांनी हयात लेखकांच्या मुलाखती घेतल्या, शोधाभ्यास केला. सर्जनशील नसलेल्या लोकांच्या तुलनेत सर्जनशील माणसांना द्विध्रुवीय

विकृती होण्याची शक्यता चौपट असते, असे त्यांना संशोधनात आढळून आले.

हॅगोप एकिसल (१९४४-२०२१) हे अमेरिकी मनोविकृतितज्ज्ञ यांनी वीस युरोपियन पुरस्कार विजेत्या लेखक, पेंटर्स, शिल्पकार यांच्या मुलाखती घेतल्या. त्यातील दोन तृतीयांश जणांना द्विध्रुवीय विकृतीच्या प्रवृत्ती दिसून आल्या.

डॉ. रुथ रिचर्ड्स या हार्वर्ड विद्यापीठात होत्या. आज त्या ८५च्या घरात आहेत. या विषयातील तज्ज्ञ आहेत. त्यांनी या विषयाचे विश्लेषण आणखी सूक्ष्म स्तरावर नेले. एखाद्या व्यक्तीला द्विध्रुवीय विकृती होण्याची शक्यता वाढवणारे जनुकीय किवा आनुवांशिक गुणधर्म हे सर्जनशीलतेच्या जन्मजात क्षमतेशी देखील जोडलेले असू शकतात. डॉ. रुथ यांनी बायपोलर विकृती झालेल्या व्यक्तीचे ज्यांना बायपोलर विकृती नाही, असे फर्स्ट डिग्री नातेवाईक = आई वडील, सख्खे भाऊ बहीण आणि मुले यांची तपासणी केली यातील काहींच्यामध्ये सर्जनशीलतेच्या प्रवृत्ती, गुणविशेष आढळून आले. बायपोलर विकृतीचा जास्त धोका निर्माण करणारी जनुके कदाचित व्यक्तीमध्ये सर्जनशीलता वाढवण्याची शक्यताही निर्माण करतात. अशी थिअरी डॉ. रुथ यांनी मांडली.

सर्जनशील व्यक्ती आणि बायपोलर विकृती असलेल्या लोकांमध्ये काही जनुके समान असतात, असे वैज्ञानिक संशोधनात आढळून आले आहे. बायपोलर म्हणजे, द्विध्रुवीय विकृती ही बहुजनुकीय विकृती आहे. भारतात सिकल सेल ॲनिमिया हा रक्तातील तांबड्या पेशींचा जनुकीय रोग आहे. या रोगाचा एक जनुक आहे. आईकडून एक आणि पित्याकडून एक असे दोन जनुक मुलात आले, म्हणजे त्या मुलाला सिकल सेल ॲनिमिया होतो. या जनुकाचा आणखी एक गुणधर्म आहे. हा जनुक असलेल्या व्यक्तीला मलेरिया होत नाही. आईकडे हा जनुक आहे आणि पित्याकडे हा जनुक नाही, म्हणजे मुलात फक्त एकच जनुक मुलाकडे येणार. या मुलाला सिकल सेल ॲनिमिया होणार नाही, कारण हा रोग होण्यास आई आणि वडील या दोघांकडून एकेक जनुक यावा लागतो. पण या मुलाकडे एक जनुक आल्यामुळे त्याला मलेरिया होत नाही. हे उदाहरण का दिले, हे पुढे स्पष्ट होईल. (सिकल सेल ॲनिमिया याचे उत्क्रांतीवादी स्पष्टीकरण आहे, पण तो एक निराळ्या लेखाचा विषय आहे)

**जनुकीय लॉटरी**

जैविक विज्ञानाच्या संशोधनात गुंतागुतीची पुष्कळता असते. ही पुष्कळता मला नेहमी विचारात पाडते आणि स्वत:चा विचार करायला लावते. आजही तेच झाले. सिकलसेल जनुकाच्या दोन आवृत्या मुलात आल्या, तर त्याला सिकल सेल हा जीवघातक रोग होतो. पण जनुकाची एकच 'कॉपी' मुलात आली, तर त्याला सिकलसेल हा रोग होत नाही, उलट मलेरिया या जीवघेण्या रोगापासून संरक्षण मिळते. हे जनुकीय नाट्य रक्तात घडते. सर्जनशीलता आणि बायपोलर विकृती हे बहुजनुकीय प्रकार याचे परिणाम थेट मेंदूत होतात. म्हणजे, या जनुकीय पुंजातील काही जनुक मेंदूत अभिव्यक्त = एक्स्प्रेस झाले तर सृजनाकरता लागणाऱ्या न्युरॉन्सच्या जोडण्या मेंदूत तयार होतात, पण हे सगळे जनुक पुंज अभिव्यक्त झाले तरच बायपोलर होण्याचा धोका निर्माण होतो. यात निसर्गाने आणखी एक मेख मारून ठेवली आहे. जनुक अभिव्यक्त होण्याकरता एपिजनेटिक्सच्या रासायनिक क्रिया घडाव्या लागतात. या क्रिया व्यक्तीच्या परिस्थितीवर अवलंबून असतात. म्हणजे अनेक चलपदे -'मल्टिपल व्हेरिएबल्स' मेंदू हाताळीत असतो.

मेंदू हा अत्यंत गुंतागुंतीचा अवयव आहे. हे कोडे सुटायला अजून खूप काळ संशोधन करावे लागणार आहे. पण माझ्यासारख्या सामान्य वाचकाला दिलासादायक संदेश मिळाला. म्हणजे, सर्जनशीलतेच्या जनुकपुंजातील काही जनुक माझ्यासारख्या सर्वसामान्य लोकांनाही मिळालेले असतात. निर्मितीच्या निखाऱ्याचा स्पर्श त्यांच्याही रोजच्या जीवनात होत असतो. म्हणून तर जीवन सुंदर होण्याच्या शक्यता वाढतात.

**व्यवसायाने हृदयरोग तज्ज्ञ असलेले डॉ. आनंद जोशी मराठीतले नामवंत विज्ञानलेखक, ललितलेखक आहेत. 'बोलकी हाडे', 'मेंदूतला माणूस', 'कर्कविज्ञानाची गोष्ट', 'अक्षर पाविजे निर्धारे', 'व्यूहचक्र', 'आपले वर्तन, आपला मेंदू' (सहलेखक सुबोध जावडेकर) 'ऑर्वेलच्या अवतीभोवती' ही त्यांची प्रकाशित झालेली पुस्तके आहेत.**

**ई मेल :** drjoshianand628@gmail.com

# गाणे जिथे उगवते...



गणेश मनोहर कुलकर्णी

सुरानुबंध



*ठुमरी गायनातली सिद्धस्त्री सिद्धेश्वरीदेवी...*



*गझल गायकीतले कालातीत वैभव बेगम अख्तर...*

संगीत गणितासारखं काटेकोर नियमबद्ध–चौकटबद्ध असूच शकत नाही. ते प्रवाही असतं. काळाप्रमाणे बदलत असतं. नव्या गोष्टी समाविष्ट करीत आणि काहींचा त्याग करत ते समाजाशी संवाद करतं. आपल्या संगीताचं कसं आधुनिकीकरण करायचं, ते श्रोत्यांवर सोडून द्यायला हवं, पण तसं न करणं ही फार वाईट गोष्ट आपल्याकडे बऱ्याचदा घडते. दिवंगत संगीततज्ज्ञ भास्कर चंदावरकर म्हणायचे, जगात दोन प्रकारची माणसं दिसतात. सध्या आघाडीवर असलेलं जॅझ, रॅप हे एक प्रकारचं बंडाचं संगीत आहे. त्यामध्ये गोरी माणसं समाजाच्या विरुद्ध बंड करताना दिसतील. ती गोरी माणसं आफ्रिकन–अमेरिकन माणसांच्या व्यथा मांडत नाहीत. त्यामुळे तिथल्या आफ्रिकन–अमेरिकन लोकांचा यावरही आक्षेप आहे. हा भेदभाव आणि वर्गवादाचा प्रकार पाश्चात्यांकडे मोठ्या प्रमाणावर आहे. जुनी माणसं फक्त क्लासिकल संगीताला जातात, तरुण पोरं फक्त रॉक कॉन्सर्ट्सला. हा सगळा भोवताल बघून काही वेळा भांबावल्यासारखी स्थिती होते. वाटते, सध्याचा स्थित्यंतराचा काळ पडझडीचा आहे का?

पंडित रविशंकर पॅरिसमध्ये राहत होते, तेव्हा त्यांना आयनेस्को माहीत होता. मेन्युहीनबरोबर त्यांचा संवाद होत असे (यहुदी मेन्युहीन, १९१६ ते १९९९, प्रख्यात व्हायोलिनवादक.) संगीत हे प्रथम देवळात होतं. कागदावर लिहिलेलं संगीत, जसं युरोपात विकलं जातं, तसं आपल्या देशात ते विकलं जाण्याचा प्रश्नच नव्हता. तिथे तुम्ही संगीत लिहू शकत होतात आणि ते कागद एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवू शकत होतात. हे भारतात घडलं नाही. लोक कलाकाराला ऐकायला जायचे. तो कार्यक्रम एखाद्या विशिष्ट ठिकाणी व्हायचा. त्या दिवशी तो कलाकार आपलं गाणं सादर करायचा आणि ते तिथंच संपायचं. एका विशिष्ट प्रकारचं संगीत ऐकायचं असेल, तर तुम्हाला एखाद्या विशिष्ट ठिकाणी जावं लागे. पण समजा, दुसऱ्या एखाद्या प्रकारचं संगीत ऐकायचं असेल, तर तुम्हाला दुसऱ्या वेगळ्या ठिकाणी जावं लागायचं.

ही दुसरी जागा म्हणजे, या संदर्भात कोठी होती. एके काळी लोकं हमीदाबाईकडं, अख्तरीबाईंकडं जायचे. ग्रामोफोन आधीपासूनच अस्तित्वात होते. १९३२-३३च्या सुमारास या माध्यमाच्या लोकप्रियतेमुळे ते सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलं. ७८ आरपीएमच्या रेकॉर्ड पाच रुपयांच्या आसपास पैसे देऊन विकत घेता येऊ लागल्या. तुम्हाला तुमच्या दिवाणखान्यात अख्तरीबाई ऐकायला मिळू लागली. म्हणजे गाणं ऐकण्यासाठी एखाद्या तवायफच्या कोठीची पायरी चढताना येणारी अपराधी भावनेची अडचण आता दूर झाली. तिचं गाणं आता तुम्हाला तुमच्या घरी ऐकणं शक्य झालं होतं.

**रामूभैय्या गाणं ऐकणं शिकले...**

अख्तरीबाई फैजाबादी म्हणजे, नंतरची प्रख्यात गझल गायिका बेगम अख्तर! गझल गाताना यांच्या आवाजात लागलेली पत्ती ऐकण्यासाठी लोकं जीवाचं रान करायचे. रामूभैय्या दाते आणि अख्तरीबाईंचे खूप सौहार्दाचे संबंध होते. सुरुवातीला जेव्हा अख्तरीबाईंचं नाव व्हायला लागलं, तेव्हा त्यांच्या खाजगी बैठकीचे मानधनही जबरदस्त असायचं. तेवढं मानधन भरून रामूभैय्या नागपूरहून लखनौला पोचले. बेगम समोर बसल्यावर बेगमने विचारले, की इतर जण कुठे आहेत, तर हे म्हणाले, मी एकटाच आहे. तुम्ही गाणं सुरू करा. बेगमने पहिलीच जबरदस्त तान घेतली आणि संगतीला असलेला सारंगीवादक चित्कारला वा बाई, क्या गंधार लगा है... हे ऐकल्यावर रामूभैय्या बाईंना हात करून थांबा म्हणाले आणि मैफल सोडून निघून गेले.

अख्तरीबाईंच्या लक्षात येईना, की झालं तरी काय? एव्हाना त्यांनीही रामूभैय्यांची माहिती काढून ठेवलेली होती. हे दिल्लीत मोठ्या अधिकारी पदावर कार्यरत आहेत, हे बेगमना समजलं होतं. त्यानंतर त्या त्यांना भेटायला दिल्लीला गेल्या आणि हाच प्रश्न पहिल्यांदा विचारला, की तुम्ही मैफलीतून असे उठून का गेलात? रामूभैय्या म्हणाले अहो, तुमचा सारंगीवाला म्हणतोय काय जबरदस्त गंधार लागलाय आणि मला गाण्यातला अजून 'सा' ही समजत नाही, तर मला तुमचं गाणं ऐकण्याचा अधिकारच नाही. या प्रसंगानंतर रामूभैय्यांनी रीतसर गाण्याची शिकवणी लावली. गायक बनण्यासाठी नव्हे, तर गाणं समजून घेण्यासाठी. गाण्याच्या वातावरणात माणसं गाणं अक्षरशः जगतात, हेच खरं.

**चोरीला गेलेल्या सारंगीचा पाठलाग**

व्ही. शांताराम हे महाराष्ट्रातील मोठं प्रस्थ. अभिजात प्रतिभा असलेले दिग्दर्शक आणि नट. त्यांच्या स्टुडिओत कपडेपट असायचा, तसा स्वतःचा संगीतपटही होता. सगळी वाद्ये होती आणि ती वाजवणारे वादकही पगारी होते. एकदा त्यांच्या स्टुडिओत चोरी झाली. सगळी वाद्ये चोरीला गेली. पोलीस फिर्याद वगैरे झाली, पण वाद्ये काही मिळाली नाहीत. नवीन वाद्ये विकत घेतली गेली. कारण कामं जोरात सुरू होती. महिन्याभरापासून त्यांचा सारंगी वादक यांच्या मागे लागला होता की, कामाठीपुरात जाऊया म्हणून. त्यावर अण्णा रागवायचे. म्हणायचे, मला त्या वस्तीत कशाला नेतोस. तिथे जाऊन मी काय करू? खूप मागे लागल्यावर एक दिवस अण्णा तिथे जायला तयार झाले. संध्याकाळच्या वेळी इथला माहोल रंगबिरंगी असतो. मार्क्वेझ म्हणायचा, लेखनासाठी कोठ्यासारखी दुसरी कुठलीही जागा नाही, जिथे रात्रभर चैतन्य उमललेलं असतं आणि दिवसा अपार शांतता असते.

अशा नुकत्याच सुरुवात झालेल्या मैफलीच्या एका कोठी खाली अण्णा आणि सारंगी वादक जाऊन उभे राहिले. वरून गाण्याच्या सुरावटी पाझरत खाली उतरत होत्या. इतक्यात सारंगीचे स्वर ऐकू येताक्षणी वादक म्हणाला, अण्णा ही वाजतेय ना, ती आपलीच सारंगी आहे. अण्णांनी वादकाला विचारून खात्री करून घेतली. भर मैफलीत अण्णा शिरले. त्यावेळी त्यांचा दबदबा जबरदस्त होता. सारंगी वादकासमोर उभं राहून विचारू लागले, की सारंगी कुठून आणली. सगळी मैफल

स्तब्ध होऊन गेली होती. तो वादक तर ती सारंगी माझीच म्हणत होता, शेवटी, अण्णांनी दोन कानशिलात लगावली तेव्हा तो सरळ पायावर पडला; म्हणाला, मला एकाने स्वस्तात विकली. म्हणून मी ती विकत घेतली. अण्णांनी त्यांच्या अंगावर काही नोटा भिरकावल्या आणि आपल्या वादकाला म्हणाले, उचल ती सारंगी आणि निघ...

**सिद्धेश्वरीदेवींचा रौद्रावतार**

वादकांना आपल्या वाद्याचा प्रचंड जिव्हाळा असतो. आपलं वाद्य ते कुणाच्या हातातही देत नाहीत. मोठे मोठे वादक जेव्हा आपल्या वाद्याला शिष्याला हात लावू देतात, तेव्हा शिष्य स्वतःला धन्य समजतो. सारंगीवरून अजून एक किस्सा आठवतोय. सिद्धेश्वरीदेवींचं गाणं दिल्ली रेडिओ स्टेशनवर आयोजित केलेलं होतं. रेडिओने साथीला स्थानिक सारंगीवाल्याची व्यवस्था केलेली होती. बाई जराशा स्थूल आणि गाण्यालाच वाहून घेतलेल्या साधनेत असल्याने कपड्यांचे भान हरपून गायच्या. त्यांच्या घट्ट ब्लाऊज मधून दिसणारं शरीर पदराने झाकून घेतलेलं असायचं, पण जर त्या जराशाही हलल्या किंवा तानपुरा ऐकायला वाकल्या तर पदर खाली पडायचा आणि सारंगी वादकाची कामुक नजर ते न्याहाळताना सारंगी सुरांवरून घसरून जायची. बाईंच्या एक दोनदा हे लक्षात आलं. आणि कधीही न चिडणाऱ्या बाईंचा राग अचानक उफाळून आला. त्या झर्रकन वळल्या आणि सगळा पदरच खाली पाडून सारंगी वादकाला म्हणाल्या, काय बघायचे ते एकदाच मनभरून बघून घे, म्हणजे तुझी सारंगी तरी निदान सुरात राहील. बाईंचं हे रौद्र रूप बघून सगळेच हादरले. सारंगीवाला तर पायाशी लोळण घेऊन गयावया करून माफी मागायला लागला. शीला धर या गायिकेनं त्यांच्या पुस्तकात हे लिहिले आहे. त्या म्हणतात की सिद्धेश्वरीबाईंसारख्या प्रेमळ बाईंचा कधी तोल जाताना कोणी पाहिलंच नव्हतं. पण या प्रसंगात त्यांचा राग बघून आम्ही सगळेच हादरलो होतो.

**बेगम अख्तरची थोरवी**

बेगम अख्तर आणि सिद्धेश्वरीदेवी तशा समकालीनच. गझलमध्ये अख्तरीबाईंनी जी उंची गाठली होती, तितकीच उंची ठुमरीमध्ये सिद्धेश्वरीदेवींची होती. किंबहुना, त्याच्याही पलीकडे त्यांचा आवाका होता. पण बेगम अख्तरना गझलमुळे जे आंतरराष्ट्रीय वलय नि यश प्राप्त झालं होतं, ते सिद्धेश्वरीदेवींच्या पदरात खूप उशिरा पडलं. यांची नावं बेगम, बाई किंवा देवी होण्यामागे तत्कालीन प्रसारण मंत्री बी. जी. केसरकरांचा हात होता. केसरकर मंत्री असताना तवायफ मंडळींना रेडिओवर गायला बंदी होती. पण त्यांनी लग्नाचं प्रमाणपत्र जमा केलं आणि आपल्या नावापुढे देवी लावलं, तर मात्र त्यांची वर्णी रेडिओवर पटकन लागायची. यातूनच सिद्धेश्वरींचं सुरुवातीला बाई आणि नंतर देवी झालं.

बेगम अख्तरच्या दिल्ली-लखनौ प्रवासात रामूभैय्या दातेंमुळे एक वेगळेच जिव्हाळ्याचे अस्तर जोडले गेले. म्हणजे, बेगमचा निरोप आला की स्टेशनवर स्वतः रामूभैय्या गाडी घेऊन जायचे. बेगम आपल्या साथीदारांसह हवे तितके दिवस राहायच्या, सोबत मैफली झडायच्या. तर एक दिवस ड्रायव्हर एकटाच गाडी घेऊन पोहोचला, बेगमच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली, पण ड्रायव्हर काही बोलेचना. साहेबांनी घरी घेऊन यायला सांगितले आहे, एवढंच म्हणत राहिला. बंगल्यावर पोहोचल्यावर कळलं, की रामूभैय्यांचा सकाळीच अपघात होऊन पायाला फ्रॅक्चर झाले आहे आणि ते हॉस्पिटलात भरती झाले आहेत. बेगमसाहिबांनी गाडी तडक फिरवून हॉस्पिटलला घ्यायला सांगितली. तिथे गेल्यावर रामूभैय्यांशी आस्थेचं भांडण झालं की मला अगोदर का नाही कळवलं म्हणून... मग साथीदारांना इशारा करून सांगितले की, 'जा रे सगळा ताम झाम घेऊन वरतीच या, आज मैफल यही जमेगी...' आणि चक्क हॉस्पिटलमधेच तब्येतीत गायल्या.

बेगमचं सगळ्याच लोकांना अपार कौतुक होतं. आपल्या लता दीदींनीही बेगमची एक आठवण लिहिली आहे. ''१९४६-४७ च्या सुमारास नुकताच रेडिओवर आपकी फर्माइश कार्यक्रम सुरू झाला होता. दीदींना आपलं नाव रेडिओवर ऐकायचं होतं, म्हणून त्यांनी फर्माइश पाठवली तीही बेगम अख्तरने गायलेल्या बहज़ाद लखनवींच्या गझलची- **दिवाना बनाना है तो दीवाना बना दे / वर्ना कहीं तक़दीर तमाशा न बना दे** दीदी पुढे लिहितात, की रोज रात्री त्या रेडिओला कान लावून बसायच्या. आणि एक दिवस बेगम अख्तर बरोबर दीदींच्या नावाचा उल्लेख झाला. ती गझल ऐकण्यापेक्षा आपलं नाव बेगम अख्तर बरोबर ऐकण्याचा जो थरार मी त्यावेळी अनुभवला, तसा पुन्हा आयुष्यात अनेकदा रेडिओवर माझं नाव ऐकूनही मला अनुभवता आला नाही.''

याच बेगम अख्तर यांना एका नबाबानं आपल्याकडे दामटवून ठेवून घेतलं होतं. तो त्यांच्या हसण्यावर प्रचंड फिदा



*रसिकोत्तम रामूभैय्या दातेंच्या दिलदारीने भिन्न वृत्ती-प्रवृत्तींच्या कलावंतांचा यथायोग्य आदरसन्मान राखून सांभाळ केला. गायकीतले मर्म ठावूक असल्यानेच पं. कुमार गंधर्वांपासून बेगम अख्तरांपर्यंतच्या अनेक दिग्गजांचा स्नेह त्यांनी प्राणपणाने जपला...*

होता. त्याने बेगमला नवरत्नांचा हार भेट दिलेला होता. त्यात विलक्षण सुंदर नऊ महागडे हिरे जडवलेले होते. गाणं गायला बसल्यावर तो हार चक्क बेगमच्या गुडघ्याला स्पर्श करायचा. एवढ्या महागड्या हाराचे सगळेच कौतुक करायचे, पण नबाब मात्र म्हणायचा, की सर्वात किंमती तर आमच्या बेगमचं हसणं आहे.

**बेगमचा चंग... सतारीचा संग**

एकदा उस्ताद रइस खान (२५ नोव्हेंबर १९३९ - ६ मे २०१७) यांचं सतार वादन होतं आणि त्यानंतर बेगमच्या गझलांचा कार्यक्रम होता. साधारणपणे वरिष्ठ वादक वा गायक नंतरच मैफलीला बसतात. तर सुरुवातीला उ.रईस खान यांचं सतार वादन सुरू होतं. रंगपटात बेगम आपल्या वहीत कुठल्या गझला सादर कराव्यात, याचा अंदाज घेत होत्या. इतक्यात रईस खान साहेबांच्या लक्षात आलं, की सगळा माहोल गझलचा आहे, तर त्यांनी सतार ठेवून गझल गायला सुरुवात केली. बेगमने बघितलं, की हे काहीतरी वेगळंच सुरू झालंय त्यांना प्रचंड राग आला, हा त्यांचा अपमान वाटला. खरंतर रईस खानसाहेबांच्या हे मनातही नव्हतं आणि लक्षातही आलं नाही, की असं करून आपण मैफलीचा औचित्यभंग करतोय. बेगमने त्याचवेळी रागाच्या भरात शपथ घेतली, की मी पुढच्या कार्यक्रमात सतारच वाजवेन. नंतर बेगमना मैफलीत पाचारण करण्यात आलं आणि त्यांनी आपल्या गझलांनी सगळ्या मैफलीचा नूरच पालटून टाकला, ही गोष्ट वेगळी पण, मैफल संपल्यावरही तो राग बाईंच्या मनात धुमसतच होता. मग शोध सुरू झाला, की कुणाकडे शिकायचं आणि त्यावेळचे सर्वात सर्वोत्तम सतारवादक उस्ताद विलायत खान यांच्याकडे शिकायचा मनोदय जाहीर झाला. त्यांचा मोहम्मद नावाचा जवळचा सहकारी होता. त्याला बोलणी करण्यासाठी पुढे पाठवण्यात आलं. आपल्याकडे साक्षात गझल सम्राज्ञी बेगम अख्तर सतार शिकणार, या कल्पनेनं उस्ताद विलायत खान आणि त्यांची आई पार मोहरून गेली. बेगमने खूप सारा नजराणा आणि पैसे वगैरे भरून गंडा शागीर्द बनण्याची तयारी सुरू केली. इतक्यात मोहम्मदने खबर आणली की उ.विलायत खान तुम्हाला शिष्य म्हणून स्वीकारायला तयार आहेत, पण त्यांच्या आईची अशी इच्छा आहे, की तुमच्या हिऱ्यांच्या हारातला एक हिरा त्यांना नजराणा म्हणून द्यावा. हे ऐकल्यावर बेगमचा पाराच चढला. त्यांच्या मते, मी एवढी सगळी तयारी तुम्ही न सांगता केली आहे आणि त्यातही तुम्हाला काही मागण्याचा अधिकार कुणी दिला? त्या तडक मोहम्मदला म्हणाल्या, की यांचा अगदी दुय्यम शिष्य शोधून काढ, मी त्याला हा सगळा नजराणा देईन. त्यांच्या शिष्याकडे शिकेन. गाणं माझ्या नसानसांत मुरलेलं आहे, फक्त तंत्रच तर शिकायचं आहे. मग उ.विलायत खानच्या शिष्याकडे वाजत गाजत नजराणा पोचवला गेला. रीतसर गंडा बांधला गेला. उस्ताद विलायत खान समोर असतील तर बेगम मुद्दाम शिष्याला वाकून नमस्कार वगैरे करायला लागल्या. ते समोर नसतील, तर या बातम्या त्यांच्यापर्यंत पोचतील याची काळजी घेतली जाऊ लागली. हा सगळा मानपमानाचा खेळ फक्त दोन-तीन महिने चालला. मुश्किलीने तीन शिकवण्या सतारीच्या घेतल्या गेल्या आणि बेगम परत आपल्या जादुई मुलायम आवाजातल्या गझलांकडे त्यातल्या मैफलींकडे वळल्या, तेव्हा सगळ्यांनीच सुटकेचा निःश्वास टाकला. काळाच्या ओघातच उ.रईस खान किंवा उ.विलायत खान यांच्या बरोबरचे खेळीमेळीचे नातेही पुन्हा पूर्ववत झाले

**तानसेन... कविकल्पनेपलीकडचा**

तो काळच तसा होता. कलावंत व्यावहारिक नव्हते, सगळं स्वान्त सुखाय होतं. गाणं गाताना समोरच्याला रिझवतानाच स्वतःची उन्नती करून घेणं, आनंदाची देवाण-घेवाण हाच मुद्दा महत्त्वाचा होता. पैसे दिले जात होते आणि पुरेसे मिळतही होते, पण कुणी जर सांगितले, की बुवा जरा बजेट आज कमी आहे तर

कधी त्याचा अपमान नाही, व्हायचा. उलट, अधिक प्रेमानं अशा मैफलीत कलावंत स्वतःहून सहभागी व्हायचे. पु. ल. देशपांडे म्हणायचे, आपण आपल्या पूर्वजांचा आणि इतिहासाचा फुकाचा अभिमान बाळगतो. खरं तर पूर्वजांच्या जीवन-वृत्तान्ताविषयी आणि कर्तृत्वाविषयी आपल्या इतकी बेफिकीरी इतरत्र क्वचितच आढळेल. आम्हाला आमच्या तानसेनबद्दल फार मोठा अभिमान आहे, पण त्यांच्या संबंधीच्या दंतकथाखेरीज आमच्या हाती त्यांच्या चरित्राची कसलीही साधने नाहीत. तानसेनाची गायकी कशी होती, यापेक्षा तो मल्हार गायल्याबरोबर पाऊस पडत असे, ही कथाच अधिक लोकप्रिय. मृत व्यक्तींना देवत्व द्यायची आम्हाला फार घाई आणि देवत्व द्यायचे, तर चमत्कार हवा. म्हणून आम्ही कविकल्पनांचे वास्तवीकरण केले. तानांचा पाऊस पाडलेल्या तानसेनाने पाण्याचा पाऊस पाडला, असे करून टाकले.

याच तानसेनची गोष्ट एका संगीताच्या शिबिरादरम्यान पं.सत्यशील देशपांडे यांनी सांगितली आहे. तानसेनच्या गाण्यावर सम्राट अतिशय लुब्ध होता. तो एकदा तानसेनला म्हणतो की, तू इतका छान गातोस तर तुझे गुरू किती भारी गात असतील. सम्राट फारच काकुळतीनं तानसेनला विचारतो, की माझी आणि त्यांची भेट घडवून आणशील का? तानसेन सांगतो की, ते असे तुमच्या दरबारात येऊन गाणार नाहीत. आपल्याला त्यांच्यापर्यंत जावं लागेल, तेही वेष वगैरे बदलून. राजा तयार होतो. शिष्यही आपल्या गुरूच्या भेटीला नेहमीच उतावळा झालेला असतो. एक दिवस राजा आणि तानसेन भल्या पहाटे, निबिड अरण्यात एकटेच चालत निघतात. वेगवेगळ्या पक्ष्यांचे आवाज. त्यांची सोबत करत असतात. जंगलातल्या एका झाडाखाली बसून गुरूजी सकाळचा रियाज करत असतात. राजा आणि तानसेन झाडाच्या मागे लपून ऐकत राहतात. काही वेळाने राजा आणि तानसेन परत निघतात, तेव्हा राजा भारावलेल्या अवस्थेत तानसेनला विचारतात, की हे अद्‌भुत, ईश्वरी प्रचिती देणारं गाणं, मला अगोदर का नाही ऐकवलंस. राजा पुढे म्हणतो, की तुझ्या गुरूंच्या आणि तुझ्या गाण्यात असा



*दिग्दर्शक व्ही. शांताराम उर्फ अण्णा आणि संगीतकार वसंत देसाई यांचे संगीतसख्य कौतुकाचा विषय ठरले होते. याच अण्णांनी आपल्या संगीतपटातल्या वादकाची चोरीला गेलेली सारंगी मिळवण्यासाठी थेट कामाठीपुऱ्यातल्या कोठ्यापर्यंत धाव घेतली...*

काय फरक आहे? तानसेन म्हणतो, मी जर खरं उत्तर दिलं तर तुम्ही माझी गर्दनच छाटून टाकाल. राजा म्हणतो, मी तुला अभय दिलंय, पण मला खरोखर हे जाणून घ्यायची उत्सुकता आहे की तुझ्या आणि गुरूंच्या गाण्यात काय फरक आहे? तानसेन म्हणतो, महाराज आमचे गुरुजी स्वतःसाठी गातात आणि मी मात्र पोटार्थी असल्याने तुमच्यासाठी गातो, हाच आमच्या दोघांमधल्या गाण्यातला मौलिक फरक आहे...

**गणेश मनोहर कुलकर्णी हे राज्य पुरस्कार प्राप्त 'रूळानुबंध' या पुस्तकाचे लेखक आणि कला आस्वादक आहेत.**
**संपर्क : ९८१९९५७८५२**

# स्त्री मनाचे चौकटबाह्य स्वगत



डॉ. नेहा सावंत

काव्यगत संवाद




**१९७०** नंतरच्या टप्प्यातील कवयित्रींमध्ये रजनी परुळेकर हे नाव महत्त्वाचे ठरते. केवळ पाच काव्यसंग्रहांची निर्मिती करून त्यांनी काव्यविश्वात आपली नाममुद्रा वैशिष्ट्यपूर्णतेने उमटविलेली दिसते. 'दीर्घकविता' (१९८५), 'काही दीर्घकविता' (१९९३), 'स्वीकार' (१९९३), 'चित्र' (१९९६), 'पुन्हा दीर्घकविता' (१९९९) असे त्यांचे पाच काव्यसंग्रह प्रकाशित झालेले दिसतात. त्यांच्या काव्यलेखनासाठी राज्य पुरस्कार तसेच कुसुमाग्रज पुरस्कार, ना. धों. महानोर पुरस्कार प्राप्त झालेले असूनही त्या तशा उपेक्षितच राहिल्या. त्यांनी फारशी मंचीय कविता सादर केली नाही. किंबहुना, त्यांच्या कवितेला दाद देणाऱ्या रसिकांना, अभ्यासकांना खेद वाटावा इतपत त्या प्रसिद्धीपराङ्मुखच राहिल्या. वस्तुतः पुरुषप्रधानतेविरूद्धचे बंड तसेच स्त्रीमनाचे भावविश्व अतिशय उत्कटतेने त्यांनी आपल्या कवितेतून प्रकर्षाने आधोरेखित केले आहे. घटस्फोटित स्त्रीचे मनोविश्व, एकाकी स्त्रीचे अनुभव, समलैंगिक संबंध असलेल्या स्त्रियांची मानसिकता असे विविधांगी विश्व त्यांनी कवितेतून रेखाटले. अशा वैविध्यसंपन्न आशयाच्या कविता लिहिणाऱ्या कवयित्रीने ४ मे २०२२ रोजी या जगाचा निरोप घेतला, ही काव्यविश्वाच्या दृष्टीने हानीच म्हणावी लागते...

बऱ्याच वर्षांपूर्वी मुंबई विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष, पदवी कला शाखेच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात 'आव्हान' या नावाचा काव्यसंग्रह अभ्यासाला होता. यात स्त्री लिखित कवितांचा समावेश होता. या संग्रहाच्या निमित्ताने मी प्रथमच रजनी परुळेकर यांची कविता वाचली होती. कवितांचे विषय, आशय सूत्र या संदर्भात इतर कवयित्रींच्या तुलनेत ही कविता मला खूपच वेगळी आणि काहीशी धीट वाटली. त्यांची पहिलीच 'दीर्घ कविता' या संग्रहात होती, 'केस संपल्यानंतर'. मला वाटतं, स्त्री लिखित कवितांमध्ये असा विषय प्रथमच कवितेतून मांडला गेला होता.

घटस्फोटाची केस झाल्यानंतर, ती केस कोर्टात लढवताना स्त्रीला येणारे अनुभव आणि ती केस संपल्यानंतर कोर्टातून बाहेर पडताना स्त्रीची झालेली मनोवस्था या कवितेत रेखाटली होती. तसेच याच संग्रहात त्यांची 'स्पर्श' नावाची कविता होती, जी विविध स्पर्शांची जाणीव करून देणारी होती. मानवी नातेसंबंधांप्रमाणे स्पर्शही किती आश्वासक, उन्मादक आणि आधाराचे किंवा नकोसे वाटणारे, किळसवाणे असतात अशा आशयाची ती  कविता होती. या वेगळ्या पद्धतीच्या कविता वाचल्यानंतर रजनी परुळेकरांच्या कवितांचा सखोल अभ्यास करावा म्हणून उत्सुकतेने 'पुन्हा दीर्घकविता' हा संग्रह परत एकदा हातात घेतला.

**वास्तवदर्शी दीर्घांक**

काव्यसंग्रहाच्या शीर्षकाप्रमाणेच त्यातील प्रत्येक कविता ही दीर्घ स्वरूपाची होती. अर्थातच त्याला दीर्घत्व लाभणं हे स्वाभाविक आणि अपरिहार्य होतं, हे कविता वाचताना जाणवू लागलं. प्रत्येक कविता म्हणजे, स्त्रीच्या मनाचा केवळ हुंकारच नव्हता किंवा स्त्रीची केवळ व्यथा वेदना स्पष्ट करणारी ती कविता नव्हती, तर तिच्या शारीर जाणिवा, स्त्रीची मानसिक आंदोलने या साऱ्यांचा समग्र विचार या कवितेत मांडलेला होता. संपूर्ण काव्यसंग्रह वाचल्यानंतर रजनी परुळेकरांचे वेगळेपण ठळकपणे मनात नोंदवले गेले. त्यांच्या बहुतांशी कविता वैयक्तिक अनुभवाच्या होत्या. या केवळ पारंपरिक प्रेमकवितेसारख्या किंवा रोमँटिक स्वरूपाच्या नव्हत्या. तसेच स्त्रीवरील अत्याचाराच्या किंवा अन्यायाच्या कविता नव्हत्या, तर स्त्रीच्या मनातील सुप्त जाणिवा तसेच नेणिवेतील तिच्या मनोवस्था अशा साऱ्यांचा वेध घेणाऱ्या होत्या.

त्यांच्या कवितेतील स्त्री ही वंचित समाजाचे, कष्टकरी वर्गाचे किंवा तळागाळातील समाजाचे प्रतिनिधित्व करणारी नसून मध्यमवर्गीय समाजातील सांसारिक जीवन जगणारी, नोकरी करणारी अशी आहे. तिच्याही वाट्याला पराकोटीचे दुःख, शोषण, अन्याय, स्त्रीपुरुष नात्यांतील ताणतणाव हे अनुभव येत आहेतच, त्यातून तिला येणारे नैराश्य, विकलता अस्वस्थ करणारी आहे, याकडे ही कविता लक्ष वेधून घेते. हे या कवितेचे वेगळेपण जाणवत गेले.

**स्त्री मनाचा ठणकता कोपरा**

रजनी परुळेकर यांची कविता पूर्वकालीन आणि समकालीन कवयित्रींच्या तुलनेत खूपच वेगळी ठरलेली दिसते. त्यांच्या आधीच्या काळात काव्यलेखन करणाऱ्या पद्मा गोळे, इंदिरा संत, शांता शेळके, शिरीष पै अशा अनेक कवयित्री स्त्रीचे भावविश्व कवितेतून रेखाटत होत्या. पण त्यांची कविता प्रणयी वृत्तीची, आत्मलक्ष्यी, सौंदर्यलक्ष्यी स्वरूपाची होती. तर रजनी परूळेकर यांच्या समकालीन कवयित्रींनीही स्त्रीचे भावविश्व नेमकेपणाने रेखाटले होते. प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अश्विनी धोंगडे, सुशील पगारिया, हिरा बनसोडे यांच्या कवितेत कुटुंब, स्त्रीपुरुष नातेसंबंध, स्त्रीचे एकाकीपण, तिच्यावरील अन्याय, तिच्या व्यक्तिगत जाणिवा असे अनेक विषय आलेले दिसतात, पण त्याहूनही रजनी परुळेकर यांची कविता भिन्न ठरलेली दिसते.

वास्तविक पाहता स्त्री कविता म्हटलं, की स्त्रीच्या व्यथा वेदना, पुरुषप्रधानते विरुद्धचे तिचे बंड, पुरुषांकडून केले जाणारे अत्याचार, अन्याय हाच परिप्रेक्ष्य आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. परंतु रजनी परुळेकर स्त्रीच्या मनातील लैंगिक जाणीव, शरीरसुखाविषयीचे तिचे विचार किंवा शरीरसुखाविषयीची तिची आस, कामातुरता आदी पैलू थेटपणे कवितेतून मांडतात. सर्वसाधारणपणे या जाणिवा खुलेपणाने स्त्रिया व्यक्त करायला धजावत नाहीत. एकवेळ पुरुषाची शरीर सुखाची ओढ किंवा गरज तो स्त्रीकडे हक्काने बोलून दाखवतो, व्यक्त करतो, अधिकारवाणीने किंवा जबरदस्तीने आपली इच्छा पूर्ण करून घेतो किंवा त्याबद्दलचे विविध पर्याय तो निवडतो. हे स्वातंत्र्य त्याला असते. परंतु या गरजा, या नैसर्गिक जाणिवा स्त्रीच्याही असू शकतात, पुरुषाच्या खिजगणतीतही नसतात. मुळात, आपल्या मनातील शारीर गरजा स्त्री कधीही कुणाकडे बोलून दाखवत नाही. ती आतल्या आत घुसमटत राहते. परंतु रजनी परुळेकरांच्या कवितेतील स्त्री थेटपणे शरीराची अनावर भूक,

शरीर सुखाची ओढ व्यक्त करते, म्हणूनच ती पुरुषाच्या नजरेतून हावरट किंवा बदफैली ठरते. परंतु याच गोष्टी पुरुषांनी केल्या तर ते मात्र गृहीत धरले जाते किंवा मान्य केले जाते. या पारंपरिक विचारसरणीला रजनी परुळेकर मोडू पाहतात, एकूणच, पुरुषसत्ताक कुटुंब पद्धतीतील स्त्री-पुरुष असमानता, पुरुषी वर्चस्व त्या प्रखरपणे अधोरेखित करतात.

कधीकधी त्यांच्या कवितेत वैयक्तिक पातळीवरील अनुभवांना काव्यरूप दिलेले दिसते, म्हणून ही कविता आत्मलक्ष्यी ठरते, तसेच ती आत्मकेंद्रीही ठरते. स्त्रीच्या मनात एका मागोमाग एक उठणारे भाव तरंग किंवा भाव लहरी आणि जाणीव नेणिवेतील अनुभूती संज्ञाप्रवाही जाणिवेप्रमाणे त्यांच्या कवितेतून व्यक्त होत राहते, म्हणूनच कवितेला दीर्घत्व प्राप्त झालेले दिसते आणि ते अपरिहार्य असलेलेही जाणवते. या साऱ्या वैशिष्ट्यांमुळे त्यांची कविता वेगळी ठरते.

**उत्कट भावबिंब**

रजनी परुळेकर आपल्या कवितेविषयी म्हणतात की, मला गरज होती व्यक्त होण्याची आणि ती गरज अगदी उत्कट होती. काहीतरी काळजाला स्पर्श करणारं अनुभवलं की उत्कटतेने मी कवितेकडे वळत होते. माझ्या पुष्कळ कविता थेट आहेत, त्या शरीराविषयी बोलतात, शरीर संबंधाविषयी बोलतात. मी माझ्या अनुभवांशी प्रामाणिक राहून लिहिते. पुढे त्या असेही म्हणतात, की आपल्या समाजात बाईकडे पुरुषजात किती दांभिकपणे पाहते, हे मला आयुष्याने चांगलं समजावलंय, माझी कविता हा पुरुषांचा दांभिकपणाच उघड करत जाते. स्त्रीला मालकीची वस्तू समजण्याचा पुरुष दृष्टिकोनच उघड करते. हाच विचार त्यांच्या 'फेर', 'पुरुष', 'नग्न सत्य' या कवितांमधून व्यक्त झालेला दिसतो. या साऱ्याच कविता कवयित्रीच्या उत्कट अनुभवामुळे आणि व्यक्त होण्याच्या अपरिहार्यतेतून निर्माण झाल्याचे मनोमन पटते.

रजनी परुळेकर यांच्या अनेक दीर्घ कवितांपैकी एक उल्लेखनीय दीर्घकविता म्हणजे, 'रिसेप्शन आणि स्वगत' ही होय. कवितेचे शीर्षकच अतिशय बोलके आणि थेट विषयाला भिडणारे आहे. ही कविता केवळ स्त्रीच्या भावविश्वावर प्रकाश टाकीत नाही, तर लग्नसमारंभाच्या निमित्ताने एकूणच समाजातील माणसामाणसांचे परस्पर संबंध विशेषत: स्त्री-पुरुष नातेसंबंध याविषयीचे चिंतन करताना दिसते. या कवितेतील निवेदक म्हणजे, एका लग्नाच्या रिसेप्शनला आलेली एक अनुभवी संसारी स्त्री आहे. अतिशय आनंदात असणाऱ्या नववधूला पाहून तिच्या मनात जे विचार येतात, ते या कवितेतून जसेच्या तसे इथे नोंदवले आहेत. म्हणूनच ती आपल्या मनातील विचारांना स्वगत असे म्हणते. तसेच लग्न समारंभातील बेगडी वातावरण पाहून तिच्या मनात आलेले विचार ती कवितारूपातून व्यक्त करत आहे. लग्नमंडपातील माणसांच्या गर्दीला उद्देशून कवयित्री माणसांनी फुललेले ताटवे अशी समर्पक प्रतिमा योजते. त्याचवेळी नववधूला पाहताच तिच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात, जे आजच्या वस्तुस्थितीचे यथार्थ वर्णन करणारे आहेत, जे कधीकाळी निवेदिकेनेही अनुभव घेतलेले होते. म्हणूनच ती म्हणते –

*किती स्वप्नं असतील या नवऱ्यामुलीची?*
*बहुतेक जोडप्यांप्रमाणे वर्ष दोन वर्षांत*
*संपून जाणारे आकर्षण*
*आणि एकमेकांची मनं? आवडीनिवडी?*
*पूर्वीच्या लग्नपत्रिकात तर असंच छापायचे*
*''यांचा शरीरसंबंध जुळवायचे योजिले आहे''*
*पुरुषात तेवढ्या प्रतिष्ठेच्या पायऱ्या*
*शिपाई, कारकून, ऑफिसर, मॅनेजर*
*बायका सगळ्या गृहीत धरलेल्या*

**(संपूर्ण कविता वाचण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.)**

वरील ओळींमधून पूर्वी लग्न या शब्दा ऐवजी शरीरसंबंध असा शब्द लग्नपत्रिकेत छापला जायचा, याकडे ती लक्ष वेधते, एकीकडे तोच शब्द किती खरा आणि यथार्थ होता, असे तिला वाटते. पण कालांतराने लग्न हा शब्दच किती कृत्रिम व तकलादू आहे, हे तिने अनुभवांती जाणले होते, म्हणूनच त्या नववधूविषयी तिला सहानुभूती वाटू लागते. कारण लग्नाच्या नव्यानव्या दिवसांत, एकमेकांविषयीचे नवे आकर्षण ओसरल्यावर ते आकर्षण केवळ शारीरिक होते, याची प्रत्येक नवविवाहित स्त्रीला जाणीव होते आणि दोघांची मनं आणि आवडीनिवडी जुळतात की नाही, हे ओळखण्यात आयुष्य समपून जातं, हे भेदक वास्तव कवयित्री अधोरेखित करते. एकंदरीत हा समाज पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेला महत्त्व देणारा आहे, पुरुष कसाही असला तरी त्याला प्रतिष्ठा मिळते, पण स्त्री एकाच वेळी अनेक आघाड्या सांभाळूनही ती केवळ पुरुषाची दासीच असते, हा दुखरा भाव कवयित्री व्यक्त करते. स्त्रीची

गुणवत्ता केवळ एकाच पातळीवरची मानली जाते, तिने रांधा, वाढा, उष्टी काढा, नोकरी करा, घरातल्यांची आजारपणं काढा, वंशाला एक दिवा द्या; बाकी ती कितीही मोठ्या पदावर असली तरी तिची किंमत शून्य. स्त्री विषयीचे हेच विदारक चित्र सर्वत्र दिसते, ते कवयित्रीला खिन्न करते.

**बोलीभाषेची स्वाभाविक लय**

कवितेच्या पुढच्या भागात कवयित्री एक दृश्य टिपते, मित्रांच्या कोंडाळ्यात बसलेल्या एका ढेरपोट्या पुरुषाला पाहून त्याच्या बायकोला त्याची किती किळस येत असेल, हा विचार करते. कारण एरवी एक मूल झाल्यावर, चाळिशी नंतरही बायकोने सुंदरच दिसावं, तिने आपली अंगकाठी शिडशिडीत ठेवावी, (स्वत: मात्र शरीराने कितीही स्थूल झाला तरी चालेल.) ही अपेक्षा पुरुषाची असते, तशी अपेक्षा स्त्रीने पुरुषाबद्दल बाळगणं चूक आहे का, आपली पत्नी देखणी आणि बांधेसूद असावी, हे जसं पुरुषाला वाटतं तसंच आपला नवराही देखणा आणि शिडशिडीत असावा, अशी स्त्रीची अपेक्षा असू नये का, तिला ढेरपोट्या नवऱ्याची किळस वाटू नये का, असा स्वाभाविक प्रश्न तिला पडतो, म्हणूनच ती म्हणते –

*मित्रांच्या कोंडाळ्यात बसलेला*
*तो एक ढेरपोट्या*
*त्याच्या बायकोला*
*किळस नसेल वाटत त्याची ?*
*बाळंतपणं झाली, चाळिशी उलटली*
*तरी बायकोची फिगर मात्र*
*महत्त्वाची वाटते यांना !*

एकंदरीतच स्त्रीकडे पाहाण्याची पुरुषांची नजर भोगवस्तू अशीच असते, हे नमूद करताना तिला इतर काही प्रसंगही आठवतात. उदा. एका सुशिक्षित मैत्रिणीला ती हॉटेलमध्ये एकटीच चहा घेत असताना हमालाने मारलेला डोळा, आजारपणात केवळ बिछान्यात पडून असते, म्हणून नवऱ्याने नाकारलेली बायको  या आठवणींवरून पुरुषवर्गाची स्त्रीकडे पाहण्याची संकुचित आणि स्वामित्वभावाची दृष्टी कवयित्रीला अस्वस्थ करते. लग्न समारंभातील काही देखण्या पुरुषांचे, विशेषत: आइस्क्रीम देणाऱ्या देखण्या पुरूषाचे कवयित्रीला आकर्षण वाटते, हे ती मोकळेपणाने व्यक्त करते, पण त्याचवेळी कृत्रिमपणे वागणाऱ्या, नाटकीवृत्तीचा तिला तिटकाराही वाटतो. एकट्या दुकट्या बसलेल्या स्त्रीकडे सूचकपणे पाहणाऱ्या पुरुषी नजरेचाही तिला राग येतो. निखळपणे, मैत्री भावाने यांना  का वागता येऊ नये ? असा प्रश्न तिला भेडसावतो, म्हणूनच ती म्हणते –

*एकेक भेटतात तेव्हा*
*किती वेगवेगळे असतात हे !*
*पण ग्रूपमध्ये गेले की*
*किती गढूळ बोलतात*
*स्वतंत्र वृत्तीच्या बायकांबद्दल !*
*जणू चार-पाच सांडपाण्याचे नाले*
*एकमेकांना येऊन मिळालेयत*

एकेकटे पुरुष एखाद्या स्त्रीला भेटतात, तेव्हा सभ्यतेचा बुरखा पांघरणारे पुरुष तिच्या पाठीमागे किती असभ्य बोलतात, वरवर तिच्या स्वतंत्र बाण्याबद्दल, स्वतंत्रपणे निर्णय घेऊन राहण्याबद्दल कौतुक करणारे पुरुष तिचे स्वातंत्र्य सहन करू शकत नाहीत, तिच्या स्वातंत्र्याचा विपरीत अर्थ लावून तिची बदनामी करतात, त्याचाही अनुभव अशा लग्नसमारंभाच्या निमित्ताने येतोच, हे ती दाखवून देते. केवळ पुरुषच अशा दूषित नजरेने स्वतंत्र वृत्तीच्या किंवा परित्यक्ता स्त्रीकडे पाहतात, असे नाही तर सर्वसामान्य स्त्रियाही तिच्याकडे सहानुभुतीने पाहत नाहीत, जणू स्त्रीने पुरुषाला नाकारणे किंवा पुरुषाने स्त्रीला नाकारणे हा स्त्रीने केलेला गुन्हा असावा, अशा नजरेने तिच्याकडे पाहिले जाते. हा अनुभव कवयित्रीला अधिक विषण्ण करतो.

लग्नानंतर नवरा बायकोच्या वागण्यात किती बदल होत जातो, यावर कवयित्री विचार करताना, तिला तिच्या मैत्रिणींचे संवाद आठवू लागतात,

*''हा बाहेरून पोरी फिरवून येणार*
*म्हणजे माझ्यासाठी संपलेलाच*
*दिवसांमागून दिवस लोटतात*
*आपण वाट पाहत राहायचं*
*आणि विझून जायचं अखेर*
*मग अकल्पितपणे एक दिवस*
*सहन करायचा तो त्याचा बलात्कार''*

पुरुष लग्नानंतरही हवे ते करायला मुक्त असतो, पण असं स्वातंत्र्य स्त्रीला मात्र नसतं. त्याच्यासाठी तिचे शरीरही त्याच्याच हक्काचे असते. पण तसा हक्क तो बायकोला देत नाही. बायकोलाही शरीरसुखाची प्रकर्षाने गरज वाटू शकते, हे

त्याच्या ध्यानीमनीही नसतं. तिने फक्त त्याच्या गरजेप्रमाणे आपलं शरीर त्याच्या हवाली करून, त्याने केलेला बलात्कार निमूटपणे सहन करायचा असतो. येथे कवयित्री स्त्री पुरुष, नवरा बायको यांच्या नात्यातील ताण तणाव अधोरेखित करते. स्त्रीलाही शरीरसुखाची स्वाभाविक, नैसर्गिक ओढ असते ही जाणीव धीटपणे व्यक्त करते.

*''गर्भाशियात बीजं पडत गेली*
*आणि मुलं होत गेली*
*पण स्त्रीला मिळायला हवा तो*
*ऑरगॅझम्, तो तृप्तीचा परमोच्च क्षण*
*माहीतच नाही मला.''*

वरील ओळीत स्त्रीच्या ऑरगॅझम्, परमोच्च सुखाचा विचार थेटपणे मांडलेला दिसतो, हे रजनी परुळेकर यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्ट्य म्हणता येईल. केवळ मुलांना जन्म देणे किंवा गर्भवती होणे यातच तिचे सुख नसून तिलाही प्रणयाचा, संभोगक्षणांचा निखळ आनंद घ्यायचा असतो , याकडे कवयित्री निर्देश करते. अशाच तऱ्हेचा अनुभव रजनी परुळेकर त्यांच्या 'फेर' या कवितेत व्यक्त करताना म्हणतात –

*''मन गुंतलेलं नसेल तर नको ते शरीरसुख''*
*''आजन्म एकट्या राहू पुरुषाशिवाय''*

शरीरसंबंध हा केवळ शरीराशीच निगडित नसतो, मन आणि भावना त्यात गुंतलेल्या असतील तर त्या प्रणयात, शृंगारात आनंद असतो, असोशी असते, स्त्रीला असा आनंद हवा असतो हे कवयित्री अधोरेखित करते. पण असं मोकळेपणाने व्यक्त करणारी स्त्री पुरुषाला बदफैली वाटते, या पुरुषाच्या संकुचित मानसिकतेचाही कवयित्री धीटपणे उच्चार करते.

लग्नाच्या रिसेप्शनच्या निमित्ताने कवयित्रीचे विचारचक्र गतीने फिरत राहते, शेवटी स्त्रीच्या वाट्याला एकाकीपणच येते, हे ती नमूद करते. लग्न म्हणजे जणू संगीत खुर्चीचा खेळच आहे, असे तिला वाटते. त्याचवेळी या लग्नातील नव्या नवरीबाबत सहानुभुतीने विचार करताना ती म्हणते –

*ही नवी नवरीही काही वर्षांनी*
*अशीच भेटेल कुणाच्या लग्नात*
*तिच्याबरोबरही असेल*
*संगीतखुर्ची खेळणारा मुलगा*
*त्यावेळी स्त्री-पुरुष नात्याबद्दल*
*कोणतं स्वगत चालेल तिचं ?*
*की तेवढा विचार करण्याएवढा*
*विकासच झालेला नसेल तिच्या बुद्धीचा ?*

आज जी नवीनवरी दिसतेय, ती आणखी काही वर्षांनी अनुभवी संसारी स्त्रियांच्या रांगेत येईलच, तेव्हा ती आपल्यासारखाच विचार करील का? स्त्रीपुरुष नात्यांमधील तेढ तिला जाणवेल का? निदान असा विचार करण्याइतकी विचारक्षमता तिच्यात असेल का? की रांधा, वाढा, उष्टी काढा या पारंपरिक चौकटीत जगणारी, नवऱ्याच्या अधिकारात जगण्यात धन्यता मानणारी असेल? अशा शंकांचे काहूर कवयित्रीच्या मनात उमटत राहते. एकूणच दीर्घ कवितेच्या या अवकाशात स्त्री पुरुषांच्या वेगवेगळ्या मानसिकतेचा व्यापक विचार मांडलेला दिसतो.

या कवितेची शब्दकळा तशी साधी सोपी, तसेच रोजच्या व्यवहारातील बोलीभाषेप्रमाणे योजलेली असल्यामुळे कविता अगदी सहजपणे उलगडत जाते. कवयित्रीच्या मनात येणाऱ्या विचारांना स्वगताचे रूप दिले आहे, किंबहुना ते स्वगतच काव्यरूप धारण करून येते.

*माणसांनी फुललेले ताटवे*
*गुलाबपाणी, बँडवरची गाणी*
*फुलांचे गजरे*
*रिकाम्या खुर्च्यांवर*
*संगीतखुर्ची खेळणारी मुलं*

अशा शब्दांतून कवयित्री लग्न समारंभाच्या हॉलमधील वातावरणनिर्मिती नेमकेपणाने करते. ही कविता गद्यप्राय स्वरूपाची असली तरी बोलीभाषेची स्वाभाविक लय या कवितेला असल्याचे दिसून येते. प्रतिमा, प्रतिकांची फारशी योजना न करताही काव्यात्म परिणाम साधण्यात ही कविता यशस्वी झालेली दिसते.

एकंदरीत, या कवितेत कवयित्रीने स्त्रीपुरुष नातेसंबंध विविध परिप्रेक्ष्यातून मांडलेले दिसतात. स्त्रीच्या शारीर जाणिवांबाबत धिटाईने काही भाष्य केलेले असले तरी कवितेचा सूर काहीसा निराशावादी असलेला दिसतो. कवयित्रीने या कवितेत तिच्या वैयक्तिक अनुभवाला काव्यात्म रूप दिलेले दिसते, यादृष्टीने ही कविता आत्मलक्ष्यी स्वरूपाची आहे, असे असले तरी ही कविता खाजगी स्वरूपाची न ठरता, स्त्री मनाचे भावकल्लोळ व्यक्त करणारी यादृष्टीने ती प्रातिनिधिक स्वरूपाची ठरते. ही कविता जितकी आत्मलक्ष्यी

आहे, तितकीच ती संपूर्ण स्त्री समाजाकडे तटस्थतेने पाहणारी देखील आहे. असं म्हटल्यास वावगे ठरू नये. कवितेतील स्थलकाल, आशय आणि आविष्कार यांची सहेतुक आणि सार्थ योजना केल्यामुळे ही कविता अधिक प्रत्ययकारी आणि परिणामसाधक अशी झालेली दिसून येते.

**संदर्भ –**

**१) परुळेकर रजनी; पुन्हा दीर्घ कविता, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.**

**२) ढेरे अरूणा (संपा.); स्त्री –लिखित मराठी कविता (१९५० – २०१०) पद्मगंधा प्रकाशन, पुणे.**

**३) पै शिरीष, संगवई विजया; आव्हान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे**

**डॉ. नेहा सावंत अंधेरी–मुंबई येथील भवन्स महाविद्यालयात मराठी विभागप्रमुख आहेत. त्यांनी कुपारी बोलीतील साहित्याचा चिकित्सक अभ्यास या विषयावर पीएच.डी. मिळवली असून, लेखन, शब्दांकन, संपादन, अभिनय, डबिंग, सूत्रसंचालन आदी क्षेत्रात त्या सक्रिय राहिल्या आहेत.**

**संपर्क** : nehasawant603@gmail.com

# पाठराखण




खिशा–पाकिटातल्या हिरव्या, निळ्या, गुलाबी कागदांपेक्षा काळी अक्षरे उमटलेल्या पुस्तकांच्या पांढऱ्या कागदावर जास्त प्रेम करणाऱ्या भाग्यवान माणसांच्या जमातीतला एखादा मान्यवर सरदार म्हणून शोभावा अशा नीतिन वैद्य यांनी आयुष्यभर पुस्तकांवर अपार प्रेम केलं आणि या ग्रंथ–मैत्राचा अपार अभिमान बाळगला. या अद्भुत मैत्राच्या रानवाटेवर उमललेली सुंदर रानफुले वाटावी, अशी सुरेख टिपणे आणि लेख त्यांनी वेळोवेळी लिहून ठेवले. अशा अपार पुस्तकमैत्राने दरवळणारे मोजके लेख म्हणजे, 'वाचून उरणारी पुस्तकं'

'पुस्तक संपतं, पण तिथून ते वाचकांच्या मनात सुरू होतं' या सारखे विचक्षण भाष्य नीतिन नोंदवतात. त्यांचे वाचन भाषांच्या सीमा किती सहज ओलांडतं, याचं अतिशय विदग्ध दर्शन हिमालयविषयक पुस्तकांवरच्या लेखात घडतं. हिमालय या एकाच विषयावरच्या अनेक हिंदी पुस्तकांची अतिशय रंजक आणि समृद्ध करणारी ओळख लेखात करून दिली आहे.

हिंदी पुस्तकांबाबत अजून सांगायचं तर उदयन वाजपेयी यांच्या मुलाखतवजा संवाद ग्रंथांच्या परिचयातून इतक्या ज्ञानी, चिंतनशील, प्रतिभावंत माणसांचे अद्भुत सुंदर दर्शन नीतिन करून देतात की, ती सर्व पुस्तकं वाचल्याबद्दल आपल्याला त्यांचा हेवा वाटायला लागतोच, पण आपण स्वतः ती पुस्तकं कधी एकदा वाचतो असं होतं. ही भावना हेच वैद्य यांच्या या पुस्तकाचं सर्वात मोठं यश आहे.

नीतिन वैद्य यांचं हे दीर्घकाळ पुरणारं, आपल्याला विविध विषयांवरच्या पुस्तकांपर्यंत पोचवणारं आणि वाचून मनात उरणारं मौलिक पुस्तक आहे.

**– संजय भास्कर जोशी**

**वाचून उरणारी पुस्तकं**
**लेखक–नीतिन वैद्य**
**प्रकाशक–रोहन प्रकाशन**
**मूल्य–३५० रुपये**

# सुलेखाचं रुदन



अनुवाद : सुमती जोशी

**मूळ कथा : वनफूल**

**बंग नाद**



**ल**घुकथेची खुमारी काही औरच असते. त्यातही लघुकथेची मूळ भाषा बंगाली असेल, तर ती कथा बंगालच्या मातीचा आणि त्या मातीत फुलणाऱ्या मानवी नातेसंबंधांचा गंध घेऊनच अवतरते. त्यात त्या नातेसंबंधातून आलेली लय असते, नादही असतो. ही लय आणि हा नाद कधी वाचकाला धक्का देतो, कधी अंतर्मुख करतो, तर कधी बुचकळ्यातही पाडतो. बंगाली भाषेचे सौंदर्य यात असतेच, पण त्या त्या लेखक-लेखिकेची दृष्टी वाचकांचे भानही विस्तारते. अशाच काही निवडक कथांचा हा भावानुवाद...

सुलेखा रडत होती.

बरीच रात्र झाली होती. बाहेर टिपूर चांदणं पसरलं होतं. अशा स्वप्नमय परिसरात दुधाचा फेस पसरलेला असावा, अशा शय्येवर सुलेखा ही सोळा वर्षांची तरुणी उपडी झोपून जोरजोरात रडत होती.

एकटी.

खोलीत आणखी कोणी नव्हतं. चांदण्याची एक तिरिप चोरून हळूच खिडकीतून खोलीत आली. वेदनेमुळे रडत असलेल्या सुंदरीला बघून ती थबकून उभी राहिली. का बरं रडत असावी ती?

प्रेम? असू शकेल. चांदण्यात न्हाऊन निघालेल्या या शोडषीच्या नयनातून अश्रूंचा पूर यायचं कारण प्रेम असू शकेल. सुलेखाच्या जीवनात एकदा प्रेम येऊ घातलं होतं ना! तेव्हा तिचा विवाह झाला नव्हता. अरुणदा नावाचा युवक तिला मनापासून आवडत असे. तेव्हा ती खूपच सावध होती आणि तिनं मनातल्या मनात प्रेमाची ती भावना जपली होती. ही आवडच स्वाभाविक नियमानुसार प्रेमात परिणत झाली असती, पण सामाजिक नियमांनी त्यात अडचण निर्माण केली. सामाजिक नियमांपुढे मान तुकवत तिनं अरुणदांऐवजी बिपीन नावाच्या एका तरुणाच्या गळ्यात वरमाला घातली.

अपरात्री पसरलेल्या पांढऱ्याशुभ्र चांदण्यात कदाचित तिला अरुणदांची तीव्रतेनं आठवण येत असेल. या रिकाम्या शय्येकडे पाहून त्यांच्या आठवणीमुळे होत असावं, हे अश्रू तर्पण! तिच्या अंतर्मनात लपलेली हृदयाची हाक तिने अरुणदांना जाणवू दिली नव्हती. अंतर्मनात ओढ आणि आकांक्षा जागी झाली असली, तरी विवाह झाल्यावर काळाच्या अमोघ नियमानुसार हळूहळू हे भाव आपोआप कमी झाले.

बिपीन म्हणजे अरुणदा नाहीत. बिपीन हा बिपीनसारखा! अगदी सहज स्वाभाविक बिपीन. नवल वाटत असलं, तरी बिपीनच्या या बिपीनत्वावर सुलेखाने मनापासून प्रेम केलं होतं, हेही तितकंच खरं होतं. प्रेम करून ती सुखी झाली होती. या अपरात्री विस्मृतीत गेलेल्या अरुणदांची आठवण काढून डोळ्यातून पाणी गाळण्याइतकं सुलेखाचं मन भूतकाळात रमणारं होतं का?

असू शकेल. स्त्रीचं मन विचित्र. त्यांची मानसिकताही अद्‌भुत! त्याविषयी चटकन मत व्यक्त करणं उचित होणार नाही. वास्तविक स्त्रियांविषयी कोणतंही भाकीत वर्तवणं ही धाडसी कृती ठरते. एखाद्या रमणीला बघितल्यावर ती एकोणीस-वीस वर्षांची असेल असं वाटतं, पण चौकशी केल्यावर समजतं ती पस्तिशीची आहे. हा अनुभव लक्षात ठेवून सावध होत एखादीचं वय पंचवीस असेल असा अंदाज केला तेव्हा समजलं, प्रत्यक्षात तिचं वय पंधरापेक्षा एक मिनिटही अधिक नव्हतं.

एवंच स्त्रियांविषयी चटकन मूर्खासारखं मंतव्य करणं उचित होणार नाही. प्रत्येक वेळी सारासार विचार करणं आवश्यक ठरतं. हेच सारतत्त्व मला समजलंय म्हणूनच सुलेखाच्या रुदनाविषयी मी फार काही बोलत नाही. मला त्याविषयी काही माहीत नाही. रुदनाची सुयोग्य आणि सुसंगत अशी जी कारणं शक्य वाटतायत तीच सांगायचा मी प्रयत्न करतोय.

अपरात्री एकाकी खोलीत एक तरुणी बिछान्यावर आडवी होऊन सतत रडतेय... हा एखाद्या डिटेक्टिव्ह कादंबरीचा पहिला परिच्छेदही होऊ शकतो. विश्वसनीय सूत्राकडून मला विशेष काही समजलंय, असा भाग नाही. त्या विषयी वाचकांनी निर्धास्त व्हायला हरकत नाही. बिपीन आणि सुलेखा यांच्याविषयी जी काही माहिती आहे, त्यावरून ती उभयता डिटेक्टिव्ह कादंबरीचे नायक-नायिका होऊ शकतील, अशी शक्यता वाटत नाही.

अरुणदांचा विचार सोडून दिला, तर सुलेखाच्या रुदनाची आणखी एक शक्यता मनात येतेय. काही दिवसांपूर्वी सुलेखाला एक अपत्य झालं होतं. तिचं पहिलंवहिलं अपत्य. दोन महिन्यांपूर्वी अचानक डिप्थेरिया झाल्यामुळे ते अपत्य देवाघरी गेलं. कदाचित त्या बाळाचा चेहरा डोळ्यासमोर दिसू लागल्यामुळे तिचं मातृ-हृदय हेलावलं असावं. बालकाचा मृत्यू झाल्यावर सुलेखा दोन दिवस बेशुद्ध पडली होती, हे विश्वसूत्रानुसार स्वाभाविक होतं. जे कायमचं हरवून गेलंय, ते क्षणभरासाठी तरी पुन्हा मिळावं, अशी व्याकुळता कठोर पुरुषांनाही अधूनमधून वाटत रहाते. कोमल मनाच्या रमणीच्या अंत:करणात तशी भावना निर्माण होणं, सहज शक्य आहे. पुत्रशोक हे तिच्या रुदनाचं कारण असू शकेल.

आणखी एक कारणही असण्याची शक्यता आहे. पुत्रशोक या कारणापाठोपाठ मी ही गोष्ट सांगतोय म्हणून वाचकांनी मला क्षमा करावी. सुलेखाच्या रुदनाच्या या शक्यतेकडे मी दुर्लक्ष करू शकत नाही. गेल्या काही दिवसांपासून एक नावाजलेला चित्रपट स्थानिक सिनेमागृहात दाखवला जातोय. पाड्यावरचे

बरेचसे स्त्री-पुरुष गटागटाने जाऊन हा चित्रपट बघून आले होते आणि उत्साहाने त्याची प्रशंसा करत होते. पण बिपीन हा माणूस इतका अरसिक होता, की सुलेखाच्या सततच्या मागणीकडे दुर्लक्ष करून तो तिला चित्रपट बघायला घेऊन गेला नाही. प्रांजळपणे सांगायचं तर त्यानं तिची उपेक्षा केली होती. सुलेखाला ज्या गोष्टी आवडत त्याविषयी बिपीनच्या मनात राग असे.

एकंदरीत बिपीन हा नवल वाटावं असा माणूस! चित्रपटाचा लास्ट शो संपला होता. सुलेखाच्या शयनगृहाच्या खालच्या बाजूला चित्रपटगृहाकडे जाणारा रस्ता. काही वेळापूर्वी त्याच रस्त्यावरून प्रेक्षक गटागटाने चर्चा करत जात होते. कदाचित त्यामुळे सुलेखाची चित्रपट बघायची आवड उफाळून आली असेल. पण ती एकटीच का दिसतेय? बिपीन कुठे गेलाय? नाईलाज झाल्यामुळे अशा अपरात्री दुसऱ्या चित्रपटाचं बुकिंग करायला गेला की काय?

असू शकेल. तरुण पत्नीला शांतवण्यासाठी माणूस काहीही करू शकतो. कसाही असला तरी बिपीन माणूसच आहे ना? शिवाय बिपीन सुलेखावर मनापासून प्रेम करतो, हे विश्वसनीय सूत्राकडून मला समजलं होतं. आम्ही लेखक मंडळी विश्वसनीय सूत्रांकडून सत्य जाणून घेत असतो. साहजिकच सुलेखाचं रुदन चित्रपटाच्या अनुषंगाने असण्याची शक्यता नाकारता आली नसती.

काहीही असण्याचा संभव होता. जसजसा अधिकाधिक विचार करू लागतो तसतसे सुलेखाच्या रुदनाचे विविध हेतू मनात येऊ लागले. आजच संध्याकाळी साडीचे काठ निवडण्यावरून सुलेखा आणि बिपीन यांच्यात मतभेद झाले. अशा प्रसंगी पुरुष जे करतात तेच बिपीनने केलं. आवाजाच्या जोरावर, अर्थात ओरडून त्याने आपल्या मनासारखं करून घेतलं. तो जिंकला. मृदुभाषी तरुणी साधारणपणे ज्या उपायांनी पुरुषांवर कुरघोडी करतात, सुलेखाने तोच मार्ग अनुसरला होता, अर्थातच ती रडली.

कारण कोणतं का असेना, सुलेखाचं रुदन नि:संशय करुण होतं. चांदण्यांत न्हाऊन निघालेल्या अपरात्री ते अधिकच करुण वाटू लागलं. एखाद्या सहृदय वाचकांनी या घटनेला करुणतम म्हटलं तरी मी त्याला हरकत घेऊ शकणार नाही. सुलेखा एक तरुणी. ती अपरात्र असो नाहीतर चांदण्यात न्हाऊन निघालेली रात्र असो. अशा वेळी जर एखादं लहान मूल किंवा एखादी वृद्धा रडली असती तर मी इतका हेलावून गेलो नसतो. उलट मी त्यांच्याकडे दुर्लक्षच केलं असतं.

सुलेखा तरुण होती. साहजिकच मी विरघळलो. सुलेखाच्या रुदनाचं कारण समजल्याशिवाय माझ्या जीवाला स्वस्थता वाटेना. अरुणदांवर चटकन एखादं काव्य करावं, असाही विचार मनात डोकावून गेला. मन म्हणत होतं, अशा चांदण्या रात्री किशोरवयातील ती अर्धवट उमललेली प्रेमभावना पूर्ण उमलण्याची शक्यता नाकारता येईल का? समोरच्या बगिच्यातली रजनीगंधाची फुलं स्वप्न-विव्हल झाली होती. चहूकडे चांदणं पसरलं होतं. अशा दुर्लभ क्षणी अरुणदांची आठवण मनात जागी होणं अशक्य होतं का? किंवा तो अपराध ठरला असता का? मनातला हा संवाद बंद झाला. अचानक कोणीतरी कपाटाचं दार उघडलं. घाईघाईनं बिपीन आत आला. चेहऱ्यावर काळजीची सावली. सिनेमाची तिकीटं मिळाली नसावीत. पण हे काय!

बिपीनने विचारलं, ''दातदुखी कमी झाली का?''

''नाही, खूप दुखतंय.''

''ही पुडी घे. डॉक्टरबाबू उद्या सकाळी येणार आहेत. आता रडू नकोस. हे घेतलंस की दुखणं कमी होईल. घे ग माझी राणी ती!''

चांदण्याचे किरण गालातल्या गालात हसत होते...

**वनफूल यांनी लिहिलेल्या 'सुलेखार क्रंदन' या बंगाली कथेचा भावानुवाद. अनुवादिका सुमती जोशी या राज्य पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखिका आहेत. त्यांची उत्क्रांती, बंगरंग, दैत्याचा बगीचा, मंत्र आदी स्वतंत्र तसेच अनुवादित पुस्तके प्रकाशित झाली आहेत.**

**ईमेल :** sumatijoshi154@gmail.com

# गुणवत्ता आयुर्वेदिक औषधांची



डॉ. श्रीराम सावरीकर








**बा**जारात विकल्या जाणाऱ्या आयुर्वेदिक औषधांची गुणवत्ता हा अत्यंत गंभीर विषय आहे. तरीही आयुर्वेदिक औषध निर्माते, औषध विक्रेते, वितरक, आयुर्वेदिक डॉक्टर, ते औषध खरेदी करून सेवन करणारा ग्राहक, ग्राहक सेवा क्षेत्रात काम करणाऱ्या सामाजिक संस्था आणि एकूणच समाज या विषयाबाबत अत्यंत उदासीन आहेत. आयुर्वेदिक औषधे नैसर्गिक असल्यामुळे त्यांपासून कांही शारीरिक हानी होत नाही, हा सार्वजनिक गैरसमज हे याचे प्रमुख कारण होय. वास्तविक आयुर्वेदिक औषधाचे गुणवत्ता निर्धारक वैधानिक निकष केंद्र शासनाने प्रसिद्ध केलेले आहेत. केवळ त्यांचे पालन होते की नाही, यावर नियंत्रण ठेवणे हे राज्य स्तरावरील औषध नियंत्रक प्रशासनाचे कर्तव्य आहे. ज्याकडे या ना त्या कारणाने राज्य प्रशासने दुर्लक्ष करतात असे दिसून येते. स्वयंप्रेरणेने डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय आयुर्वेदिक औषध सेवन करणाऱ्या लोकांची संख्या समाजामध्ये खूप अधिक आहे. त्यामुळे गुणवत्ताहीन सदोष औषध सेवनाने आरोग्यास धोका पोहोचण्याची शक्यता खूपच बळावलेली असते...

**औ**षधाची गुणवत्ता वर्णन करताना संपन्न, योग्य औषध आणि युक्त भैषज्य असे शब्द आयुर्वेद संहिता ग्रंथांत वापरले आहेत. औषधाचा अपेक्षित परिणाम मिळवण्यासाठी चिकित्सकासाठीच नव्हे, तर ते औषध सेवन करणाऱ्या व्यक्तीसाठीही हे शब्द मार्गदर्शक आहेत. यातील संपन्न व योग्य औषध हे शब्द औषध गुणवत्तादर्शक तर युक्त भैषज्य हे शब्द औषधाच्या योग्य वापराशी संबंधित आहेत. औषधाची संपन्नता व योग्यता औषध निर्मात्याच्या हाती, तर त्याची युक्तता म्हणजे योग्य वापर हा चिकित्सक व औषध सेवन करणारी व्यक्ती म्हणजेच रूग्णाच्या हाती असते. कोणतेही औषध संपन्न व योग्य असेल आणि त्याचा वापर योग्य झाला असेल, तर आणि तरच त्या औषधाचा अपेक्षित परिणाम दिसून येईल अन्यथा ते औषध केवळ निरूपयोगीच नव्हे तर अनेकदा आरोग्यास हानीकारकही ठरण्याची शक्यता असते.

**फार्माकोपिया कमिशन**

जगभरातील देश ॲलोपॅथिक औषधांची स्वीकारार्ह गुणवत्ता दर्शक मानके स्वतःच्या भेषज संहितेमध्ये म्हणजेच फार्माकोपियामध्ये प्रसिद्ध करीत असतात. काही देश त्यांचा स्वतःचा फार्माकोपिया नसेल तर अन्य देशाचा जसे की ब्रिटिश फार्माकोपिया (बी पी), यु एस. फार्माकोपिया (यु एस पी) इत्यादींचा संपूर्ण स्वीकार करतात. भारतामध्ये ॲलोपॅथिक औषधांची वैधानिक मानके इंडियन फार्माकोपियामध्ये (आय पी) मध्ये प्रसिद्ध केलेली आहेत.

ॲलोपॅथिक औषधांची गुणवत्ता दर्शक मानके निश्चित करण्याचे काम भारतीय भेषज संहिता आयोग म्हणजेच, इंडियन फार्माकोपिया कमिशन (आय पी सी) या संस्थेमार्फत चालते. याच धर्तीवर फार्माकोपिया कमिशन ऑफ इंडियन मेडिसिन अँड होमियोपॅथी (पी सी आय एम अँड एच) ही संस्था आयुर्वेद, युनानी, सिद्ध व होमिओपॅथी औषधांची वैधानिक गुणवत्ता दर्शक मानके निश्चित करून ती आयुर्वेदिक फार्माकोपिया ऑफ इंडिया (ए पी आय) मध्ये प्रसिद्ध करीत असते. भारतातील सर्व आयुर्वेदिक औषध निर्मात्यांनी त्यांच्या औषधासाठी या मानकांचे पालन करणे वैधानिकदृष्ट्या बंधनकारक आहे. बाजारात विक्री व वितरित केले जाणारे एखादे औषध या मानकांची पूर्तता करीत नाही. असे आढळल्यास ते औषध तयार करणाऱ्या संबंधित औषध निर्मात्याला कायदेशीररित्या आर्थिक दंडच नव्हे, तर प्रसंगी कैद सुद्धा होऊ शकते. ॲलोपॅथिक औषधांसंदर्भात असे घडल्याच्या अनेक बातम्या वृत्तपत्रातून आपल्या वाचनात येत असतात. पण आयुर्वेदिक औषधांबाबत काही वर्षापूर्वी उत्तर भारतात ऐन दिवाळीत अमृतसंजीवनी सुरा नावाचे अल्कोहोलयुक्त आयुर्वेदिक औषध सेवनाने मोठ्या संख्येत मुत्यू झाल्यामुळे झालेली कारवाई वगळता असे काही घडल्याचे प्रसंग अपवादात्मकच असतील.

मे २०२६ च्या शेवटच्या आठवड्यापासून महाराष्ट्रात मॅजिक रेमिडी ॲक्टचे उल्लंघन केल्यामुळे काही बड्या आयुर्वेदिक औषधी कंपन्यांच्या आयुर्वेदिक औषधांचे मोठे साठे महाराष्ट्र औषध नियंत्रण प्रशासन जप्त करीत असल्याच्या बातम्या सातत्याने वाचनात येत आहेत. यावरून महाराष्ट्र औषध प्रशासनाला या प्रश्नाचे गांभीर्य उमगू लागल्याचे दिसते. याचबरोबर निर्देशित वैधानिक गुणवत्ता मानकांची पूर्ती न करणाऱ्या आयुर्वेदिक औषधांवरही अशीच कारवाई अपेक्षित आहे.

सामान्य ग्राहकासाठी बाजारातून विक्री व वितरण केल्या जाणाऱ्या औषधांची गुणवत्ता ठरवून दिलेल्या वैधानिक मानकाप्रमाणे राखली जाते आहे, की नाही हे पाहणे हे जगभरातील औषध नियंत्रक यंत्रणांचे आद्य कर्तव्य असते. किंबहुना, त्यासाठीच या यंत्रणा निर्माण केलेल्या असतात. हे काम करण्यासाठी औषध निरीक्षकापासून ते आयुक्तापर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्यांची फौज तैनात केलेली असते. भारतात केंद्रीय स्तरावर सेंट्रल ड्रग्स स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन (CDSCO) ही संस्था देशभरातील औषध तसेच वैद्यकीय उपकरणे व सौंदर्य प्रसाधनांच्या मानकांचे निश्चितीकरण व नियमन करण्याचे काम करीत असते. तर प्रत्येक राज्यात विक्री व वितरण होणारी औषधे निर्देशित वैधानिक गुणवत्ता दर्शक मानकांची पूर्तता करतात की नाही, हे पाहण्याचे काम संबधित राज्य औषध नियंत्रण प्रशासनाचे असते.

**आयुर्वेदिक औषधांचे गुणवत्ता नियंत्रण**

भारतात ॲलोपॅथिक औषधांचे गुणवत्ता नियंत्रण व नियमन करणारी यंत्रणा प्रस्थापित झालेली आहे. ती अत्यंत प्रभावीपणे कार्यरतही आहे. पण आयुर्वेदिक औषधांच्या गुणवत्ता नियंत्रण व नियमनाची स्थिती मात्र अत्यंत दयनीय आहे. मुळात, आयुर्वेदिक औषधांच्या गुणवत्तेचे काही वैधानिक निकष अस्तित्वात आहेत, त्यावर नियंत्रणाची व नियमनाची आवश्यकता आहे, याचे औषध प्रशासनातील शासकीय

अधिकाऱ्यांना फारसे गांभीर्य नाही, असे दिसते. शासकीय अधिकाऱ्यांची ही परिस्थिती असेल तर सामान्य जनतेबद्दल तर बोलायलाच नको. आयुर्वेदिक औषधे नैसर्गिक आहेत त्यांनी काही हानी होत नाही, अशा समजापोटी जनतेतील सुसंस्कृत व उच्चशिक्षित वर्गातील बुद्धिमंतही आयुर्वेदिक औषधांची खरेदी स्वयंपाकासाठी मसाल्याच्या पुड्या खरेदी केल्यासारखी करीत असतात. त्यामुळे त्यांच्या मनात आयुर्वेदिक औषधाच्या गुणवत्तेबाबत काही प्रश्न निर्माण होत नाहीत.

आयुर्वेदिक औषधे वनस्पती, खनिज अथवा प्राणिज यापैकी एकाच प्रकारापासून किंवा तिन्ही प्रकारची अथवा कोणत्याही दोन प्रकारची द्रव्ये एकत्र मिसळून बनवलेली असू शकतात. ॲलोपॅथिक औषधांमध्ये औषधी कार्य करणारे एकच एक रासायनिक द्रव्य नेमक्या प्रमाणात मिसळलेले असते. त्यामुळे ॲलोपॅथिक औषधांमधील संबंधित रासायनिक द्रव्यांचे नेमके प्रमाण तपासून पाहणे सोपे असते. असे आयुर्वेदिक औषधांबाबत घडत नाही. कारण एखादे आयुर्वेदिक औषध एकाच द्रव्यापासून बनलेले असले तरी त्यात एकच एक नेमके रासायनिक द्रव्य असत नाही. वनस्पती औषधांचे उदाहरण घ्यायचे तर एका वनस्पतीमध्ये अनेक प्रकारची वानस्पतिक रसायने म्हणजेच फायटोकेमिकल्स असतात. त्या प्रत्येकाचे औषधातील प्रमाण तपासणे शक्य नसते. त्यातच आयुर्वेदिक औषध एकापेक्षा अधिक द्रव्ये मिसळून बनवलेले असेल, तर हे काम अशक्य होऊन जाते. त्यामुळेच आयुर्वेदिक औषधांच्या गुणवत्ता मानकांची निश्चिती करणे अत्यंत किचकट काम आहे. असे असले तरीही औषधातील रासायनिक द्रव्यांच्या प्रमाणावर विसंबून न राहता आयुर्वेदिक औषधी वनस्पती, खनिजे वा प्राणिज द्रव्ये यांची नेमकी ओळख व एकूण औषधी परिणामकारकता दर्शवणारी स्थूल मापने व त्यातील भेसळ व सूक्ष्मजीवसंसर्गाचे स्थूल मापदंड निश्चित करून ते आयुर्वेदिक फार्माकोपियामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. आयुर्वेदिक औषध निर्मात्यांनी त्यांच्या औषधासाठी या मापदंडांचे पालन करणे कायद्याने बंधनकारक आहे.

**आयुर्वेदिक फार्माकोपिया**

आयुर्वेदिक औषधामध्ये वापरल्या जाणाऱ्या एकूण ६६५ औषधी वनस्पती, खनिजे व प्राणिज द्रव्यांची गुणवत्ता निर्धारक मानके दर्शविणारे मोनोग्राफ फार्माकोपियाच्या पहिल्या भागाच्या १० खंडामध्ये प्रसिद्ध करण्यात आले आहेत. त्याचबरोबर फार्माकोपियाच्या दुसऱ्या भागाच्या पाच खंडातून २२४ तयार औषधांच्या गुणवत्तादर्शक मानकांचे मोनोग्राफ प्रसिद्ध झाले आहेत. फार्माकोपियामध्ये प्रसिद्ध झालेले कोणतेही औषध आयुर्वेदिक औषध निर्माता विक्रीसाठी तयार करीत असेल किंवा फार्माकोपियामध्ये उद्धृत औषधी द्रव्य वापरून अन्य एखादे औषध बनवत असेल, तर त्या औषधांनी वा द्रव्यांनी संबंधित मोनोग्राफमध्ये दर्शविलेल्या गुणवत्ता दर्शक मानकांची पूर्तता केलेली असणे औषधी निर्मात्यासाठी कायद्याने बंधनकारक आहे.

विक्री वा वितरित केले जाणारे आयुर्वेदिक औषध गुणवत्ता मानकांची अशी पूर्तता करीत नसेल तर संबधित औषधी निर्मात्याचा तो दंडनीय अपराध ठरतो. सामान्य वापरातील बहुसंख्य औषधी द्रव्यांचे गुणवत्ता निकष आयुर्वेदिक फार्माकोपियामध्ये प्रसिद्ध झालेले असले, तरी अशी अनेक औषधी द्रव्ये आहेत, की ज्यांची गुणवत्ता मानके निश्चित झालेली नाहीत. आयुर्वेदिक औषधांची गुणवत्ता मानके निश्चितीकरणाचे काम सतत सुरू असते. जशी जशी मानक निश्चिती होत जाते तशी तशी, ती मानके प्रसिद्ध करण्याचे कार्य संबंधित शासकीय यंत्रणा करीत असते.

औषधी उपयोग नाही, असे एकही द्रव्य जगात नाही. फक्त संबंधित द्रव्याचा वैद्याला औषधासाठी युक्तीपूर्वक वापर करता आला पाहिजे. अशा अर्थाचे एक विधान आयुर्वेदिक संहिता ग्रंथामध्ये आहे. एखादा औषध निर्माता फार्माकोपियामध्ये उल्लेख नसलेले एखादे आयुर्वेदिक औषधी द्रव्य त्याचे औषध बनवण्यासाठी वापरत असेल वा फार्माकोपियामध्ये उल्लेख नसलेले एखादे आयुर्वेदिक औषध तो बनवत असेल, तर त्याला स्वतःला संबंधित औषधाची गुणवत्ता मानके विकसित व निश्चित करून ती औषध नियंत्रकास सादर करून असे औषध बनवण्याचा परवाना प्राप्त करून घ्यावा लागतो व संबंधित औषधाची प्रत्येक बॅच तयार झाल्यानंतर ते औषध या मानकांची पूर्तता करत असल्याची खातरजमा करावी लागते.

**भेसळयुक्त, बनावट व मिसब्रॅण्डेड आयुर्वेदिक औषध**

खरेदी केलेल्या आयुर्वेदिक औषधाच्या गुणवत्तेविषयी शंका येत असेल अथवा खरेदी केलेले औषध क्षतिग्रस्त अथवा बुरशी लागून वा कीड लागून दूषित झालेले असेल तर अशा औषधाला औषध प्रसाधन अधिनियमाच्या कलम ३३ ईई अन्वये ॲडल्टरेटेड म्हणजे भेसळयुक्त औषध संबोधले जाते.

त्याचप्रमाणे एखाद्या प्रसिद्ध आयुर्वेदिक औषधाच्या नावाची, स्वरूपाची नक्कल करून एखादे औषध विकले जात असेल तर कलम ३३ ईईए अन्वये त्याला स्पुरियस म्हणजे बनावट औषध म्हटले जाते. संहिता ग्रंथामधील उल्लेखित औषधांच्या घटक द्रव्यांमध्ये अंशतःही बदल केल्यास त्या औषधांसाठी संहितोक्त नाव अथवा त्याला साधर्म्य दर्शवणारे नाव देऊन ते विक्रीसाठी बाजारात ठेवता येत नाही. उदा. च्यवनप्राश या प्रसिद्ध संहितोक्त आयुर्वेदिक औषधामध्ये साखरे ऐवजी सॅकरिन, ॲस्पार्टेम यासारखे गोडी निर्माण करणारे कृत्रिम रसायने टाकली असल्यास त्याला 'शुगर फ्री च्यवनप्राश' हे नाव देऊन त्याची विक्री करणे हा दंडनीय अपराध आहे. कारण असे औषध औषध प्रसाधन अधिनियमाच्या कलम ३३ ईईए अन्वये स्पुरियस म्हणजे बनावट औषध ठरते. कलम ३३ ई अन्वये औषधाची खराबी लपवण्यासाठी त्याला रंग वा सुगंध मिसळलेल्या अथवा चुकीचे लेबल लावलेल्या औषधाला 'मिसब्रँण्डेड' औषध म्हणतात.

**नाव तांब्याच्या खनिजाचे, विक्री लोह खनिजयुक्त औषधांची...**

आयुर्वेदिक औषधांच्या गुणवत्ता पालनाच्या नियमना–संबंधात औषध प्रशासन कसे बेफिकीर आहे, हे दर्शवण्यासाठी सुवर्णमाक्षिक भस्म या वैद्यवर्गामध्ये सुपरिचित आयुर्वेदिक औषधाचे एक उदाहरण पुरेसे आहे. सुवर्णमाक्षिक हे कॉपर पायराइट नावाचे तांब्याचे खनिज आहे. यामध्ये सामान्यतः ३५ टक्के तांबे आणि ३० टक्के लोह असते. आयुर्वेदिक फार्माकोपियातील सुवर्णमाक्षिकाच्या मोनोग्राफमध्ये निर्देशित मानकाप्रमाणे यात कमीत कमी ५ टक्के तांबे आणि २० टक्के लोह असणे आवश्यक आहे. नुकत्याच केलेल्या एका अभ्यासामध्ये बाजारातील सुवर्णमाक्षिक भस्माच्या ७ नमुन्यापैकी ६ नमुन्यामध्ये तांब्याचा अंशही सापडलेला नाही.

म्हणजेच, कॉपर पायराइटपासून बनवलेले औषध असे लेबल लावून आयर्न पायराइट या लोह खनिजाचे औषध विकले जात आहे. औषध प्रसाधन अधिनियमाच्या कलम ३३ ईईए अन्वये हे स्पुरियस म्हणजे बनावट औषध आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष संशोधन पत्रिकेत प्रसिद्ध होऊन ६ महिने होऊन गेलेत तरी आजही बाजारात असेच तांबे विरहित सुवर्णमाक्षिक भस्म विकले जात आहे व ते आमचे वैद्य बंधू नियमितपणे वापरत आहेत. याच प्रकारे हिऱ्याचे भस्म म्हणून काचेपासून बनवलेल्या भस्माची विक्री केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे. याचा अर्थ, सर्वच आयुर्वेदिक निर्माते अशा प्रकारात सामील आहेत असे नाही. काही आयुर्वेदिक औषध निर्माते वर्षानुवर्षे गुणवत्तापूर्ण औषध निर्मितीसाठी प्रसिद्ध आहेत. पण तरीही बनावट औषधी निर्मितीचे असे प्रकार वारंवार घडत आहेत हे निश्चित. औषध प्रशासनाला मात्र या प्रकारांची काही खबर लागत नाही आणि फिकीर तर अजिबातच नाही. मिसब्रॅण्डेड, ॲडल्टरेटेड किंवा स्पुरियस औषध विक्रीसाठी ठेवणे हा दंडनीय अपराध आहे. औषध निरिक्षकांनी याबाबत सातत्याने लक्ष द्यायला हवे. पण असे होताना कधी दिसत नाही. विशेष करून अनेक स्पुरियस आयुर्वेदिक औषधांची बाजारात उघड उघड विक्री होताना दिसत असते. त्याचमुळे बाजारातून आयुर्वेदिक औषध विकत घेताना ग्राहकांनी या सर्व गोष्टी पाहून घेणे आवश्यक आहे. असे काही आढळून आल्यास त्याची तक्रार औषध नियंत्रकाकडे करता येते. याबाबत ग्राहक मंचादी सामाजिक संस्थांनी पुढाकार घ्यायला हवा.

आयुर्वेदिक औषधांपासून काही हानी होत नाही समाजाच्या अशा दृढ समजामुळे या संबंधांत जागरूकता निर्माण करण्याचे प्रयत्न सातत्याने फोल ठरत आले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य औषध नियंत्रण प्रशासनाची जबाबदारी खूप वाढलेली आहे. ती ते प्रशासन ओळखेल तो सुदिन लवकर उजाडावा, अशी आपण आशा करू या.

**डॉ. श्रीराम सावरीकर हे एम. डी. (आयु), पीएच. डी. असून, आयुर्वेद प्राध्यापक तसेच गुजरात आयुर्वेद विद्यापीठाचे माजी कुलगुरू, भारत सरकारचे माजी आयुर्वेद सल्लागार आणि भारत सरकारच्या आयुर्वेद फार्माकोपिया समितीचे माजी अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची रसचंडांशु – हिन्दी टीका, शारंगधर संहिता – इंग्रजी टीका – तीन खंड, अर्वाचीन आयुर्वेदायन, आयुर्वेद – फाउंडेशन ऑफ हेल्दी लाइफ, इंग्रजी, वैद्यकीय सांख्यिकी शास्त्र – हिंदी आदी साहित्य प्रकाशित झाले आहे. संपर्क :** sssavrikar@gmail.com

## मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशनचा

# तळागाळातील गरजूंना मदतीचा हात





जिल्हा परिषद शाळा घोडपापड शाळेतील विद्यार्थ्यांना युनिफॉर्म वाटप.



बोअरवेल भूमीपूजन सोहळा.



फौंडेशनच्या सौजन्याने अंबीसत्ते हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ता. वाडा, जि. पालघर यांना साऊंड सिस्टीम व क्रीडा साहित्य पुरविले.




फौंडेशनच्या वतीने तालुक्यातील पाच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.



जिल्हा परिषद शाळा घोडपापड येथील शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्यासाठी नवीन बोअरवेल लोकार्पण समारंभ.



फौंडेशनच्या वतीने वर्षभर पुरेल एवढी वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल, चित्रकला साहित्य. स्कूल बॅग व रेनकोट वाटप.

* संत गाडगेबाबा ट्रस्ट या संस्थेतील गरजूंना अल्पोपहार व दोन्ही वेळचे जेवण मोफत देण्यात आले.
* मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन आणि जीवन विद्यामिशन, मुंबई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांसाठी संस्कार वर्ग व अंधश्रद्धा निर्मूलन शिबीर, तसेच व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन वेगवेगळ्या ठिकाणी केले जाते.

**- मंगला प्रभूखानोलकर फाऊंडेशन**

Samatawadi MuktSanvad Patrika
Monthly Magazine- Publishing date- 1st of every month
PRGI NO-MAHMAR/2023/86554

